20-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1



**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी.**: मराठी भाषेचा विकास व संवधर्नासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय

**मु.शी.**: मराठी भाषेचा विकास व संवधर्नासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय या विषयावर श्री दिवाकर रावते,डॉ.नीलम गोऱ्हे,डॉ.दीपक सावंत श्री.परशुराम उपरकर वि.प.स. यानी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी दीड तास वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"मराठी भाषेचा विकास व संवर्धानासाठी राज्य शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा नुकताच घेतलेला निर्णय, सदर विभागासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद करुन या विभागासाठी स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय, राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात तसेच राज्याच्या एकंदरीत सर्वच व्यवहारामध्ये मराठीचा 100 टक्के वापर करण्याबाबतची बाब राज्य शासनाने प्रस्तावित मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता, शासनाच्या सर्व स्तरावरील कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यात कसूर झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करुन त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेण्याची आवश्यकता, या बाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, राज्य शासनाने मराठी भाषेचा विकास आणि संवर्धनासाठी धोरण जाहीर केल्यानंतर अशाप्रकारचा प्रस्ताव आणण्याची काय गरज आहे असे समोरच्या बाकावरील सन्माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-2

AJIT/ SBT/ KTG/ 11:00

श्री.दिवाकर रावते.....

सदस्यांना वाटू लागेल. सरकारला असे धोरण घेण्याचे काय आवश्यकता पडली हे सांगण्याकरिता मी येथे उभा आहे. "नेमिची येतो मग पावसाळा" असे शासनाचे धोरण आहे आणि या उक्तीप्रमाणे दुर्दैवाने महाराष्ट्रात मराठी भाषेच्या बाबतीत ही गोष्ट कायम राहिलेली आहे हे मी येथे सिध्द करणार आहे. मराठी भाषेचा विकास करण्यासाठी जी समिती नेमली आहे त्या समितीचे सदस्य ही चर्चा ऐकण्याकरिता सभागृहाच्या गॅलरीत उपस्थित राहिले असते आणि या मराठी भाषेबाबत सभागृहाची काय मानसिकता आहे, काय भावना आहेत हे त्यांनी नोंदवून घेतले असते तर समितीला आणखी चांगल्या प्रकारे काम करण्यास मदत झाली असती आणि आम्हाला देखील आनंद झाला असता.

सभापती महोदय, मी या प्रस्तावात "ग्रामपंचायत स्तरापासून ते मंत्रालय स्तरापर्यंत" आणि "ग्रामपंचायत सदस्यांपासून ते मंत्र्यांपर्यंत" हे दोन महत्वाचे शब्द टाकले आहेत. तसेच मराठी भाषेचा वापर करण्यात कसूर करणाऱ्या सरकारी अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तिकेत "राज्य धोरणद्रोही" अशी नोंद घ्यावी असेही प्रस्तावित केलेले आहे.

या अल्पकालीन चर्चेवरील भाषणाची सुरुवात करताना मी कुसुमाग्रजांच्या काव्य पंक्तीने करणार आहे. कुसुमाग्रज मराठी भाषेतील शेक्सपियर आहेत. महाराष्ट्राच्या मातीला सुंगध देणाऱ्या आणि शेक्सपियरलाही नमविण्याची ताकद असलेल्या कुसुमाग्रजांचा विषय घेऊन मी भाषण करणार आहे. सन्माननीय सदस्या याठिकाणी उपस्थित असत्या तर मला आनंद झाला असता. आपल्याकडे शेक्सपियरपेक्षा श्रेष्ठत्व आहे हे मी त्यांना सांगू शकलो असतो. कुसुमाग्रजांच्या काव्यपंक्ती मी वाचून दाखवितो.

माझ्या मराठी मातीला, नका म्हणून हीन दीन,
स्वर्गलोकाहून थोर, मला तिचा अभिमान,
माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटीचा टिळा,
तिच्या संगे जगतील, माय देशातील शिळा

कुसुमाग्रजांनी त्या मातीचा टिळा करताना सांगितले आहे.

या मातीचा टिळा, कपाळी लावू,
जोवर वाहे गोदामाई, तोवर गाणे गाऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, काल दैनिक "सामना" मध्ये एक पत्र आले होते ते मी वाचून दाखवितो. "राजा हरिश्चंद्र नव्हे शेखचिल्ली" असे त्याचे शीर्षक आहे. त्यात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्याची राज्यभाषा मराठीचे धोरण ठरविण्यासाठी कायम स्वरुपी भाषा सल्लागार समिती स्थापन करण्याचा निर्णय राज्यमंत्रिमंडळाने घेतल्याचे वृत्त वाचनात आले.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 11.05

श्री.दिवाकर रावते .....

महाराष्ट्र वगळता इतर राज्य सरकार व तेथील विरोधी पक्ष देखील मातृ भाषाभिमान बाळगून आहेत आमचे राज्य सरकार स्वत:ला राजा हरिश्चंद्राचा अवतार असल्याचे समजून केवळ मुंबईच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र उप-यांना आंदण द्यावयास निघाले आहे. त्यामुळेच मराठी भाषेला ग्लानी आली आहे.आमच्याच राज्यात आम्हाला राजभाषेच्या रक्षणासाठी समिती नेमावी लागते त्यामुळे राजा हरिश्चंद्राच्या भूमिकेत असलेल्या राज्य सरकारची अवस्था कथेतील शेख चिल्ली सारखी झाली आहे. "

दिनांक 19 जुलै 2010 रोजीच्या सामना या वर्तमानपत्रात श्री. सुधीर कलगुटकर, दिवा यांचे वरील प्रमाणे पत्र प्रसिध्द झाले असून . राज्य शासनाने नेमलेल्या समितीच्या संदर्भात अशा प्रकारच्या लोकभावना व्यक्त झाल्या आहेत.

सभापती महोदय,मराठी भाषेच्या आग्रहासाठी माननीय मंत्र्यापासून मंत्रालयापर्यत मी जो पत्रव्यवहार केला होता त्यासबंधी मला देण्यात आलेली उत्तरे माझ्याकडे दहा नस्त्या भरतील एवढी आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी मला जुलै 2007 मध्ये लिहिलेले एक पत्र माझ्याकडे आहे. त्यात त्यांनी असे म्हटले होते की, " राज्यात शासकीय कामकाजामध्ये मराठीचा वापर करण्यांसंबंधीचे पत्र मिळाले प्रस्तुत प्रकरणी लक्ष घालून या बाबतीत केलेली कार्यवाही आपणास कळविण्यासबंधी मी प्रधान सचिव,सामान्य प्रशासन विभाग यांना कळविले आहे". त्या पत्रावर त्यांनी मराठीतून सही केली होती. अशा प्रकारे त्यांनी मराठीतून सही केली होती म्हणून मला आनंद झाला होता.त्यानंतर त्यांनी मला दुसरे पत्र पाठविले होते त्या पत्रात त्यांनी असे म्हटले होते की, ".दिनांक 20 एप्रिल 2007 रोजी दैनिक लोकसत्तामध्ये प्रसिध्द झालेल्या मराठी भाषा संचालनालयाच्या संबंधित लेखाच्या अनुषंगाने लिहिलेले दिनांक 20 जुलै 2007 रोजीचे पत्र मला मिळाले आहे." मराठी भाषा संचालनालयाची अवस्था कशी आहे हे सांगणारा लोकसत्ता या वर्तमानपत्रातील लेखच मी त्यांच्याकडे पाठविला होता. त्या पत्राला माननीय मुख्यमंत्र्यांची पोच दिली होती. त्या पत्रावर देखील आदरणीय श्री विलासराव देशमुख यांनी मराठीतून सही केली होती याचा मला आनंद होत आहे.

सभापती महोदय, विधान परिषदेवर मी निवडून आल्यानंतर माझे अभिनंदन करणारे पत्र

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

माननीय मुख्यमंत्री श्री अशोक चव्हाण यांनी मला दिनांक 11 जून 2010 रोजी पाठविले होते आणि त्या पत्रावर त्यांनी मात्र इंग्रजीतून सही केली होती. ग्रामपंचायती पासून मंत्रालयापर्यतच्या सर्व शासकीय कामकाजामध्ये मराठीचा वापर झाला पाहिजे परंतु प्रत्यक्षात तों होतांना दिसत नाही. माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील "आर.आर." असे नाव लिहितात तेव्हा त्यांचे खरे नाव काय आहे ? हे मला अजूनही कळलेले नाही. आर.आर.चा नेमका अर्थ काय आहे? त्यांना हे नाव मराठीतून लिहिण्यास लाज वाटते काय ? मी जेव्हा मंत्रालयातील इंग्रजीतून लिहिलेल्या पाटया काढण्यासाठी गेलो होतो तेव्हा त्यांनी आपली पाटी काढून ठेवली होती ही पाटी त्यांनी अजून लावली किंवा नाही हे मला माहीत नाही. परंतु त्यावेळी आबांनी धाबरुन पाटी काढून ठेवली होती.परंतु स्वत:चे नाव मराठीतून लिहिण्यास त्यांना लाज का वाटते हे मला समजत नाही. त्यामुळे मंत्रालयात जोपर्यत माननीय मंत्री आपले शुध्दीकरण करीत नाहीत तोपर्यत मराठी भाषा शुध्दीकरणासंबंधीचा प्रकल्प तेथील अधिकारी हातात घेतील असे मला वाटत नाही. म्हणून त्याचा प्रारंभ स्वत:कडूनच झाला पाहिजे.हे मी या ठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो आणि माननीय गृहमंत्री श्री.पाटील यांनी स्वत: पासून सुरुवात करावी अशी मी त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, मराठीच्या संदर्भात दिनांक 30 मार्च 2007 रोजी या सभागृहात पाच दिवस चर्चा झाली होती. या सभागृहातील बहुतांशी सन्माननीय सदस्यांनी मराठीचा अभिमान बाळगत प्रथमत: विधीमंडळ निर्माण झाल्यापासून पाच दिवस मराठीवर चर्चा उपस्थित केली होती. याचा मला अभिमान वाटतो आणि आनंदही वाटतो . दिनांक 30 मार्च 2007 रोजी ही चर्चा सुरु झाली होती आणि ती पाच दिवस चालली होती.या राज्यामध्ये मराठीची आवश्यकता, राजभाषेची आवश्यकता या सारखे अनेक मुद्दे त्या चर्चेच्या वेळी मांडण्यात आले होते. सर्व सन्माननीय सदस्यांनी केलेल्या भाषणांचे पुस्तक छापावयाचे ठरविले तर जवळजवळ 200 पानांचे पुस्तक होईल .अशा प्रकारे एवढे ज्ञान पाजळणचा आम्ही येथे प्रयत्न केला होता असे दुर्देवाने म्हणावेसे वाटते. परंतु इतकी चर्चा होऊनही त्याचा शासनावर काहीही परिणाम झालेला नाही.

सभापती महोदय, राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मराठवाडयातील श्री नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आल्याबद्दल मला आनद वाटला

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

होता. मराठवाडयातील अनेक चांगल्या साहित्यिकांचा या समितीमध्ये समावेश करण्यात आला होता त्याबद्दल मी आनंद व्यक्त करतो.श्री.नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमण्यात आली आहे त्या समितीचे धोरण काय आहे अशा प्रकारचा विषय निर्माण होणार आहे.राज्याची राजभाषा मराठीचे धोरण ठरविण्यासाठी निवृत्त न्यायाधीश श्री नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली कायम स्वरुपी भाषा सल्लागार समिती गठित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये या महाराष्ट्रामध्ये राज्य सरकारला मराठी राजभाषा व्हावी याकरिता समिती स्थापन करावी लागते . गेल्या 50 वर्षात मराठी भाषेचे किती अवमूल्यन सरकारने केले आहे याचे हे एक बोलके उदाहरण आहे.हा अभिमानाचा भाग नाही तर आपले नाकर्तेपणा दाखविण्याचा भाग आहे. वेळ गेलेली असली तरी या वेळी भाषेच्या संदर्भात समिती स्थापन करुन सुवर्ण महोत्सवी वर्षात शासन काम करणार असल्यामुळे त्याबद्दल आनंद व्यक्त करीत असतांना त्यातूनच हा ठराव निर्माण झालेला आहे हे मी आपणास सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या संदर्भात मी घोषा लावला होता आणि सातत्याने पाठपुरावा करावयास लागलो होतो परंतु दुर्देवाने त्याचा काहीही परिणाम होत नव्हता. मराठी भाषेबद्दल राज्यकर्त्याची मानसिकताच जर बिघडलेली असेल तर कोणत्या शब्दात मी त्यांचा धिक्कार करावयाचा ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, तत्कालीन वित्तमंत्री नामदार श्री. जयंत पाटील यांना मी एक पत्र लिहिले होते, ते संपूर्ण वाचून न दाखविता माझा संताप व्यक्त करण्यासाठी त्यातील शेवटचे वाक्य वाचून दाखवितो. ते वाक्य असे आहे की, "आपणच मीठ खाऊन मराठीचा अवमान करणाऱ्या या औलादीला धडा शिकविण्याऐवजी मलाच अटक करण्यामध्ये पुरुषार्थ दाखविणाऱ्या या शासनाला कोणते शालजोडे मारावेत? " हा मी त्यांना प्रश्न विचारला होता. कारण त्यावेळी मला अटक झाली होती. मी फक्त या सर्व पाटया मराठीमध्ये करा असे सांगावयास गेलो होतो. जेव्हा जेव्हा मी मंत्रालयामध्ये पाऊल ठेवतो तेव्हा तेव्हा मराठी पाटया लावण्याचा आग्रह धरतो. मला आनंद आहे की, ज्यांना आपण तथाकथित आय.ए.एस. अधिकारी म्हणतो, त्या राजपत्रित अधिकाऱ्यांना राजपत्रित अधिकारी म्हटले की, बरे वाटत नाही. त्यांना इंग्रजी भाषेमध्ये आय.ए.एस. अधिकारी म्हटले की, बरे वाटते. I am somebody. परंतु आपल्याला राजपत्रित अधिकारी म्हटल्यानंतर आपण कुणीतरी आहोत असे भासत नाही. ही अधिकाऱ्यांची मानसिकता झालेली आहे, त्या संदर्भात मला एवढेच दु:ख होते की, मी एक मराठीचा फटका मारला होता, त्यामुळे मला अटक झाली. त्यानंतर सरकारने तातडीने जे परिपत्रक काढले त्यामध्ये या तथाकथित सरकार चालविणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्यांना मात्र त्यांचे नाव इंग्रजीमध्ये लिहिण्यास मुभा दिली. ती मुभा कां दिली? हा मला प्रश्न पडलेला आहे. या सर्व अधिकाऱ्यांना कुणी आमंत्रण दिले होते. ज्यावेळी ते आय.ए.एस. होतात त्यावेळी त्यांना आपले राज्य निवडण्यास सांगितले जाते. त्यावेळी त्यांनी आपले महाराष्ट्र राज्य निवडले. कारण महाराष्ट्र राज्यामध्ये स्थैर्य आहे, सर्व काही व्यवस्थित आहे,काम करण्यासाठी चांगली परिस्थिती आहे. जास्तीत जास्त अधिकारी आपले महाराष्ट्र राज्य निवडतात. हे राज्य निवडल्यानंतर व या ठिकाणी आल्यानंतर आपल्या आई-वडिलांनी ठेवलेले नाव आहे त्या पध्दतीने लिहिण्याकरिता कायद्यामध्ये तरतूद असल्यामुळे जर ते नाव मराठीत असेल तर मराठीत लिहिले पाहिजे. मी जर दिवाकर नारायण रावते असेन तर मराठीमध्ये दि.ना. रावते असे लिहिले पाहिजे. इंग्रजीमध्ये D.N.RAWATE असे लिहिलेले चालते. परंतु या अधिकाऱ्यांना सरकारने त्यामध्ये सूट देऊन त्यांची मस्ती कां चालू ठेवली आहे? याचे उत्तर मला मिळाले नाही. ते उत्तर मला मंत्रिमहोदयांच्या उत्तराच्या भाषणामधून मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, ही घटनात्मक चर्चा असून दिवाकर रावते यांना वाटते म्हणून निर्माण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते...

झालेली नाही. किंवा या सभागृहामध्ये कुणाला वाटते म्हणून आम्ही चर्चा करीत नाही. भारतीय राज्य घटनेच्या 350 व्या कलमानुसार आपली गाऱ्हाणी रेल्वे, टपाल, प्राप्तीकर,आयुर्विमा महामंडळ, विमामंडळ, सार्वजनिक बँका, महानगर टेलिफोन निगम इत्यादी भारत सरकारच्या आस्थापनेकडे मराठीमधून सादर करण्याचा आपल्याला हक्क आहे. या सभागृहामध्ये आपण त्रिभाषा-सूत्र संदर्भात ठराव मंजूर केला. जर संविधानाच्या 350 व्या कलमामध्ये तरतूद असेल तर मराठी भाषा ही राजभाषा म्हणून सर्व ठिकाणी वापरली गेली पाहिजे. त्याबाबतीत कायदेशीर तरतूद आहे. तशाप्रकारचा ठराव संमत होऊन 4 महिने झाले आहेत. परंतु त्या ठरावाची अजूनपर्यंत कोणतेही अधिकारी कार्यवाही करीत आहेत असे मला वाटत नाही. त्या संदर्भातील काही सचित्र उदाहरणे आपणापुढे मांडणार आहे. शासनाचे सामान्य प्रशासन विभाग कशासाठी निर्माण करण्यात आले आहेत? ते शासनाचे परिपत्रक कां अंमलात आणीत नाहीत? या संदर्भात विविध उदाहरणे याठिकाणी मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. आणि त्याबाबतीत दोषारोप ठेवणारे उत्तर मला मिळाले पाहिजे अशी ही उदाहरणे देण्यामागची माझी भावना आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. परशुराम उपरकर)**

याठिकाणी घटनात्मक बाब मांडीत असतांना अर्जाचे नमुने, माहिती देणारे अर्ज हे मराठीमध्ये छापलेले असले पाहिजेत, अशाप्रकारचे ऑफिशिअल मेमोरांडम, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स यांनी काढलेले आहे. सर्व राज्यांमध्ये त्या त्या भाषेचा सन्मान राखला गेला पाहिजे असे ज्यावेळी केंद्र सरकार ठरविते, त्यावेळी आमच्या राज्यामध्ये ते परिपत्रक अंमलात येत नाही. माझ्याकडे दि. 25 मार्च 1968, न्यू दिल्ली 11 या तारखेचे एक "IMMEDIATE" म्हणून परिपत्रक आहे. केंद्र शासनाने 1968 साली निर्देश दिल्यानंतर आज आपले राज्य सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असतांना सुध्दा त्याची अंमलबजावणी आपल्या राज्यामध्ये होत नाही, याची सर्व जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे आहे. या सभागृहाने ठराव संमत केल्यानंतर सुध्दा ते अंमलात आणीत नाहीत. या संदर्भात आपण कुणाला दोषी धरणार आहात? हा माझ्यापुढे प्रश्न आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीला परभणीला जायला सुरुवात केली त्यावेळी परभणी रेल्वे स्टेशनवर मराठी हा विषयच अस्तित्वात नव्हता. त्या रेल्वे स्टेशनवर आंध्र प्रदेशच्या तेलगू भाषेमध्ये किंवा हिंदी भाषेमध्ये उद्‌घोषणा होत असे. तिथे गेल्यानंतर व मी आंदोलन सुरु केल्यानंतर मराठीमध्ये उद्‌घोषणा सुरु झाली. त्यानंतर मराठवाडयाच्या संभाजीनगर ते नांदेड या पट्टयामध्ये पूर्णपणे मराठीमध्ये उद्‌घोषणा होते. तेथील रेल्वे स्थानकामध्ये प्रवाश्यांच्या माहितीसाठी इतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते....

भाषेतील चार सूचना फलक लावण्यात आले होते ते मराठीमध्ये नसल्यामुळे त्यांना डांबर फासले आहे. माझ्या शिवसैनिकांनी त्या रेल्वे स्टेशनमध्ये जाऊन त्या पाटयांना डांबर फासले होते. त्यानंतर त्या पाटया मराठीमध्ये असल्या पाहिजेत असा वेस्टर्न रेल्वेने क्रमांक जी-152/4-1/सी-8,2002, डिव्हिजन ऑफिस मुंबई सेंट्रल, मुंबई दि. 25 मे, 2002 रोजी आदेश काढला होता.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

आजही काही ठिकाणी या पाटया मराठीत आहेत की नाही हे तपासून पहावे. आम्ही आंदोलन करत रहावे अशी तुमची भूमिका आहे काय? तुमचेच राज्य, तुमचेच कर्तृत्व, तुमचेच आदेश तुम्ही पायदळी तुडवत सुटता आणि मराठीचा अवमान करत आहात.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचे दु:ख झाले. बँकेच्या संदर्भात अशा प्रकारचे आदेश आहेत. बँकेमध्ये जे कागदपत्र देण्यात येतात, मग ती पैसे काढण्याची स्लीप असली तरी ती प्रथम मराठीमध्ये असली पाहिजे त्यानंतर मग ती हिंदी आणि इंग्रजीमध्ये असली पाहिजे. आज मी छातीवर हात ठेवून सांगतो की, संपूर्ण महाराष्ट्रातील बँकाचे सोडून द्या पण मुंबईमधील 90 टक्के बँकांमध्ये तशी परिस्थिती नाही. या सभागृहात ठराव केल्यानंतर त्याची अंमलबजावणी मुंबईमध्ये सुध्दा झालेली नाही. या संबंधात जास्त लांब जाण्याची गरज नाही. आम्ही म्हाडामध्ये गेलो आणि म्हाडाचा फॉर्म भरला. अर्थात तो फॉर्म तेथील अधिकाऱ्यानेच भरुन दिला आम्ही त्यावर फक्त सही केली. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक महाराष्ट्राची आहे पण हे सर्व इंग्रजीमध्ये आहे. (बँकेचे डाक्युमेंट सभागृहात दाखविले ) या बँकेचे प्रमुख कोण आहेत? महाराष्ट्राचे युवराज श्री. अजित पवार यांच्या नेवृत्वाखाली ही बँक चालते. मराठी भाषेचा अभिमान महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये नसेल तर दुसऱ्या बँकेला कसे काय शिकविणार ? सभापती महोदय, यासबंधीचे सर्व डाक्युमेंन्ट मी आपल्याकडे तसेच संबंधित माननीय मंत्रिमहोदयांकडे पाठविणार आहे. यासंदर्भात शासन काय घोषणा करणार ती आम्हाला आज कळली पाहिजे. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक सहकार खात्याच्या अधिपत्याखाली आहे. मातृ भाषेचा अवमान करणाऱ्या या बँकच्या संदर्भात शासन कोणती भूमिका घेणार आहे हे सदनाला आजच्या आज समजले पाहिजे. इतर बँकामध्ये मराठीकरण किती दिवसात होईल हे सांगितले पाहिजे. यासंदर्भात शासनाने दिलेल्या मुदतीच्या आत शासनाने हे लिहून घ्यावे. कारण सन्माननीय मंत्रिमहोदयांना यासंदर्भात उत्तराच्या भाषणात सांगावयाचे आहे की, एका महिन्याच्या आत सर्व बँकाना तंबी देऊ आणि सर्व कारभार मराठीत करावयाला सांगू अन्यथा त्यानंतर शिवसेना याबाबतीत उग्र आंदोलन केल्या शिवाय रहाणार नाही. आणि शिवसैनिक बँका-बँकातील स्लीपा नष्ट करायला लागले व पोलिसी बळाचा वापर करुन शिवसैनिकांवर गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्र राज्य भाषा द्रोही म्हणून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सरकारला नामशेष करु हे मी याठिकाणी जाहीररित्या सांगू इच्छितो. नावाच्या पाटया आणि सूचना फलक मराठीतच असले पाहिजेत अशा प्रकारची सूचना केंद्र सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स डिपार्टमेन्ट ऑफिशअल लॅग्वेजेस यांनी दि.18/7/1977 रोजी दिली होती. 1977 साली केंद्र सरकारने त्या त्या राज्यामध्ये त्या त्या दुकानदारांच्या आस्थापनेच्या भाषा त्या त्या भाषेत असल्या पाहिजे. महाराष्ट्राच्या मराठीत असल्या पाहिजेत असा आदेश काढल्यानंतर सुध्दा मला स्वत:ला या संदर्भात आंदोलन करावे लागले आणि आंदोलन करुनही त्याचा परिणाम झाला नाही. कोण तो विरेन शहा येथे येतो. धंदा करायला उभा रहातो. त्याला या राज्यामध्ये मराठीत पाटी लावायला सांगितली तर तो कोर्टात जातो.त्याला बदडायला गेलो तर कायदा व सुव्यवस्था चालविणाऱ्या या शासनाला विरेन शहा महत्वाचा वाटतो. आणि मराठी भाषेच्या स्वाभिमानी लोकांना तुरुंगात टाकण्यात येते. चॅनेल्सवरील त्या बाबतच्या चर्चेमध्ये मी सहभागी झालो होतो. श्री. विरेन शहाला पॅंट सोडून पळून जाण्याची पाळी आली होती एवढे मी त्याला टी.व्ही.च्या माध्यमातून धाब्यावर धरले होते. आमच्या राज्यात येऊन कोणाला शिकविता? मराठी पाटया लिहायला सांगितले तर त्या विरोधात तो कोर्टात जातो आणि केंद्र सरकारचा आदेश असताना देखील कोर्ट त्या संदर्भात रीटपिटिशन दखल करुन घेते असे असेल तर यापुढे न्यायालयाच्या बाबतीत आम्ही काय समजायचे?

सभापती महोदय, टपाल खात्याच्या नावाच्या पाटया आणि सूचना फलक मराठीत असले पाहिजेत असे आदेश चिफ पोस्ट मास्टर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई - 400 001 यांनी दिनांक 22/11/1985 रोजी काढले. त्याची अंमलबजावणी होते की नाही हे कोणी पहायचे? हे कलेक्टर आणि जिल्हाधिकाऱ्यांनी पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, ऑफिशिअल मेमोरॅन्डम सुध्दा मराठीत असले पाहिजेत अशा प्रकारचे आदेश डायरेक्टर रिसर्च,पुणे यांनी काढले होते. विधी व न्याय विभागाने महाराष्ट्र राजभाषा अधिनियम 1964 अंतर्गत राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक 11 जानेवारी, 1965 रोजी प्रथम इंग्रजीमध्ये प्रसिध्द केले त्यानंतर राज्याच्या विधिमंडळाच्या प्रयोजनार्थ, राज्याच्या शासकीय प्रयोजनाकरिता, वापराकरिता अंगिकारावयाची भाषा अंगिकारण्यासाठी तरतूद करण्याबाबतचा अधिनियम 1964... मी या ठिकाणी हा अधिनियम पूर्ण

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

वाचून दाखवित नाही. तो शासनाकडे आहे. माननीय मंत्रिमहोदयानी तो मागवून घ्यावा आणि मला उत्तर देण्यापूर्वी वाचावा. 1964 साली काढलेल्या नियमाप्रमाणे शासन काम का करीत नाही, हा या ठिकणाी प्रश्न निर्माण होतो. शासकीय व्यवहारातील मराठी भाषेच्या वापराच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने काही आदेश काढले होते त्या आदेशाची संपूर्ण सूची माझ्याकडे आहे. दिनांक 18 मे, 1982 रोजी एक आदेश काढण्यात आला.

यानंतर श्री. बरवड....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यानंतर शासन स्तरावर मराठीचा संपूर्ण वापर यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाचे 1985 चे आदेश आहेत. शासन व्यवहारात मराठीचा संपूर्ण वापर, तातडीची उपाययोजना याबाबतचे आदेश काढलेले आहेत. 1966 सालच्या आदेशाला चुना लावला, त्याला मूठमाती दिल्यामुळे 1985 सालचे आदेश निघाले. तातडीची उपाययोजना म्हणून हे आदेश 30 एप्रिल, 1985 रोजी आढण्यात आले. "कोडग्या कोडग्या लाज नाही कालची गोष्ट आज नाही" अशा प्रकारे जर जे अधिकारी वागत असतील तर ही जी सारखी परिपत्रके काढलेली आहेत त्याच्या सुरळ्या करुन त्याचे काय करावयाचे, कोठे त्यांच्या कानामध्ये कोंबावयाच्या हा प्रश्न निर्माण झालेला आहे. एवढे आपण बधीर झालेला आहेत काय ? या राज्याचा पगार खातात, या राज्याचे मीठ खातात आणि एवढे आदेश काढल्यानंतर सुध्दा अंमलबजावणी करीत नाहीत. आज मी अत्यंत कडवटपणे बोलण्यासाठी उभा आहे. एवढे आदेश काढल्यानंतर सुध्दा या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये राज्याला एक समिती नेमावी लागते. 1966 सालापासूनचे अनेक आदेश आहेत. मराठी भाषेच्या संदर्भामध्ये निर्भत्सना निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निर्लज्जपणाचा हा कळस निर्माण झालेला आहे. म्हणून हे कडवटपणे बोलावे लागते.

सभापती महोदय, मुंबईसह महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी असल्याबाबतचा सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. माझ्याकडे सुप्रीम कोर्टाचा पूर्ण निर्णय आहे. मराठी भाषाच वापरली पाहिजे असा दिल्लीच्या सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. घटनेला धरुन त्यांनी हा निर्णय दिलेला आहे. हा संपूर्ण निर्णय वाचावयाचा झाला तर मला किमान एक ते दीड तास वेळ लागेल एवढा तो निर्णय आहे. तरीही आमच्यावर काही परिणाम होत नाही. तो संपूर्ण् निर्णय माझ्याकडे आहे. माझ्याकडे संपूर्ण निर्णय असताना तो निर्णय राज्य शासनाकडे नाही असे मी म्हणू शकतो काय ? तसे नाही. सामान्य प्रशासन विभागाने सांगून ऐकत नाहीत, सर्वोच्च न्यायालयाने सांगून ऐकत नाहीत. या सभागृहामध्ये 2007 साली पाच दिवस चर्चा झाली तरी त्याचा काही परिणाम होत नाही.

सभापती महोदय, माझ्याकडे त्यानंतरचा 1966 चा शासन आदेश आहे. त्यामध्ये काय काय लिहिले आहे ते सगळे वाचत नाही. परंतु ही सर्व परिस्थिती निर्माण झाल्यानंतर कालपरवा आम्हा सर्व आमदारांना एक पत्र आलेले आहे. 6 नोव्हेंबर, 2006 चा महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते ....

विभागाचा जो आदेश आहे त्या अनुषंगाने मराठीच्या संदर्भामध्ये त्यामध्ये एक टिप्पणी दिलेली आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "सर्व शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, मराठी पाठ्यपुस्तके इत्यादीमध्ये तसेच ज्या ज्या ठिकाणी मराठी भाषेचा वापर होतो अथवा भविष्यात केला जाणार आहे अशा सर्व ठिकाणी हस्तलेखन, टंकलेखन, मुद्रित, संगणक इत्यादी बाबीसाठी सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या देवनागरी लिपीतील प्रमाणीकृत मराठी वर्णमालेचा, अक्षरमालेचा व अंकांचा शासनाने स्वीकार केला आहे व त्यानुसार वर्णमालेच्या संदर्भात स्पष्टीकरण तसेच विशिष्ट अक्षराच्या लेखनाच्या सूचना समाविष्ट केल्या आहेत." यामध्ये जोडपत्र देऊन वर्णमाला कशी आहे ती आता आम्हाला काल आलेली आहे. दुर्दैव असे आहे की, या महाराष्ट्रामध्येच चर्चा होते. कन्नड भागात किंवा तामीळनाडूमध्ये किंवा हैद्राबादमध्ये जाऊन बोलण्याची आमची हिंमत होणार नाही. मी गेल्या वर्षी नागपूरहून येत असताना सध्याकाळचे वर्तमानपत्र वाचावयास घेतले. त्यामध्ये इंग्रजी छापून आलेले आहे. तुला मराठी येते काय ? मग त्यावर चर्चा घडविली आहे. त्यामध्ये श्री. सय्यद मुजाहिद नावाची व्यक्ती आहे त्याने स्वत: बिझनेसमन असल्याचे छापले आहे. त्याने असे म्हटले आहे की, "

" Dealing with routine official work will also become problematic for so many people. Choosing Hindi, instead of Marathi, would still be better because a wide spectrum of society can understand this language. Moreover, Hindi is also our national language." म्हणजे आता या महाराष्ट्राचे मराठीकरण लुप्त होत असताना मराठीचे काय होणार हे सर्व दिसावयास लागले आहे. एवढे परप्रातीय भाषिक आलेले आहेत त्यावर मी नंतर बोलणार आहे. आमचा श्री. बंडू काळवीट नावाचा मराठी माणूस आहे. काळवीट आडनाव विदर्भामध्ये आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, "In my view, such decisions will further increase this language divide. In today's advancing world if we still carry on implementing such issues, then how will our kids do better in days to come?"

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 11:25

श्री.दिवाकर रावते.....

आपली मुले इंग्रजी शाळेमध्ये गेलीच पाहिजेत अट्टाहास असलेल्या पालकांचे हे प्रतिनिधी आहेत. या पालक वर्गाचे हे प्रतिनिधीत्व करतात. अशा या प्रतिक्रिया वर्तमानपत्रातून येतात. हे एकच नाही तर भरपूर उदाहरणे आहेत. शितावरुन भाताची परीक्षा घेतात असे म्हणतात. परंतु येथे एवढी शिते आहेत की त्यामुळे भात किती पातेले असेल असा प्रश्न निर्माण होतो. सतत इंग्रजी माध्यमाच्या वर्तमानपत्रातून आपल्या मराठीवर टिपण्णी केली जाते.

सभापती महोदय, मला मराठीचा अभिमान वाटतो, वि.वा.शिरवाडकर यांचा अभिमान वाटतो. केवळ मराठी भाषेकरिता त्यांनी साहित्य निर्माण केले म्हणून त्यांचा अभिमान वाटतो अशातील भाग नाही. त्यांनी सरकारला सतत सांगण्याचा प्रयत्न केला आहे. तो मी येथे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. मराठीतील शेक्सपीयरला मागे टाकील असे साहित्यातील त्यांचे उत्त्युंग व्यक्तिमत्व आहे. 1964 साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमलेन, मडगांव, गोवा येथे झाले होते. त्याठिकाणी त्यांनी केलेले संपूर्ण भाषण मी येथे वाचू शकत नाही. परंतु त्या भाषणात त्यांनी असे म्हटले होते की, "राज्य व्यवहारामध्ये सर्व पातळयांवर मराठी भाषेचा व फक्त मराठी भाषेचाच वापर होणे, त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात विद्यापीठातील सर्व अभ्यासक्रमासाठी मराठी केवळ उपलब्ध नव्हे तर रुढ करणे हे आज आवश्यक आहे, अपरिहार्य आहे. भाषेच्या संबंधात जी अर्धवट व अनिश्‍चित धोरणे सध्या वापरली जात आहेत. ती मला तरी निषेधार्ह वाटतात. इंग्रजीचा आश्रय घेतल्याशिवाय शासकीय किंवा अन्य क्षेत्रातील वरच्या दर्जाचे व्यवहार आम्हाला चांगल्या रितीने करता येणार नाही अशी समजूत कित्येकांच्या मनात रुजून बसली आहे आणि हे कित्येक अधिकाराच्या सिंहासनावर किंवा त्या सिंहासनाच्या जवळपास असल्यामुळे लोकांना न समजणाऱ्या भाषेत चालणारी लोकशाही हे अद्‌भूत नवल या देशात घडत आहे." लोकांना न समजणाऱ्या भाषेत चालणारी लोकशाही हे अद्‌भूत नवल असे तात्या शिरवाडकर यांनी 1964 साली मडगांव, गोवा येथे म्हटले आहे. त्यांनी केलेले संपूर्ण भाषण भाषा विषयक आहे. माननीय मंत्री महोदयांना हे पाहिजे असेल तर मी देण्यास तयार आहे किंवा त्यांनी ते उपलब्ध करुन घ्यावे. भाषा कशी अंमलात आणावी यासंदर्भात जी समिती नेमली आहे. त्यासंबंधी 1964 साली तात्यांनी जे म्हटले होते तेवढे जरी शासनाने केले तरी मराठी भाषेचा ठसा उमटेल. एवढे बारीक सारीक त्यांनी भाषणात नमूद केलेले आहे.

2...



NTK/ SBT/ KTG/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

महाराष्ट्रातील मराठी भाषा कशी असावी हे गोव्यातील साहित्य संमलेनात त्यांना सांगावे लागले. त्यांना भविष्यातील सरकारचा नाकर्तेपणा दिसत असावा म्हणून त्यांनी सांगितले असावे.

माझ्याकडे दिनांक 24 ऑक्टोबर रोजीचे 'सामना' हे वर्तमानपत्र आहे. त्यामध्ये शिवसेनेचे श्री.संजय राऊत यांनी लिहिलेले आहे. त्यात ते असे म्हणतात की, मुंबईतून मराठी माणूस हद्दपार झाला आहे. पण महाराष्ट्रातही मराठी माणसांच्या संख्येत कमालीची घसरण दिवसेंदिवस होत आहे, हे सर्व शासकीय अहवालात समोर आलेले आहे. 1998-99 पासून हिंदुस्थानची आर्थिक पाहणी करण्यात आली आहे. त्यात महाराष्ट्रातील मराठी भाषिकांची संख्या कमी होत असून हिंदी भाषिक लोकांची संख्या झपाटयाने वाढत चालली आहे. या अहवालानुसार 1971 साली महाराष्ट्रात मराठी भाषिकांची संख्या 76.6 टक्के होती ती 1991 मध्ये 73.3 टक्के एवढयावर येऊन ठेपली. फक्त 20 वर्षात मराठी भाषिकांची संख्या 3.3 टक्क्यांनी घटली व याच काळात हिंदी भाषिकांची संख्या 2.9 टक्क्यांनी वाढली. 1991 च्या जनगणनेनुसार हिंदी भाषिकांची संख्या 7.8 टक्के झाली आहे. परराज्यातून येणारे लोंढे महाराष्ट्रात बिंबविण्यात येत आहेत, मराठी भाषेची गळचेपी होत आहे हे सत्य त्यात मांडण्यात आले आहे. सभापती महोदय, दिनांक 3 मार्च, 1991 रोजी मराठीचे संवर्धन यासंबंधात भाष्य केले होते. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, मराठी भाषेच्या संवर्धनाचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. भाषा ही माजघरात वाढत नाही. ती सर्व क्षेत्रात पुढे आली पाहिजे. भाषिक राज्यात भाषेचा विचार होईल असे वाटत होते. या राज्य सरकारने 1964 साली सांगूनही ऐकले नसल्यामुळे त्यांनी 1991 साली खंत व्यक्त केली आहे. ते असे म्हणतात की "भाषिक राज्यात भाषेचा विचार होईल असे वाटले होते, परंतु महाराष्ट्रात जे घडत आहे ते विपरित आहे. इंग्रजांच्या राज्यात इंग्रजीचा जेवढा झाला नाही, तेवढा प्रचार आज या भाषेचा झाला आहे, होत आहे. मराठीबाबत अनास्थाच वाढत नाही तर तिच्या प्रगतीच्या प्रेरणेचे खच्चीकरण होत आहे, मला इंग्रजीबद्दल आदर आहे. परंतु आपल्या आईला मदर व वडिलांना फादर असे शिकवले जाते हे लज्जास्पद आहे. हा इंग्रजी हटावचा प्रश्न नसून मराठी जपण्याचा प्रश्न आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम महाराजांची मराठी भाषा ही कोणी मारली म्हणून मरणार नाही." तात्या शिरवाडकरांनी 1964 सालानंतर पुन्हा 1991 साली मराठी भाषेच्या निर्जीव धोरणाबद्दल असे तडाखे ओढले होते.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:30

(श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, पहिली जागतिक मराठी परिषद झाली. श्री. मनोहर जोशी यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांना यासंदर्भात विनंती केली आणि त्यांनी त्यास मान्यता दिली. जागतिक मराठी परिषद झाली. त्यावेळी असे म्हटले गेले की, "या पहिल्या मराठी जागतिक परिषदेचे अध्यक्ष तात्यासाहेब शिरवाडकर तथा कुसुमाग्रज, आपल्या भाषणात म्हणाले की, डोक्यावर सोन्याचा मुगुट आणि अंगावर फाटके कपडे अशा अवस्थेत माय मराठी मंत्रालयाच्या दाराशी उभी आहे." एवढा आक्रोश करुन आजही ती तशीच उभी आहे. "कागदोपत्री राजभाषा असलेल्या मराठीला आपले सिंहासन मिळत नाही. कारण या मातीशी कोणतेही नाते नसणा-या इंग्रजी भाषेने ते बळकावले आहे. इंग्रजीच्या जीवावर 4 टक्के लोक 8 कोटी लोकांवर राज्य करीत आहेत. अशी ही इंग्रजीची लाट सुरु राहिली तर 50 वर्षानंतर मराठीपण हरवलेला आणि सकस इंग्रजी कर्णापर्यन्त न पोहोचलेला असा एक अस्मिताहीन समाज आपल्याला निर्माण करायचा आहे काय ? याचा राज्यकर्त्यांनी जरुर विचार करावा" जागतिक मराठी परिषद 1964 साली झाली, 1991 साली झाली. परंतु हे सरकार ऐकत नाही, शासनाला जाग येत नाही. म्हणून कुसुमाग्रजांनी असे तळमळीने लिहिले की, या मराठी भाषेला तुम्ही दरिद्री बनवून मंत्रालयाच्या दारात ऊभी केली. तरी आमच्या शासनाला जाग येत नाही.

सभापती महोदय, उच्च न्यायालयामध्ये मराठी कामकाज असावे यासंबंधीच्या विधेयकावर मी दीड तास बोललो. ते संपूर्ण भाषण माझ्याकडे आहे. सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितलेले आहे की, उच्च न्यायालयापासून मराठी भाषेचा वापर करायला पाहिजे. पण आमचे हे सरकार काहीच करत नाही. सभापती महोदय, बॉम्बेचे "मुंबई" करण्यासंबंधीचा प्रस्ताव बॅलटला घेतला जात नाही. या लोकांना मी काय म्हणावे ? सभापती महोदय, मला आपण माफ करावे, परंतु हे कर्मदरिद्री, आपल्या आई-वडिलांच्याच पोटी जन्माला आलेले आहेत का असे विचारावेसे वाटते. मला माफ करा मला कुणाचा अपमान करायचा नाही. माझा ठराव तपासायला पाठवला म्हणून तो आजच्या बॅलटला नाही. तुमचे काय जात आहे ?

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो वाक्यप्रयोग या ठिकाणी केलेला आहे तो कार्यवृत्तातून काढून टाकावा.

==2==

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांना राग का येतो ? "बॉम्बे"ला "मुंबई"म्हणण्यासंबंधीचा माझा ठराव कारण नसताना ज्यावेळी अशा त-हेने फकेला जातो त्यावेळी राग येणार नाही काय ? हा ठराव मी सतत मांडत आलो. परंतु तो कधी बॅलटमध्ये लागला नाही. या सदनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी तीन वेळा आश्वासन दिले. हा विषय मी सतत लावून धरलेला आहे. आम्ही केन्द्राला आठवण करतो असे या सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले. केन्द्रामध्ये असे काय घडले की त्याला "बॉम्बे"चे "मुंबई"करता येत नाही. हे सतत दिल्लीला जातात. मुख्य मंत्र्यांची पंतप्रधानांबरोबर बैठक होत असते. खासदारांची पंतप्रधानाबरोबर बैठक होत असते. मंत्र्यांची पंतप्रधानांबरोबर बैठक होत असते. या बैठकांच्या वेळी हा विषय मांडता येत नाही काय ? ...(अडथळा)... या मातीमध्ये जो मराठीला गाडायला निघेल... या मराठीच्या मातीमध्ये मराठी अस्मिता, मराठी बाणा, मराठी भाषा गाडायला जो मराठी माणूस निघेल तो मराठी आईच्या पोटचा आहे की नाही असे मी म्हणतो. मराठी कोण ? तर ज्याचे आई-बाप मराठी आहेत आणि जो ठेच लागल्या नंतर आई म्हणतो तो मराठी. मी हे जनरल स्टेटमेंट केलेले आहे.ज्यांना लागायचे त्यांना लागेल. परप्रांतीयांनी येथे येऊन मराठी भाषेची गळचेपी केली तरी आम्ही स्वस्थ बसून तारे तोडणार असू तर ते आमचे आणि मराठी भाषेचे दुर्दैव आहे. कुसुमाग्रजांनी 50 वर्षात काय होणार ते सांगितले. तरी आमचे डोळे उघडत नाहीत. मी अस्सल मराठी आई-बापाच्या पोटी जन्माला आलो याचा मला अभिमान आहे. माझे कुळ मराठी आहे हे सांगायला मला अभिमान वाटतो. न्यायालयामध्ये मराठी भाषेच्या वापरासंबंधीचा ठराव मांडल्यानंतर त्या ठरावाला उत्तर देताना माननीय मंत्रीमहोदय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी असे सांगितले की, "सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मराठी भाषेचा मोठा इतिहास आपल्यापुढे मांडला. राज्य सरकारने अतिशय गांभीर्याने या विषयाकडे पाहिले होते. न्यायालयाचे कामकाज मराठीतून सुरु व्हावे अशी सरकारची भूमिका होती. आता कनिष्ठ न्यायालयातून मराठीतून कामकाज सुरु आहे. या संदर्भात एक विशिष्ट संगणक प्रणाली सुरु करण्यात आली आहे. कनिष्ठ न्यायालयामध्ये पुरावे देखील मराठीतून नोंदविण्यात येतात. अनेक न्यायालये मराठीतून निर्णय घ्यायला लागली आहेत."

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 11:35

श्री.दिवाकर रावते ..........

मराठीतून न्यायनिवाडा करण्यासाठी न्यायाधीशांना प्रवृत्त करण्याकरिता त्यांना आवश्यक असणाऱ्या सुविधा वाढवून देण्यात आल्या आहेत. तसेच आवश्यक ते मनुष्यबळ वाढवून देण्याबाबत सरकार प्रयत्न करीत आहे. राज्य सरकारने आपल्या राज्यामध्ये आपल्या राजभाषेचा वापर उच्च न्यायालयात करण्याबाबत माननीय राष्ट्रपतींकडे आग्रह धरला असून त्याबाबत प्रयत्न सुरु आहेत.

सभापती महोदय, याची काही गरज नाही. घटनेने हा अधिकार दिलेला आहे. मंत्रीमहोदयांचे हे विधान चुकीचे आहे. या विधानाचा समाचार मी नंतर घेणार आहे. अधिकृतरित्या रेकॉर्डवर नमूद करण्यासाठी मी सांगू इच्छितो की, या सदनातून सतत मागणी होत असताना कनिष्ठ न्यायालयातील 30 टक्के निकाल मराठीतून दिले जात होते. परंतु दुर्दैवाने गेल्या वर्षभरात ही प्रथा बंद केली गेली. गेल्या वर्षभरात एकही निकाल मराठी भाषेतून दिला गेला नाही. पुन्हा एकदा मराठी भाषेचा वापर बंद करुन इंग्रजी भाषेतून निकाल देण्याचे काम सुरु केले आहे. या संदर्भात मंत्रीमहोदयांचे उत्तर काय आहे?

सभापती महोदय, माझ्याकडे श्री.विलास लिंगाडे या शिवसैनिकाची तक्रार प्राप्त झाली आहे. त्यांनी आपल्या वाहनावर मराठी भाषेत नंबर प्लेट लावल्याबद्दल परिवहन विभागाकडून दंडात्मक कारवाई करण्यात आली. मी या राज्याचा परिवहन मंत्री म्हणून काम केलेले आहे. नियमानुसार मराठी भाषेत नंबर प्लेट लावता येते. त्याच्याच जोडीने इंग्रजी भाषेत तो क्रमांक नमूद करावा अशी कायद्यात तरतूद आहे. मराठी भाषेत नंबर प्लेट लावण्यास बंदी केलेली नाही. या कृतीबद्दल जी दंडात्मक कारवाई करण्यात आली त्या संदर्भात कागदपत्रे इंग्रजी भाषेतील आहेत. माझ्याजवळ उपलब्ध असलेल्या रसीदवर काय लिहिले आहे? Vehicle No.MH-03-JJ 2255 या वाहनावर मराठीमध्ये नंबर लिहिलेला आहे. अशाप्रकारे शासनाचा संपूर्ण कारभार इंग्रजी भाषेत सुरु आहे. दंड आकारताना सुध्दा मराठी भाषेचा वापर केला जात नाही. सगळे फॉर्म इंग्रजी भाषेतील आहेत. परिवहन विभागाच्या कारभाराचे मराठीकरण का होत नाही? परिवहन विभागाचा एल फॉर्मचा नमुना माझ्याकडे उपलब्ध आहे. हा नमुना देखील इंग्रजी भाषेतील आहे.

सभापती महोदय, मी काल म्हाडा कार्यालयात गेलो होतो. यापूर्वी मी राज्य सहकारी बँकेच्या संदर्भात वक्तव्य केले. म्हाडाचे सर्व अर्ज हे इंग्रजी भाषेतील आहेत. मंत्रीमहोदय सभागृहात आश्वासन देतात. परंतु कृती केली जाते का? सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांना

..2...

श्री.दिवाकर रावते.........

ताबडतोब निलंबित केले पाहिजे असा आमचा आग्रह आहे. या सदनामध्ये शासनाने आश्वासन दिलेले आहे. मागील चर्चेच्या माध्यमातून उत्तर देत असताना मंत्रीमहोदयांनी त्यांच्या हस्ताक्षरात मला लेखी कळविले आहे. ते पत्र मी लॅमिनेट करुन ठेवले आहे. सन्माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांनी सांगितले होते की, मला विधानसभेच्या सभागृहात काम असल्यामुळे माननीय शिक्षणमंत्री उत्तर देतील. त्यांनी पत्रामध्ये काय लिहिले आहे? अंमलबजावणी जी.ए.डी.कडून कडक पध्दतीने केली जाईल. सामान्य प्रशासन विभागाऐवजी जी.ए.डी.असा उल्लेख केलेला आहे. 2007 साली कडक पध्दतीने अंमलबजावणी करण्याचे आश्वासन या सदनामध्ये दिले. म्हणून मी हा विषय सदनामध्ये उपस्थित केलेला आहे. मी आणखी एका पत्राचा उल्लेख याठिकाणी करु इच्छितो. राज्यातील सर्व विद्यापीठांचा कारभार मराठी भाषेतून व्हावा या संदर्भात उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-411 001 यांनी दिनांक 17 मे, 2007 रोजीच्या पत्रान्वये सर्व अर्जांचे नमुने राज्याच्या मराठी राजभाषेत असण्याबाबत राज्यातील विद्यापीठांना लेखी पत्राद्वारे कळविले. डॉ.का.म.कुलकर्णी, उच्च शिक्षण संचालक यांनी मराठी भाषेचा वापर करण्याबाबत सर्व विद्यापीठांना कळविले. अर्ज मराठी भाषेत असावेत, सर्व फॉर्म मराठी भाषेत असावेत या संदर्भात पाठविले होते. असे असताना विद्यापीठांमध्ये आजही मराठी भाषेचा वापर होत नसेल काय करायचे? माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांच्याकडून लेखी पत्र मला प्राप्त झाले आहे. मी त्यांना या विषयाबाबत पत्र लिहिले होते व सभागृहात विषय मांडला होता की, विधी व न्याय विभागात अधिकाऱ्यांच्या वापरासाठी वृत्तपत्रे खरेदी करण्यात येतात. त्यामध्ये चार मराठी व पाच इंग्रजी वृत्तपत्रे खरेदी करण्यात येत होती. मराठी भाषेतील चारपैकी दोन वृत्तपत्रे बंद करण्यात आली. या विषयाबाबत मंत्रीमहोदयांनी मला कळविले की, फक्त मराठी वृत्तपत्रांची संख्या कमी करण्यात आली नसून इंग्रजी वृत्तपत्रांची संख्या देखील कमी करण्यात आली आहे. दोनच इंग्रजी वृत्तपत्रे खरेदी करण्यात येत आहेत.

(नंतर श्री.खर्चे....

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

मराठी वर्तमानपत्र वाचावयाचे की कमी करावयाचे यासंबधीचे ते पत्र आहे. अशा प्रकारे या राज्यात मराठीची गळचेपी सुरु आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या उपसचिवांना सुध्दा मी त्यांच्याकडून प्रसिध्द होत असलेल्या जाहिरातींसंबधात पत्र दिलेले आहे. तसेच आजच्या "सामना" या दैनिकात एक जाहिरात प्रसिध्द झालेली आहे. माझ्याकडे अशा प्रकारे पाठविलेल्या वेगवेगळया पाच फाईल्स भरलेल्या आहेत. इंग्रजीमध्ये जाहिरात देण्यासाठी खरे तर परवानगीच नाही. ड्राफ्ट इंग्रजीत करा पण त्याचे मराठीत भाषांतर करुनच वर्तमानपत्रात देणे अवश्यक असते. आजच्या सामनामध्ये जी जाहिरात आलेली आहे, ती नांदेड म्युनिसिपल कॉर्पोरेशन या नावाने जाहिरात आली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या नगरविकास खात्याच्या अखत्यारितील हे खाते आहे. ही जाहिरात सुध्दा इंग्रजीत आहे. त्याचप्रमाणे डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन अशा प्रकारे जवळपास पाच हजार जाहिराती मी काढून ठेवलेल्या आहेत. या सर्व जाहिराती इंग्रजीतच आहेत. मी एमपीएससीला एक पत्र लिहिलेले आहे आणि त्यामध्ये " आपल्याकडून देण्यात येत असलेल्या सर्व जाहिराती केवळ मराठीतूनच असाव्यात या संबंधी योग्य ती दक्षता घ्यावी " अशा प्रकारचे परिपत्रक दि. 5 मार्च, 1980 मध्ये शासनाने काढलेले आहे त्याचा संदर्भ दिला आहे. कोणत्याही परिस्थितीत अशा जाहिराती मराठीतूनच असल्या पाहिजेत. तरी सुध्दा आजच्या घडीपर्यंत त्यात बद्दल होत नसेल तर त्याची जबाबदारी कोणावर असणार आहे ? मी उपस्थित केलेल्या मुद्यांचे केवळ मुळमुळीत उत्तर देणार असाल तर ते न दिलेले बरे पण अशा प्रकारे अमानुषपणे मराठीच्या बाबतीत वागून चालणार नाही. याचा परिणाम इतका झालेला आहे की मी जेथे जातो तेथे फोटो काढत असतो. त्यात डॉ.प्रदीप व्यास, सिनियर ऑप्थॉल्मॉलॉजिस्ट असे फलक दिसून येतात त्यानंतर सीटी बँक, कॉर्पोरेशन बँक, एटीएम अशा प्रकारचे मोठमोठे फलक या मंत्रालयाच्या तसेच विधान भवनाच्या परिसरात समोरच दिसून येतात. तसेच महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक, सी. के. पी.बँक, आणि नागपूरला विमानतळावर असलेले सगळेच फलक मी पाहिले. तेथे सुध्दा इंग्रजी व हिंदी या दोनच भाषामध्ये लिहिले आहे की, " भारतीय विमान पत्तन प्राधिकरण आपका स्वागत करती है " आणि "सुरक्षा कारणों से वाहनों की पार्किंग "......... असे फलक विमानतळावर आत शिरताना आजही दिसून येतात. या सर्व सुचनांचे फोटो देखील मी आणलेले आहेत. हिंदी





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

जिमखाना, पारशी जिमखाना, पोलीस जिमखाना या सर्व ठिकाणी दिलेले भूखंड हे शासनानेच दिलेले आहेत पण त्यांनी मराठीतून फलक लावताना मात्र इस्लामिक जिमखाना अशा प्रकारे इंग्रजीतूनच फलक लावलेले आहेत. यासंदर्भात शासन कोणतीच कारवाई करत नसेल तर हे फलक तोडायचे काय ? असा प्रश्न निर्माण होत आहे. इंग्रजीत फलक लावण्याबाबत कोणतीही तक्रार नाही पण मराठीतून फलक का लावले नाहीत ? हे सर्व फलक आताच, एक महिन्यापूर्वी लावलेले आहेत, ते सुध्दा आपल्या छातीवर " आम्ही इस्लामिक आहोत " हे सांगण्याकरिता, पण ते मराठीतून का लावले जात नाही ? म्हणून माझी विनंती आहे की, जर शासनाने दिलेले भूखंड असतील तर त्यांचे परवाने शासन का रद्द करत नाही ?

कै. हेमंत करकरे यांनी दि. 26.5.2008 रोजी दिलेले पत्र माझ्याकडे आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे.की, "कार्यालयीन कामकाजात मराठी राजभाषेचा वापर करण्याबाबतचे शासन परिपत्रक क्रमांक व दिनांक अमुक अमुक मध्ये दिलेल्या सर्व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत सर्व पोलीस आयुक्तालयांना कळविण्यात आलेले आहे. तथापि आपले पत्र प्राप्त होताच "दि. 3.5.2008 चे परिपत्रक क्र. 3008 अन्वये सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पुन्हा निर्देश देण्यात येतील " असेही त्या पत्रात म्हटले आहे. परंतु आठच दिवसापूर्वी त्या सर्व कार्यालयात ती गेलो असता सर्व कार्यालयांमध्ये लावण्यात आलेले फोटो सुध्दा काढून आणलेले आहेत. ते सर्व इंग्रजीमध्येच आहेत, हे देखील या निमित्ताने मी शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

यानतंर श्री. जुन्नरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, मी कोठेही गेलो तरी त्या ठिकाणचे सर्व फोटो काढत असतो. आपण कोठेही जा आपल्याला सर्व पाट्या इंग्रजी भाषेतूनच दिसतात. मराठी वापराच्या संदर्भात शासनाने जो शासन निर्णय काढलेला आहे त्या शासन निर्णयाची अंमलबजावणी कोठेही केली जात नाही. कमिशनर ऑफ पोलीसच्या कार्यालयात गेलो तरी आपल्याला त्या ठिकाणची सर्व नावे इंग्रजीतूनच दिसतात. शासनाचे जी काही कार्यालये आहेत मग ती जिल्हा परिषद असो, पंचायत समिती असो किंवा कोणतेही शासकीय कार्यालय असो त्या सर्व कार्यालयामध्ये जे काही हजेरी पुस्तक असते ते हजेरी पुस्तक सुध्दा इंग्रजीमधूनच छापलेले असते. त्या हजेरी पुस्तकात नेम, सिरीअल नंबर, टाईम अशी जी सर्व माहिती असते ती सर्व इंग्रजीमधूनच लिहिलेले असते व त्याच्याखाली मग अधिकारी कर्मचा-यांची नावे लिहिली जातात. जिल्हा परिषद, महानगरपालिका, पंचायत समितीला आपण भेट दिली तर त्या ठिकाणच्या सर्व अधिका-यांची नावे व हुद्दा इंग्रजी भाषेमधूनच लिहिलेली असतात. शासकीय विश्रामगृहात गेलो तरी त्या ठिकाणी सुध्दा इंग्रजी भाषेतूनच नावे लिहिली जात असतात. एवढेच काय सार्वजनिक बांधकाम खाते माईल स्टोनवर गावांची नावे मराठीतून लिहिते परंतु कि.मी.चे आकडे मात्र इंग्रजी भाषेतूनच लिहिलेली असतात. त्यामुळे आपण हे सर्व बदलणार आहात काय ? माननीय श्री. शरद पवार साहेबांनी सर्क्यूलर काढले होते की, मराठीचा वापर झाला पाहिजे व ज्या ठिकाणी मराठी शब्द नसेल अशा ठिकाणी पर्यायी इंग्रजी शब्द वापरावा. चार दिवसापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. अबू आझमी यांनी "उर्दू" भाषेला मान्यता द्यावी अशी मागणी केलेली आहे. मराठीचा वापर व्हावा यासाठी आम्ही कितीही प्रयत्न केला, कितीही मागणी केली तर आमच्या मागणीचा विचार होत नाही. परंतु उर्दूचा विषय निघाल्याबरोबर शासन तातडीने काम करेल कारण हे शासन मतासाठी लाचार झाले आहे, मिंधे झालेले आहे. मराठीचा वापर करण्यात यावा यासाठी शासनाचे जे सर्क्युलर आहे त्या सर्क्युलरची अंमलबजावणी होत नाही. आज शासनाच्या आदेशाची सर्व ठिकाणी पायमल्ली होत असल्याचे आपल्याला दिसून येते. कोणत्याही कार्यालयात गेले तरी आपल्याला अधिका-यांच्या पाट्या इंग्रजी भाषेतूनच लिहिलेल्या दिसतात. मराठी भाषेतून पाट्या का लिहीत नाही असे मी नेहमी विचारीत असतो. तसेच शासकीय

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

कार्यालयामध्ये जे हजेरी पुस्तक छापले जाते ते मराठी भाषेतूनच छापले जावे यासाठी मी शासकीय छापखान्याला पत्र देखील लिहिले होते परंतु त्याचा काही एक उपयोग झालेला नाही. त्यांच्याकडे जशी मागणी येते त्या प्रमाणे ते काम करीत असतात. आज सर्व ठिकाणी मराठी भाषेची गळचेपी केली जात आहे. एसटी महामंडळ प्रवाशांना जे तिकीट देत असते ते तिकीट सुध्दा इंग्रजीतूनच दिले जात असते. त्यामुळे एसटी महामंडळ इंग्रजी भाषेतून तिकीट का देते ? मराठी भाषेची गळचेपी कशी होत आहे याबाबत मी किती सांगावे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. या ठिकाणी मी जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या सर्वांची उत्तरे माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. p

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, जाता जाता मला एवढेच सांगावयाचे आहे की, मराठी भाषेची अवस्था आज भिकाऱ्यासारखी झाली आहे. गेल्याच आठवड्यामध्ये म्हणजे दिनांक 4 जुलै 2010 रोजी श्री.भरतकुमार राऊत यांनी "मराठी भिकारणी झाली तरीही....." असा लेख लिहिला होता. आजही आपल्या राज्यामध्ये मराठी भाषा "भिकारीण" आहे असे लिहिण्याची पाळी येत आहे. मराठी भाषेसाठी शासनाने समिती स्थापन केली आहे. श्री.राऊत यांनी आपल्या लेखात नमूद केले आहे की, "मराठीचा उद्धार करायचा, तर आधी मंत्रालयातील व्यवहार मराठीत यायला हवेत. आजही बहुतांश सचिव अगोदर इंग्रजीत नोट तयार करून नंतर त्यांचे क्लिष्ट व "सरकारी" भाषांतर करून घेतात. सचिव पातळीवर चर्चा इंग्रजीतच होतात. हे चित्र बदलत नाही, तोवर मंत्रालयाचे "मराठीकरण" होणार नाही. केवळ 27 फेब्रुवारीला कुसुमाग्रज जयंतीला 'मराठीदिन' साजरा केल्याने आणि खाते काढल्याने ना मराठीला मान मिळणार ना तिचे रक्षण होणार." त्यांनी पुढे असेही लिहिले आहे की, "हिंदीखेरीज प्रादेशिक भाषाच राज्यभाषा असलेली डझनभर राज्ये आहेत. या राज्यांनी आपल्या भाषेचा योग्य विकास साधला आहे. शेजारची गुजराती भाषा, युरोप, अमेरिका, आफ्रिका खंडांत पसरलेली आहे. पंजाबी व बंगालीचीही तीच स्थिती. तामीळचा तर इतका विकास झाला की, ती इंडोनेशिया, मलेशिया, हाँगकाँग या देशांचीही अधिकृत भाषा बनली. यापैकी कोणत्याही राज्यात भाषेसाठी वेगळा मंत्री आहे काय, याची चौकशी मुख्यमंत्र्यांनी करावी. भाषेचे संरक्षण व संवर्धन ही संपूर्ण मंत्रिमंडळाचीच जबाबदारी, असे या राज्यातील राज्यकर्ते मानतात." आपल्याकडे वेगळे मंत्रिमंडळ आहे. वि.वा.शिरवाडकरांनी रौप्य महोत्सवी वर्षामध्ये केलेले संपूर्ण भाषण माझ्याकडे आहे. त्यांनी आपल्या भाषणामध्ये मराठी भाषा संपूर्ण राज्यामध्ये नांदली पाहिजे असे मत व्यक्त केले होते. आज सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये तात्या नाहीत. पण आज ते असते तर त्यांना तसेच लिहावे लागले असते. आम्ही माननीय सभापतींच्या दालनात जातो. तेथील एक फोटो माझ्याकडे आहे. सभापती दालनाच्या बाहेर मराठीत नाव आहे. पण पाटी मात्र इंग्रजीत आहे. आता आपण तेथे गेलात तर ती पाटी दिसेल. येथे सुद्धा आपल्याला मराठीकरण करता येत नाही. म्हणून मायबोली संबंधातील सुरेश भटांची कविता सांगून मी येथेच थांबणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढया जगात माय मानतो मराठी

आमुच्या मनामनात दंगते मराठी
आमुच्या रगारगात रंगते मराठी
आमुच्या उराउरात स्पंदते मराठी
आमुच्या नसानसात नाचते मराठी

आमुच्या पिलापिलात जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यात रांगते मराठी
आमुच्या मुलामुलीत खेळते मराठी
आमुच्या घराघरात वाढते मराठी

येथे कवि सुरेश भट हे मराठी भाषेच्या कुळासंबंधी बोलले आहेत. त्यामुळे याचा कुणालाही राग यायला नको.

आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी
येथल्या फुलाफुलात हासते मराठी
येथल्या दिशादिशात दाटते मराठी
येथल्या नगानगात गर्जते मराठी

येथल्या दरीदरीत हिंडते मराठी
येथल्या वनावनात गुंजते मराठी
येथल्या तरुलतात साजते मराठी
येथल्या कळीकळीत लाजते मराठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येथल्या नभामधून वर्षते मराठी
येथल्या पिकांमधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून वाहते मराठी
येथल्या चराचरात राहते मराठी

पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी...
आपुल्या घरात हाल सोसते मराठी
हे असे कितीक 'खेळ' पाहते मराठी
शेवटी मदांध तख्त फोडते मराठी

सभापती महोदय, कवि सुरेश भट आज आपल्यामध्ये नाहीत. त्यांनी आपली भूमी मराठीने व्यापली असताना सुद्धा व्यथा व्यक्त केली आहे.

पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी...
आपुल्या घरात हाल सोसते मराठी

हे त्यांनी परप्रांतीयांसबंधी लिहिले आहे.  मराठीचा अवमान करणार असाल तर असे लिहिले आहे की,

हे असे कितीक 'खेळ' पाहते मराठी
शेवटी मदांध तख्त फोडते मराठी

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आज तशीच परिस्थिती झाली आहे. आज समिती स्थापन करण्याचे दुर्भाग्य राज्यकर्त्यांवर आलेले आहे. ही घटना मराठीसाठी आनंददायी नाही. आज पर्यंत आपण मराठीची हेळसांड केली. त्यामुळे हे सर्व निर्माण झाले आहे. तेव्हा आपली समिती नेमके काय काम करणार आहे ? आज मंत्र्यालयाच्या दारात मराठी फाटक्या वस्त्रानिशी उभी आहे. त्यामुळे आपण अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? असा प्रश्न मी आपल्याला विचारीत आहे. नाही तर उद्या माझ्यातल्या बंडखोरीला आपण आवर घालू शकणार नाहीत. आपल्या कितीही अटका मला मराठीसाठी थांबवू शकणार नाहीत असा इशारा देतो आणि पुन्हा एकदा मिळमिळीत उत्तराची अपेक्षा न करता ठोस उत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने द्यावे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

............

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मराठी भाषे विषयी या सभागृहात चर्चा होत आहे. मराठी भाषेसाठी स्वतंत्र विभाग, विकास आणि संवर्धन हे उद्दिष्ट, 10 कोटी रुपयांची तरतूद, स्वतंत्र सचिव अशी येथे चौकट मांडण्यात आलेली आहे. ही चौकट मांडताना शासनाने किती प्रकाराने विचार केलेला आहे, हे आपण सर्वांनी समजून घेतले पाहिजे. आपल्याला काही गोष्टी माहीत नसतील तर शासनाकडून त्याची माहिती मिळविली पाहिजे. भाषे विषयी बोलताना आपण अतिशय पोटतिडकीने वेगवेगळे संदर्भ देऊन सभागृहात भाषण करतो. आपली भाषे मागची तळमळ, त्या भाषेचे मातीशी असलेले नाते अधिक सुदृढ करण्यासाठी सर्वांच्या मनात असलेली इच्छा या भावनेकडे अधिक आग्रहाने पाहणे आवश्यक आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्षात मराठी भाषेसाठी विभाग निर्माण होतो ही निश्चित अभिमानास्पद गोष्ट आहे....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आताच येथे मला विधानमंडळ सचिवालयाकडून एक इंग्रजी भाषेत लिहिलेले पत्र आले आहे. आपण येथे मराठीचा आक्रोश करीत असताना विधानमंडळ सचिवालयाकडून देखील इंग्रजी भाषेत पत्र पाठविण्यात येते. हे पत्र फाडले तर आपणास अपमान वाटेल...

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मला येथे एका गोष्टीचा आर्वजून उल्लेख करावासा वाटतो की, काही राज्यांमध्ये त्या राज्याची भाषा आणि त्या राज्याचा सांस्कृतिक विभाग असा एकत्र मिळून विभाग आहे. उदारहण सांगावयाचे झाले तर ज्यांच्याशी आपला सीमाप्रश्ना संदर्भात लढा सुरु आहे त्या कर्नाटक राज्यामध्ये फक्त "सांस्कृतिक विभाग" असे म्हटलेले नाही तर "कन्नड भाषा आणि सांस्कृतिक विभाग" असा विभाग आहे. खरे म्हणजे मराठी भाषा ही आपल्या राज्याची भाषा असल्या कारणाने तिची अंमलबजावणी वरुन खाली करण्याचा जो प्रयोग आहे तो मंत्रालयात बसून मराठी भाषेची आपल्याला काहीतरी चिंता आहे म्हणून आपण तेथून सुरुवात केल्यावर खालच्या पातळीपर्यंत म्हणजे गावापर्यंत जाऊन आपण भाषेविषयी नक्की काही करु शकू अशाप्रकारचे धोरण असेल तर त्यामध्ये आपणास निश्चितच काहीतरी बदल करावा लागेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

राज्यात सर्वांना प्राथमिक शाळेपासून मराठी भाषा शिकणे आवश्यक आहे. मराठी भाषा हा काही 45 मिनिटांत संपणारा विषय नाही. मराठी भाषा हे मुळात माध्यम आहे. इतर कोणत्याही विषयाचे शिक्षण असो, त्याचा पाया मराठीत घातला गेला पाहिजे. म्हणून मराठी भाषणा 45 मिनिटांच्या मर्यादेत कधीच बसविता येणार नाही.

सभापती महोदय, मराठी भाषा, शिक्षण विभाग, सांस्कृतिक विभाग, सामान्य प्रशासन विभाग आणि सामाजिक न्याय विभाग या विभागांमार्फत सुदृढ करता येऊ शकेल. कारण शासनाचे विषय समजायचे असतील, त्यांच्याशी संवाद व्हावयाचा असेल तर आपणास निश्चितपणे या विभागांच्या संवेदनशील मराठी वापरण्यामधून मराठी भाषा अधिक चांगल्या प्रकारची होण्याची शक्यता अधिक आहे. शेवटी मराठी किंवा कोणत्याही भाषा ही जेव्हा ज्ञानाच्या रुपाने पुस्तकामधून, शाळांमधून, महाविद्यालयांमधून येते तेव्हा त्याची मूळ परंपरा ही बोलीभाषेतून आलेली असते आणि असे म्हटले जाते की, बोलीभाषा दर 10 मैलांवर बदलत जाते.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ KGS/ KTG/ ST/ प्रथम श्री.अजित शिगम 12.00

श्री.हेमंत टकले......

उदाहरणार्थ मराठवाडयातील माणसे ज्या पध्दतीने मराठी भाषा बोलतात त्या पध्दतीने पश्चिम महाराष्ट्रातील माणसे मराठी बोलणार नाहीत. त्याचप्रमाणे् कोकणतील माणसे ज्या पध्दतीने मराठी बोलतात त्या पध्दतीने विदर्भातील माणसे बोलणार नाहीत. त्यामुळे विदर्भ, कोकण, मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र इत्यादी ठिकाणी बोलल्या जाणा-या मराठीचे एकत्रिकरण केले जात असतांना बोली भाषेची जी रंगत आहे ती लोप पावणार नाही हेसुध्दा पाहिले पाहिजे. त्याचबरोबर काही इंग्रजीतील शब्द नेहमीच वापरले जातात व ते अधिक चांगले समजतात त्याप्रमाणे मराठी भाषेच्या सगळया उपक्रमामध्ये बोली भाषेवर कोठेही अन्याय होणारा नाही.याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. त्याचप्रमाणे मराठी भाषेचा जो प्रादेशिक आयाम आहे आणि त्या त्या विभागाचे ते वैशिष्टय म्हणून आपण मानले आहे. ते आपण निश्चितपणे विचारात घेतले पाहिजे.असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारतर्फे सांस्कृतिक धोरण जाहीर करण्यात आले आहे. मराठी भाषेचा विकास करीत असतांना इंग्रजी व इतर भाषेतील शब्दांना मराठी प्रतीशब्द मिळावे लागतात व त्यासाठी अभ्यास करावा लागतो.सभापती महोदय परवाच्या दिवशी मी बोन्साय या विषयावर लेख लिहित होतो बोन्साय ही जपानी छोटी झाडे असतात हे आपणा सर्वांना माहीत आहेच.सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते वा इतर सान्माननीय सदस्य मराठीतून नावे का लिहिली जात नाहीत याबद्दल सभागृहात आग्रह धरत असतात. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांच्यापुढे जसा प्रश्न निर्माण होत असतो तसाच माझ्यापुढे असा प्रश्न निर्माण झाला होता की बोन्सायला मराठीतून काय म्हटले जाते? त्यामुळे त्याबाबतीत मी शोध घेण्यास सुरुवात केली. मराठी शब्दकोषामध्ये मला तो उल्लेख मिळाला नाही. म्हणून मी अनेक तज्ज्ञांना याबाबतीत विचारले होते पंरतु त्यांच्याकडूनही मला माहिति मिळाली नाही. ज्यांचा वनस्पतीशी आणि वृक्षांशी सबंध आहे असे माझे एक मित्र होते आणि त्यांना मी याबाबतीत विचारले असता त्यांनी मला बोन्सायला वामनवृक्ष शब्द असल्याचे सांगितले आहे. बोन्सायला अतिशय योग्य असा हा शब्द आहे. मराठीमधून जेव्हा योग्य असा प्रतिशब्द मिळतो तेव्हा मराठी भाषा भेटल्याचा आनंद होत असतो. मराठी भाषे व्यतिरिक्त इतर भाषेतून येणारे काही शब्द मराठीत आहेत व त्या शब्दांचा

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले......

आपण स्वीकार देखील केलेला आहे. आता असे म्हटले जाते की , इंग्लडमध्ये मूळ इंग्रजी भाषा बोलणारे लोक कमी झाले असून इंग्रजी आणि हिंदी मिश्रीत बोलणा-यांची संख्या जास्त झालेली आहे. अशा प्रकारे भाषेचे आक्रमण केवळ मुंबई शहरामध्येच नव्हे तर इतर प्रदेशातही हळूहळू होत आहे.इतर भाषिक लोकांचा सहभाग वाढत असल्यामुळे मराठी भाषा कोठे तरी मागे पडेल की काय अशी चिंता निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे.असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, शासनाने व शासकीय अधिका-यांनी या बाबतीत ज्या काही गोष्टी करावयाच्या आहेत त्या तर जरुर केल्या पाहिजेत परंतु त्याही पलिकडे जाऊन विज्ञानावर आधांरित ज्या काही गोष्टी कराव्या लागणार आहेत त्याचा जास्तीत जास्त वापर करुन मराठीच्या संवर्धनासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मराठीचा विकास करणे आणि संवर्धन करणे हे आपले उद्दिष्ट आहे .सध्या जी मराठी भाषा आहे तीच ठेवावयाची आहे की संवर्धन करुन मराठीला अधिक चांगले रुप देण्यात येणार आहे याबाबतीत विचार केला पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, दोन तीन दिवसापूर्वी आपण सर्वानीच वर्तमानपत्रात एक बातमी वाचली असेल. मुबईच्या आय.टी.आय.मध्ये 22 व्या वर्षी एक प्रोफेसर झाला आहे. त्याचे नाव प्रोफेसर तथागत असे आहे. कोणताही विषय अत्यंत प्रभावीपणे स्वत: समजावून घेऊन जो लोकांना सांगू शकतो त्याला तथागत असे म्हटले जाते. प्रो. तथागताच्या वडिलांसंबंधीची बातमी आजच्या वर्तमानपत्रात आली आहे.तथागत हा त्याच्या आईवडिलांचा तिसरा मुलगा आहे.त्याचे वडिलसुध्दा प्रोफेसर आहेत. त्यांनी असे सागितले की, आमच्या पोटी अंत्यत बुध्दिमान मूल जन्माला यावे म्हणून त्याचे आई वडिल या नात्याने आम्ही स्वत:वर काही संस्कार करुन घेतले होते. आमच्या रोजच्या आहारात आम्ही बदल केला होता. आमच्या पोटी जन्माला येणा-या मुलाचे बुध्दि चातुर्य अधिक कसे वाढेल या दृष्टीने आम्ही प्रयोग केला होता. एका कुटुंबामध्ये जर एका मुलासाठी अशा प्रकारे जर प्रयत्न केले जात असतील तर संपूर्ण राज्याची जी मराठी भाषा आहे त्या भाषेसाठी आपल्याला व्यापक प्रमाणात विचार करुन अनेक बाबींचा त्यामध्ये अंतर्भाव करावा लागेल.

नंतर श्री.सरफरे



DGS/ KGS/ ST/ 12:05

श्री. हेमंत टकले..

भाषिक देवाण घेवाण सांगतांना माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी तात्यासाहेब शिरवाडकरांची उदाहरणे दिली आहेत. कित्येक वर्षापूर्वी "रायगडाला जेव्हा जाग येते" हे नाशिकच्या वसंतराव कानेटकरांचे नाटक गाजले होते. म्हणजे या नाटकाचे नाव असे घेतले की, "रायगड आता जागा झालेला आहे". त्यानंतर जो इतिहास आणि जी व्यक्तिमत्वे समोर येतात, त्यामध्ये छत्रपती शिवाजी आणि छत्रपती संभाजीची नव्याने ओळख या नाटकांमधून होत असते. ही व्यक्तिमत्वे पुन्हा समजली जात असतात. परंतु अशापध्दतीचे साहित्य निर्माण होणार नसेल, आणि ते निर्माण होण्यासारखी परिस्थिती शालेय शिक्षणापासून या राज्यात नसेल तर, पुढील पिढीमध्ये कोण शिरवाडकर होणार, कोण विंदा करंदीकर होणार, कोण वसंतराव कानेटकर होणार? ही पिढी नव्याने आपल्याला घडवावयाची आहे. अजूनही मराठीमध्ये प्रयोग करणारी तरुण पिढी अतिशय चांगल्या पध्दतीने सांस्कृतिक क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. आपल्यापैकी कित्येक जणांनी "आयुष्यावर बोलू काही" हा कार्यक्रम जरुर ऐकला असेल. हा कार्यक्रम शासकीय अधिकाऱ्यांसाठी रविंद्र नाटय मंदिरमध्ये ठेवला तर आपणा सर्वांमध्ये मराठी भाषेबद्दल माया उत्पन्न होईल, प्रेम उत्पन्न होईल. इतके समर्थपणे आपण भाषाविषयक सांस्कृतिक माध्यमातून पुढे जाऊ शकतो. या सर्व गोष्टींचा आपल्याला विसर पडला आहे की काय? असे वाटावयास लागते. मुळात 10 कोटींच्या तरतुदीचा आकडा दिसायला भयंकर मोठा वाटत असला तरी 10 कोटींमध्ये काय होणार आहे? त्या बाबतीत असे म्हणतात की, तुमच्या बजेटला 10 कोटींची कॅप लावली आहे, ते बंद केले आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी या राज्याचा खजिना सदैव उघडा राहिला पाहिजे. त्यामध्ये केवळ 10 कोटी नव्हे तर जी लागेल ती तरतूद या कामासाठी राज्य सरकारने निश्चितपणे केली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, आपल्या भाषेवर आपण प्रेम करीत असतांना इतर राज्यातील भाषेचा दुस्वास करावयाचा नाही असे आम्हाला आमच्या साहित्यिकांनी शिकविले आहे. याठिकाणी शेक्सपिअरबद्दल बोलले गेले. ग.प्र.प्रधान सरांनी राम गणेश गडकरी यांच्या उत्कृष्ट कलाकृतींचे इंग्रजीमध्ये भाषांतर केले. ते आज ऑक्सफर्डमध्ये जाऊन पोहोचले आहे. त्या विद्यापीठामध्ये मराठी भाषेच्या साहित्यिकाचा सन्मान होत आहे. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊ शकणारी आमच्या राज्याची भाषा यापुढील काळात या सुवर्ण महोत्सवी वर्षापासून अधिक जोमाने कशी



DGS/ KGS/ ST/

श्री. हेमंत टकले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाढेल, तिचा प्रसार अधिक चांगला कसा होईल? हे आमच्या जीवनाचे सूत्र आहे, ही आमच्या जगण्याची प्रतिज्ञा आहे, या भाषेतच आम्ही जगू, या भाषेतच आम्ही आमचा विकास करु, या भाषेतच मोठे होऊन आमच्या राज्याला मोठे करु, त्यामधून आमच्या देशाला मोठे करु. या भावनेतून जर हे काम करता आले तर भविष्यकाळामध्ये आपण मराठीसाठी काही तरी केले याचे समाधान निश्चितपणे आपणा सर्वांना वाटेल असे मला वाटते. सभापती महोदय, आपण मला बोलण्याकरिता संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व अन्य माननीय सदस्यांनी मराठी भाषेसंबंधी जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर या सभागृहामध्ये चर्चा होत असतांना वरिष्ठांचे सभागृह असल्यामुळे यावर अधिक ॲकॅडमिक चर्चा व्हावी या अर्थाने माझ्या भाषणाला मी अधिक जोर देणार आहे. राष्ट्रभाषा कोणती असावी अशाप्रकारची चर्चा ज्यावेळी या देशामध्ये झाली, त्यावेळी महात्मा गांधी, पंडित नेहरु व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषा समितीमध्ये चर्चा झाली. त्यावेळी महात्मा गांधी यांनी हिंदी भाषा ही राष्ट्रभाषा असावी असे म्हटले, पंडित नेहरुंनी इंग्रजी भाषा ही राष्ट्रभाषा असावी असे म्हटले आणि आपणास आश्चर्य वाटेल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संस्कृत भाषा ही राष्ट्रभाषा असावी असा आग्रह धरला. ज्यावेळी एकमत होत नव्हते त्यावेळी ज्या राज्याची जी भाषा ती राजभाषा असावी आणि समन्वयाची भाषा ही हिंदी किंवा इंग्रजी असावी असे ठरले. व त्यानुसार जशी पाहिजे तशी त्या त्या राज्यांनी ती भाषा स्वीकारली. दक्षिणेकडील सर्व राज्यांनी इंग्रजी भाषा स्वीकारली, वरच्या राज्यांनी हिंदी स्वीकारली. त्यामुळे देशाची राष्ट्रभाषा अशी कोणतीच नाही. यामध्ये आपण राजभाषा मराठी व समन्वयाची भाषा हिंदी ठरविली. भाषा समितीमध्ये म्हणणे मांडतांना भाषा ही राज्याच्या संस्कृतीचे एक प्रतिक, एक वाहक आहे. म्हणून त्या त्या राज्याची ती भाषा ही राजभाषा असावी असा आग्रह समितीमध्ये धरला गेला.आपण मराठी भाषेवर चर्चा करीत असतांना मराठी संस्कृती टिकली पाहिजे यासाठी मराठी भाषा असली पाहिजे. मध्यंतरी एका चॅनेलवर मी पाहिले की,...

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/ प्रथम श्री. सरफरे.... 12:10

श्री. विनोद तावडे...

अंदमानमधील एका वृध्द स्त्रीचा मृत्यू झाल्यानंतर तेथील बोली भाषा लोप पावली. हे ज्या पध्दतीने चालले आहे, त्यातून मराठीचे असे काही होईल असे वाटत नाही. पण वर्षानंतर मराठी भाषेची अधेगती ज्या गतीने होत आहे त्या पध्दतीने होत राहिली तर शंभर-दोनसे वर्षानंतर ती त्या दिशेला सरकायला वेळ लागणार नाही याची चिंता मात्र नक्की व्यक्त कराविशी वाटते. मराठी ही राजभाषा ठरलेली असताना त्या राजभाषेचा आग्रह, सक्ती हा त्या त्या वेळच्या राजकर्त्यांनी ठेवला नाही त्यामुळे आज अशा प्रकारची चर्चा या सभागृहात उपस्थित करावी लागते, हे त्यातील दुर्दैव आहे. या ठिकाणी एका पत्रकाचा उल्लेख करण्यात आला. अशा प्रकारचे पत्रक शासन सहजपणे मराठीत काढू शकते पण ते मराठीत काढण्यात येत नाही. लहान लहान तालुक्यातील कोर्ट मराठीतून चालले पाहिजेत पण ते चालत नाहीत त्यामुळे तेथील लोकांना काय चालले आहे हे कळत नाही. वकील सांगेल ते त्यांनाा समजून घ्यावे लागते. प्रशासनामध्ये मराठीची सक्ती राहिली असती तर मराठी भाषा समृध्द करण्याचे प्रयत्न अधिक गतीने पुढे गेले असते. पण मराठी भाषेची सक्ती केली जात नाही. मराठीच्या भाषेच्या सक्ती बरोबरच मराठी भाषेची आसक्ती मराठी जनतेमध्ये कशी निर्माण होईल याचा विचार करावयास पाहिजे. शासनाने मराठी भाषेच्या संदर्भात स्वतंत्र मंत्रालय निर्माण केले आहे. त्यासाठी दहा कोटी रुपये देण्यात आलेले आहेत असे सन्माननीय सदस्य श्री. टकले साहेबांनी सांगितले आहे. पुढे-मागे जास्त पैसे देण्यात येतील.

सभापती महोदय, आपण बेळगावच्या सीमावादाच्या बाबतीत लढत आहोत. कर्नाटक सरकार 525 कोटी रुपये कन्नड भाषेच्या संवर्धनसाठी दर वर्षी खर्च करते. केरळमध्ये भाषा प्रबोधिनी आहे. मल्ल्याळी भाषेसाठी नीम सरकारी प्रबोधिनी आहे. या प्रबोधिनीवर दर वर्षी 350 कोटी रुपये खर्च होतात. मल्ल्याळी भाषेत जे साहित्य निर्माण होते ते भारतातील काही भाषांमध्ये तसेच विदेशातील भाषांमध्ये भाषांतरीत करण्याचे काम चालते. सभापती महोदय, कुसुमाग्रजांना आणि विंदाना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला तेव्हा आपल्याला खूप आनंद झाला. रविंद्रनाथ टागोर यांच्या गीतांजलीला नोबेल पारितोषिक मिळाले. गींताजली हे अतिशय उच्च दर्जाचे साहित्य नक्कीच होते पण या गीतांजलीचे इंग्रजी भाषेत भाषांतर झाले आणि त्याला डब्लू बी इडसे यांनी प्रस्तावना लिहिली होती त्यामुळे ते नोबेल समितीसमोर गेले आणि रविंद्रनाथ टागोर यांच्या गीतांजलीला नोबेल पुरस्कर मिळाला तेव्हा आपल्याला खूप अभिमान वाटला. आपल्याकडे खूप

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

मोठे साहित्यिक आहेत. तेंडुलकर आहेत. खानोलकर आहेत. अशी साहित्यिकांची खूप नावे घेता येतील. मराठी साहित्य उच्च दर्जाचे आहे पण पुरस्कार देणाऱ्या समितीसमोर ते ज्या भाषत गेले पाहिजे त्या भाषेत भाषांतरित होत नाही. एक ज्ञानपीठ मिळाल्याबरोबर मराठी भाषिकांचा ऊर भरुन आला . अशा प्रकारचे नोबेल पुरस्कार कधी मिळणार? मराठी भाषेतील उच्च दर्जाचे साहित्य भाषांतरित करण्याची सरकारी व्यवस्था असण्याची आवश्यकता आहे. मध्यंतरी एक पदनाम कोष भाषांतरीत करण्यात आला. तो पदनाम कोष होता की, बदनाम कोष होता हेच कळत नाही. फाईलसाठी नस्ती आणि उजव्या मेंदूसाठी उजवे मस्तिष्क अमुक अमुक काही तरी कणा असे भाषांतर केलेले आहे. हे सगळे शब्द पाठ करेपर्यंत पाठीचा कणा मोडला तरी मुलांना ते पाठ होत नव्हते. सभापती महोदय, प्रत्येक इंग्रजी शब्दाचा अर्थ संस्कृतच्या मार्गानेच का आला पाहिजे? स्वातंत्र्यवीर सावरकरांनी महापौर हा शब्द आणला. प्रबोधनकार ठाकरे यांनी नगरसेवक असा शब्द आणला. किती साधे आणि सोपे शब्द आणले. हे शब्द सहजपणे प्रचलित झाले. अशा पध्दतीने या शब्दांचे भाषांतर करुन ते शब्द आपल्या मराठी भाषेत सहज प्रचलित करण्यासाठी कष्ट केले पाहिजेत. मला माफ करा, हे कष्ट आणि यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी केवळ साहित्यिकांनी केल्या पाहिजेत, मराठी रसिकांनी केल्या पाहिजेत असे नाही तर ही जबाबदारी मराठी भाषेचे राज्य असणाऱ्या सरकारची आहे.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/ पूर्वी कु. थोरात 12:15

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, संगणक आल्यानंतर इंग्रजीमधील कोणतीही मेल उघडली आणि ती कोणत्याही फॉण्टमध्ये असली तरी उघडते. पण मराठीचा फॉण्ट मात्र कधी आकृती तर कधी दुसरा असतो. दुसरा फॉण्ट असेल तर तो मेल माझ्या संगणकावर उघडत नाही. संगणक आल्यानंतर आपल्या राज्य सरकारने मराठीचा फॉण्ट जगभर एकच असला पाहिजे यासाठी 50 कोटी रुपये खर्च करुन जर एकच फॉण्ट ठरविला असता तर सध्या जसे संगणकावर कधी 'लोकमत' उघडते तर 'सकाळ' उघडत नाही आणि 'सकाळ' उघडले तर 'लोकसत्ता' उघडत नाही अशी स्थिती झाली नसती. आता त्यामध्ये थोडी प्रगती झालेली आहे. आपण ते का केले नाही ? सन्माननीय सदस्य श्री. टकले साहेब यांना सांगू इच्छितो की, आता सुध्दा जी प्रबोधिनी झाली त्यामध्ये मराठी भाषेच्या बाबतीत सुचले कारण मराठी भाषिकांचे जे काही आंदोलन चालू झाले त्यामुळे जाग आली. मी त्या राजकारणात जात नाही पण ही जाग ज्यावेळी संगणक आले त्यावेळी यावयास पाहिजे होती. संगणकावर ही भाषा येणार त्यावेळी जगभर एकच मराठी भाषा वापरली गेली पाहिजे, एकच फॉण्ट असला पाहिजे यादृष्टीने त्यावेळी त्याबाबतच्या संशोधनावर जो खर्च करावयास पाहिजे होता तो खर्च भारत सरकार करणार नाही किंवा अमेरिकेतील मराठी साहित्य मंडळ करणार नाही तर तो खर्च महाराष्ट्र शासनाने करावयास पाहिजे होता. परंतु महाराष्ट्र शासनाने तो खर्च केला नाही. त्यामुळे वेगवेगळे फॉण्ट असल्यामुळे काही ई-मेल उघडतात तर काही उघडत नाहीत. त्यामुळे लोक मराठी वापरत नाहीत. त्यामुळे मराठीमध्ये 'वाढदिवस' असा शब्द लिहावयाचा असेल तर 'Vadhadivas' असे लिहून लोक मेल पाठवितात. कारण आपण पाठविलेले इ-मेल तिकडे उघडतील की नाही हे त्यांना माहीत नाही. मराठी भाषा वापरात आली पाहिजे असे वाटत असेल तर ती वापरात येण्यासाठी जे विशेष प्रयत्न सरकारकडून झाले पाहिजे ते प्रयत्न नक्कीच कमी पडले आहेत. या चर्चेच्या निमित्ताने सरकारने या सभागृहाला वचन दिले पाहिजे की, आम्ही यातील या चार गोष्टी आवर्जून करणार आहोत.

नेहमी चर्चा होते की, मुलांना मराठी शाळेत घातले पाहिजे. मुलांना मराठी शाळेत घातले तर त्यांचे ज्ञान अधिक प्रगत होते याची चर्चा होते. पण आपण पालकांना तोपर्यंत पटवून देऊ शकणार नाही जोपर्यंत मराठीमध्ये मराठीमध्ये सायन्स, मराठीमध्ये कायदा, मराठीमध्ये वाणिज्य याबाबतचे शिक्षण उपलब्ध होत नाही. हे होऊ शकत नाही काय ?

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

श्री. विनोद तावडे ....

1600-1700 सालापर्यंत संपूर्ण जगातील मेडिकल सायन्स लॅटीनमध्ये होते. ज्यावेळी इंग्लंडने ठरविले की, आपल्याला संपूर्ण जगावर राज्य करावयाचे आहे त्यावेळी त्यांनी लॅटीनमधील सर्व सायन्स, लॅटीनमधील लॉ, लॅटीनमधील कॉमर्स इंग्रजीत भाषांतरित करुन घेतले आणि आता ते लॅटीनमध्ये होते की नव्हते असा प्रश्न पडावा इतके सहजपणे त्यांनी ते इंग्रजीमध्ये भाषांतरित केले. आपण ते करु शकत नाही काय ? आज त्याचे काम चालू करा. या महाराष्ट्रामध्ये एमबीबीएसची पदवी 25 वर्षानंतर मराठी भाषेतून घेऊ शकतो हे आज काम चालू केले तर होऊ शकेल. पण त्यासाठी जी राजकीय इच्छाशक्ती पाहिजे ती प्रामाणिकपणे आपल्या राज्यकर्त्यांमध्ये दिसत नाही. मी केवळ आजच्याच राज्यकर्त्यांबद्दल बोलत नाही. आम्ही सुध्दा पाच वर्षे सत्तमध्ये होतो. आम्ही तरी किती केले ? मला खरोखरच यामध्ये राजकारण आणावयाचे नाही. यामध्ये आपण प्रामाणिकपणे किती काम करु शकलो असतो ? आपण ऑक्सफर्ड डिक्शनरीचे नाव घेतो. ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये 80 लाख शब्द आहेत. मराठीमध्ये आपले जे मराठी शब्दकोशाचे खंड तयार झालेले आहेत त्यानुसार आपण कसे तरी 7 लाख शब्दांपर्यंत पोहोचलो आहोत. ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये शिवसेनेचा आवडता 'बंद' हा मराठी शब्द इंग्रजीमध्ये आला. 'व्हारांडा' हा मराठी शब्द इंग्रजीमध्ये आला. 'ग्लासनोस' वगैरे रशियन शब्द इंग्रजीमध्ये आले. ऑक्सफर्डमध्ये सातत्याने त्यांचे भाषा स्वयंसेवक म्हणजे लँग्वेज किऑक्स जगभर लाखोच्या संख्येने असतात आणि असे नवीन चांगले शब्द आले तर ते शब्द ऑक्सफर्डच्या रिसर्च करणाऱ्यांकडे पाठवितात आणि त्यामध्ये त्यावर संशोधन होऊन, विचार होऊन ते शब्द ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये वाढविले जातात आणि ऑक्सफर्ड डिक्शनरी अधिक समृध्द व्हावी यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो. ते केवळ सरकार करीत नाही. श्री. मनोज तिरोडकरांचे तसेच श्री. म्हैसकराचे नाव फोर्ब्सच्या यादीमध्ये पहिल्या 50 मध्ये आले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना मी म्हटले की, आपण मराठी आहात आणि माझे मित्र आहात याबद्दल मला अभिमान वाटतो. बिल गेट्स त्याच्या उत्पन्नातील काही पैसा त्यांच्या ज्ञानासाठी, वेगळ्या फाऊंडेशनसाठी खर्च करतो. आमचे साहित्यिक श्री. माने आणि इतर साहित्यिक हे फोर्ब्स फाऊंडेशनच्या पैशावर विदेशात दौरे करणार.

यानंतर श्री. खंदारे...

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

असा एक तरी मराठी उद्योगपती आहे काय ? मराठी उद्योगपती गरवारे आणि किर्लोस्कर यांनाही यामध्ये सामावून घेतले पाहिजे. ही केवळ सरकारची जबाबदारी नाही. ज्यांनी या महाराष्ट्रात राहून उद्योग काढले आहेत त्या लोकांना सरकारने आग्रह केला पाहिजे की, त्यांनी त्यांच्या उत्पन्नातील जो कॉर्पोरेट सोशल कमिटमेण्टचा पैसा असतो तो पैसा या मराठी भाषेच्या संवर्धनासाठी लावला पाहिजे. त्यांच्या स्कॉलरशीपवर आमच्या मराठी साहित्यिकांनी या विषयातील संशोधन करण्यासाठी विदेशात प्रवास करावा आणि संशोधन केंद्रे त्याच्या आधारे चालवावीत. केवळ ही सरकारची जबाबदारी नाही. यामध्ये समाजाची जबाबदारी त्यात अंतर्भूत केली पाहिजे. सिना पेण्ट अशा दौ-यावर गेले. त्यांना अमेरिकन फाउंडेशनची स्कॉलरशीप मिळाली. लक्ष्मण माने यांना अशी स्कॉलरशीप घ्यावी लागली. आमच्या राज्यातील किंवा देशातील साहित्यिक अशा फाउंडेशनतर्फे विदेशात गेले आहेत काय ? याचा आग्रह का धरला जात नाही ? माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्व मराठी उद्योगपतींना बोलविले पाहिजे. महाराष्ट्रातील मराठी भाषेसाठी तुम्ही वेगळा ट्रस्ट स्थापन करावा आणि त्या ट्रस्टमार्फत तुम्ही स्कॉलरशीप दिली पाहिजे, त्याच्या आधारे मराठी संवर्धनाचे काम उद्योजकांनी केले पाहिजे, असा आग्रह सरकारने धरण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मराठी भाषेची पुस्तके विकली जात नाहीत अशी खंत व्यक्त केली जाते. मी पुण्यातील साहित्य संमलेनामध्ये गेलो असताना तेथील प्रत्येक स्टॉलवर फिरलो होतो. त्याठिकाणी प्रचंड प्रमाणात करोडो रुपयांची पुस्तकांची विक्री होत असल्याचे मी पाहिले आहे. त्यानंतर नवी मुंबईत गेलो होतो. तेथे मी एकाला विचारले की, येथे दादरमधील आयडियल बुक डेपो सारखे किंवा गिरगांवमधील बुक डेपोसारखे एखादे दुकान आहे का ? मला असे उत्तर मिळाले की, येथे एकही दुकान नाही. मी विचारले की का नाही ? त्यांनी असे सांगितले की, नवी मुंबईतील जागेचे भाव पाहिले तर येथे एखादा गाळा विकत घेऊन तेथे मराठी भाषेतील पुस्तके विक्रीसाठी ठेवून त्यातून जे उत्पन्न मिळेल ते आर्थिकदृष्टया परवडणार नाही. मग ही जबाबदारी सरकारची नाही का ? मराठी भाषेतील पुस्तकांसाठी काही ठिकाणी राखीव प्लॉट किंवा फ्लॅट

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

असतील किंवा गाळे असतील ते ठेवले पाहिजे. महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अशी व्यवस्था झाली पाहिजे. आपली वितरण व्यवस्था विक आहे. म्हणून मराठी साहित्याची विक्री कमी होत आहे. साहित्य उच्च दर्जाचे आहे. लोक घेऊ इच्छितात. मोफतमध्ये वाचण्याची मराठी माणसाला सवय नाही. शासनाने इन्फ्रास्ट्रक्चर उभे करुन दिले पाहिजे. आपण तालुक्याच्या व जिल्हयाच्या ठिकाणी नगरपालिकेने किंवा महानगरपालिकेने स्वस्त दरामध्ये गाळे उपलब्ध करुन दिले पाहिजेत. हे त्या स्थानिक स्वराज्य संस्थेला सांगितले पाहिजे की, तुमच्या तालुक्यातील मध्यवर्ती ठिकाणी एक गाळा अशाप्रकारच्या साहित्य विक्रीसाठी राखून ठेवावा. परंतु यासाठी गाळा राखीव ठेवला जात नाही. मराठी माणसाची ही भूक आहे, ही भूक भागविण्यासाठी त्यांना चांगले साहित्य पुरविले तर मराठी भाषेचे संवर्धन नक्की होईल.

सभापती महोदय, शिक्षणामध्ये नेहमी आय.क्यू.चा विचार केला जातो. भावनिक बुध्यांक गणण्याचा विचार हल्ली होऊ लागला आहे. मराठी भाषेचे शासनाला अधिक चांगल्या प्रकारे संवर्धन व प्रसार करावयाचा असेल तर मराठी भाषेचा एम्प्लॉयबिलिटी कोशण्ट वाढविला पाहिजे. मराठी भाषा येत असेल तर तुला नोकरी मिळेल नाही तर मिळणार नाही असे सांगितले पाहिजे. आम्ही जेट एअरवेजमधून प्रवास करतो त्यावेळी मराठी वर्तमानपत्र मागितले तर एअरहोस्टेस 'नवभारत टाईम्स' आणून देते. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील हे असे सांगत आहेत की, एस.टी.महामंडळाच्या 'शिवनेरी' या बसेसमध्ये इंग्रजी वर्तमानपत्र ठेवले जाते, मराठी वर्तमानपत्र ठेवले जात नाही. माझे असे म्हणणे आहे की, मला मोबाईलवर फोन येतात, त्यावेळी समोरुन असे म्हटले जाते की, हम आयसीआयसीआय लॉम्बार्डसे बात कर रहे है. हम आपसे बात कर सकते है क्या ? त्यावेळी त्यांना मी पहिला प्रश्न विचारत असतो की, तुम्हाला मराठीतून बोलता येते का ? त्यावेळी समोरुन हम यह कॉल ट्रान्सफर कर देते है असे सांगितले जाते. आपल्या राज्यातील 10 कोटी जनतेपैकी 9 कोटी जनता मराठी भाषिक आहे. आपल्याला जर मार्केट मधून फोन आला तर तुला मराठीतून बोलता येत असेल तर बोल असे सांगितले पाहिजे. म्हणजे नाईलाजाने का होईना ते कॉल सेंटरवाले मराठी भाषा येणा-या मुलांना नोकरी देतील.

यानंतर श्री.शिगम....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KGS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:25

(श्री. विनोद तावडे....

आपण जर पंचतारांकित हॉटेलमध्ये गेलो तर इंग्रजीमध्ये ऑर्डर देतो. आपण मराठीत ऑर्डर का देत नाही ? आपण पहिल्यांदा मराठीमध्ये ऑर्डर दिली पाहिजे. त्याला मराठी समजत नसेल तर ती गोष्ट मॅनेजरच्या लक्षात आणून द्यायला पाहिजे. त्याला सांगितले पाहिजे की, मला इंग्रजी येते परंतु मला मराठीतच ऑडर द्यायची आहे. असा प्रत्येक ठिकाणी आग्रह धरला गेला तर इंग्रजी येणा-या मराठी पदवीधर तरुणाला नोकरी मिळू शकते. तेव्हा मराठीचा सर्वत्र वापर होण्यासाठी आपण सुध्दा प्रयत्न केले पाहिजेत. म्हणून एम्पॉयबिलिटी कोशण्ट कसा वाढेल यादृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. मराठी भाषा आली तरच नोकरी मिळण्याची संधी जास्त अशा प्रकारचे वातावरण मराष्ट्रामध्ये निर्माण झाले तर आपोआपच मराठी भाषेचे संवर्धन आणि जतन या राज्यामध्ये होईल. मराठी भाषेकरिता स्वतंत्र खाते निर्माण करीत असताना ही मराठी भाषा वेगवेगळया पध्दतीने कशी विकसित करता येईल याचा विचार व्हायला पाहिजे. नाही तर साहित्यिक राज्यकर्त्यांकडे आणि राज्यकर्ते रसिकांकडे बोट दाखवित असतात. प्रत्येक जण एकमेकाकडे बोट दाखवित असतो. खरे म्हणजे मराठी भाषेच्या विकासाची आणि संवर्धनाची जबाबदारी ही साहित्यिक, सरकार आणि रसिक या तिघांचीही आहे. मराठी साहित्य संमेलनासाठी 50 लाख रुपये दिले की आपली जबाबदारी संपली असे सरकारने समजू नये.

पुण्याच्या साहित्य संमेलनात मी सांगितले होते की मराठी साहित्य मंडळाला सरकारने दिलेले पैसे घ्यायचे की घ्यायचे नाहीत यावर खल करीत बसू नका, सरकार पैसे देत असेल तर ते घ्या. कारण ते पैसे सरकारचे नाहीत. ते जनतेचे पैसे आहेत आणि ट्रस्टी म्हणून सरकार ते देत आहेत. तेव्हा ते पैसे साहित्य मंडळाने घ्यावेत असे आग्रही मत मी मांडले होते. त्यावेळी मी विंदाची कविताही उधृत केली होती.

देणा-याने देत जावे
घेणा-याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणा-याचे हात घ्यावेत

केवळ साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी सरकारचे हात घेऊ नका . राज्याचे माननीय मुख्यमंत्री,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे...

माननीय उपमुख्यमंत्री, मंत्री यांना साहित्य मंडळात यावयाचे असेल तर त्यांना येऊ द्यावे, त्यांना सन्मानाने पहिल्या रांगेत बसवावे. त्यांना साहित्य संमेलनात व्यासपीठावर बसवू नका.

मराठी भाषेच्या विकासासाठी स्वतंत्र खाते निर्माण केल्याबद्दल मी राज्य सरकारचे अभिनंदन करतो. परंतु मनात इच्छा नसेल आणि केवळ राजकीय आंदोलनामुळे हे खाते निर्माण करण्यात येत असेल तर काहीच होणार नाही. आता आयपीएलचे सामने दरवर्षी होतील. या सामन्यावर कर लावून त्यामधून मिळणा-या उत्पन्नातून 300 ते 500 कोटी रुपये या खात्याला द्या. ही पुढची गोष्ट झाली. सध्या या खात्याला शंभर-दीडशे कोटी रुपये दिले तर बरे होईल. दुसरे असे की, मराठीमधील उत्कृष्ट साहित्य हिंदी, बंगाली, इंग्रजी, फ्रेंच इत्यादी भाषांमध्ये भाषांतरीत झाले तर मराठी साहित्य जगात पोहोचेल.

सभापती महोदय, डॉ. नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या कमिटीमध्ये साहित्यिकही असले पाहिजेत. त्याचबरोबर मराठी भाषेच्या विकासाचा आणि संवर्धनाचा विचार करणारी माणसे देखील त्या कमिटीवर असली पाहिजेत. तेव्हा या खात्याची नव्याने रचना करीत असताना सर्वंकष विचार करायला पाहिजे.....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.परशुराम उपरकर) : ही चर्चा याठिकाणी थांबविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे हे ऑन लेग राहतील. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.30 ते 12.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: नियम 289 च्या सूचनेसंबंधी

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम आणि किरण पावसकर यांची एक नियम 289 अन्वये सूचना आलेली आहे. परंतु आजच्या कामकाज पत्रिकेत या अनुषंगाने कोणताही विषय नसल्यामुळे या सूचनेला मी अनुमती नाकारीत आहे.

--------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**सिंधुदूर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्पाचे पाणी सोडतांना सटमटवाडी येथील बंधारा वाहून गेल्याबाबत**

**(1) * 7516 श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्पाचे पाणी सोडतांना व टेस्टिंग करताना बांदा सटमटवाडी येथील बंधारा दिनांक 25 मे, 2010 रोजी वाहून गेला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर बंधारा वाहून गेल्यामुळे मोठ्या प्रमाणात जिवित व वित्तहानी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर बंधाऱ्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने या बंधाऱ्याच्या कामाची, गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून पाहणी करण्यात आली होती काय,

(4) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी असणाऱ्या ठेकेदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप या प्रकरणी कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (1) तिलारी प्रकल्पांतर्गत बांदा शाखा कालव्यामध्ये पाणी सोडण्याच्या प्रथम चाचणीच्यावेळी कालवा भरावाचे किरकोळ स्वरुपात नुकसान झाले होते.

(2) नाही.

(3) सदर भरावाचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले नसून त्या भरावाचे कामाची गुणवत्ता चाचणी गुणनियंत्रण विभागाकडून करण्यात आली आहे.

(4) या प्रकरणी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने चौकशी अधिकारी यांची नेमणूक केलेली होती. कामाच्या गुणवत्तेत दोष आढळून आलेला नाही. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : महोदय, अशा प्रकारे सातत्याने दर पावसात अनेक ठिकाणी डोंगर कोसळणे तसेच माती कोसळण्याचे प्रकार घडतात व कालवा फुटतो. तसेच हा कालवा पहिल्यांदाच चाचणी करीत असताना फुटलेला आहे. तेव्हा पुढे तो फुटू नये यादृष्टीने शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? त्याचप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी असे डोंगर कोसळलेले आहेत त्या त्या ठिकाणी संरक्षक भिंती बांधण्यात येणार आहेत काय ?

श्री. विजय वडेट्टीवार : महोदय, 9.350 कि.मी. वर हा कालवा फुटला असून त्याची प्रथम चाचणी करीत असताना ॲक्वाडेकच्या बाजूने थोडे नुकसान झालेले आहे. अशा प्रकारे अतिशय

........3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7516..... श्री. विजय वडेट्टीवार....

किरकोळ स्वरुपाची ही घटना होती. टेस्टिंगचे पाणी सोडतो त्यावेळी अशा घटना घडतच असतात. तेथे लाईनिंगचे काम चालू नव्हते. कारण पहिल्या वर्षी आपण मातीकाम करतो आणि एक वर्षानंतर लायनिंग करीत असतो. अशा प्रकारे यामध्ये जे नुकसान झालेले आहे तो रस्ता करुन दिलेला आहे तसेच शेतकऱ्याच्या शेतात मातीचा भराव जमा झाला होता तो सुध्दा काढून मदत केलेली आहे. अशा प्रकारे जवळपास 4-5 लाख खर्च करुन संपूर्ण दुरुस्ती करण्यात आली आहे.

श्री. राजन तेली : महोदय, तिलारी हा प्रकल्प कोकणातील सर्वात जुना प्रकल्प असून सन 1982 मध्ये त्याला सुरुवात झाली आहे. आजपर्यंत देखील या प्रकल्पाचे कामच सुरु आहे. हे काम कधी पूर्ण होणार आहे ?

श्री. विजय वडेट्टीवार : महोदय, हा जुना प्रकल्प असून तो एकूण 57 कि.मी. लांबीचा कालवा त्यामध्ये आहे. अनेक ठिकाणी डोंगरातून कालवा जात असताना कोठे ना कोठे दरडी कोसळल्यानंतर पुढे पाणी थांबते. पण गेल्या 10 वर्षात हे प्रमाण अत्यल्प असेच आहे. अशा प्ररस्थितीत या कालव्यामध्ये जेवढे लायनिंगचे काम शिल्लक होते ते लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : महोदय, प्राथमिक स्वरुपाची टेस्टिंग करीत असताना हा कालवा फुटल्याचे सांगण्यात आले. त्यात जे गुणदोष असतील त्यासंबंधी पुढील काळात काळजी शासन घेणार आहे काय ? त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी विचारल्याप्रमाणे या प्रकल्पाचे काम कधी पूर्ण होणार आहे आणि त्याचे अपेक्षित बजेट किती आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 7516....

श्री. अजित पवार : सभापती महोदय, तिलारी प्रकल्प महाराष्ट्र आणि गोवा अशा दोन राज्यांचा प्रकल्प आहे. सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्र शासनाने तिलारी प्रकल्पासाठी 60 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. गोवा सरकारकडून तिलारी प्रकल्पासाठी 27 कोटी रुपये येणे बाकी आहे. तिलारी प्रकल्पासाठी आपण आतापर्यंत आपल्या वाटयाचा खर्च करीतच असतो. गोवा हे लहान राज्य असल्यामुळे त्यांचे पैसे त्याच वर्षी येतात असे काही नाही. या वर्षाचे पैसे पुढील वर्षी सुध्दा गोवा सरकार देत असते. गोवा सरकारचे पैसे यावयाचे बाकी आहेत. म्हणून काम थांबले गेले आहे अशी परिस्थिती नाही. या तिलारी प्रकल्पासाठी गोवा राज्याचा हिस्सा 73.30 टक्के असून महाराष्ट्र राज्याचा हिस्सा 26.70 टक्के आहे. तिलारी धरणाचे मूळ काम झालेले असून या ठिकाणचे कालवे उतारावर असल्यामुळे कालव्याची सातत्याने फुटतूट होत असते. या वर्षी या प्रकल्पासाठी जो काही जास्तीचा निधी लागेल तो निधी देण्याचा महाराष्ट्र शासनाचा प्रयत्न राहणार आहे. तिलारी प्रकल्पाचे काम वर्षानुवर्षे सुरु आहे ते काम पूर्णत्वास नेण्यासाठी गोवा सरकारच्या हिश्श्याची जी काही रक्कम आहे ती त्यांनी लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावी यासंदर्भात आम्ही गोवा सरकारला सुध्दा सांगणार आहोत. कालव्यांची फुटतूट होऊ नये यासाठी कोणती खबरदारी घेण्यात येईल असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेला आहे. या ठिकाणच्या कालव्यांना जास्त उतार असल्यामुळे कालव्याचे काम झाल्यानंतर लागलीच लायनिंगचे काम करता येत नाही. कालवा तयार झाल्यानंतर तो कालवा तसाच एक वर्ष ठेवावा लागतो व एक वर्ष झाल्यानंतर कालव्याच्या लायनिंगचे काम केले जात असते. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी यासंदर्भात तक्रार केल्यानंतर आम्ही गुण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांना सुध्दा या कामाची चौकशी करण्यास सांगितले होते तसेच आमच्या एस.ई.च्या अंतर्गत सुध्दा चौकशी करण्यास सांगितले होते. या दोघांच्या चौकशीमध्ये एकसारख्याच बाजू लक्षात आलेल्या आहेत. कामाचा दर्जा खराब होता म्हणून बांधकाम फुटले अशातला भाग नाही तर ॲक्वाडक्टच्या जवळ लायनिंगचे काम झाले नव्हते त्या ठिकाणी पाणी पाझरले गेले व पाणी पाझरल्यामुळे भराव फुटला गेला. भराव फुटल्यामुळे तेथील 11 शेतक-यांच्या दोन एकराच्या शेतात पाणी गेले. भराव

...2...

ता.प्र.क्र. : 7516....

श्री. अजित पवार.....

फुटल्यामुळे फार मोठे नुकसान झाले अशातला काही भाग नाही. भराव दुरुस्त करण्याचे काम त्याच ठेकेदाराकडून करुन घेण्यात आले असून यामध्ये राज्यसरकारला कोणत्याही प्रकारचा भुर्दंड पडलेला नाही. भराव फुटल्यामुळे शेतक-यांचे जे नुकसान झालेले आहे ते तातडीने भरुन देण्यात आलेले आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे येथील आरोग्य विभागात नेमणुकीची बनावट पत्रे देऊन उमेदवारांची केलेली फसवणूक**

**(२) * ७८१५ श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील आरोग्य विभागात नेमणूकीची बनावट पत्रे देऊन काही उमेदवारांची फसवणूक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे प्रकरण पोलिसांत दाखल करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, संबंधीतांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे,

(४) अशाप्रकारच्या घटना पुढे होऊ नयेत यासाठी शासनाने काय उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे ?

**प्रा.फौजिया खान,श्री.सुरेश शेट्टी यांच्या करिता :** (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, सातारा यांचेमार्फत सातारा पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे. तसेच सदर भरती प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.मार्फत करण्याबाबतचा प्रस्ताव गृह विभागास सादर करण्यात आला आहे.

(३) उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे कार्यालयातील तीन कर्मचाऱ्यांना चौकशीसाठी अटक झाल्याने व त्यांची अटक ४८ तासांपेक्षा जास्त असल्याने त्यांना पुढील आदेश होईपर्यंत निलंबीत करण्यात आले आहे. याशिवाय पोलीस चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्यांवर शासन नियमातील तरतूदींनुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(४) नवीन नियुक्तीने हजर होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आदेशाबाबत उपसंचालक, पुणे कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून प्रत्यक्ष शहानिशा करुन घेण्याबाबत सर्व संस्थाप्रमुखांना उपसंचालक, पुणे यांनी सुचना निर्गमित केल्या आहेत.

श्री चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, प्रश्न क्रमांक...

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रमाणे दुरुस्ती करु इच्छिते. प्रश्न क्रमांक दोनच्या उत्तरात "सातारा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आलेली आहे" या ऐवजी "सातारा पोलीस स्टेशनमध्ये काही प्रकरणांच्या तक्रारी नोंदविण्यात आलेल्या आहेत" असे वाचावे. बाकी छापल्या प्रमाणे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मागील वर्षी महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य मंत्री डॉ. विमल मुंदडा असतांना व डॉ.यशवंत डोईफोडे हे उपसंचालक असतांना ग्रामीण रुग्णालयाची पदे भरतांना खोटी कागदपत्रे देऊन बोगस नेमणुका झाल्या होत्या. या संदर्भात पॉझीटीव्ह उत्तर मिळालेले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, ही घटना किती वर्षापूर्वी घडली होती ? या प्रकरणाची सीआयडी चौकशी होण्यास विलंब का होत आहे? डॉ. डोईफोडे हे निवृत्त झाले असून त्यांच्या निवृत्तीचे सर्व हिशोब थांबविण्यात आलेले आहेत काय ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : ७८१५...

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, दिनांक २२.३.२००८ रोजी वर्ग ३ व वर्ग ४ च्या भरतीच्या संदर्भात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. ऑक्टोबर, २००८ मध्ये भरतीची प्रक्रिया संपल्यानंतर असे लक्षात आले होते की, ज्या ठिकाणच्या पदांसाठी जाहिरात देण्यात आली होती त्या ठिकाणी प्रत्यक्षात जादा पदे भरली गेल्याचे आढळून आले होते.

यानंतर श्री. भारवि...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KGS/ SBT/ KTG/ ST/ जुन्नरे... 12:55

ता.प्र.क्र.7815.....

प्रा.फौजिया खान....

52 ज्युनिअर क्लार्कच्या पदासाठी जाहिरात देण्यात आली होती. तथापि, सदर पदासाठी 98 उमेदवारांची निवड करण्यात आली. 20 एक्सरे टेक्निशियन पदासाठी जाहिरात देण्यात आली होती. परंतु, प्रत्यक्षात 31 उमेदवारांची भरती करण्यात आली होती. वर्ग-4 मधील वॉर्ड बॉयच्या 70 पदांसाठी जाहिरात देण्यात आली होती. परंतु, येथे देखील जास्त प्रमाणात म्हणजे 105 जणांची वॉर्ड बॉय म्हणून नेमणूक करण्यात आली. या सर्व उमेदवारांना बनावट पत्रे देऊन नेमण्यात आले आहे, असे लक्षात आल्यानंतर चौकशी करण्यात आली. हे फोर्जरीचे मोठे प्रकरण आहे. म्हणूनच आम्ही चौकशीचे आदेश दिलेले आहेत. पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदविण्यात आली आहे. त्याची देखील संख्या सांगते. स्टाफ नर्स पदासाठी देखील अर्ज मागविण्यात आले होते. आम्ही 56 अर्जांची तपासणी केलेली असून त्यापैकी 16 जणांची नेमणूक पत्रे बोगस असल्याचे आढळून आल्याने 15 जणांविरूद्ध पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदविण्यात आली आहे. वेगवेगळ्या पदांसाठी 154 जणांची भरती झालेली आहे. त्यापैकी 110 जणांचे व्हेरिफिकेशन झाले असून 37 बनावट नेमणूकीची प्रकरणे असल्याचे लक्षात आल्यावरून 27 प्रकरणांमध्ये पोलीसठाण्यामध्ये तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. हे गंभीर स्वरूपाचे प्रकरण आहे. त्यामुळे अत्यंत गंभीरपणाने कारवाई करण्याबाबतचे पाऊल शासनाकडून उचलण्यात येत आहे. तसेच ज्या काही नियुक्त्या झालेल्या आहेत, त्या ताबडतोब रद्द करण्याचे आदेश काढण्यात येतील. ज्यांनी गुन्हा केला आहे, त्यांची उच्च अधिकाऱ्यामार्फत चौकशी करून निलंबन करण्याची कारवाई करण्यात येईल. गरज वाटल्यास त्यांना सेवेतून काढण्याची देखील कारवाई करण्यात येईल. तसेच या प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.मार्फत करण्याबाबत गृह विभागाला कळविण्यात आले आहे. तसेच पैशाचा व्यवहार झाला असेल तर अशी प्रकरणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपवून त्याची देखील चौकशी करण्यात येईल.

20-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V 2

ता.प्र.क्र.7815.....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी क्रमांक 4 ला जे लेखी उत्तर दिलेले आहे, ते संशयास्पद आहे. लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, "नवीन नियुक्तीने हजर होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आदेशाबाबत उप संचाक, पुणे कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून प्रत्यक्ष शहानिशा करून घेण्याबाबत सर्व संस्थाप्रमुखांना उप संचालक, पुणे यांनी सूचना निर्गमित केल्या आहेत." म्हणजे चौकशी अपूर्ण आहे. असे असताना पोलीस ठाण्यामध्ये काही तक्रारी नोंदविलेल्या आहेत. बाकीच्या नोंदविलेल्या नाहीत. त्यामुळे थातूरमातूर चौकशी करून केस दडपविण्याचा प्रयत्न केला असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. स्टाफ नर्सच्या पदाबाबत 16 जणांची नेमणूक पत्रे बोगस असल्याचे आढळून आल्याने 15 जणांविरूद्ध पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदविण्यात आली आहे. तसेच 37 बनावट नेमणूकीची प्रकरण असल्याचे लक्षात आल्यावरून 27 प्रकरणांमध्ये पोलीसठाण्यामध्ये तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. म्हणजे चौकशी पूर्ण झालेली नाही. ही सभागृहाची दिशाभूल आहे. म्हणून माझा प्रश्न आहे की, या प्रकरणी जे संबंधित अधिकारी कर्मचारी आहेत त्यांच्या विरुद्ध शासन केव्हा कारवाई करणार आहे ? तसेच सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यासाठी शासन पोलीस ठाण्यामध्ये तक्रार का करीत आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सदर बोगस प्रकरण लक्षात आल्यानंतर पोलीस ठाण्यामध्ये तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव गृह विभागाकडे पाठविलेला आहे. गृह विभागाकडून या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी होणार आहे. त्यामुळे शासन कोणालाही पाठीशी घालण्याचे काम करीत नाही. चौकशीमध्ये जे जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. उप संचालकांनी वर्ग-3 संबंधातील पदांबाबतचा चौकशी अहवाल तयार करून सादर केलेला आहे. वर्ग-4 पदांसंबंधीचा अहवाल अद्यापि सादर झालेला नाही. त्यामुळे या प्रकरणात कोणी कॅज्युअली वागले असतील तर त्यांच्या विरूद्ध देखील कारवाई करण्यात येईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, बनावट कागदपत्रांचे स्वरूप काय आहे ? कुठल्या सक्षम प्राधिकाराच्या नावाने पत्र दिलेली आहेत ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7815..

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सिव्हील सर्जन आणि डेप्युटी डायरेक्टर श्री.डोईफोडे यांच्या नावावर व्हेरिफीकेशन करुन नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. बनावट सह्या करुन नियुक्तीचे आदेश, आदेश रद्द झालेले नाही, अशी पत्रे त्यांच्या सहीने पाठविण्यात आलेली आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, फोर्जरी स्वरुपाच्या केसेस दाखल करण्यासाठी इतका वेळ का लागला ? आरोग्य विभागामध्ये डी.ई आणि ए.सी.बी.च्या किती केसेस प्रलंबित आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय,डी.ई आणि ए.सी.बी.च्या किती केसेस प्रलंबित आहेत याची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. ही माहिती नंतर देण्यात येईल.

श्री.सय्यद ज़मा : सभापति महोदय, मंत्री महोदय ने उत्तर दिया है कि जांच हुई है, रिपोर्ट आई है, एफ.आय.आर. दर्ज हो गई है. लेकिन प्रश्न यह है कि इतना बड़ा घोटला हो गया है. वास्तविक रुप से बड़े अधिकारियों की जिम्मेदारी थी कि निष्पक्ष तरीके से, पारदर्शीता से नियुक्तियाँ होनी चाहिए थी. क्या जांच में अधिकारी दोषी पाए गए हैं, अगर दोषी पाए गए हैं तो उनके खिलाफ तुरंत क्या कार्रवाई की जा रही है ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, हे प्रकरण अतिशय गंभीर असून यामध्ये काही अधिकाऱ्यांचा समावेश आहे. हा विषय मागील अधिवेशनात उपस्थित झाला होता त्यावेळी मी या प्रकरणी संबंधितांची डी.ई.करण्याचे आदेश दिले होते. त्याच काळात सन्माननीय खासदार श्री.उदयनराजे भोसले यांचे मला पत्र आले. तेव्हा याप्रकरणी सी.आय.डी.चौकशी आणि डी.ई करण्याचा निर्णय घेण्यात आला. गैरव्यवहार करणारे डेप्युटी डायरेक्टर श्री.डोईफोडे हे सेवानिवृत्त झालेले आहेत. तरी सुध्दा त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करणार आहोत. तसेच या प्रकरणातील दुसरी व्यक्ती श्री.खांडेकर यांची बदली औंध हॉस्पीटलमध्ये करण्यात आली आहे. अधीक्षक श्री.कुमावत व वरिष्ठ लिपिक श्री.खाडे यांना सस्पेंड करुन त्यांची चौकशी करणार आहोत. तीन कर्मचाऱ्यांना अटक झाली आहे. मला स्वत:ला वाटते की, हे एक-दोन लोकांचे काम नसून यामध्ये अनेकजण गुंतलेले असावेत. एकूण 37 केसेस बोगस आढळल्या, अजून 40 प्रकरणी व्हेरिफिकेशन व्हावयाचे आहे. मी आजच ब्रिफींग घेताना आरोग्य विभागाच्या प्रधान





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7815...

श्री.सुरेश शेट्टी... बअ

सचिवांना सांगितले की, या संदर्भातील अहवाल पंधरा दिवसांत देण्यात यावा. या प्रकरणी जे जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी. श्री.खाडे यांना आतापर्यंत सस्पेंड का केले नाही, तसेच या प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांकडून डिरिलिक्शन ऑफ डयुटी झाली असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री.चंद्रकांत पंडित : सभापती महोदय, या प्रकरणी काही जणांच्या नियुक्त्या चालू राहिल्या त्यांना ट्रेझरीमधून पगार मिळाला. तेव्हा या प्रकरणी ट्रेझरीमधील काही जणांचा समावेश आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. या प्रकरणी प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांना पंधरा दिवसांत चौकशी करण्याचे आदेश देऊन ज्या अधिकाऱ्यांनी डिरिलिक्शन ऑफ डयुटी दाखविली असेल त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

----------

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पिंपरी (जि.पुणे) येथील चिखली ते आळंदी दरम्यान इंद्रायणीच्या पात्रातील जलपर्णीमुळे पाण्याचे झालेले प्रदुषण**

**(३) * ७५३८ श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , प्रा.सुरेश नवले , श्री.चरणसिंग सप्रा , डॉ.सुधीर तांबे , श्री.सुभाष चव्हाण :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (जि.पुणे) येथील चिखली ते आळंदी या १८ किलोमीटर पर्यंतच्या इंद्रायणीच्या पात्रामध्ये पसरलेल्या जलपर्णीमुळे नदीचे पाणी प्रदूषित होऊन परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंद्रायणी नदीतील जलपर्णी त्वरीत काढण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सचिन अहिर,श्री.सुरेश शेट्टीयांच्याकरिता :** (१) आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका पिंपरी यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार हे खरे नाही.

(२) इंद्रायणी नदी पात्रातील (चिखली ते आळंदी) जलपर्णी काढण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या प्रश्नाला विसंगत उत्तर दिलेले आहे. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरातील इंद्रायणी नदीच्या पात्रातील ७ दशलक्ष पाण्यावर प्रक्रिया करण्याचे कामकाज अर्धवट राहिल्यामुळे नदीतील सर्वच पाणी दूषित झाले आहे हे खरे आहे काय ? त्याचबरोबर जलपर्णी नदी पात्रातून काढण्यात आली आहे असे उत्तर देण्यात आले आहे. तेव्हा शासनाच्या माध्यमातून जलपर्णी काढण्यात आली की खाजगी संस्थेच्या माध्यमातून काढण्यात आली होती ?

श्री.सचिन अहिर :सभापती महोदय, उत्तरात सांगितल्याप्रमाणे इंद्रायणी नदीच्या १८ किलोमिटर लांबीच्या पात्रात जलपर्णी झाली होती ही वस्तुस्थिती आहे.त्यानंतर ही जलपर्णी काढून टाकण्यासंबंधी महानगरपालिकेला आदेश देण्यात आले होते. त्यानुसार दिनांक २६.५.२०१० ते १५.६.२०१० या कालावधीत जलपर्णी काढून टाकली होती. इंद्रायणी नदीचे पात्र साफ करण्याचे काम महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात आले होते. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की,सिव्हरेज ट्रिटमेन्ट प्लॅन्ट मधून १०० टक्के पाण्यावर ट्रिटमेन्ट व्हावयास पाहिजे परंतु काही वेळा जलपर्णी वा गाळ पात्रात जात असल्यामुळे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते काम पूर्ण्पणे होऊ शकत नाही म्हणून सिव्हरेज ट्रिटमेन्ट प्लॅन्टमध्ये सुधारणा करावी अशी सूचना देखील महानगरपालिकेला देण्यात आली आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, जलपर्णी होण्याची काही शास्त्रीय कारण् आहेत काय आणि त्याचे निवारण करण्यासाठी शासन काही शास्त्रशुध्द उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, जलपर्णी होण्यास निश्चितपणे काही कारणे आहेत. सिव्हरेज ट्रिटमेन्ट प्लॅन्टमधून पाण्यावर ट्रिटमेन्ट न केल्यामुळे ज्यावेळी दूषित पाणी पात्रात सोडले जाते त्यामुळे सांडपाणी वा दूषित पाणी खाली साठले जाते व वरच्या बाजूला जलपर्णी निर्माण होत असते. यास सायटिंफिक रिझन्स काय आहेत हे शोधण्यासाठी पाण्याचे नमुने बायोलॉजी डिपार्टमेन्टकडे पाठविले होते आणि बायोलॉजिकल ऑक्सिजनचे प्रमाण त्या पाण्यात किती आहे हे सुध्दा तपासण्याचे काम शासनाच्या यंत्रणेमार्फत करण्यात आलेले आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, पिंपरी चिंचवड मधील दूषित पाण्याच्या संदर्भात या सभागृहात वारंवार चर्चा झालेली आहे. या चर्चेच्या वेळी सभागृहात एक वर्षापूर्वी उत्तर देण्यात आले होते . त्यावेळी आताच्या मंत्रीमहोदयांकडे ही जबाबदारी नव्हती त्यामुळे अन्य मंत्र्यानी जबाबदारीने ते उत्तर दिले होते. या बाबतीत मला माननीय मंत्रीमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, नदी पात्रातील सर्व जलपर्णी काढण्यात आली नाही अजूनही नदी पात्राच्या काठावर जलपर्णी ठेवण्यात आलेली आहे. नदी पात्रातील जलपर्णी काढल्यानंतर जलपर्णीचे ढिग तसेच पडून आहेत. ती जलपर्णी तेथून दुसरीकडे हलवावयास पाहिजे होती परंतु ती न हलविल्यामुळे पात्रात पुन्हा जलपर्णी तयार होत असते. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी असा प्रश्न विचारला होता की, या नदी पात्रातील जलपर्णी काढण्याची जबाबदारी कोणावर सोपविण्यात आली होती ? नदी पात्रातील जलपर्णी काढून टाकण्याची जबाबदारी ज्या यंत्रणेवर सोपविण्यात आली होती त्यांनी ही जबाबदारी पूर्णपणे पार पाडली नाही. तसेच नदीच्या काठावर ही जलपर्णी तशीच राहिलेली आहे यांसबंधी माननीय मंत्रीमहोदय चौकशी करणार आहेत काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, या नदीतील पात्र साफ करण्यात आले असल्याची माहिती मला मिळालेली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे असे समजून पुन्हा पाहणी करण्यात येईल आणि जर नदी पात्र व्यवस्थितपणे साफ करण्यात आले नाही असे जर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाहणीत आढळून आले तर सबंधित व्यक्तीविरुध्द कारवाई करण्या बाबत महानगरपालिकेला निदेश देण्यात येतील.

--------

तारांकित प्रश्न क्रमांक ७२३९

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सेवानिवृत्ती वेतन योजना राज्यात अंमलात आणतांना त्यातील काही महत्वाच्या तरतुदी राज्य शासनाने न स्वीकारणे

**(५) * ६९०७ श्री.दिलीपराव सोनवणे , प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने लागू केलेल्या सहाव्या वेतन आयोगाशी समकक्ष सेवानिवृत्ती वेतन योजना राज्यात अंमलात आणताना त्यातील काही महत्वाच्या तरतूदी राज्य शासनाने न स्विकारणे, काही योजनांबाबत अजूनही शासन निर्णय निर्गमित न होणे, "कन्सोलिडेटेड पेन्शन" नवीन वेतनश्रेणीच्या किमान वेतनाच्या निम्म्याहून कमी निश्चित झालेली असणे, एका विशिष्ट तारखेपूर्वी (१ जानेवारी, २००६) व त्या तारखेनंतर निवृत्त झालेल्या सेवानिवृत्तांमध्ये असा भेदभाव करणे घटनेच्या कलम १४ चा भंग करणारे असल्याचा मा.सर्वोच्च न्यायालयाने डी.एस.नकारा विरुध्द केंद्र शासन प्रकरणात (ISCC ३०५/१९८३) दिलेला निर्णय याबाबत महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनच्या अध्यक्षांनी अतिरिक्त सचिव, वित्त विभाग यांना दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी किंवा त्या सुमारास एक निवेदन देऊन अनेक त्रुटी लक्षात आणून दिल्या असून या संदर्भात उपरोक्त सर्वच त्रुटी व विशेषत: दिनांक १ जानेवारी, २००६ पूर्वी व नंतर निवृत्त झालेले/होणारे शासकीय कर्मचारी यांच्यातील भेदभाव संपुष्टात आणण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्यापही निर्णय झालेला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.विजय वडेट्टीवार,श्री.सुनिल तटकरे यांच्याकरिता :** (१) व (२) (३) सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्रीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेल्या विविध वेतनश्रेणींचा अभ्यास करुन राज्य शासकीय व इतर पात्र निवृत्तीवेतनधारकांची निवृत्तीवेतन निश्चिती व अनुषंगीक बाबींसंबंधी शिफारशी करण्यासाठी श्री.पी.एम.ए.हकीम, केंद्र शासनाचे माजी सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ यांनी शासनास सादर केलेल्या शिफारशी स्विकृत करण्याचा निर्णय जाणिपूर्वक घेण्यात आला असून त्यानुसार दि.१.१.२००६ पूर्वी व दि. १.१.२००६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याचे आदेश अनुक्रमे दिनांक ५.५.२००९ व दि.३०.१०.२००९ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनच्या अध्यक्षांनी वित्त विभागास दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी दिलेले निवेदन प्राप्त झाले असून त्यामध्ये केंद्रीय निवृत्तीधारकांना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केलेले सर्व लाभ राज्यातील निवृत्तीवेतनधारकांना लागु करण्याची विनंती केली आहे.

दरम्यानच्या काळात केंद्रीय निवृत्तीधारकांना सहाव्या वेतन आयोगात मंजूर केलेले सर्व लाभ राज्यातील निवृत्तीवेतनधारकांना लागु करण्यासाठी महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन व इतर काही जणांनी मुंबई उच्च न्यायालयाने याचिका दाखल केल्या आहेत. या याचिका मा. उच्च न्यालयाने दाखल करुन घेतल्या असून त्या सुनावणीसाठी प्रलंबित आहेत. त्यामुळे ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, केन्द्र सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी सहावा वेतन आयोग लागू केलेला असून सहाव्या वेतन आयोगाशी समकक्ष सेवानिवृत्ती वेतन योजना राज्यात अंमलात आणतांना त्यातील काही महत्वाच्या तरतुदी राज्य शासनाने न स्वीकारल्यामुळे राज्य शासनाच्या निवृत्त कर्मचा-यांवर अन्याय झालेला आहे. निवृत्ती वेतन सुधारणा आदेशाच्या अनुषंगाने काही शासन निर्णय काढण्यात आलेले आहेत परंतु त्यात काही त्रृटी असल्यामुळे त्यात सुधारणा करण्यात यावी यासाठी राज्य शासनाला निवेदन देण्यात आले होते दिनांक २२ मार्च २०१० रोजी या विषयावरील एका लक्षवेधी सूचनेवरील प्रश्नाला उत्तर देतांना माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, " सिफारस लागू करनेके बारेमे सरकार विचार कर रही है. " आता मात्र असे उत्तर दिलेले आहे की," उच्च न्यायालयाकडे ही बाब न्यायप्रविष्ट आहे."

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/ 13:10

ता.प्र.क्र. 6907...

श्री. दिलीपराव सोनवणे...

म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, राज्य वेतन सुधारणा समितीने याबद्दल काय शिफारस केली आहे? आणि त्यावर शासनाने काय विचार केला आहे?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सहाव्या वेतन आयोगाच्या समकक्ष सेवानिवृत्ती वेतन योजना अंमलात आली. त्यावेळी त्या योजनेचा अभ्यास करुन शिफारस करण्यासाठी शासनाने हकिम समितीची नियुक्ती केली होती. त्या समितीने केलेल्या काही शिफारशी राज्य सरकारने मंजूर केल्या व त्याप्रमाणे अंमलबजावणी सुरु केली. ती करीत असतांना या संदर्भात वेगवेगळया विभागाच्या वेगवेगळया संघटनांचे जे आक्षेप होते, किंवा म्हणणे होते ते ऐकून घेण्यासाठी वेतन त्रुटी समिती गठीत करण्यात आली. त्या समितीपुढे वेगवेगळया विभागाच्या संघटनांची प्रकरणे गेली. परंतु सेवानिवृत्तांच्या प्रकरणाचा वेतन त्रुटी समितीशी संबंध नसल्यामुळे त्यांची प्रकरणे गेली नाहीत. म्हणून या संदर्भात पेन्शनर्स असोसिएशनने उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली असल्यामुळे उच्च न्यायालयाचा निर्णय लागल्यानंतर या संदर्भात निर्णय घेतला जाईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, सेवानिवृत्तांची प्रकरणे वेतन त्रुटी समितीच्या अंतर्गत येत नाहीत, तो त्या समितीचा विषय नाही हे मंत्रिमहोदयांनी याठिकाणी सांगितले. त्यांना त्याकरिता फोरम उपलब्ध नाही, म्हणून त्यांनी दिलेले निवेदन आपण मान्य केले. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हर्ट होऊन काही चुकीचा निर्णय होणे योग्य नाही. आता मंत्रिमहोदयांनी हे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असल्याचे सांगितले. जर हे प्रकरण न्यायप्रविष्ठ नसेल तर मला दोन-तीन लहान प्रश्न विचारावयाचे आहेत. उच्च न्यायालयामध्ये अर्ज केल्यानंतर ते प्रकरण न्यायप्रविष्ठ होत नाही, ते ॲडमिट झाल्यानंतर न्यायप्रविष्ठ होते. माझ्या खाजगी स्त्रोताव्दारे मिळविलेल्या माहितीनुसार ते प्रकरण अजून ॲडमिट झालेले नाही. आणि जर ॲडमिट झाले असेल तर मी प्रश्न विचारणार नाही. त्यामुळे प्रकरण जर ॲडमिट झाले असेल तर ते कोणत्या तारखेला ॲडमिट केले?

श्री सुनील तटकरे : सभापती महोदय, क्रमांक 1530/09 ही याचिका उच्च न्यायालयामध्ये दाखल झाली आहे. त्याबाबत राज्य सरकारने जे काही धोरण स्वीकारावयाचे आहे, त्याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेतले आहेत. त्यामुळे त्या संदर्भातील आमची भूमिका आम्ही उच्च न्यायालयामध्ये मांडू.

20-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Y 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6907...

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे सांगितले. प्रकरण ॲडमिट झाल्यानंतर ते न्यायप्रविष्ठ होते परंतु त्यांनी ॲडमिट झाल्याचे सांगितले नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, याचिका न्यायालयामध्ये दाखल होते त्यावेळी त्या संदर्भात राज्य सरकारने आपली भूमिका शपथपत्राव्दारे स्पष्ट करावी असे उच्च न्यायालयकडून सांगण्यात येते. त्यामुळे मला प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे हे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये ॲडमिट झ ााले आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी प्रकरण उच्च न्यायालयामध्ये ॲडमिट झाल्याचे सांगितले आहे. त्यामुळे मी याबाबत प्रश्न विचारणे उचित नाही. मी मंत्रिमहोदयांचा आभारी आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईच्या उपनगरातील वीज भारनियमन कमी करण्याबाबत**

**(6) * 6818 डॉ.दीपक सावंत , श्री.रामदास कदम , श्री.किरण पावसकर , श्री.परशुराम उपरकर , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.सुभाष चव्हाण , श्रीमती अलका देसाई** : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईला वीजेचा पुरवठा करणाऱ्या मे.रिलायन्स वीज कंपनी व मे.टाटा वीज कंपनीचा वाद विकोपाला गेल्याने त्याची झळ उपनगरातील रिलायन्स कंपनीच्या ग्राहकांना बसत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ग्राहकांना नियमित वीज पुरवठा होत नसल्याने, मे.रिलायन्स वीज कंपनीने मुंबई उपनगरांमध्ये आळीपाळीने भारनियमन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, मे.टाटा वीज कंपनीने दिनांक 31 मार्च, 2010 पर्यंत मे.रिलायन्सला 200 मेगावॅट वीजेचा पुरवठा करावा असा आदेश, राज्य शासनाने, मे.टाटा वीज कंपनीला दिला, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, सदर आदेश टाटा वीज कंपनीने नाकारला असून टाटा आपली अतिरिक्त वीज शेजारी राज्यांना चढ्या दराने विकत आहे, हे ही खरे आहे काय,

(5) असल्यास, मुंबई उपनगरास अखंड वीज पुरवठा करण्याबाबत, शासनाने काही उपाययोजना केली आहे काय ?

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) नाही.

(3) नाही.

(4) नाही.

(5) मुंबई उपनगरास अखंड वीज पुरवठा करण्याबाबत उपाययोजना करावी म्हणून शासनाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास 7 मे, 2010 च्या शासन ज्ञापनान्वये सूचित केले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबई शहर व मुंबई उपनगराच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. याठिकाणी राज्य शासनाने माझ्या प्रश्नांना चार वेळा "नाही" असे उत्तर दिले आहे. आणि पुढे असे म्हटले आहे की, "मुबई उपनगरात अखंड वीज पुरवठा करण्याबाबत उपाय

..4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6818...डॉ.दीपक सावंत...

योजना करावी म्हणून शासनाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास 7 मे, 2010 च्या शासन इ ापनाव्दारे सूचित केले आहे". या उत्तरामध्ये मला कॉट्रॅडिक्शन दिसते. म्हणून माझा असा प्रश्न आहे की, 300 युनिटपेक्षा कमी वापर करणारा ग्राहक टाटा कंपनीकडे वर्ग करावा अशाप्रकारे दि.16.5.2010 रोजी राज्य शासनाकडे देण्यात आलेला प्रस्ताव अस्तित्वात आहे काय? काल मुंबईच्या उपनगरामध्ये एक तास वीज नव्हती. त्यामुळे माझा दुसरा प्रश्न असा की, मुंबईमध्ये कोणकोणत्या भागामध्ये भारनियमन आहे?

(यानंतर श्रीमती थोरात)

----------

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/ प्रथम श्री. सरफरे.... 13:15
ता.प्र.क्र.6818...

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मुंबईमध्ये सध्या कुठलेही भार नियमन नाही. ट्रान्स्फॉर्मरमध्ये बिघाड झाल्यामुळे मेन्टेनन्सच्या कारणास्तव एखाद्यावेळी अर्धा-तास एखादा तास वीज नसेल अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. एमईआरसीकडे हा प्रस्ताव गेल्यानंतर एमआईआरसीने तो कमिशनरकडे पाठविलेला आहे. कमिशनरच्या अहवालानुसार पुढचा निर्णय लवकरात लवकर घेतला जाईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, महाराष्ट्रील काही शहरे भारनियमन मुक्त करण्याचा निर्णय या सदनात झाला होता. त्याअनुषंगाने मी यापूर्वीही मागणी केली होती की, महाराष्ट्रात लातूर हे शहर शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थी मोठया प्रमाणात लातूर या शहरातील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेतात. म्हणून लातूर हे शहर भारनियमनमुक्त करण्याचा विचार शासनाच्या विचाराधिन आहे काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे परंतु मी या प्रश्नाचे उत्तर देतो. मुंबई जसे राजधानीचे ठिकाणी आहे तशा पध्दतीने औरंगाबाद, नागपूर, पुणे, अमरावती, नाशिक ही त्या त्या विभागाची ठिकाणे आहेत. या विभागाच्या ठिकाणी भारनियमन होऊ नये यासाठी जी काही जास्तीची वीज लागेल ती ज्या दरामध्ये मिळेल त्या दरामध्ये घेऊन त्या जास्तीच्या विजेवर होणारा खर्च ज्या शहराला भारनियमनातून मुक्त करावयाचे आहे त्या शहरातील ग्राहकांवर तो खर्च आकारण्यात यावा अशा प्रकारचा निर्णय एमईआरसीने घेतला आहे. त्याबाबतीत नागपूर, औरंगाबाद आणि पुणे शहराने प्रतिसाद दिला. त्यामुळे ही शहरे भारनियमनमुक्त झाली. नाशिक शहराने प्रतिसाद दिलेला नाही. म्हणून ते यामध्ये मागे राहिले आहे. सभापती महोदय, लातूर हे काही विभागाचे ठिकाण नाही तर जिल्हयाचे ठिकाण आहे. जिल्हयाची ठिकाणे अनेक आहेत. लातूर, परभणी, नांदेड, उस्मानाबाद, हिंगोली, जालना ही जिल्हयाची ठिकाणे आहेत. विजेच्या आजच्या परिस्थतीमध्ये विजेची मागणी आणि पुरवठा याचा ताळमेळ घातला तर आजही जवळपास तीन ते चार हजार मेगावॅटचे शॉर्टेज आहे. अशा काळामध्ये जिल्हयाची ठिकाणे लगेच भारनियमनातून मुक्त करणे शक्य नाही. परंतु विजेची थोडीशी परिस्थिती सुधारली की, त्यांचा देखील विचार करण्यात येणार आहे. तो विचार करीत असताना जो काही दर वाढेल तो जास्तीतचा दर देण्याची तयारी त्या जिल्हयानी दाखविली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6818...

श्री. अजित पवार.....

पाहिजे. सभापती महोदय, संपूर्ण जिल्हा भारनियमन मुक्त होणार नाही तर ते फक्त लातूर शहरापुरते मर्यादित असेल. म्हणजे ते फक्त त्या त्या शहरापुरते मर्यादित असेल. तसेच विभागाची ठिकाणे देखील त्या शहरांपुरतीच मर्यादित असतील. या पध्दतीचा राज्य सरकारचा याबाबतीतील विचार आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रात भारनियमन लागू आहे. ज्या जिल्हयात वीज निर्मिती होते तेथेही भारनियमन लागू आहे. ग्रामीण भागात 14 ते 18 तास व शहरी भागात पाच ते सहा तास भारनियमन असते. सुदैवाने ऊर्जा राज्यमंत्री चंद्रपूर जिल्हयातील आहेत. त्यामुळे मला याठिकाणी प्रश्न विचारावयाचा आहे की, चंद्रपूर येथे वीज निर्मिती होते तसेच आम्हाला तेथे प्रदूषणामध्ये रहावे लागते. त्यामुळे चंद्रपूर भारनियमनमुक्त करणार काय? तसेच ग्रामीण भागात 14 ते 18 तास आणि शहरी भागात पाच ते सहा तास भारनियमन आहे त्यामध्ये मुक्ती देणार काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, माझ्या सुरुवातीच्या उत्तरामध्ये एक गोष्ट सांगायची राहून गेली. महाराष्ट्रात वीज गळतीचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. म्हणून या वीज गळतीच्या ठिकाणांना ए,बी,सी,डी,इ, अशा प्रकारच्या कॅटेगरिज लावल्या आहेत. ज्या ठिकाणी वीज गळतीचे प्रमाण सर्वात कमी आहे ते ठिकाण 'ए' या कॅटेगरिमध्ये घेण्यात येते. गळतीचे प्रमाण जसजसे वाढत जाते त्याप्रमाणे 'बी','सी', 'डी' या कॅटेगरिमध्ये ती ठिकाणे घेण्यात येतात. ज्या ठिकाणी गळतीचे प्रमाण 50 टक्केपेक्षा जास्त आहे ते ठिकाण 'एफ' या कॅटेगरिमध्ये जाते. त्या ठिकाणी गळतीचे प्रमाण मोठया प्रमाणावर आहे अशा ठिकाणी गळतीचे प्रमाण कमी करण्याबाबत सातत्याने सांगण्यात येते. सभापती महोदय, या ठिकाणी गळती हा शब्द वापरण्यात येत असला तरी खरे म्हणजे याला वीज चोरीचे प्रमाणच म्हटले पाहिजे. जेथे वीज चोरीची प्रमाण जास्त आहे त्या ठिकाणी भारनियमन जास्तीचे करण्यात येते ही वस्तुस्थिती मी मान्य करतो. सन्माननीय सदस्यांनी चंद्रपूरच्या बाबतीत या ठिकाणी प्रश्न विचारलेला आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 6818 ..... श्री. अजित पवार ...

त्याबाबत मी सांगू इच्छितो की, चंद्रपूर असेल, खापरखेडा असेल, भुसावळ असेल किंवा कोराडी असेल, ज्या ज्या ठिकाणी वीज निर्मिती होते त्या ठिकाणी नाही म्हटले तरी काही प्रमाणात प्रदूषण होते आणि हे प्रदूषण त्या ठिकाणी होत असताना त्या भागामध्ये वीज निर्मिती होते परंतु त्या शहराला भारनियमन सहन करावे लागते म्हणून आम्ही याबाबतीतमध्ये एमईआरसीच्या पुढे गेलेलो आहोत की, त्या ठिकाणी किमान त्या शहरापासून पाच किलोमीटरच्या एरियामध्ये तरी भारनियमन नसावे. कारण आज चंद्रपूरला जवळपास 2 हजार मेगावॅट वीज निर्माण होते. त्यामुळे अशा प्रकारचा प्रस्ताव आम्ही त्या ठिकाणी सादर करीत आहोत. त्याला मान्यता मिळाल्यानंतर ज्या ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वीज निर्मितीची केंद्रे आहेत त्या केंद्रापासून पाच किलोमीटरच्या एरियामध्ये त्या शहराला भारनियमनातून मुक्त करण्याचा शासनाचा विचार आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी 300 मेगावॅटचा मी जो प्रस्ताव सांगितला तो प्रस्ताव पाचव्या महिन्यात गेला आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले. माझा प्रश्न असा होता की, 16.5.2010 ला आपण एमईआरसीकडे प्रस्ताव दिला आहे काय ? त्या प्रस्तावाचे पुढे काय झाले ? दुसरा प्रश्न असा आहे की, टाटा आणि रिलायन्स यांचा वाद हा सर्वश्रुत आहे. त्यामुळे अनेक ग्राहक आज रिलायन्सकडून टाटाकडे परावर्तीत होत आहेत. म्हणजे आपली बिले ट्रान्सफर करीत आहेत. आम्हाला टाटाची वीज पाहिजे आहे असे म्हणतात. हे खरे आहे काय ? अशा प्रकारे असेल तर रिलायन्सचे जे वाढलेले दर आहेत ते दर कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासन यामध्ये मध्यस्थी करणार काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, संपूर्ण मुंबई उपनगर आणि शहराच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. खरे तर मागच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या वेळेसच सन्माननीय लोकप्रतिनिधींना आणि ग्राहकांना असे वाटत होते की, रिलायन्सचा विजेचा दर वाढतो की काय ? अजूनही हा वाद मिटलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. हा वाद एमईआरसीच्या कोर्टामध्ये आहे. त्यामध्ये असे काही घडू नये म्हणून राज्य सरकार त्याबाबतीत प्रयत्न करीत आहे. खरे तर दिल्लीमध्ये तीन वेगवेगळ्या कंपन्या वीज पुरवठा करतात. पण त्या ठिकाणी सगळीकडे ग्राहकांना

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

ता. प्र. क्र. 6818 ..... श्री. अजित पवार ...

विजेचा दर सारखा आहे म्हणून दोन्ही सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे अशा प्रकारची मागणी केलेली होती आणि तशाच प्रकारची भूमिका राज्य सरकारने या ठिकाणी स्वीकारावी आणि या ठिकाणी बेस्ट, रिलायन्स आणि टाटा या तिघांच्या ग्राहकांना कमर्शियलच्या बाबतीत, घरगुती ग्राहकांच्या बाबतीत, बीपीएल कार्ड धारकांच्या बाबतीत किंवा शून्य ते शंभर युनिटपर्यंत वापर असलेले ग्राहक अशा सगळ्यांना वेगवेगळ्या प्रकारचे दर आहेत ते एकसारखे करण्याचा प्रयत्न करावा अशा प्रकारची त्यांची मागणी होती. ती मागणी सुध्दा तपासून बघितलेली आहे. एमईआरसीची सुध्दा त्याला मान्यता लागते. अजून त्याला अंतिम मान्यता मिळालेली नाही. परंतु मी एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, ज्यावेळेस आपल्याला वाटत होते की, 31 मार्चलाच मुंबईमधील वीज ग्राहकांना विजेचा फटका बसणार तेव्हा आम्ही मंत्रिमंडळ उपसमितीची पहिली बैठक घेतली. त्यामध्ये टाटा कंपनीने 1.4.2010 पासून रिलायन्सला 460 मेगावॅट वीज न देण्याच्या संदर्भात जी परिस्थिती उद्भवली होती त्यासंदर्भात आम्ही पाच सदस्यांची समिती स्थापन केली आणि त्यांना सांगितले की, याचा अभ्यास करा. टेक्निकल बाबी तपासून घ्या आणि यामध्ये ग्राहकाला त्रास होणार नाही याची खबरदारी राजयकर्ते म्हणून सरकार म्हणून आपल्याला घ्यावी लागेल. या समितीमध्ये 30.3.2010 रोजी आम्ही जे पाच सदस्य निवडले त्यामध्ये ऊर्जा सचिव, महानिर्मितीचे एम.डी., महावितरणचे एम.डी., विधी व न्याय खात्याचे प्रधान सचिव तसेच एमईआरसीचे सचिव अशा लोकांची समिती होती. 28.4.2010 रोजी समितीने शासनाला अहवाल सादर केला. 7.5.2010 रोजी समितीच्या शिफारशीनुसार ज्ञापन निर्गमित करुन एमईआरसीला कार्यवाही करण्याच्या सूचना राज्य सरकारने दिल्या. 19.5.2010 ला टाटाकडून रिलायन्सला होणाऱ्या वीज पुरवठ्याबाबत जैसे थे स्थिती ठेवण्याच्या संदर्भामध्ये आणि विशेषत: 360 मेगावॅटच्या बाबतीत शासनाने सूचना दिल्या. तो राज्यभार प्रेषण केंद्राला राज्याने त्या पध्दतीने कळविला आणि 20.5.2010 ला टाटाने 7.5.2010 च्या आणि 19.5.2010 च्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6818... श्री.अजित पवार....

तेथे अंतरिम स्थगिती देण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. अद्यापपर्यंत ते प्रकरण प्रलंबित आहे. हे सर्व करीत असताना राज्य सरकारने मुख्यमंत्र्यांच्या, उपमुख्यमंत्र्यांच्या स्तरावरुन प्रयत्न केले आहेत. काही झाले तरी टाटा पॉवर ही कंपनी यासंबंधी वेगळी भूमिका घेत असेल तर शासनाला एमईआरसीला डायरेक्टीव्हज् देण्याचे अधिकार आहेत त्यासंदर्भात देखील विचार करावा लागेल. टाटाने ऐकले नाहीच तर या कंपन्यांना डायरेक्टीव्हज् देण्याचा अधिकार आहे, त्याचाही वापर करावा लागेल. परंतु त्यांनी तसे न करता ते उच्च न्यायालयात गेले आणि उच्च न्यायालयाने सुध्दा सर्व बाजू समजून घेतल्यानंतर त्याला स्थगिती दिलेली नाही. शासनामार्फत सुध्दा एमईआरसीसमोर वस्तुस्थिती मांडली जात आहे. एक गोष्ट खरी आहे की, टाटा, रिलायन्स आणि बेस्ट या तिघांचा विचार करता आज रिलायन्सकडे सर्वात जास्त ग्राहक आहेत. बेस्टच्या ग्राहकांची संख्या 9 लाख 80 हजार इतकी आहे. त्यापैकी 7 लाख 8 हजार निवासी ग्राहक आहेत. रिलायन्सकडे 30 लाख 30 हजार ग्राहकांची संख्या आहे, त्यापैकी 26 लाखझोपडपट्टीत राहणारे गरीब वर्गातील ग्राहक आहेत. टाटाकडे 1 लाख 63 हजार ग्राहक आहेत. त्यापैकी 1 लाख 36 हजार निवासी ग्राहक आहेत. 86 हजार ग्राहक हे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरकडून टाटा पॉवरकडे ट्रान्सफर झालेले आहेत. कारण त्यांना त्यांचे दर कमी आहेत असे वाटते. एकूणच कमर्शिअलच्या बाबतीत बोलावयाचे झाल्यास त्या भागातील इंटरनॅशनल एअरपोर्टला रिलायन्स वीज देत होती त्यावेळी त्यांचे येणारे बिल आणि टाटाकडून वीज घेण्यास सुरुवात केल्यावर आलेले बिल यामध्ये मोठी तफावत दिसून आली आहे. टाटाचे कमर्शिअलचे दर खूप कमी आहेत, त्यामुळे त्या एअरपोर्टचे दररोज 10 लाख रुपये वाचू लागले. त्यामुळे एअरपोर्ट ॲथोरिटी टाटाकडे गेली. त्यांचे दरमहा 3 कोटी रुपये याप्रमाणे वर्षाला 36 कोटी रुपयांची बचत होऊ लागली. त्यांचे 36 कोटी वाचले तरी त्यांचा भूर्दंड सर्वसामान्य ग्राहकांवर येतो. म्हणून वीज नियामक आयोगाला सूचना केली आहे की, सबसिडी मिळाली पाहिजे. जो मोठा ग्राहक आहे त्यांच्याकडून अधिकचा दर घेतला पाहिजे, जेणे करुन लहान ग्राहकाला त्याचा फटका बसणार नाही. आज मॉल, रेल्वे, इंटरनॅशनल एअरपोर्ट, जाहिरातदार वाणिज्यिक उद्देशासाठी जे वीज वापरतात त्या सगळयांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

NTK/ SBT/ KTG/

ता.प्र.क्र.6818... श्री.अजित पवार....

टाटा वीज देण्याचा प्रयत्न करीत आहे. टाटाचा स्वत:चा वीज निर्मिती प्रकल्प असल्यामुळे टाटाला हे सोयीचे होत आहे. रिलायन्सच्या ग्राहकांची संख्या वाढल्यामुळे त्या कंपनीने स्वत: वीज निर्मिती करावयास पाहिजे होती. परंतु ते करु शकलेले नाहीत. त्यांच्या रायगडच्या प्रकल्पाला विलंब लागला आहे. त्यामुळे हया सगळया अडचणी आलेल्या आहेत. तरी सुध्दा कारण नसताना गरीब माणूस, लहान वीज ग्राहक यात भरडला जाऊ नये अशी सरकारची भूमिका आहे, म्हणून या सगळया बाबीवर सरकार लक्ष ठेवून आहे.

-----

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-07-2010

( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही )

BB-3

NTK/ SBT/ KTG/

**गोदावरीचे (जि.नाशिक) पाणी प्रदुषित झाल्यामुळे रहिवाशांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका**

**(७) * ७१३७ श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.सुभाष चव्हाण , श्री.मोहन जोशी , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.उल्हास पवार , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील गोदावरीचे पाणी प्रदूषण धोकादायक स्थितीत असल्याचे, जागतिक आरोग्य संघटना व भारत सरकारने निश्चित केलेल्या निकषांद्वारे नुकतेच आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदूषित पाण्यामुळे नदीकाठच्या रहिवाश्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.सचिन अहिर, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता :** (१) गोदावरी नदी पात्रामध्ये घरगुती सांडपाणी मिसळत असल्यामुळे नदीपात्रातील पाणी दूषित झाले आहे, हे खरे आहे.

(२) नाशिक महानगरपालिका आरोग्य विभाग, नाशिक यांच्या दिनांक ०८.०७.२०१० च्या अहवालान्वये, नाशिक परिसरात जलजन्य आजार म्हणून गॅस्ट्रो, कॉलरा, इ. आजारांची साथ उद्‌भवलेली नाही. तथापि जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी एप्रिल, २०१० मध्ये नाशिक शहरापासून २० ते २५ कि.मी. अंतरावर असलेल्या सायखेडा परिसरामध्ये कावीळ या रोगाची लागण झाल्याचे व त्यामुळे ८४ रुग्णांना कावीळ व एका रुग्णाचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे कळविले आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नाशिक महापालिका आयुक्त, यांना दिनांक १४/६/२०१० रोजी वैयक्तिक सुनावणी देऊन कृती आराखडा सादर करुन त्याबाबत तातडीने कार्यवाही करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत. डिसेंबर २०११ पर्यंत १००% सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची यंत्रणा उभारण्याची कार्यवाही नाशिक महानगरपालिकेकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, नाशिक शहरात प्रदूषित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे या शहराच्या दृष्टीकोनातून हा अतिशय महत्वाचा व गंभीर प्रश्न आहे. लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "पिण्याच्या पाण्यात सांडपाणी मिसळत आहे हे खरे आहे. तथापि, फारसे साथीचे विकार आढळून आलेले नाहीत. नाशिक शहरापासून 25 कि.मी.अंतरावर साथीच्या रोगाचे रुग्ण आढळले आहेत." खरे म्हणजे कित्येक दिवसापासून पिण्याच्या पाण्यामध्ये दूषित पाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मिसळल्यामुळे तेथे भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. 1 लाख लोक नदीकाठी राहतात. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे व महानगरपालिकेचे पूर्ण दुर्लक्ष असल्यामुळे नाशिक शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सायखेडामध्ये काही रुग्ण आढळलेले आहेत. नाशिक शहरामध्ये झोपडपट्टीमध्ये राहाणारी गरीब माणसे या साथीच्या रोगाने आजारी असल्याचे आढळून आलेले आहे. या पाण्यामध्ये नायट्रेट सारखे विषारी रसायन मिसळलेले आहे. गढूळ पाण्यामुळे साथीचे विकार होतील असे वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाले आहे. त्यामुळे या संपूर्ण शहरामध्ये भीतीचे वातावरण पसरलेले आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळाने कोणकोणत्या भागातील पाण्याची तपासणी केली आहे ? ही पाण्याची तपासणी सरकारी प्रयोगशाळेत की खाजगी प्रयोगशाळेत केलेली आहे ? भुयारी गटार योजनेसाठी जेएनएनयुआरएम मार्फत 350 कोटी रुपये केन्द्र सरकारकडून आलेले आहेत. या योजनेमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : आरोग्य खात्याने निष्कर्ष काढले त्यावेळी शहरामध्ये दूषित पाणी असल्याचे लक्षात आले. सायखेड्यामध्ये रुग्ण आढळले आणि एकाचा संशयास्पद मृत्यू झाला. याची गंभीरपणे दखल घेत असताना शासनाच्या असे लक्षात आले की, 40 वर्षापूर्वीची जुनी पाईन लाईल नादुरुस्त झालेली आहे. तिची दुरुस्ती करण्यासाठी नगरपरिषद आणि ग्रामपंचायतीने जो प्रस्ताव पाठविला त्याला मंजुरी देण्याचे काम शासनाने केले. नाशिकमध्ये 70 सिव्हरेज ट्रीट होईल अशा प्रकारचा एसटीपी प्लॅण्ट करायला पाहिजे. म्हणून जेएनएनयूआरएमच्या अंतर्गत महानगरपालिकेला निधी देण्याचे काम केले. पहिल्या टप्प्यामध्ये 163 एमएलडी पाणी फिल्टर करुन घेण्याची योजना प्रस्तावित केली आहे. दुस-या टप्प्यासाठी निधीची मागणी केलेली आहे. तिस-या टप्प्यामध्ये निधी मिळाल्यानंतर शंभर टक्के सिव्हरेज ट्रीट करण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे.

श्री. भाई जगताप : राज्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न फार गंभीर आहे. जेवढ्या गंभीरपणे आरोग्य खात्याने या प्रश्नाची दखल घ्यायला पाहिजे तेवढ्या गंभीरपणे ती घेतलेली नाही. स्वच्छ पाण्याचे नमुने घेतले गेले अशी आमची माहिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी सांगितल्याप्रमाणे पाण्याचे नमुने कोठून घेतलेले आहेत ? खरे म्हणजे पाण्याचे नमुने वारंवार घेऊन त्यामध्ये काय काय आढळून आले हे सांगणे गरजेचे आहे. तेव्हा अशा प्रकारची प्रक्रिया केली गेली आहे काय ? पाण्याचे नमुने सरकारी प्रयोग शाळेत की खाजगी प्रयोग शाळेत तपासले ?

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 13:35

ता.प्र.क्र.7137........

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, खाजगी लॅबमध्ये तपासणी करण्याची आवश्यकता नाही. मंडळाची स्वत:ची यंत्रणा असल्यामुळे त्याठिकाणी पाण्याचे नमुने तपासण्याचे काम केले जाते. गोदावरीच्या पात्रामध्ये पाणी दूषित होत असल्याची तक्रार प्राप्त झाली तसेच रुग्णांच्या संख्येत वाढ होते की काय अशी भीती निर्माण झाल्यामुळे गोदावरीच्या पात्रातील पाण्याचे नमुने घेऊन ते मंडळाच्या लॅबमध्ये तपासण्याची भूमिका घेतली गेली. दरमहा तीन-चार ठिकाणच्या पाण्याचे नमुने तपासले पाहिजेत असा प्रघात असल्यामुळे त्याप्रमाणे नमुने तपासण्याचे काम केले आहे. गंगापूर धरण, सोमेश्वर धरण, रामकुंड, नंदकुमार घाट तद्वत तपोवन येथील पाण्याचे नमुने तपासण्याचे काम केले आहे. पाण्याच्या नमुन्यामध्ये बायोलॉजीकल ऑक्सीजन डिमांड किती आहे हे तपासण्यात आले. सायखेडा येथील पाण्याचे नमुने तपासण्यात येत असताना त्या नमुन्यामध्ये बायोलॉजीकल ऑक्सीजन डिमांडचे प्रमाण कमी असल्याचे निदर्शनास आल्याने माहिती घेतली असता दूषित पाण्याचे प्रमाण वाढत आहे असे लक्षात आले. 40 वर्षापूर्वीची जी योजना होती ती कार्यान्वित करण्याची भूमिका घेतली आहे. नाशिकमध्ये सांडपाण्यावरील प्रक्रियेचा विषय ही गंभीर समस्या बनलेली आहे. प्रतिवर्षी 240 ते 250 एमएलडी सांडपाणी तयार होते, किमान 16 लाख लोकसंख्या त्या परिसरात आहे म्हणून जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून 148 कोटी रुपये खर्चाचा पहिला टप्पा पूर्ण करण्याचे काम केले असून त्याद्वारे 163 एमएलडी सांडपाण्यावर ट्रिटमेंट केली जात आहे. टप्पा क्रमांक-2 साठी राज्य शासनाने जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून 171 कोटी रुपये मंजूर केले असून त्याद्वारे 90 एमएलडी सांडपाण्यावर ट्रिटमेंट केली जाईल. आज 70 टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात आहे, यापुढच्या काळात जे सांडपाणी तयार होईल त्यावर प्रक्रिया करण्यासाठी जेएनएनयुआरएम योजनेतून तरतूद केली आहे. त्र्यंबकेश्वर येथे 100 टक्के एसटीपी ट्रीट होत आहे. तसाच प्रयत्न नाशिक शहरामध्ये करण्याचे देखील काम होत आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत महापालिकेला सुनावणी देऊन डिसेंबर, 2011 पर्यंत 100 टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा उभारण्यात येईल. प्रश्न असा आहे की, मध्यंतरीच्या काळात जे दूषित पाणी पुरविले जाईल आणि ते नागरिकांकडून वापरले जाईल त्याबाबत जनजागरण मोहीम राबविणे हा त्याच कार्यातील भाग आहे. असे दूषित पाणी वापरण्यावर निर्बंध कसे आणता येतील किंवा

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नागरिकांनी ते पाणीशुध्द करुन वापरावे यासाठी मार्गदर्शन करण्याकरिता प्रदूषण नियंत्रण मंडळाने योजना आखली आहे. परंतु जे प्रदूषित पाणी तेथे पुरविले जात आहे त्यामध्ये डिसेंबर, 2011 पर्यंत बदल होणार नाही हे निश्चित झाले असल्यामुळे मध्यंतरीच्या काळात आरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे महत्वाचे आहे. सुदैवाने आरोग्य आणि पर्यावरण हे दोन्ही विभाग एकाच मंत्रीमहोदयांकडे असल्यामुळे समन्वय साधून जनतेला मार्गदर्शक ठरेल अशा प्रकारच्या सूचना देणे आणि कार्यवाही करणे याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळ विचार करणार आहे काय?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, दोन प्रश्नांमध्ये गफलत होत आहे. सन्माननीय सदस्यांनी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. याठिकाणी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचा प्रश्न चर्चिला जात आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत मी एवढेच सांगू इच्छितो की, वेळोवेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जनजागृती उपक्रम राबविण्याचा प्रयत्न होत आहे. 2011 पर्यंत महानगरपालिकेने 100 टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया केली पाहिजे अशी अट घालण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी न झाल्यास संबंधित महानगरपालिकेवर कारवाई करण्याचा राज्य शासनाला अधिकार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आरोग्य आणि पर्यावरण विभागाच्या माध्यमातून संयुक्तपणे जनजागृती करण्याचे काम करण्याची भूमिका घेतली जाईल.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**राज्यातील मुंबई, नागपूर उस्मानाबाद व नांदेड येथील आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षकांची पदे भरण्याबाबत**

**(८) * ६७६० श्री.विक्रम काळे , प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, नागपूर, उस्मानाबाद व नांदेड या ठिकाणच्या शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात शिक्षकांची व प्रपाठकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्यामुळे सन २००९-१० मध्ये केंद्रीय चिकित्सा परिषदेने या महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया थांबविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशी एकूण किती पदे रिक्त आहेत व सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) उक्त प्रकरणी अद्यापही निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड, डॉ.विजयकुमार गावीत यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) एकूण १४० पदे रिक्त असून त्यापैकी ७१ पदांचे मागणीपत्र जून, २००९ मध्ये लोकसेवा आयोगाला पाठविण्यात आले आहे व उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्रातील मुंबई, नागपूर, उस्मानाबाद आणि नांदेड येथील चार आयुर्वेदिक महाविद्यालये चालविली जातात. २००८-०९ पासून या चारही आयुर्वेदिक महाविद्यालयातील शिक्षक, प्रपाठक, प्राध्यापकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्यामुळे उस्मानाबाद आयुर्वेदिक महाविद्यालयात २००८-०९ या वर्षात आयुषने प्रवेश प्रक्रिया थांबविली होती. त्या वर्षात प्रवेश झाले नाहीत एवढी गंभीर बाब असताना दरवर्षी आयुषकडे पदांची भरती करीत आहोत असे प्रतिज्ञापत्र दाखल करुन विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळण्याचे काम शासन करीत आहे. ही रिक्ते तातडीने भरण्यासाठी स्वतंत्र निवड मंडळाची नियुक्ती केली जाईल काय?

नंतर २ इ.१...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6760.......... श्री. विक्रम काळे ....

आणि शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर आहेत, त्यांच्यामधूनच प्र-पाठक आणि प्राध्यापक पदांवर प्रमोशन शासन देणार काय ? हे प्रमोशन किती दिवसात देणार आहात ?

प्रा.वर्षा गायकवाड : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसारएकूण 140 पदे रिक्त असून एमपीएससी मार्फत नामनिर्देशन पत्रे 71 पदांच्या बाबतीत दिलेली आहेत. त्यातील 10 पदे प्राध्यापक, 29 पदे प्र-पाठक आणि 32 अधिव्याख्याता इ. पदांच्या बाबतीत प्रस्ताव दिलेला आहे. त्याव्यतिरिक्त 29 लोकांचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे दिलेले आहेत. तो प्रस्ताव मंजूर झ ााल्यानंतर त्या पदांच्या भरतीबाबत सुध्दा एमपीएससीकडून प्रक्रिया करण्यात येईल. उर्वरित पदे भरण्याबाबतची प्रक्रिया पुढील दोन महिन्याच्या आत पूर्ण केली जाईल.

श्री. विक्रम काळे : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले ते आम्ही अनेक वर्षांपासून ऐकत आहोत. एमपीएससी कडे सन 2003 मध्ये रिक्वीझिशन दिली असताना तयांची भरतीची प्रक्रिया मात्र सन 2010 मध्ये पूर्ण होते. अशा प्रकारे सात वर्षे लागली. म्हणून किमान जे शिक्षक सध्या उपलब्ध आहेत त्यातूनच प्र-पाठक, प्राध्यापक अशा पदांवर पदोन्नती देण्याची प्रक्रिया किती दिवसात पूर्ण करणार आहात ?

प्रा. वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्यांनी ॲडहॉक बेसवर प्रमोश किती दिवसात देणार आहात असे विचारले. त्याबाबत मी असे सांगू इच्छिते की, ही फाईल सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविली असता त्यात काही त्रुटी आढळून आल्या आहेत. त्या त्रुटीची पुर्तता केल्यानंतर हा निर्णय घेण्यात येईल.

-------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यात सुमारे 25 टक्के स्टोन झालेल्या रुग्णांना वैद्यकीय सुविधा पुरविण्याबाबत**

**(9) * 7441 श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.राजन तेली** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यात सुमारे 25 टक्के नागरिकांना स्टोनच्या (युरीन स्टोन) आजाराची लागण झाली असून वैद्यकीय सुविधांचा अभाव असल्यामुळे तेथील नागरिकांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे मे, 2010 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, स्टोन झालेल्या रुग्णांना वैद्यकीय सुविधा त्वरीत पुरविण्याबात शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, ,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) व (3) किडनीच्या आजारावरील युरॉलॉजिस्ट विशेषज्ञांची सेवा ही फक्त विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाच्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे जिल्हा रुग्णालयांमध्ये ह्या सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. जिल्हा रुग्णालय, सिंधुदूर्ग येथे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आठवड्यातून एक दिवस खाजगी युरोलॉजिस्ट मार्फत किडनीच्या आजाराच्या रुग्णांची तपासणी करुन शस्त्रक्रिया करण्यात येतात.

श्री. सुभाष चव्हाण : महोदय, कोकणात युरिन स्टोन नावाचा गंभीर स्वरुपाचा आजार आहे. त्याला आपण मुतखडा म्हणतो. वैद्यकीय तज्ज्ञांच्या अहवालानुसार भविष्यात या आजारामुळे किडनी फेल होण्याची शक्यता असते. अशा रुग्णांना त्वरित उपचाराची सुविधा पुरविण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केली आहे ? तसेच उत्तरात म्हटल्याप्रमाणे फक्त विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाच्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु त्यासाठी शासनाने निश्चित असा कार्यक्रम हाती घेतला आहे काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, अशा रुग्णांसाठी युरोलॉजिस्ट व नेफ्रॉलॉजिस्ट हे जिल्हा पातळीवर असण्याचे शासनाचे धोरण नाही तर केवळ वैद्यकीय सेवा संदर्भ रुग्णालयातच ही सेवा उपलब्ध आहे. या किडनी स्टोनच्या उपचारासाठी फिजिशियन अँड जनरल फिजिशियन तसेच जनरल सर्जन हे सुध्दा शस्त्रक्रिया करु शकतात आणि त्यानुसार त्या भागात ही सेवा उपलब्ध आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यात सन 2007-08 मध्ये 62, सन 2008-09 मध्ये 49 आणि सन

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7441...... प्रा. फौजिया खान.....

2009-10 मध्ये 25 रुग्ण उपचारासाठी दाखल झाले होते. रत्नागिरी जिल्ह्यात सन 2007-08 मध्ये 69, सन 2008-09 मध्ये 88 आणि सन 2009-10 मध्ये 95 रुग्ण दाखल झाले होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुध्दा सन 2007-08 मध्ये 19, सन 2008-09 मध्ये 35 आणि सन 2009-10 मध्ये 10 रुग्ण दाखल झाले होते. त्यापैकी रायगडमध्ये सर्जरी झालेले रुग्ण 2007-08 मध्ये 14, सन 2008-09 मध्ये 09 आणि सन 2009-10 मध्ये 05 असे आहेत तर रत्नागिरीमध्ये 2007-08 मध्ये 07, सन 2008-09 मध्ये 12 आणि सन 2009-10 मध्ये 15 रुग्णांवर शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात 2007-08 मध्ये 17, सन 2008-09 मध्ये 31 आणि सन 2009-10 मध्ये 16 रुग्णांवर शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. अशा प्रकारे ऑपरेशन्स होत आहेत आणि ज्या प्रमाणात रुग्ण दाखल होत आहेत त्या प्रमाणात उपचार होत आहेत.

डॉ. दीपक सावंत : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, युरोलॉजिस्टची सुविधा नसून संदर्भ सेवा रुग्णालयामध्येच उपलब्ध करण्यात आली आहे. मग ही संदर्भ सेवा सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यांमध्ये कोठे उपलब्ध आहे ? कारण माझ्या माहितीप्रमाणे कोणत्याच ठिकाणी युरोलॉजिस्टची सेवा उपलब्ध नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 7441....

डॉ. दीपक सावंत ....

या जिल्हयात युरॉलॉजिस्ट नाहीत, हे आपण कबूल केलेले आहे. फिजिशीयन आणि सर्जन या रोगाचे काम बघत असतात. त्यामुळे रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड या तीन जिल्हयामध्ये एकूण किती फिजिशियन व सर्जन डॉक्टरांकडे युरॉलॉजिस्टच्या केसेस जात असतात, याची कृपया मंत्री महोदयांनी माहिती द्यावी ?

प्रा. फौजिया खान :सभापती महोदय, रायगड जिल्हयात 3 सर्जन नियमित स्वरुपाचे असून एक सर्जन आयपीएसच्या अंतर्गत कंत्राटी पध्दतीवर आहे. रत्नागिरी जिल्हयात 2 सर्जन नियमित स्वरुपाचे असून 5 सर्जन आयपीएसच्या अंतर्गत कंत्राटी पध्दतीवर आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयात 1 सर्जन नियमित स्वरुपाचा असून 3 सर्जन आयपीएसच्या अंतर्गत कंत्राटी पध्दतीवर आहेत.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते तेवढेसे योग्य नाही. आज पूर्ण कोकणात सर्जनची कमतरता आहे. मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, सिंधुदुर्गमध्ये एक सर्जन आहे परंतु या ठिकाणी सुध्दा हा सर्जन नियमित स्वरुपात नाही. त्यामुळे माझा यासंदर्भात प्रश्न आहे की, आपण या ठिकाणच्या डॉक्टरांची पदे कधी भरणार आहात, सिंधुदुर्ग व संपूर्ण कोकणातील सर्व जिल्हयामध्ये युरॉलॉजिस्टांची पदे भरली जाणार आहे काय, लॅप्टोस्पायरोसीसची सुविधा कोकणातील जिल्हयांमध्ये उपलब्ध करुन दिली जाणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, संपूर्ण राज्यात 1450 मेडिकल ऑफिसरची पदे भरण्यात आलेली आहेत.

(एकाचवेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**सभापती** : कोकणातील किडनी स्टोनच्या रुग्णांचे प्रमाण रोखण्यासाठी युरॉलॉजिस्टची पदे भरली जाणार आहेत काय, असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, नेफ्रॉलॉजिस्ट आणि युरॉलॉजिस्टची पदे जिल्हा रुग्णालयात देण्याचे शासनाचे धोरण नाही. या ठिकाणच्या तिन्ही जिल्हयात रुग्णांचे प्रमाण 0.4,0.5,0.6 व 0.7 पेक्षा जास्त नाही.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.: लेखी उत्तरे**

**मु.शी.:** अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी व पाचवी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सह सचिव ( श्री. भाऊसाहेब कांबळे ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी व पाचवी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली ते पाचवी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस :येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ प्रोसिजर बाबत**

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. गेल्या आठवडयात खैरलांजी प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर या सभागृहामध्ये पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या अनुषंगाने चर्चा झाली होती. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी भाग घेतला होता. सरकारने खैरलांजी प्रकरणासंबंधी कोर्टाच्या निकाला विरुध्द सुप्रीम कोर्टात अपील दाखल करावे, अशी चर्चेच्या वेळी एकमुखी मागणी करण्यात आली होती. सरकारच्या वतीने या सभागृहात मंत्री महोदय, श्री. सुरेश शेट्टी यांनी निवेदन केले की, "खैरलांजीच्या निकालाच्या संदर्भात शासन निश्चितपणे सुप्रीम कोर्टात जाईल." त्याच दिवशी दिल्लीमध्ये आदरणीय मुख्यमंत्री होते, त्यांनी त्यावेळी खैरलांजीच्या निकालाच्या संदर्भात वाहिन्यांना मुलाखत दिली होती.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे...

त्या मुलाखतीमध्ये आदरणीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, या प्रश्नाशी आमचा काही संबंध नाही. या प्रकरणाची चौकशी सीबीआयने केली आहे. आता सीबीआय सगळे काही पाहील. त्यामुळे दलित समाजामध्ये निराशेची भावना पसरली आहे. आजही ठिकठिकाणी खैरलांजी विषयावरून आंदोलने सुरू आहेत. आदरणीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केल्यामुळे माझ्यासह संपूर्ण दलित समाज संभ्रमावस्थेत आहे की, प्रत्यक्षात काय होणार आहे. सभागृहामध्ये एक निवेदन करायचे आणि सभागृहाच्या बाहेर माननीय मुख्यमंत्री दुसरे निवेदन करतात. त्यामुळे दलित समाजामध्ये संतापाची लाट उसळली आहे. म्हणून माझी सरकारला विनंती आहे की, खैरलांजी प्रकरणाच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध सुप्रीम कोर्टामध्ये शासन अपील दाखल करणार आहे किंवा नाही याबाबत निवेदन करावे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, यासंबंधी शासनाने आज सायंकाळ पर्यंत निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, तो अत्यंत महत्त्वाचा आहे. मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदनाला सांगू इच्छितो की, खैरलांजी प्रकरणासंबंधी जो निकाल लागला आहे त्याची गंभीर दखल शासनाने घेतली आहे. शासन याबाबत गंभीर आहे. दलितांवरील अन्यायाबाबत शासन नेहमी गंभीर असते. खैरलांजी प्रकरणातील आरोपींना जास्तीत जास्त कडक शिक्षा व्हावी म्हणून, त्यांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून सुप्रीम कोर्टामध्ये लवकरात लवकर अपील केले जाईल. जो पर्यंत आरोपींना फाशीची शिक्षा होत नाही तो पर्यंत शासन गंभीर राहून या प्रकरणाचा पाठपुरावा करेल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी सांगितल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारचे निवेदन केलेले नाही. या प्रकरणाची चौकशी सीबीआयने केली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाशी आमचा संबंध नाही असे निवेदन केलेले नाही. त्यामुळे चुकीचे रेकॉर्डवर काहीही राहू नये अशी माझी विनंती आहे.

सभापती : ते रेकॉर्डवरून काढून टाकण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खैरलांजी प्रकरणाची चौकशी सीबीआयने केली आहे. त्यामुळे यापुढची जी काही कारवाई असेल ती सीबीआयला करावी लागेल, अशा प्रकारचे स्टेटमेंट आले आहे. तेव्हा या प्रकरणाबाबत शासन अपील करणार आहे किंवा नाही ? ही तांत्रिक बाब आपल्याला समजावून घ्यावी लागेल. सदर प्रकरणाची चौकशी राज्य शासनाने सीबीआयकडे सोपविली असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याचा अधिकार शासनाला आहे काय ? असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे.

**सभापती** : ही बाब गृह विभाग तपासून पाहील.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, अपील करण्यासंबंधीची विनंती आम्ही सीबीआयला करू आणि त्याचा पाठपुरावा देखील त्यांच्याकडे करू.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, उत्तरामध्ये तफावत आहे. एका बाजूला आम्ही कोर्टामध्ये जाऊ, अपिलामध्ये जाऊ असे शासनातर्फे सांगितले जाते, तर दुसरीकडे आम्ही त्यांना विनंती करू असे सांगितले जाते. त्यामुळे शासनाची आरोपींना पकडण्याची भूमिका आहे की, सोडण्याची आहे ? असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे. सदर निर्णयामुळे दलित समाजामध्ये तीव्र भावना उसळलेल्या आहेत. या प्रकरणात सरकार दुटप्पी धोरण स्वीकारत असेल तर ते चुकीचे आहे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, खैरलांजी प्रकरणासंबंधी उच्च न्यायालयाच्या निर्णयासंबंधी शासनाची स्पष्ट भूमिका आहे की, गुन्हेगार आरोपींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे.

...............

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ KTG/ ST/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.. 13:55

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

प्रा.फौजिया खान ( सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादितचा सन 2007-2008 चा एकतिसावा वार्षिक अहवाल पटलावर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल पटलावर ठेवण्यात आला आहे.

------

श्री.राजेंद्र दर्डा (उद्योग मंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा सन 2006-2007 चा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2010-2011 चे अंदाजपत्रक व कामाचा कार्यक्रम तसेच सन 2009-2010 चे सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अंदाजपत्रक सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

-----

श्री.नसीम खान ( माजी सैनिकांचे कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2003-2004 व 2004-2005 चा अनुक्रमे दुसरा व तिसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

ॲड.पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने जळगाव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव यांचा सन 2001-2002 चा वैधानिक लेखापरीक्षण व वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखापरीक्षण व वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "सन 2009-10 च्या आर्थिक वर्षामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे रत्नागिरी जिल्ह्यातील रस्ते, पूल, मोऱ्या, पाजवे, साकव, शासकीय इमारती, नळ पाणी पुरवठा योजना, विहिरी, तळी, बंधारे यांच्या दुरुस्तीसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन न देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "म्हाडाने मध्यप्रदेश चॅरीटेबल ट्रस्टला गोरेगाव मुंबई येथील 6032 चौ.मी.शाळा आणि खेळाच्या मैदानासाठी सवलतीच्या दराने विकलेल्या भूखंडाचे चॅरिटेबल ट्रस्टने दोन तुकडे करुन म्हाडाच्या पूर्व परवानगीशिवाय परस्पर विकणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे,चंद्रकांत पाटील यांनी "अल्पसंख्याक महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना 25 टक्के आरक्षण असूनही त्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदिश गुप्ता यांनी "मौजा कांबा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील मे.प्रेरणा ट्रेडींग कंपनीतर्फे सन 1990 पासून दगडखाणीच्या व क्रशन मशीन कंपनीला तहसीलदार कल्याण यांनी कोणतीही नोटीस न देता परवानगी न दिल्यामुळे क्रशन मशिनवर व दगडखाणीवर काम करणाऱ्या मजुरांवर उपासमारीची वेळ आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

**माननीय सभापती**.....

यानंतर सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "शासनाने महिला बचत गटांना 4 टक्के व्याज दराने कर्ज योजनेची घोषणा करुनही प्रत्यक्षात 3 लाख बचत गटांपैकी फक्त दीड हजार महिला बचत गटांना या कर्ज योजनेचा लाभ होत असल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभागाची मान्यता न घेता 517 नवीन पदांना वेतनश्रेणीसह मंजुरी दिली असून यापैकी 116 क्षेत्रीय अधिकाऱ्यांची निवड करताना अनियमितता झाल्याचे निदर्शनास आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ KGS/ ST/ KTG/ प्रथम श्री.शिगम 14.00

सभापती ...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर,चंद्रकांत पाटील यांनी " महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सामान्य प्रशासन विभागाची तसेच वित्त विभागाची मान्यता न घेता 517 नवीन पदांना वेतनश्रेणीसह मंजुरी दिली असून यापैकी 116 क्षेत्रीय अधिका-यांची निवड करतांना अनियमिता झाल्याचे निदर्शनास आल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, पाशा पटेल,संजय केळकर. यांनी " मु.पो. क्षेत्र चाकरवाडी, ता. व जि. बीड येथील प्रसिध्द चाकरवाडी देवस्थानाचे ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर यांचेकडे संपूर्ण जिल्हयातून अनेक भक्त दर्शनाकरिता येत असणे, श्रध्दास्थानी असलेल्या ह.भ.प.महादेव महाराजांना कोणतीही तक्रार नसतांना चौकशीसाठी बोलावल्याने संपूर्ण जिल्हयामध्ये भाविकांच्या मनात पसरलेला तीव्र असंतोष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सर्वश्री किसनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी " मालवण तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) कट्टा कारणेवाडी, वरची गुरामवाडी, वराड,भंडारवाडी, वेताळ मंदिरासमोर लाडवाडी तळी, मोहुळवाडी, भराडवाडी, खिश्चनवाडी विहीर ही शिवकालीन तळी व भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेल्या विहिरीची कामे अद्यापपर्यत अपूर्णावस्थेत असल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**श्री.चंद्राबाबू नायडू यांच्या संदर्भात सभागृहात निवेदन करणे**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,श्री.चंद्राबाबू नायडू यांच्या संदर्भात माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी विधान सभेमध्ये निवेदन केले आहे. तशा प्रकारचे निवेदन या सभागृहामध्ये देखील करावे याबाबत आपण शासनाला सांगावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय गृह राज्य मंत्री श्री. रमेश बागवे यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी आता सांगितल्याप्रमाणे माननीय गृह मंत्र्यांनी विधान सभेमध्ये जे निवेदन केलेले आहे तशा प्रकारचे निवेदन या सभागृहामध्ये देखील करावे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, होय

-------

**नियम 93 अन्वयेचे 21 वे निवेदन प्रथम घेण्या बाबत**

**सभापती** : आज नियम 93 अन्वयेची एकूण 21 निवेदने चर्चेसाठी आलेली असून माननीय पर्यावरण राज्य मंत्री श्री सचिन अहिर यांना विधान सभेमधील कामकाजासाठी तेथे उपस्थित रहावयाचे असल्यामुळे त्यांच्या विभागाशी सबंधित 21 क्रमांकचे निवेदन प्रथम घेण्यात यावे अशी त्यांनी विनंती केलेली आहे. त्यामुळे ते निवेदन प्रथम चर्चेला घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ SBT/ KGS/ ST/ KTG/ प्रथम श्री.शिगम 14.00

पृ.शी. : कराड चिपळूण हायवेवरील उरुल घाटात पाोटॅशियम ब्रोमाईड या विषारी रसायनाने भरलेला ट्रक कोसळल्यामुळे प्रदूषित झालेले पाणी

मु.शी. : कराड चिपळूण हायवेवरील उरुल घाटात पाोटॅशियम ब्रोमाईड या विषारी रसायनाने भरलेला ट्रक कोसळल्यामुळे प्रदूषित झालेले पाणी याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील,कपिल पाटील,व्ही.यू.डायगव्हाणे,डॉ. नीलम गो-हे,श्री.दिवाकर रावते.वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.सचिन अहिर ( पर्यावरण राज्यमंत्री ) :सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र.पाटील,कपिल पाटील,व्ही.यू.डायगव्हाणे,डॉ.नीलम गो-हे,श्री.दिवाकर रावते यांनी " कराड चिपळूण हायवेवरील उरुल घाटात पाोटॅशियम ब्रोमाईड या विषारी रसायनाने भरलेला ट्रक कोसळल्यामुळे प्रदूषित झालेले पाणी " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



- निवेदना नंतर -

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय,पोटॅशियम ब्रोमाईड हे विषारी रसायनाने भरलेला ट्रक कराड चिपळूण हायवे वरील उरुळ घाटात कोसळल्यामुळे हे रसायन तेथील ओढयात मिसळले होते. या ओढयातील पाणी कोयना आणि कृष्ण नद्यांच्या प्रवाहात मिसळल्यामुळे त्या भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. या निवेदनाच्या तिस-या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, "अपघातग्रस्त झालेल्या टँकरमधील रसायनाचे नमुने पृथ:करणासाठी प्रादेशिक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. दरम्यानच्या काळात तेथील खालच्या गावांना नदीच्या पाण्याची गुणवत्ता तपासल्यानंतरच पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा करण्याच्या जिल्हा प्रशासनास सूचना देण्यात आल्या. जिल्हाधिकारी यांनी नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा दिला असून कोयना कृष्णा नदीचे पाणी पिण्यास वापरु नये असे आदेश दिले आहेत." आपत्ती निवारण आराखडा प्रत्येक राज्यामध्ये तसेच प्रत्येक जिल्हयात तयार करण्यात आलेला आहे असे आपण नेहमी म्हणत असतो. नदीच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी प्रयोग शाळेत पाठविण्यात आल्यानंतर हे पाणी प्रदूषित झालेले आहे किंवा नाही यासंदर्भात अहवालात काय आढळून आले होते ?त्याचबरोबर या प्रदूषित पाण्याचा परिणाम किती दिवसापर्यंत टिकून राहतो ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे डिझॉस्टर सेलच्या माध्यमातून सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. काही तासामध्ये शासनाची यंत्रणा सज्ज झाली होती त्यानंतर त्यांनी या पाण्याचे नमूने घेतले होते या विषारी रसायनामुळे ओढयातील व नदीतील मासे मरतात हे दिसून आल्यामुळे पुढील गावांना पाणी पुरवठा करणे हानीकारक होईल म्हणूनच ते पाणी थांबविण्याचे आदेश देण्याच्या निष्कर्षापर्यंत शासकीय यंत्रणा आली होती व त्यानी तसे आदेश दिले होते .इतकेच नव्हे तर हे संपूर्ण् केमिकल वाहून जावे यासाठी कोयना धरणातून जादा पाणी देखील सोडण्यात आले आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ राज्यामध्ये स्थापन करण्यात आलेले आहे या घटनेमध्ये विषारी रसायनांनी भरलेला टॅकर उलटल्यामुळे पाणी प्रदूषित झालेले आहे. परंतु वेगवेगळया कारणामुळे पाणी प्रदूषित होऊन लोक सतत आजारी पडण्याच्या तक्रारी येत असतात या संदर्भात दक्षता घेण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे.?

नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, भविष्य काळात पाण्याचा स्त्रोत दूषित होऊ नये यासाठी केंद्र सरकारच्या मदतीने महाराष्ट्रातील वेगवेगळया नद्या मॅसिव्ह स्क्वॅडमध्ये घेऊन नॅशनल रिहॅबिलिटेशन म्हणजेच आर.आर.झेड.प्रमाणे संपूर्ण रिव्हर ट्रिटमेंट करण्याकरिता नव्याने नियम तयार करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची महाराष्ट्र शासनाची मानसिकता आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये सूचनेवरील निवेदन क्रमांक 2 बाबत**

**सभापती** : माननीय दुग्धविकास मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे नियम 93 अन्वये सूचनेच्या निवेदन क्रमांक 2 वरील चर्चा प्रलंबित ठेवण्यात येत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

**पृ. शी**. : ठाणे येथील गावदेवी भाजी मार्केटचे अपूर्णावस्थेत असलेले बांधकाम

**मु. शी**. : ठाणे येथील गावदेवी भाजी मार्केटचे अपूर्णावस्थेत असलेले बांधकाम याबाबत सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी " ठाणे येथील गावदेवी भाजी मार्केटचे अपूर्णावस्थेत असलेले बांधकाम" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ... 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे येथील गांवदेवी भाजी मार्केटच्या बांधकामासंबंधीचा हा विषय आहे. ठाणे महानगरपालिकेने या मार्केटच्या बांधकामासाठी शासनाकडे 2 कोटी रुपये भरुन आठ वर्षे झाली. महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधी नगरसेवक या प्रश्नासाठी मंत्रालयामध्ये वारंवार जाऊन आले आहेत. उदा. एका लोकप्रतिनिधींनी या कामासाठी 82 वेळा मंत्रालयामध्ये फेऱ्या मारल्या असे सांगून त्यांनी त्यांच्या फाईलमध्ये असलेले पासेस मला दाखविले. एवढे करुनसुध्दा महानगरपालिकेच्या ताब्यात हे भाजी मार्केट येत नाही. ठाणे शहराचा विकास झाला आहे, परंतु ठाणे स्टेशनच्या परिसरामधील गांवदेवी मार्केटचा हा एक महत्वाचा भाग विकसित झालेला नाही. केवळ लाल फितीच्या कारभारामुळे हा विषय प्रलंबित राहिलेला आहे. त्याकरिता एन.ओ.सी. देण्यात आलेली असतांनाही मार्केटचे बांधकाम पूर्ण होत नाही. हे प्रकरण परवानगीकरिता महसूल विभागाकडे प्रलंबित असल्याचे समजते. त्याठिकाणी असलले धान्य गोडावून सुध्दा मोडकळीस आलेले आहे. तेव्हा या कामाकरिता किती दिवसात परवानगी मिळणार आहे?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, गेल्या आठ वर्षापासून गांवदेवी मार्केटचा प्रश्न प्रलंबित आहे. त्यासाठी ठाणे महानगरपालिकेने शासनाकडे पैसे भरले आहेत, गोदामासाठी पैसे भरले आहेत, परंतु अजूनपर्यंत त्याला मान्यता मिळालेली नाही. या संदर्भात अन्न व नागरी पुरवठा मंत्री माननीय श्री. अनिल देशमुख साहेबांबरोबर चर्चा केली असून त्यांनी सांगितल्याप्रमाणे हे अधिवेशन संपल्यानंतर 15 दिवसात बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, बैठक बोलाविण्याचे कारण काय? महानगरपालिकेचे कोटयवधी रुपये शासनाकडे अडकून पडले आहेत, त्या मोडकळीस आलेल्या धान्य गोडावूनचा काहीही उपयोग होत नाही.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती खरी आहे. या संदर्भात चर्चा केल्यानंतर येत्या दोन महिन्यात हा प्रश्न निकालात काढण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, दोन महिने थांबण्याची गरज नाही.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, हा गोडाऊनचा प्रश्न आहे. हे गोडाऊन मोडकळीस आले असल्यामुळे या खात्याच्या माध्यमातून नवीन बांधकाम करण्याची योजना आहे. त्या संदर्भात जमिनीचा प्रश्न निकालात कशाप्रकारे काढता येईल यासंदर्भात माननीय राज्यमंत्र्यांबरोबर लवकरात लवकर बैठक घेऊन हा प्रश्न निकालात काढण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : सिंधुदुर्ग जिल्हयातील मच्छिमारांच्या विविध समस्या

**मु. शी**. : सिंधुदुर्ग जिल्हयातील मच्छिमारांच्या विविध समस्या याबाबत सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील मच्छिमारांच्या विविध समस्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, याठिकाणी मत्स्य दुष्काळाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. यामध्ये मत्स्य उत्पादनाची सरासरी मोजण्याची पध्दत ब्रिटीशकालीन आहे. ही पध्दत तातडीने बदलण्याबाबत समिती नेमून कारवाई करण्यात येईल असे तत्कालीन माननीय मंत्री श्री.रविशेठ पाटील व माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी सांगितले होते. ही समिती आपण केव्हा नेमणार आहात.?

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

तशा प्रकारची समिती नेमून तातडीने कारवाई करु असे म्हटले आहे ते कधी करणार? परराज्यातील कामगारांसाठी तात्पुरत्या स्मार्ट कार्डची अट चालणार नाही असे सांगतात. यासंदर्भात कस्टम ऑफिसला कळविण्यात येईल काय? तसेच मागच्या फयान वादळानंतर डॅट सारखे यंत्र सर्व मच्छिमारांनी बसवावे अशा प्रकारचे सर्वांचे मत झाले होते. या डॅट यंत्रांसाठी फिशरिज विभागाकडून अनुदान देण्यात येईल काय? मार्च महिन्यापासून मच्छिमारांना डिझेल परतावा मिळालेला नाही तो तातडीने देण्यात येईल काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, केंद्र शासन मच्छिमारांना पर लिटर डिझेलमागे परतावा देते त्यासंदर्भातील हा विषय आहे. यापूर्वी या मच्छिमारांसाठी केंद्र सरकारकडून पर लिटर डिझेलमागे दीड रुपयाप्रमाणे अनुदान मिळत होते परंतु आता केंद्र सरकारने पर लिटरमागे तीन रुपये अनुदान केलेले आहे. यामध्ये थोडासा अडचणीचा मुद्दा आहे. जे मच्छिमार दारिद्ररेषेखालील आहेत त्यांना ही योजना लागू करावी असे म्हटल्यामुळे आणि बहुसंख्य मच्छिमार दारिद्ररेषेच्यावरचे असल्यामुळे यासंदर्भातील परतावा त्यांना मिळत नाही. केंद्र सरकारकडे यासंदर्भातील पाठपुरावा सुरु असून केंद्र सरकार याबाबतीत सकारात्मक आहे. म्हणून याबाबतील निर्णय लवकर होईल. दुसरी गोष्ट अशी की, मच्छिमारांना जो व्हॅट परत देण्यात येतो त्याची रक्कम जवळ जवळ 40 ते 50 कोटी रुपये होते. यंदाच्या सन 2010-2011 च्या बजेटमध्ये यासाठी 80 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. यापूर्वी व्हॅटचा परतावा मिळण्यासाठी या मच्छिमारांना शासनाकडे यावे लागत होते. आता हा विषय जिल्हाधिकाऱ्यांच्या लेव्हलवर ठेवलेला असल्यामुळे पैसे वर्ग करुन त्यांना तेथल्या तेथे देण्यात येतील.

सभपती महोदय, दि.26/11 ला मुंबईवर जो हल्ला झाला तो सागरीमार्गाने झाला त्यामुळे परराज्यातील, परदेशातील कामगारांना जे परवाने देण्यात येत होते त्यासंदर्भात पोलीस खात्याच्या तशा सूचना असल्यामुळे आणि त्या उचित असल्यामुळे थोडीशी तपासणी करुन त्यांना परवाने देण्यात येतील म्हणून त्याला थोडा विलंब लागत आहे. तरी सुध्दा तात्पुरत्या स्वरुपाचे स्मार्ट कार्ड देऊन यातून मार्ग काढण्यात आलेला आहे.

----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

**पृ. शी.** :अकोला महानगरपालिकेला जकात वसुली ठेका कमी किंमतीत दिल्यामुळे झालेले नुकसान.

**मु. शी.** : अकोला महानगरपालिकेला जकात वसुली ठेका कमी किंमतीत दिल्यामुळे झालेले नुकसान याबाबत श्री गोपीकिसन बाजोजिया वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी "अकोला महानगरपालिकेला जकात वसुली ठेका कमी किंमतीत दिल्यामुळे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया : अमरावती व अकोला या ठिकाणी दोन प्रकरणामध्ये अतिशय गंभीर अनियमितता झालेली आहे. स्थापत्य कंन्सल्टंन्ट इंजिनिअर ॲण्ड डिझायनर कंपनीला कर मूल्यांकनाबाबत ठेका देण्यात आला होता परंतु अनेक अनियमितता आढळल्यामुळे महानगरपालिकेने स्वत: त्याला स्थगिती दिली होती. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या कर मूल्यांकन कंपनीचा ठेका रद्द करणार काय? माझा दुसरा प्रश्न असा की, अकोला महानगरपालिकेमध्ये जकात नाका कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चरला मागील चार वर्षापासून सातत्याने कॉन्स्पिरसी करुन 2006-2007 मध्ये 24 कोटी, 2007-2008 मध्ये 30 कोटी, 2008-2009 मध्ये 26 कोटी, 2009-2010 मध्ये 29 कोटी, अशा प्रकारे कमी जास्त दर करुन एकाच कंपनीला ठेका देण्यात येत आहे. सर्वपक्षीय आमदारांनी या कामाची निविदा पुन्हा बोलावण्यात यावी असे सांगितले होते. या कामाची बेसिक कॉस्ट 36 कोटी रुपये ठेवलेली आहे. पुन्हा निविदा काढा असे सांगण्यात आल्या नंतर सुध्दा पुन्हा त्याच कंपनीला 34 कोटी 40 लाख रुपयाचा ठेका देण्यात आलेला आहे. अशा प्रकारे कॉन्स्पिरसी करुन सातत्याने हे प्रकरण चालू आहे तेव्हा या कोणार्क कंपनीला चुकीच्या पध्दतीने दिलेला ठेका रद्द करणार काय? किंवा माननीय सभापतीच्या दालनामध्ये याबाबत बैठक घेऊन हा ठेका रद्द करणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, हे वगवेगळे दोन प्रश्न अकोला महानगरपालिकेशी संबंधित आहेत. पहिला विषय असेसमेन्टच्या संदर्भात प्रायव्हेट एजन्सी नेमली आहे त्या संदर्भातील आहे. साधारणपणे चार वर्षा नंतर त्याचे रिनोव्हेशन करत असतो. 2002 साली असेसमेन्ट केले गेले होते. 2006 साली पुन्हा करण्याची आवश्यकता होती. परंतु महानरगपालिकेने ते न केल्यामुळे 2007 साली त्यांना नोटीस देण्यात आली. परंतु त्याही वर्षी त्यांनी असेसमेन्ट केले नाही. म्हणून प्रायव्हेट कन्सल्टन्ट नेमण्यात आला.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .......

परंतु आता त्या ठिकाणी जे असेसमेंट केले जाते ते रेटेबल व्हॅल्यूवर केले जाते. आपण मागच्या अधिवेशनामध्ये नवीन कायदा केल्यामुळे कॅपिटल व्हॅल्यू आधार धरुन त्या ठिकाणी असेसमेंट करावे आणि ते जर केले तर कोणाच्याही मनामध्ये शंका राहणार नाही म्हणून तशा प्रकारचे निर्देश या महापालिकेला देण्यात येत आहेत त्यामुळे पहिला ठेका रद्द करण्यात येत आहे. त्यांच्याकडून आता असेसमेंट करुन घेतले जाणार नाही. आपला दुसरा विषय तेथील जकात खाजगी माणसाकडून वसूल केली जाते त्यासंदर्भातील आहे. आपल्याकडे साधारणपणे असा नियम आहे की, मागच्या एक दोन वर्षाचा आधार धरुन त्यामध्ये 10 टक्के वाढ करुन आपण खाजगी ठेका देतो. मागच्या वेळी आपण पाहिले तर मागच्या वर्षीची वसुली 29 कोटी 61 लाख रुपये होती. त्यामध्ये 10 टक्के वाढ केल्यामुळे ती किंमत 34.40 कोटी रुपये होणार होती. पण काही लोकांचे असे म्हणणे होते की, 10 टक्के ऐवजी 20 टक्के वाढ करावी. जर 20 टक्के वाढ केली असती तर त्याची किंमत 36 कोटी रुपये झाली असती. म्हणून चर्चेमधून त्या ठिकाणी जो निर्णय झाला त्याप्रमाणे आजची जी वाढ झ ाालेली आहे ती 16 टक्के आहे. खरे तर नियमानुसार 10 टक्केच वाढ केली जाते परंतु त्या ठिकाणी 16 टक्के वाढ करुन 34 कोटी 40 लाख रुपयांचा हा ठेका देण्यात आलेला आहे. त्याकरिता महासभेची परवानगी घेण्यात आलेली आहे. मागच्या वेळी नगरपालिकांना ज्या अटी आणि शर्थी ठरवून दिलेल्या आहेत त्याचा पुरेपूर अवलंब करुनच हा ठेका देण्यात आलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये दिशाभूल करणारी आकडेवारी मांडलेली आहे. आपण 10 टक्के वाढीचे सूत्र मान्य केले. 2007-2008 ला कोणार्क कंपनीला 30 कोटी 80 लाख 81 हजार 460 रुपयांना जकात ठेका दिला होता. त्यामध्ये 10 टक्के वाढ केली तर ती रक्कम 33 कोटी रुपये व्हावयास पाहिजे. त्याच्या पुढच्या वर्षी 10 टक्के वाढ केली तर ती रक्कम 36 कोटी रुपये झाली पाहिजे. गेल्या वर्षी 30 कोटी 80 लाख रुपयांची जकात कमी करुन 29 कोटीमध्ये ठेका दिला आणि त्यावर आता 10 टक्केऐवजी 16 टक्के वाढ केल्याचे दाखवित आहेत. मुळामध्ये कोणार्क इन्फ्रॉस्ट्रक्चरला 2007-08 मध्ये 30 कोटी 80 लाख 81 हजार 460 रुपयांना जकातीचा ठेका दिला. 2008-09 मध्ये त्यात 10 टक्के वाढ

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. दिवाकर रावते ....

केली तर ती रक्कम 33 कोटी व्हावयास पाहिजे आणि 2009-2010 मध्ये त्यात 10 टक्के वाढ केली तर ती रक्कम 36 कोटी रुपये व्हावयास पाहिजे. या वर्षीचा जो कोटा आहे त्यामध्ये 10 टक्के वाढ केली तर एकूण 39 कोटी रुपये व्हावयास पाहिजे. पण 39 कोटी रुपयांएवेजी 34 कोटी रुपयाला ठेका दिला गेलेला आहे. 10 टक्केच्या वाढीमध्ये असे गणित असताना आपण जी 16 टक्के वाढ सांगत आहात त्यामध्ये मुळात 30 कोटी रुपयांऐवजी 29 कोटी रुपये म्हणजे 1 कोटी रुपये कमी करुन पुढच्या वर्षी ठेका दिला. आता 39 कोटी रुपयाला जो ठेका द्यावयास पाहिजे तो 34 कोटी रुपयात दिलेला आहे असा मुद्दा आहे. म्हणून त्याचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. महासभेची मान्यता घेतली हा विषय नाही. अकोला सारख्या छोट्या महानगरपालिकेमध्ये साडेतीन ते चार कोटी रुपयांचे नुकसान होत असेल तर त्यात एखादा प्रकल्प होऊ शकतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, 28.2.1994 ला जे सूत्र ठरलेले आहे त्याप्रमाणे लगतच्या वर्षी जी जकात वसूल होईल त्यामध्ये 10 टक्के वाढ करावयाची आहे. 2009-2010 या लगतच्या वर्षी 29 कोटी 61 लाख रुपयांची वसुली झाली. त्यामध्ये 10 टक्के वाढ केल्यामुळे ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कोणार्क कंपनीकडून चार वर्षे वसुली चालू आहे. त्या कंपनीला 2007-08 मध्ये 30,80,81,460 रुपयाला ठेका दिला होता काय ? असेल तर त्यामध्ये चार वर्षे 10 टक्के वाढ करुन आकडेवारी सांगावी. 2007-08 मध्ये 30,80,81,460 रुपयाला अकोला महापालिकेने ठेका दिलेला होता. त्याप्रमाणे 2008-09 मध्ये 10 टक्के वाढ करावयावास पाहिजे. त्यानंतर 2009-2010 मध्ये त्यावर परत 10 टक्के वाढ करावयास पाहिजे. आताचा जो ठेका होता त्यामध्ये 10 टक्के वाढ केली तर ठेका 39 कोटी रुपयाला जावयास पाहिजे होता. आपल्यासमोर अधिकाऱ्यांकडून आकडेवारीची जी बाजू आलेली आहे ती समजून घ्यावी. मुळात 2008-09 मध्ये 30 कोटी रुपयांएवेजी 29 कोटी रुपयाला ठेका का दिला ? तो ठेका 33 कोटी रुपयाला द्यावयास पाहिजे होता. उलट आपण 1 कोटी रुपये कमी करुन 29 कोटीमध्ये ठेका दिला. त्या 29 कोटीवर टक्केवारी सांगत आहात आणि 16 टक्क्याचे कौतुक करीत आहात.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मंत्री महोदयांनी सांगितलेल्या गणितानुसारच आम्ही याठिकाणी बोलत आहोत. या निवेदनात असे नमूद केले आहे की, "शासन निर्णय दि.28.2.1994 प्रमाणे स्वीकृत करावयाची किमान देकार किंमत कमीत कमी मागील वर्षाच्या स्वीकृत देकार किंमतीपेक्षा 10 टक्के अधिक असणे आवश्यक आहे." म्हणजे त्यांना ठेका दिला असला तरी पुढील 3 वर्षात 10 टक्क्यांनी वाढविला पाहिजे. शासनाने दिलेला ठेका कमी दराचा आहे की नाही ते सांगावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सभागृहासमोर नवीन मुद्दा मांडला आहे. त्यांनी सन 2008-09 ची माहिती विचारली आहे. माझ्याकडे सन 2009-10 या आर्थिक वर्षातील माहिती आहे. त्यांनी सन 2008-09 या आर्थिक वर्षामध्ये जी रक्कम वसूल झाली त्यामध्ये 10 टक्के वाढ करुन सन 2009-10 मध्ये वसुली झाली पाहिजे आणि सन 2009-10 मध्ये 10 टक्के वाढ करुन सन 2010-11 मध्ये वसुली केली पाहिजे. आता माझ्यासमोर सन 2009-10 या वर्षाची माहिती आहे. सन 2008-09 ची मूळ रक्कम किती होती त्याची माहिती माझ्याकडे या क्षणी उपलब्ध नाही. सध्याच्या नियमानुसार ठेका दिला असला तरी त्या वर्षामध्ये साधारणपणे किती रक्कम वसूल होते. सांगलीमध्येही वसुली किती कमी होते ते सर्वांना माहीत आहे. परंतु जी वसुली होते त्याच्या 10 टक्के असा नियम आहे. परंतु नवीन मुद्दा समोर आलेला आहे त्याबाबतची माहिती मी त्यांना जरुर अवगत करीन.

**सभापती** : मी आता पुढील निवेदनाकडे वळतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदय सुधारित माहिती देण्यास तयार आहेत. त्यामुळे आपण हे निवेदन राखून ठेवावे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी नवीन मुद्दा मांडला आहे. त्या अनुषंगाने मंत्री महोदय ही बाब तपासून घेतील आणि त्याबाबतची माहिती सभागृहाला सादर करतील.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याबाबतची माहिती मी सभागृहाला सादर करीन असे म्हटलेले आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, तोपर्यंत हे निवेदन राखून ठेवावे

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी त्यांना माहिती अवगत करीन. पण त्यासाठी हे निवेदन राखून ठेवू नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आज दुपारी त्यांच्या चेंबरमध्ये बैठक घ्यावी आणि त्याची माहिती सभागृहाला द्यावी.

**सभापती** : मी हे निवेदन राखून ठेवत आहे.

-----

**नियम 93 अन्वयेचे निवेदन क्र.6 आणि 20 एकत्रित चर्चेसाठी घेण्याबाबत**

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, क्रमांक 6 व 20 यावरील निवेदने एकाच विषयाची असल्यामुळे ही दोन्ही निवेदने एकाच वेळी चर्चेसाठी घेण्यात यावीत अशी मी आपल्याला विनंती करतो.

**सभापती** : ठीक आहे.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

**पृ.शी.**: एस.टी.महामंडळाने वाढविलेला जादा प्रवासी कर व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने प्रवासी बसेसना पथ करातून वगळण्याची केलेली मागणी

**मु.शी.**: एस.टी.महामंडळाने वाढविलेला जादा प्रवासी कर व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने प्रवासी बसेसना पथ करातून वगळण्याची केलेली मागणी याबाबत सर्वश्री परशुराम उपरकर, किशनचंद तनवानी, संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गुलाबराव देवकर ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री परशुराम उपरकर, किशनचंद तनवानी यांनी "एस.टी.महामंडळाने वाढविलेला जादा प्रवासी कर व सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने प्रवासी बसेसना पथ" करातून वगळण्याची केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये ज्या सूचना दिल्या होत्या त्यांना अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदने करावयाची आहेत. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी ही निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतची निवेदने छापावीत )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, कोकणातील लोक गौरी-गणपती सणाच्या निमित्ताने मोठया प्रमाणात कोकणात जातात. गणेश भक्त प्रवासी संघटनेने शासनाने प्रवासी कर घेऊ नये यासाठी उपोषण केले आहे हे खरे आहे काय ? एस.टी.महामंडळाकडून शासन 17.5 टक्के प्रवासी कर घेते, अन्य राज्यात प्रवासी कर केवळ 7.5 टक्के इतका आहे. इंधन, टायर आणि सुटे भाग यावरील 39 टक्के विक्री कर माफ करुन या एस.टी.च्या प्रवाशांना किंवा या भक्तांना प्रवासी करात सूट देणार आहात काय ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, गौरी-गणपती सण, आषाढी कार्तिकी पंढरपूर यात्रा इत्यादीसंबंधी प्रवासी संघटनेने उपोषण केलेले होते ही गोष्ट खरी आहे. त्यासंबंधीचे निवेदन शासनाने स्वीकारलेले आहे. हा प्रवासी पथकर कमी करावा, विक्री कर कमी करावा अशी त्यांची मागणी आहे. हा विषय सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन व वित्त विभागाशी संबंधित आहे. त्यामुळे तिन्ही विभागातील वरिष्ठ अधिका-यांची एक समिती नेमत आहोत. या समितीचा अहवाल आल्यानंतर शासन स्तरावर निर्णय घेतला जाईल.

----

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : कोकणामध्ये बंदी असतानाही केलेली वृक्षतोड

**मु.शी.** : कोकणामध्ये बंदी असतानाही केलेली वृक्षतोड याबाबत सर्वश्री परशुराम उपरकर व किरण पावसकर वि.प.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. भास्कर जाधव ( वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री परशुराम उपरकर व किरण पावसकर, वि.प.स. यांनी "कोकणामध्ये बंदी असतानाही केलेली वृक्षतोड" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : माननीय मंत्री महोदयांनी वृक्षतोडीस बंदी घातलेली आहे हे खरे आहे काय ? असल्यास कोल्हापूरच्या वन अधिका-यांनी वृक्षतोडीस बंदी नाही अशा प्रकारचे परिपत्रक काढलेले आहे हे खरे आहे काय ? असल्यास, त्या अधिका-यावर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ?

डॉ. पतंगराव कदम : कोकणामध्ये वृक्षतोडीस बंदी आहे अशा प्रकारची घोषणा मी सदनामध्ये केली होती हे खरे आहे. कोल्हापूरच्या अधिका-याने पत्रक काढले. त्याबाबत त्याच्याकडून खुलासा मागितलेला आहे. स्थानिक लोकांची शिष्टमंडळे येऊन भेटली. स्थानिक लोकांचे प्रश्न आहेत. या संदर्भात विभागीय आयुक्त नागपूर, पुणे आणि कोकण विभाग या तिघांची कमिटी नेमलेली आहे. कमिटीचा रिपोर्ट आलेला आहे. स्थानिक लोकांचे प्रश्न असल्यामुळे त्या त्या ठिकाणच्या स्थानिक अधिका-यांनी परवानगी दिली होती. तरी देखील इतर जिल्ह्यात वृक्षतोडीस बंदी आहे. कमिटीचा रिपोर्ट आलेला आहे.

श्री. परशुराम उपरकर : या दोन रेंज ऑफिसरने बोगस प्रकरणे करुन चुकीच्या पध्दतीने वृक्षतोड केलेली आहे. या प्रकरणाची चौकशी करणा-या अधिका-यालाच सीएफने निलंबित केले. चौकशी करणा-या अधिका-याला निलंबित करुन सीएफने दोन रेंज ऑफिसर्सना वाचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कणकवली आणि कडावल येथील रेंज ऑफिसर्सना वाचविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल सीएफवर कोणती कारवाई केलेली आहे.?

डॉ. पतंगराव कदम : या प्रकरणी पहिली चौकशी आणि दुसरी चौकशी यामध्ये कन्फ्युजन आहे. या प्रकरणी ॲडिशनल सीसीएफ मार्फत चौकशी करुन 15 दिवसात निर्णय घेतला जाईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 14:25

**पृ.शी.** : कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्याच्या तहसीलदार निवासस्थानासमोरील ब्रिटीशकालीन सागवाण झाडाची केलेली अवैध तोड

**मु.शी.** : कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्याच्या तहसीलदार निवासस्थानासमोरील ब्रिटीशकालीन सागवाण झाडाची केलेली अवैध तोड याबाबत सर्वश्री चंद्रकात पाटील, विनोद तावडे, व भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे व भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी "कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्याच्या तहसीलदार निवासस्थानासमोरील ब्रिटीशकालीन सागवाण झाडाची केलेली अवैध तोड" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी माननीय उपसभापती )

श्री. चंद्रकांत पाटील : भुदरगड तालुक्यतील तहसीलदार निवासस्थानासमोरील ब्रिटीशकालीन वृक्षांचा तहसीलदारांनी लिलाव घोषित केला. तो लिलाव मंजूर होऊन ज्याला हे टेंडर मिळाले त्याच्यावर केस दाखल करण्यात आली. परंतु तहसीलदारांवर केस दाखल करण्यात आली नाही. तहसीलदारांनी आणि वन क्षेत्रपालांनी सागाच्या वृक्षाची किंमत ठरविली होती काय ?

श्री. भास्कर जाधव : त्या ठिकाणी तीन झाडे होती. त्या तीन झाडांचे तहसीलदारांनी मूल्यांकन केले. हे मूल्यांकन करुन त्यांनी 15 हजार रुपये रक्कम पूर्णपणे घेतलेली आहे. तहसीलदारांनी अशी अट टाकली होती की ही रक्कम भरत असताना त्यांनी वृक्षतोड परवानगी आणि वाहतूक परवानगी संबंधीत विभागामडून घ्यावी. पैसे भरुन झालेले आहेत. झाडे जुनाट झ ाालेली आहेत, ती तहसीलदार कचेरीला धोकादायक होती. म्हणून तहसीलदारांनी त्या झाडांचा लिलाव केला. ज्यांनी हा लिलाव घेतला त्यांनी तोड परवानगी न घेता वाहतूक केली.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-7........... श्री.भास्कर जाधव....

पास घेतल्याशिवाय मालाची वाहतूक केल्यामुळे त्याला दंड आकारला असून माल जप्त करण्यात आला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : मालाची किंमत ठरविलेली नाही?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, 15,255 रुपये इतकी झाडाची किंमत ठरविली आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : व्हेंटिलेटरची सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे स्वाईन फ्लूची बाधा झालेला रुग्ण दगावणे

**मु. शी.** : व्हेंटिलेटरची सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे स्वाईन फ्लूची बाधा झालेला रुग्ण दगावणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी 'व्हेंटिलेटरची सुविधा उपलब्ध न झाल्यामुळे स्वाईन फ्लूची बाधा झालेला रुग्ण दगावणे' या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ ST/ 14:30

निवेदन क्रमांक-8.......

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, दिनांक 28.8.2009 रोजी रुग्ण केईएम, कस्तुरबा, मीरा हॉस्पिटल, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हॉस्पिटल येथे उपचारासाठी गेल्यानंतर योग्य उपचाराअभावी 4.10.2010 रोजी हा रुग्ण दगावला. निवेदनातील घटनाक्रम पाहिल्यानंतर असे दिसून येते की, ज्यावेळी कस्तुरबा रुग्णालयात हा रुग्ण गेला त्यावेळी टॅमीफ्लूच्या गोळ्या दिल्या गेल्या. त्याचवेळी या रुग्णाचा ट्रॅक ठरविणे आवश्यक होते. हा ट्रॅक का ठेवला गेला नाही? याबाबत कोणाला जबाबदार धरण्यात येणार आहे? कस्तुरबा रुग्णालयात रुग्ण गेला त्यावेळी त्याच्या घशाचा स्त्राव घेणे आवश्यक होते. तो स्त्राव न घेतल्याबद्दल कोणती कारवाई करण्यात येणार आहे? डॉ.गौतम गणवीर यांनी रुग्णाला संदर्भित करण्यासाठी राजावाडी, कस्तुरबा, भाभा हॉस्पिटल येथे दूरध्वनीवरुन चौकशी केली असता तेथे व्हेंटिलेटर रिकामे नसल्याचे सांगितले गेले. करोडो रुपये खर्च करुन व्हेंटिलेटरची खरेदी करण्यात येते. परंतु व्हेंटिलेटर उपलब्ध नसल्यामुळे रुग्ण दगावला गेल्याची वस्तुस्थिती समोर आलेली आहे. या तीनही मुद्यांबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, कु.पल्लवी मधुकर लवंगारे ही मुलगी दि.22.8.2009 रोजी पुण्याहून कल्याण येथे आली होती. दि.28.8.2009 रोजी मीरा हॉस्पिटल, कल्याण येथे ती दाखल झाली होती. 28 तारखेलाच संध्याकाळी 6.00 वाजता कस्तुरबा हॉस्पिटल येथे आली असताना तिने सोबत एक्सरे आणला होता. तो एक्सरे अस्पष्ट असल्यामुळे कस्तुरबा हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी तिला नवीन एक्सरे काढावा लागेल असे सांगितले. 29 तारखेला ती पुन्हा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या रुग्णालयात गेली आणि तिथे तिने नवीन एक्सरे काढला. तो एक्सरे घेऊन रुग्णाचे नातेवाईक कस्तुरबा हॉस्पिटलच्या डॉक्टरांना भेटले. त्यावेळी ती रुग्ण मुलगी तिथे उपस्थित नव्हती. त्या एक्सरेमध्ये क्लिअॅरिटी दिसून आली. रुग्ण मुलीची तब्येत खालावली, तिला श्वासोच्छ्वासास त्रास होत असल्यामुळे 30 तारखेला मीरा हॉस्पिटल, कल्याण येथे रात्री 8.30 वाजता तिला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. पुन्हा 30 तारखेलाच रुग्ण मुलगी राजावाडी हॉस्पिटलमध्ये आली. अशाप्रकारे दिनांक 22 ते 30 ऑगस्ट, 2009 या काळात वेगवेगळया खाजगी हॉस्पिटलमध्ये व कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये तिने उपचार घेण्याचा प्रयत्न केला. 28 तारखेला ती कस्तुरबा हॉस्पिटलमध्ये आली आणि लगेच परत गेली. त्यावेळी तिची परिस्थिती

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ ST/ 14:30

श्री.भास्कर जाधव..........

अत्यंत गंभीर होती. म्हणून उपचार घेत असतानाच 3 सप्टेंबर, 2009 रोजी पहाटे 2 ते 3 वाजण्याच्या सुमारास नायर रुग्णालयात तिला आंतररुग्ण म्हणून दाखल करण्यात आले. परंतु रुग्णाकडून उपचारास प्रतिसाद मिळाला नाही आणि रुग्ण 4 सप्टेंबर, 2009 रोजी दगावला.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कस्तुरबा रुग्णालयाचा नियम आहे. टॅमीफ्लूच्या गोळ्या ज्यावेळी दिल्या गेल्या त्यावेळी तो रुग्ण स्वाईन फ्लूची बाधा झालेला असल्याचे घोषित केले जाते आणि त्याचा ट्रॅक ठेवला जातो. या नियमाचे पालन केले नाही हे मंत्रीमहोदय नाकारीत आहेत. मीरा हॉस्पिटलमधील डॉ.गौतम गणवीर यांनी दूरध्वनीवरुन राजावाडी, कस्तुरबा व भाभा हॉस्पिटल येथे चौकशी केली असता व्हेंटिलेटर रिक्त नसल्याचे सांगण्यात आले. याबाबत चौकशी करुन कारवाई केली जाणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या माहितीबाबत निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि कोणी दोषी आढळले तर कारवाई करण्यात येईल.

----------

नंतर 2 पी.1.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ ST/ KGS/ पूर्वी श्री. भोगले...... 14:35

**पृ.शी.**: मुंबई महापालिके अंतर्गत शेकडो मराठी शाळांना अद्यापही मान्यता न मिळणे

**मु.शी.**: मुंबई महापालिके अंतर्गत शेकडो मराठी शाळांना अद्यापही मान्यता न मिळणे याबाबत सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

-------

**पृ.शी.**: गोरेगांव (मुंबई) येथील विबग्योर शाळेतील विद्यार्थीनीना व्यवस्थापनाने अचानक शाळेतून काढून टाकणे

**मु.शी.**: गोरेगांव (मुंबई) येथील विबग्योर शाळेतील विद्यार्थीनीना व्यवस्थापनाने अचानक शाळेतून काढून टाकणे

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

-------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कायम विना अनुदानित मधील "कायम" हा शब्द वगळून मराठीऐवजी इंग्रजी शाळांचेच प्रस्ताव मान्य करणे

**मु.शी.**: कायम विना अनुदानित मधील "कायम" हा शब्द वगळून मराठीऐवजी इंग्रजी शाळांचेच प्रस्ताव मान्य करणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "कायम विना अनुदानित मधील "कायम" हा शब्द वगळून मराठीऐवजी इंग्रजी शाळांचेच प्रस्ताव मान्य करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : महोदय, या निमित्ताने माझा एकच महत्वाचा प्रश्न असा आहे की, ज्या मराठी शाळांना शासनाने मान्यता दिलेली नाही त्यासंबंधात आणि केंद्रशासनाच्या मोफत व सक्तीचे शिक्षण या धोरणाची अमलबजावणी करावयाची असल्याने ज्या शाळा सुरु झालेल्या आहेत अशा मराठी शाळांना मान्यता देण्याबाबत फेरविचार करणार काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, मंत्रिमंडळासमोर यासंबंधीचा निर्णय झालेला असून सन 2012-13 पासून अशा शाळांचे मूल्यांकन करुन त्या वेळेपासून सर्व शाळांना अनुदान देण्यात येणार आहे.

श्री. रामनाथ मोते : महोदय, अनुदान मिळण्याबाबतचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला नसून माध्यमिक शाळांना मान्यता देण्याबाबतचा हा विषय आहे व त्याबाबत हायकोर्टाने आदेशही दिलेले आहेत. म्हणून शासनाने अशा शाळांची मान्यता रद्द करण्याबाबत जो निर्णय घेतलेला आहे त्याचा फेरविचार करणार काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, कायम विना अनुदानित संबंधीचे धोरण शासनाने स्वीकारल्याप्रमाणे कायम विना अनुदानित तत्वावर ज्या शाळांना मान्यता मागण्याबाबतचे प्रस्ताव होते ते सर्व रद्द करण्यात आले आहेत. आता नवीन प्रस्ताव बृहत आराखडा तयार झाल्यानंतरच स्वीकारण्यात येतील.

--------

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्ह्यातील अनुदानाच्या टप्प्यावर आलेल्या शाळा तुकड्यांना अद्यापही अनुदान न मिळणे

**मु. शी.** : आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्ह्यातील अनुदानाच्या टप्प्यावर आलेल्या शाळा तुकड्यांना अद्यापही अनुदान न मिळणे याबाबत श्री व्ही.यू.डायगव्हाणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

--------

**पृ. शी.** : राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करणे

**मु. शी.** : राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करणे याबाबत सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

---------

.....5...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासींसाठी खरेदी समितीमार्फत जास्त दराने खरेदी केलेल्या जीवनावश्यक वस्तूंमध्ये झालेला गैरव्यवहार

**मु. शी.** : आदिवासींसाठी खरेदी समितीमार्फत जास्त दराने खरेदी केलेल्या जीवनावश्यक वस्तूंमध्ये झालेला गैरव्यवहार याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. पद्माकर वळवी (अन्न व नागरी पुरवठा राज्य मंत्री ) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "आदिवासींसाठी खरेदी समितीमार्फत जास्त दराने खरेदी केलेल्या जीवनावश्यक वस्तूंमध्ये झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

....6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, प्रश्न असा आहे की, खरेदी समिती क्र. 1 मार्फत हे भाव निश्चित करण्यात आले पण या वस्तू पीडीएस मार्फत खरेदी न केल्यामुळे बाजारभावाशी तसेच पीडीएस शी तुलना केली आदिवासी विकास विभागाला 20 कोटी रुपये एवढा तोटा झालेला आहे हे खरे आहे काय ? तसेच राष्ट्रीय उपभोक्ता संघ आणि पीडीएस मधून धान्य खरेदी न करण्याचे कारण काय आहे व याला जबाबदार कोण आहे आणि त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ?

श्री. पद्माकर वळवी : महोदय, खरेदी समिती क्र. 1 ही आदिवासी विकास आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समिती असते. या समितीने ही सर्व खरेदी केली असून दि. 5 मे, 2001 च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय उपभोक्ता महासंघामार्फत आदिवासी विकास विभागातील आश्रमशाळा आणि वसतिगृहांसाठी धान्याची खरेदी केली जाते. तसेच राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघाला खावटी कर्जे देण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्यामध्ये नागपूर हायकोर्टाने या एका प्रकरणात असे निर्देश दिले होते की, आदिवासींना पीडीएस मार्फत खावटी कर्जाचे वितरण व्हावे अशी मागणी केली होती. त्यानुसार आदिवासी विकास विभागाकडून फक्त प्राथमिक दर्जापुरतेच या खावटी कर्जाचे वितरण पीडीएस मार्फत होते उर्वरित 23 ठिकाणी आदिवासी विकास महामंडळाच्या वतीने असे वितरण करण्यात येते. तसेच धारणी प्रोजेक्टच्या अहवालानंतर जो निष्कर्ष निघेल त्याच्या आधारावर पीडीएस मार्फत हा निर्णय घेण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, खावटी कर्ज योजनेअंतर्गत वितरित करावयाच्या वस्तूचे दर मात्र पीडीएसपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहेत. ज्या ठिकाणी 500 रुपये क्विंटलप्रमाणे लोकवन गहू खरेदी केला जातो तोच गहू या समितीच्या वतीने 1850 रुपये प्रति क्विंटलनुसार खरेदी करण्यात आला....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ...

या प्रकरणामध्ये शासनाला तोटा झालेला आहे. त्यामुळे शासनाला जो तोटा झालेला आहे त्याची जबाबदारी ज्या अधिका-यांवर होती त्या अधिका-यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सह. संघ मर्या. मुंबई, यांना मध्ये न घेता सार्वजनिक वितरण व्यवस्थेतूनच धान्य घेण्याचा निर्णय आपण करणार आहात काय ?

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदय, 23 प्रोजेक्टसाठी जे धान्य खरेदी करण्यात आले ते प्रचलित दरानुसारच करण्यात आलेले आहे. या प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारची अफरातफर झ ाालेली नसून कार्यपध्दतीनुसारच धान्य खरेदी करण्यात आलेले आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीतील जे दर आहेत ते दर आणि खावटी कर्जाचे दर यामध्ये फरक आहे. या ठिकाणी धान्य बाजार भावाने खरेदी केलेले असल्यामुळे फरक दिसून येतो आहे. धारणीमध्ये खावटी कर्जाचे जे वाटप झालेले आहे त्या वाटपाची यशस्वीता बघितल्यानंतर ती पध्दत राज्यामध्ये लागू केली जाईल.

....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यात रेडी येथे झालेला दुहेरी खून
**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यात रेडी येथे झालेला दुहेरी खून याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. रमेश बागवे ( गृह राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यात रेडी येथे दुहेरी खून " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** :निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.. 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, वेंगुर्ले तालुक्यातील रेडीमध्ये हा दुहेरी खून झालेला आहे. या खुनातील आरोपी पोलिसांना गेल्या एक महिन्यापासून सापडत नाही. पोलीस पोहचण्याच्या अगोदरच हा आरोपी तेथून फरार होतो. त्यामुळे या आरोपीला पोलिसांकडूनच खबर मिळते का ? सदर आरोपीची आई सावंतवाडी पोलीस स्टेशनमध्ये आलेली असतांना तिने पोलीस स्टेशनमध्येच आत्महत्या केली, हे खरे आहे काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या गुन्हयातील आरोपी अजून पर्यंत पकडला गेला नाही ही वस्तुस्थिती आहे परंतु पोलिसांनी या प्रकरणात कसून तपास केलेला आहे. वेंगुर्ला पोलीस स्टेशनचे पोलीसांच्या आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांचे वेगवेगळे पथक तयार करुन तपास केला जात आहे. तसेच यासंदर्भात मोबाईल कंपन्यांची सुध्दा मदत घेण्यात आलेली आहे. गोवा राज्यातील म्हापसा पणजी, वेरणे, हनका तसेच कारवार-बेळगाव अशा सर्व ठिकाणी शोध पथके पाठविण्यात आलेली आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ अधिकारी यांना मोबाईल कंपन्याच्या माध्यमातून सुगावा लागला होता की, सदरचा आरोपी गोवा परिसरात आहे, त्यावेळेला गोवा परिसरात पोलीस पथक पाठवून आरोपीचा मागोवा देखील घेण्यात आलेला आहे. आरोपीच्या नातेवाईकांचे फोन सुध्दा डिटेक्ट करण्याचे काम सुरु आहे. या प्रकरणाची कसून चौकशी सुरु असून आरोपीने स्वत:चा मोबाईल बंद करुन ठेवलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे की, सदर आरोपीच्या आईने सावंतवाडी पोलीस स्टेशनमध्ये आत्महत्या केलेली आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आरोपी फरार झाल्याचे तसेच या घटनेत दोन महिलांचा खून झालेला आहे याची माहिती आरोपीच्या आईला कळाल्यानंतर ती पोलीस स्टेशनमध्ये आली होती. परंतु नंतर सावंतवाडी पोलीस स्टेशनच्या आवारातील तहसील कार्यालयातील विहिरीत सदर आरोपीच्या आईचा मृतदेह सापडून आला, सदर मृत्यूची नोंद आकस्मिक मृत्यू म्हणून करण्यात आलेली आहे. तसेच सदर मृत्यू कलम 174 नुसार दाखल केलेला आहे. सदरचा गुन्हा एलसीबीकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

डॉ. नीलम गो-हे : या घटनेत सीआयडी चौकशीची मागणी करण्यात आलेली आहे. आरोपीच्या आईने या प्रकरणात आत्महत्या केलेली आहे.

**उपसभापती** : एलसीबी कडे या गुन्हयाचा तपासाचे काम दिलेले आहे. एलसीबी इज बेटर दॅन सीआयडी.

---- ..4..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये निवेदन क्र. 18 व 19 एकत्रित चर्चेस घेण्याबाबत**

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, निवेदन क्रमांक 18 व 19 चा विषय एकच असल्यामुळे दोन्ही निवेदनाचे उत्तर एकत्रित देतो.

**उप सभापती** : ठीक आहे.

**पृ.शी.**: मुंबईतील शिवडी भागात विषारी गॅस गळतीमुळे 80 कामगारांची प्रकृती चिंताजनक होणे

**मु.शी.**: मुंबईतील शिवडी भागात विषारी गॅस गळतीमुळे 80 कामगारांची प्रकृती चिंताजनक होणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, श्री.विनोद तावडें, श्री धनंजय मुंडे, श्री रामनाथ मोते, श्री संजय केळकर, श्री चंद्रकांत पाटील, श्री गुरुमुख जगवानी वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. रमेश बागवे ( गृह राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्रीमती शोभा फडणवीस, श्री. विनोद तावडें, श्री धनंजय मुंडे, श्री रामनाथ मोते, श्री संजय केळकर, श्री चंद्रकांत पाटील व श्री. गुरुमुख जगवानी यांनी "मुंबईतील शिवडी भागात विषारी गॅस गळतीमुळे 80 कामगारांची प्रकृती चिंताजनक होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** :निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हाजी बंदर येथे मुंबई पोर्ट ट्रस्टचे गोडावून आहे. हे गोडावून या ठिकाणी ब-याच वर्षापासून आहे. असे असून सुध्दा या ठिकाणी क्लोरीन सारख्या विषारी वायूने भरलेली गॅस सिलेंडर ठेवली जातात. अग्निशमन दलाकडे विषारी वायुची गळती थोपविण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री नसल्याचे घटनेच्या वेळी दिसून आलेले आहे. गोडावून मध्ये विषारी वायुची सिलेंडर्स ठेवली जातात व त्यासंदर्भात वायुची गळती थोपविण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध असू नये, भर वस्तीच्या ठिकाणी लोकांच्या जीवाशी खेळ खेळला जातो, त्यामुळे या ठिकाणी अशा प्रकारची यंत्रसामुग्री कधी उपलब्ध करुन देणार आहात ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

यावर उपाययोजना करण्यासाठी बीपीटीच्या उपाध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्याने चूक केली आहे अशा अधिकाऱ्याला आता आपण उपाययोजना करण्यासाठी नियुक्त केले आहे. क्लोरिन वायूने भरलेले गॅस सिलेंडर ठेवले जातात हे त्यांना माहीत नव्हते काय ? सदर वायुची गळती रोखण्यासाठी अग्निशमन दलाकडे वायू गळती थोपविण्यासाठी सामुग्री लागते हे ज्याला आधी कळले नाही, त्यालाच आपण पुन्हा उपाययोजना करण्यासाठी नेमत आहात. या घटनेवरून गोदामाकडे सरकारचे फारसे लक्ष नव्हते असे खेदाने म्हणावे लागते. तेव्हा येथे यंत्र सामुग्री ठेवण्याकरिता शासन ताबडतोब लक्ष देणार आहे काय ? या उपाध्यक्षाऐवजी अन्य अधिकाऱ्याची नेमणूक करून शासन न्याय देणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, औद्योगिक सुरक्षा आरोग्य संचालक, केंद्रीय स्फोटके विभाग संचालक यांच्या माध्यमातून वायू गळती होऊ नये म्हणून कटाक्षाने सुरक्षा केली जाते व त्यांचे त्यावर लक्ष असते. जप्त केलेले क्लोरिन वायूचे सिलेंडर बीपीटीच्या उघड्या गोदामामध्ये ठेवण्यात आले होते. घडलेली घटना लक्षात घेऊन बीपीटीला चांगली यंत्रसामुग्री ठेवण्यासाठी व सुरक्षा करण्यासाठी सांगण्यात आले आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मूळ प्रश्न असा विचारला आहे की, ज्याने यंत्रणा उभी ठेवली नाही, त्यालाच आपण उपाययोजना करण्यासाठी, चौकशी करण्यासाठी कसे काय नियुक्त केले आहे? बीपीटीच्या उपाध्यक्षांना चौकशीसाठी कसे काय नेमत आहात ? या प्रकरणी त्यांनी हलगर्जीपणा केला आहे. त्यामुळेच 129 रूग्णांना वेगवेगळ्या रूग्णालयात दाखल करावे लागले आहे. त्यांनाच आपण कसे काय नेमत आहात ? तसेच जे जबाबदार आहेत, त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, वायू गळती झाल्यानंतर तात्काळ अग्निशमन दलाला बोलावून ते तात्काळ आले आहेत. तसेच पोलीस देखील तात्काळ आले आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, त्यांनी काय व्यवस्था केली हा विषय येथे नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मुंबई पोर्ट ट्रस्ट तसेच कस्टम विभाग, संनियंत्रके स्फोटके विभाग, भारत सरकार, डॉक सेफ्टी बोर्ड, पर्यावरण विभाग, अग्निशमन दल अशा निरनिराळ्या विभागांशी पोलीस अधिकाऱ्यांनी 11वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर नेमके कोण जबाबदार आहे हे निश्चित केले जाईल आणि त्या अनुषंगाने कारवाई केली जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जे दोषी आहेत त्यांनाच आपण चौकशी अधिकारी म्हणून नेमलेले आहे, हा विषय आहे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सदर जागा ही भारत सरकारच्या अखत्यारित आहे. बीपीटीच्या जागेत कस्टमच्या गोदामामध्ये हे सिलेंडर आणले आहेत. त्यानुसार गुन्हा दाखल केला असून संबंधित 4-5 महत्त्वाच्या खात्यांना 11 पत्रे पाठविण्यात आली आहेत. दोष नेमका कोणाचा आहे, याची चौकशी संबंधित पोलीस अधिकारी.......

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, बीपीटीच्या उपाध्यक्षांना चौकशी अधिकारी म्हणून नेमले आहे काय ?

श्री.रमेश बागवे : होय. परंतु, अद्यापपर्यंत गुन्हा कोणी केला हे सिद्ध झालेले नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, चोर कसा काय सांगेल की, मी चोरी केली आहे ?

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय, सदर नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील व्यवस्थित सुधारित उत्तर भले आपण परवा द्यावे. तो पर्यंत मी हे निवेदन मी राखून ठेवतो.

...................

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** :कोल्हापूर शहरामध्ये स्वस्त धान्य परवानाधारकांनी केशरी कार्डधारकांसाठी राज्य सरकारकडून येणारा गहू व तांदूळ उचलण्यास टाळाटाळ करणे

**मु.शी.** :कोल्हापूर शहरामध्ये स्वस्त धान्य परवानाधारकांनी केशरी कार्डधारकांसाठी राज्य सरकारकडून येणारा गहू व तांदूळ उचलण्यास टाळाटाळ करणे याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील व व्ही.यु.डायगव्हाणे,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अनिल देशमुख ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील व व्ही.यु.डायगव्हाणे यांनी "कोल्हापूर शहर स्वस्त धान्य परवानाधारकांनी केशरी कार्डधारकांसाठी राज्य सरकारकडून येणारा गहू व तांदूळ उचलण्यास टाळाटाळ करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कोल्हापूर शहरातील केशरी कार्डधारकांच्या संदर्भातील हे निवेदन आहे. रेशनिंग संदर्भातील तक्रारींबाबत प्रत्येक जिल्ह्यात दक्षता समिती नेमण्यात येईल असे माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात आश्वासन दिले होते. या समितीवर विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांचा समावेश असेल असेही सांगितले होते. मी 15 दिवसांपूर्वी माहिती घेतली असता पुणे, कोल्हापूर, सांगली इत्यादी जिल्ह्यांत तसेच अन्य जिल्ह्यात अशी दक्षता समिती नेमल्याचे दिसून आले नाही. तेव्हा कोल्हापूर व अन्य जिल्ह्यात रेशनिंग संदर्भातील तक्रारींबाबत दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची दक्षता समिती नेमण्यात येईल काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, शासनाने दक्षता समिती नेमण्याचे आदेश दिलेले आहेत. खरें म्हणजे जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना हे अधिकार आहेत. जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी साठ दिवसांत समिती नेमली नाही तर ते अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे जातात. दक्षता समितीमध्ये विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांचा समावेश असणार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या आदेशाची प्रत माझ्याकडे आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी आदेश दिल्यापासून आतापर्यंत जवळपास आठ-नऊ महिने झाले अशाप्रकारची दक्षता समिती नेमलेली नाही. निवडणुकीपासून हा विषय प्रलंबित आहे. दुसरे म्हणजे या संदर्भात जो जी.आर.काढण्यात आलेला आहे त्यामध्ये विधानपरिषद सदस्यांचा उल्लेख नाही. त्यामध्ये जी.आर.विधानसभा सदस्य, स्वंयसेवी संस्था व इतरांचा उल्लेख आहे. तसेच पुणे जिल्ह्यामध्ये निम्म्यापेक्षा जास्त जागा रिक्त आहेत. तेव्हा याबाबत केव्हा कार्यवाही करण्यात येईल ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, पुणे जिल्ह्याची माहिती घेण्यात येईल. त्या ठिकाणी दक्षता समिती का नेमण्यात आली नाही याची माहिती घेऊन दक्षता समिती लवकरात लवकर नेमण्याबाबत सूचना देण्यात येतील.

------

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :वेंगुर्ले, जिल्हा सिंधुदुर्ग येथील भुयारी गटार योजनेचे काम विहित अटी व शर्तीप्रमाणे न होणे

**मु. शी.** : वेंगुर्ले, जिल्हा सिंधुदुर्ग येथील भुयारी गटार योजनेचे काम विहित अटी व शर्तीप्रमाणे न होणे यासंबंधी श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वेंगुर्ले जि.सिंधुदुर्ग येथे 12 कोटी रुपये खर्चाच्या भुयारी गटार योजनेचे काम सुरु असून, दिनांक 31 मे, 2010 रोजी वा त्यासुमारास पडलेल्या पावसामुळे वेंगुर्ले कॅम्प येथील भुयारी गटाराच्या कामास भगदाड पडणे, या भुयारी गटार योजनेचे सर्वेक्षण करण्याचे काम शासकीय यंत्रणेकडून न करता भुयारी गटाराच्या कामाचा अनुभव नसलेल्या अशा खाजगी आर्किटेक्टना देण्यात येणे, विहित अटी व शर्तीप्रमाणे काम न होणे, या योजनेसाठी जीवन प्राधिकरण विभागाकडून पाठविलेला अहवाल विसंगत असणे, यामुळे या कामाच्या दर्जाबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेला संशय, त्याचबरोबर मालवण येथील भुयारी गटार योजनेच्या कामाकरिता दोन वर्षाच्या मुदतीत 40 किलोमीटर पाईपलाईन टाकण्याची अट असतांना योजनेचे काम रेंगाळून आतापर्यंत फक्त 500 मीटरच पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात येणे, यामुळे तेथील नागरिकांमध्ये निर्माण झालेली साशंकता, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन सर्व संबंधितांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.भास्कर जाधव ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले व मालवण शहरामध्ये भुयारी गटाराच्या अनेक तक्रारी वाढल्या आहेत. वेंगुर्ले येथे एस.टी.पी. प्लान्ट उभा करण्यासाठी आवश्यक असणारी जागा नगरपालिकेच्या ताब्यात नाही. असे असताना निविदा काढण्यात आलेली आहे. एस.टी.पी.साठी जागा उपलब्ध न झाल्यास हा प्रकल्प डबघाईस जाणार आहे. तेव्हा एस.टी.पी.साठी जागा उपलब्ध नसताना त्यास मंजुरी देऊन निविदा कशा काढण्यात आल्या ? ज्या कंपनीस आर्किटेक्टचे काम दिलेले आहे त्याच्या प्रमुख एक महिला असून त्या कधीही प्रोजेक्टवर आलेल्या नाहीत. त्या महिला बिल्डींग आर्किटेक्चर आहेत, त्यांना सिव्हरेज कामाचा कोणताही अनुभव नाही. त्या महिलेचा नवरा तांत्रिक कामाची पाहणी करण्यासाठी येतो. तेव्हा त्याबाबत चौकशी करण्यात येईल काय ? या प्रकरणी ग्रामस्थांनी मोर्चा काढून न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे हे मंत्रिमहोदयांना माहीत आहे काय ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन त्या कामासाठी ऑर्किटेक्ट नेमले होते. या कामासाठी सर्वात कमी दराची जी निविदा आली होती ती स्वीकारुन दिनांक 8 फेब्रुवारी 2007 रोजी जनरल सभेचा ठराव घेऊन मेसर्स एंगार्च आर्किटेक्ट, कोल्हापूर यांची नेमणूक करण्यात आली होती.सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, त्या फर्मच्या प्रोप्रायटर एक महिला असून त्यांनी स्वत:येऊन कामाची पाहणी करण्याऐवजी त्यांचे पती कामाची पाहणी करीत असतात. या महिले बरोबर तिच्या पतीने येणे हा भाग वेगळा आहे परंतु ज्यांची ही कंपनी आहे त्यांनीच कामाला भेट देण्यासाठी आले पाहिजे , एम.बी.रेकॉर्ड केले पाहिजे तसेच तांत्रिक बाबीसंबंधी मार्गदर्शन पाहिजे. ही सर्व कामे त्यांनीच करावीत या संदर्भात तेथील मुख्य कार्यकारी अधिका-यांना सूचना देण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी असेही सांगितले की या कामासंबंधी तेथील ग्रामस्थांनी वेळोवेळी तक्रारी केल्या आहेत. ठेकेदाराने पाईप बदलण्याचे काम केलेले आहे. परंतु मालवण नगरपालिकेच्या पाईप दुरुस्तीच्या कामासंबंधी काही तक्रारी करण्यात आल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्याची दखल घेऊन मालवणच्या या ठेकेदाराला एक रुपयाचे बिलसुध्दा अदा करण्यात आलेले नाही.या प्रकरणी जनहित याचिका दाखल झाली आहे काय असाही प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे परंतु त्यासबंधीची माहिती वा तशा प्रकारची नोटीस आल्याची माहिती शासनाकडे या क्षणापर्यत नाही.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, ही निविदा केव्हा काढण्यात आली होती ? त्या नगरपालिकेमध्ये शिवसेना भा.ज.प ची सत्ता असतांना ही निविदा काढण्यात आली असावी अशी माझी माहिती आहे. पाईप लाईन बदलण्याच्या वा अन्य कामासंबंधीची तपासणी कोणती यंत्रणा करीत आहे ?

श्री.भास्कर जाधव :सभापती महोदय, त्या कामासाठी आर्किटेक्ट नेमण्यासाठी दिनांक 24.08.2006 रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याला 8 फेब्रुवारी 2007 रोजी अंतिम मान्यता देण्यात आली होती. भुयारी गटार योजनेच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांच्या मार्फत प्रथम तपासणी केली जाते त्यानतर या कामासंबंधीचा प्रस्ताव तयार करुन तो केन्द्र सरकारकडे पाठविला जातो. आपण जो काही आराखडा तयार करुन पाठवित असतो तो आराखडा जसाच्या तसा केन्द्र सरकार मान्य करीत नाही. केन्द्र सरकारची एक तांत्रिक समिती असून त्या समितीने पहाणी केल्यानंतरच या कामांना अंतिम मंजुरी दिली जाते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मालवण नगरपालिकेच्या संदर्भात देखील या लक्षवेधी सूचनेमध्ये उल्लेख् करण्यात आलेला आहे.मालवणी नगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेतील 18 कोटी 84 लाख रुपयांची योजना हाती घेण्यात आलेली आहे. या सदर्भात माझी अशी माहिती आहे की, ही संपूर्ण कामे बोगस आहेत. मालवणमध्ये आज ज्या पध्दतीने काम सुरु आहे ते पाहिल्यानंतर असे दिसून येते की, मालवण नगरपालिकेचा कारभार जी नगरसेवक मंडळी चालवितात त्याच मंडळीने एक कडबोळे करुन ठेवलेले आहे आणि हे काम तू घे दुसरे काम मी घेतो अशा पध्दतीने कामाचे वाटप केले जाते. अन्य पक्षाच्या सदस्यांनासुध्दा आपल्याकडे घेऊन त्यांनासुध्दा त्यामध्ये भागीदार करुन घेण्याचा दुर्देवाने तेथे प्रकार घडला आहे . या संदर्भात मला माननीय मंत्रीमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न असा विचारावयाचा आहे की, हे काम ज्या कंत्राटदारांला देण्यात आलेले आहे ते कंत्राट रद्द करण्यात येणार आहे काय ? जर या कंत्राटदाराचे कंत्राट रद्द केले नाही तर या कामाची चांगली गुणवत्ता मिळणार नाही. तेव्हा हे काम चांगल्या दर्जाचे होण्यासाठी त्याचे कंत्राट रद्द केले जाणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, दोन योजना वेगवेगळया आहेत.वेंगुर्ला नगरपालिकेची योजना 12 कोटी 35 लाख रुपयांची आहे मालवण नगरपालिकेची योजना 18 कोटी 84 लाख रुपयांची आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मालवणच्या कंत्राटदाराकडून योग्य प्रकारे व समाधानकारक काम झाल्याचे दिसून आले नाही. त्याच्या कामाची गती अत्यंत कमी होती व .त्याच्याकडून खूपच कमी काम करण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात 160 मिटर्सपर्यतच काम करण्यात आलेले आहे त्यामुळे या ठेकेदाराकडील काम बंद करण्यात आलेले आहे. कोणत्याही कामाचा ठेका देत असतांना त्यामध्ये अटी आणि शर्ती ठरविण्यात येत असतात त्यानुसार सबंधित कंत्राटदाराविरुध्द कारवाई सुरु आहे.....

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

सभापती महोदय, वेंगुर्लाचे काम सुरु असून वेंगुर्ल्याच्या झालेल्या कामाचे 1 कोटी 41 लाख रुपयांचे पेमेंट करण्यात आले आहे. म्हणून मघाशी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे या कामाकडे लक्ष आहे. त्याकरिता केंद्र सरकारची सुध्दा समिती आहे. त्याचप्रमाणे थर्ड पार्टी ऑडिट करण्याचे काम वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, सांगली या संस्थेकडे दिले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वेंगुर्ल्याच्या कामासाठी काही कोटी रुपये देण्यात आले आहेत. मलनिस्सारण प्रक्रिया प्रकल्प असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय हा प्रकल्प पुढे नेता येत नाही. त्या प्रकल्पाला अजूनपर्यंत जागा मिळाली नाही. तुमच्या निविदेमध्ये ते अंतर्भूत असतांना व या प्रकल्पासाठी जागा मिळाली नसतांना तुम्ही निविदा कशी काढली ? प्रकल्पासाठी जागा नसल्यामुळे मान्यता देण्यात आली नाही असे नगरपालिकेने लेखी लिहून दिले आहे. प्रकल्पासाठी जागा उपलब्ध नसतांना आपण ही निविदा कशी काढली ? ठेकेदारासाठी निविदा काढण्यात आली असा त्याचा अर्थ होतो. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, "सदर योजनेमध्ये एसटीपी" म्हणजेच मराठीमध्ये मलनिस्सारण प्रक्रिया प्रकल्प लिहावयास हवे होते. परंतु तरीही त्यांनी "एसटीपी" लिहिले आहे. ही जागा 100 टक्के नगरपालिकेच्या ताब्यात नाही असे जिल्हाधिकाऱ्यांनी लिहून दिले आहे. तर मग ही निविदा कशी काढली?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या युआयडीएसएसएमटीमध्ये केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा आहे. ज्यावेळी असे प्रकल्प मंजूरीसाठी पाठविण्यात येतात त्यावेळी त्यामध्ये अनेक अटींचा समावेश असतो. त्या अटी बऱ्याच वेळेला स्थानिक स्वराज्य संस्थांना पूर्ण करणे अवघड होते. त्यामुळे काही अटींची पूर्तता केल्यानंतर हे प्रस्ताव मंजूर होतात. परंतु आपण म्हटल्याप्रमाणे एसटीपी प्लँटसाठी जागा उपलब्ध नसेल तर आपल्याला नगरपालिकेला निश्चितपणे जागा उपलब्ध करुन द्यावी लागेल. आपल्याला केंद्र सरकारकडून एकदम पैसे मिळत नाहीत तर इन्स्टॉलमेंटप्रमाणे मिळतात. म्हणून त्या संदर्भात थोडासा उदार दृष्टीकोन ठेवून नगरपालिकेला जा्गा उपलब्ध करुन देण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रे रोड, मुंबई येथील पावडर बंदर झोपडपटटीतील तरुण मुलीला विवस्त्र करुन तिची धिंड काढणे

**मु. शी.** : रे रोड, मुंबई येथील पावडर बंदर झोपडपटटीतील तरुण मुलीला विवस्त्र करुन तिची धिंड काढणे यासंबंधी सर्वश्री राम पडांगळे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. राम पडांगळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रे रोड, मुंबई येथील पावडर बंदरच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या मागासवर्गीय श्रीमती जाधव व त्यांच्या लहान मुलाला दि. 17 जून जून, 2010 रोजी तेथील नागरिकांनी बेदम मारहाण करणे, त्यांच्या तरुण मुलीला घरातून बाहेर काढून तिला विवस्त्र करुन तिची धिंड काढणे, या भयंकर घटनेमुळे मुंबईतील मागासवर्गीय समाजात पसरलेला तीव्र संताप सर्वच संघटनांनी या घटनेचा केलेला निषेध, यातील आरोपींना त्वरित अटक करुन त्यांचेविरध्द कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाय योजना "

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, रे रोड, मुंबई येथील पावडर बंदरच्या झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या श्रीमती जाधव यांच्या लहान मुलीला दिनांक 17 जून, 2010 रोजी तेथील नागरिकांनी बेदम मारहाण करुन व तिला विवस्त्र करुन तिची घराबाहेर धिंड काढली. सभापती महोदय, हे सरकार दलितांच्या पाठीशी आहे, हे सरकार दलितांच्या जीविताचे व अब्रूचे रक्षण करीत आहे अशाप्रकारची भूमिका दाखविली जाते.परंतु प्रत्यक्षात हे सरकार दलितांच्या बाजूने आहे की नाही असा प्रश्न पडतो. एका मागासवर्गीय तरुण मुलीला विवस्त्र करुन मारहाण केली जाते आणि मुंबईच्या भरवस्तीमध्ये हा प्रकार होतो. त्यामुळे दलितांच्या बाबतीत या सरकारला संवेदना राहिलेली नाही. मुंबई शहरामध्ये तरुण मुलीला विवस्त्र करुन तिची धिंड काढणे शेमफुल आहे. आणि याबाबतीत या सरकारची भूमिका अत्यंत लाजिरवाणी आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे ....

सभापती महोदय, शासनाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, सरकारने त्यांच्यावर चॅप्टर केस करुन न्यायालयीन खटला भरलेला आहे. सभापती महोदय, एका बाजूला बीड जिल्हयामध्ये सवर्ण महिलेवर ज्यावेळी बलात्कार होतो त्यावेळी त्या आरोपीवर मोक्का लावण्यात येतो. आणि दलितांच्या महिलेला विवस्त्र केल्यानंतर त्या आरोपीवर चॅप्टर केस लावण्यात येते. याचा अर्थ शासनाची भूमिका दलितांवर अन्याय करणाऱ्या लोकांना पाठीशी घालणारी आहे. सभापती महादेय, चॅप्टर केस दाखल केलेली आहे हा हास्यास्पद प्रकार आहे. एखाद्या गल्लीमध्ये भांडण झाले तर त्यांच्यावर चॅप्टर केस केली जाते. दलिताच्या मुलीला विवस्त्र करुन तिची धिंड काढली इतका मोठा गुन्हा घडलेला असताना त्या गुन्हेगारावर फक्त चॅप्टर केस भरली जाते. त्याला मोक्का का लावला जात नाही? सभापती महोदय, या आरोपीला मोक्का लावणे तर दूरच पण दुसऱ्या दिवशी सोडले जाते. दलिताच्या मुलीला विवस्त्र केल्यानंतर गुन्हेगाराला दुसऱ्या दिवशी जामीन मिळाला त्यामुळे दुसऱ्या दिवशी तो आरोपी दारु पिऊन तिच्या दरवाज्यासमोर बसून मी या मुलीवर पुन्हा बलात्कार करणार आहे असे सांगत होता. सभापती महोदय, अशा प्रकारची घटना घडलेली असताना त्या आरोपीवर फक्त चॅप्टर केस करणार काय? अशा प्रकारे ही चॅप्टर केस कशी काय करण्यात आली.? सभापती महोदय, हे सरकारच बडतर्फ करण्याची वेळ आलेली आहे. सभापती महोदय, शासनाला जर कारवाईच करावयाची असेल तर त्याच्या विरुध्द मोक्का लावला पाहिजे होता तो लावणार काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, आमचे सहकारी सन्मानीय सदस्य श्री. पंडागळे यांनी या ठिकाणी अत्यंत आवेशात भाषण केलेले आहे. मी देखील एक दलित चळवळीमधील कार्यकर्ता आहे. शासन अशा कोणत्याही गुन्हेगाराला पाठीशी घालीत नाही. सन्माननीय सदस्यांनी सदनामध्ये जी माहिती दिलेली आहे त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, या निंदनीय घटनेच्या संदर्भात पोलीस विभागाने भारतीय दंड विधान कलम 143,146,147,149, 323,324,354,427,447,448,452,504,506,509 या व्यतिरिक्त अनुसूचित जाती जमाती अत्याचार अधिनियम,1989 कलम -3 (1), 3(10) (11) प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे आणि या गुन्हयामध्ये सुमारे 13 जण अटक झालेले आहेत त्यापैकी दहा जण अनोळखी आहेत. त्यामधील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/

श्री. रमेश बागवे...

श्रीमती शारदा  यादव ही बारा नंबरची आरोपी आहे या आरोपीला कोर्टाने जामीन दिलेला आहे. त्यामुळे पोलीस खात्याने तिच्यावर चॅप्टर केस भरुन प्रतिबंधात्मक कारवाई केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी या आरोपीला मोक्का कां लावण्यात आलेला नाही असा प्रश्न विचारलेला आहे. या गुन्हयामध्ये जे आरोपी आहेत त्यांच्यावर मोक्का कायदा लावण्यासारखे अगोदचे गुन्हे असतील तर नक्कीच त्याची गंभीर दखल घेऊन त्यांना मोक्का लावण्यात येईल.  मोक्का लावताना त्या गुन्हेगारावर कमीत कमी ज्या गुन्हयामध्ये दहा वर्षे शिक्षेची सजा आहे अशा प्रकारचे कमीत कमी दोन गुन्हे असले पाहिजेत. तसेच या गुन्हयाची पार्श्वभूमी एखादा देशद्रोहीचा गुन्हा, देशाच्या किंवा राज्याच्या सुरक्षिततेसंबंधी असलेला गुन्हा .......

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे ...

असे गंभीर गुन्हे असले तर त्यांच्यावर मोका लावत असतो. या आरोपींवर अशा प्रकारचे गुन्हे असतील तर त्यांच्यावर मोका लावण्यात येईल.

श्री. राम पंडागळे : बीड जिल्ह्यामध्ये जो बलात्कार झाला होता त्या ठिकाणी मोक्का लावला. त्यांना 10 वर्षाची शिक्षा झाली नव्हती. एका बाजूला एक भूमिका आणि दुसऱ्या बाजूला दुसरी भूमिका अशी परिस्थिती आहे. माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की, मी दलिताचा लेकरु आहे. त्या ठिकाणी मोक्का लावत नाही. दुसऱ्या दिवशी ते जामिनावर सुटतात.

श्री. रमेश बागवे : ही बाब तपासून निर्णय घेतला जाईल.

श्री. राम पंडागळे : दुसऱ्या दिवशी आरोपी जामिनावर सुटतात. एवढी जी कलमे लावली त्याचा काय उपयोग झाला ? दुसऱ्या दिवशी ते जामिनावर सुटतात.

श्री. रमेश बागवे : यातील कोणताही आरोपी न्यायालयीन कस्टडीतून सुटलेला नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, धिंड काढण्याच्या या घटनेच्या संदर्भात जास्तीत जास्त कडक कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर एका पाच वर्षाच्या मुलीवर बलात्कार झाल्याची घटना याच भागामध्ये घडली होती. त्यातील जे आरोपी आहेत त्यामध्ये त्यांच्या काही नातेवाईकांचा संबंध आहे काय ? ज्या मुलीवर बलात्कार झाला त्या मुलीवर बलात्कार करणारा जो आरोपी आहे त्यांचे काही नातेवाईक यामध्ये आहेत काय ? दोन गटामधील वादाचे स्वरुप याला आलेले आहे काय ? या दोन्ही घटनेच्या संदर्भात कठोरातील कठोर कारवाई करणार काय ? पहिली घटना असो किंवा दुसरी घटना असो, दोन्ही घटनेच्या बाबतीत द्रुतगती न्यायालयामध्ये खटला उभा करणार काय जेणेकरुन त्यामध्ये निर्णय होऊन शिक्षा होऊ शकेल ?

श्री. रमेश बागवे : या गुन्ह्यामध्ये ज्यांचा काही संबंध नाही असा कोणताही आरोपी नाही.

श्री. राम पंडागळे : अशा घटना वारंवार घडत आहेत. भंडाऱ्यामध्ये सुध्दा अशी घटना घडली. ती संवेदनशील घटना आहे.

...2...

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, हे वरिष्ठ सभागृह असून या ठिकाणी फक्त काय घटना घडली यावरच न बोलता त्यावर विचार करण्यासारखी बाब आहे. मुंबईसारख्या शहरामध्ये नग्न धिंड काढण्यासारखा प्रकार होत असेल तर त्यामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी जी कलमे वाचून दाखवली तेवढे दिवस तरी आरोपी कस्टडीमध्ये राहणार आहेत काय ? गेल्या तीन महिन्यामध्ये झालेले सर्व प्रकार पाहिले तर एक गोष्ट आपल्या लक्षात येईल. आपण नेहमी असे म्हणतो की, हिंसाचार करणाऱ्या अतिरेक्यांना जातपात नसते परंतु एका जातीच्या लोकांकडून असे हिंसाचार होणार असतील तर त्याबाबतीत सभागृहाला विचार करावा लागेल. याचे कारण असे की, शहापूरला पाच वर्षाच्या मुलीवर बलात्कार करुन तिला मारुन टाकण्याची जी घटना घडली होती त्यातील आरोपीचे नाव देविदास मिश्रा होते. शहापूरला ठक्कर कंपाऊंडमध्ये हा प्रकार झाला होता. गोरेगाव (पूर्व) येथे स्वत:च्या 17 वर्षाच्या मुलीवर बलात्कार करण्याची जी घटना घडली होती त्या आरोपीचे नाव घनश्याम सिंह होते. पोलीस त्याला पकडून घेऊन जात असताना सांताक्रुझ येथे त्याने पोलिसांच्या गाडीतून उडी मारली आणि तो आरोपी मयत झाला. 17 जून, 2010 रोजी रे रोड येथे जी घटना घडली त्यातील आरोपीचे नाव शारदा यादव आहे. या दोन तीन घटनांमध्ये लहान-मोठ्या मुलींवर बलात्कार करण्याच्या ज्या घटना घडलेल्या आहेत त्यातील आरोपींमध्ये एकाच समाजाच्या लोकांची नावे येत असतील तर त्याबाबत सभागृह विचार करणार आहे काय ? ही सगळी मंडळी अशा पध्दतीने महिलांवर होणारे अत्याचार, बलात्कार यासाठी कारणीभूत आहेत काय ? त्यांच्यावर आणखी मानसोपचार करावयाचे असतील तर मुंबई शहराच्या दृष्टीने तो बदल धडवून आणण्यासाठी शासन काही करणार आह काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो गंभीर आहे. मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, वारंवार अशा ज्या घटना घडतात त्यासंदर्भात शासन गंभीर आहे आणि यामध्ये शासनाने गांभीर्याने लक्ष घालून निवृत्त न्यायाधीश धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 9 जुलैला एक समिती गठीत केलेली आहे. त्या समितीमध्ये या सदनाच्या सन्माननीय महिला आमदार तसेच उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, गुप्तवार्ता शाखेचे तसेच गुन्हे शाखेतील वरिष्ठ अधिकारी घेतलेले आहेत. वारंवार राज्यामध्ये महिलावंर जे अत्याचार होतात

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. रमेश बागवे ....

त्यातील गुन्हेगारांवर जरब बसावी यादृष्टीने कायद्यामध्ये बदल करावयाचा काय यासंदर्भात ही समिती नेमलेली आहे. कारण केंद्र शासनाचा कायदा असल्यामुळे केंद्र शासनाला शिफारस करुन त्या कायद्यामध्ये बदल करुन गुन्हेगारांना जास्तीत जास्त कडक शासन कसे होईल यासाठी ही समिती नेमलेली आहे आणि या अनुषंगाने शासन गंभीर विचार करीत आहे.

---

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 3 व 4 संबंधी</u>**

**उपसभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील अनुक्रमांक 3 व 4 वर दर्शविण्यात आलेल्या दोन्ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : कोल्हापूर सी.पी.आर.रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभाग सुरळित सुरु करण्याची आवश्यकता

**मु.शी.** :कोल्हापूर सी.पी.आर.रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभाग सुरळित सुरु करण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोल्हापूरातील सी.पी.आर रुग्णालयातील हृदय शस्त्रक्रिया विभाग बंद करण्यासाठी काही डॉक्टर प्रयत्नशील असणे, जाणीवपूर्वक या विभागाकडे अपुरे कर्मचारी देणे, महत्वाचे अत्यावश्यक असलेले साहित्य देण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ होणे, तृतीय व चतुर्थ वर्ग कर्मचाऱ्यांच्या नेमणुका न करणे, वैद्यकीय शिक्षणमंत्री यांनी मंजूर केलेल्या दीड कोटी रुपये निधीचे नियोजन नसणे, शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शस्त्रक्रिया विभाग सुरळीत सुरु करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विजयकुमार गावित ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, काही वर्षांपूर्वी कोल्हापूर जिल्हयातील सी.पी.आर.रुग्णालय हृदय शस्त्रक्रिया विभाग सुरु झाल्यामुळे त्याचा सामान्य माणसांना उपयोग झाला होता. त्या रुग्णालयात अँजीओग्राफी व अँजीओप्लास्टीच्या आतापर्यंत 7 हजार शस्त्रक्रिया झाल्या आहेत. ओपन हार्ट सर्जरी 2,200 झाल्या आहेत. काही दिवसांपासून हा हृदय शस्त्रक्रिया विभाग बंद पडावा म्हणून काही लोकांचे प्रयतन सुरु आहेत. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "अशाप्रकारची कोणतीही घटना घडलेली नाही." ज्यावेळी वीज जाते त्यावेळी जनरेटर सुध्दा बंद असतो हे खरे आहे का ? बीएमव्ही या शस्त्रक्रियेसाठी बलूनची आवश्यकता असते. 25 हजार रुपयांमध्ये 3 शस्त्रक्रिया होऊ शकतात. बीएमव्ही शस्त्रक्रिया गेल्या 3 महिन्यांपासून केल्या जात नाहीत हे खरे आहे काय ? देखभालीसाठी वर्षासाठी 9 लाख रुपयांची तरतूद असताना ही रक्कमही दिली जात नाही आणि कॅथलॅबला मुंग्या लागल्यामुळे आठ दिवस अँजीओग्राफी व अँजीओप्लास्टी या शस्त्रक्रिया बंद होत्या हे खरे आहे काय ? हृदय शस्त्रक्रिया विभाग बंद पाडण्यासाठी काही डॉक्टरांचा प्रयत्न चालला आहे. काही डॉक्टरांना तेथे येणा-या पेशंटना खाजगी रुग्णालयात शिफ्ट करुन काहीना काही कमिशन घ्यावयाचे आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा या भागातील रुग्णांना हे रुग्णालय वरदान ठरले आहे ते बंद करण्याच्या दृष्टीने हालचाल चालली आहे हे खरे आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, येथील हृदय शस्त्रक्रिया विभाग बंद करण्याचा कोणी प्रयत्न करीत आहे असे निदर्शनास आलेले नाही. उलट त्याठिकाणी डॉ.देवरे हे आल्यापासून ऑपरेशनचे प्रमाण वाढलेले आहे. अँजीओग्राफी व अँजीओप्लास्टीच्या शस्त्रक्रियांची संख्या वाढलेली आहे. जनरेटरची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. परंतु तेथील जनरेटर बंद झाला असेल तर तो तातडीने सुरु करण्याचे निदेश दिले जातील. देखभालीच्या 9 लाखाचा माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे, ती रक्कम पी.एल.मधून देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : ऑल इज वेल अशाप्रकारचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. सर्व सुरळीत असेल तर ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्याचे कारण नव्हते. त्याठिकाणी गेल्या 3 महिन्यापासून अँजीओग्राफी व अँजीओप्लास्टीच्या शस्त्रक्रिया होत नाहीत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. त्यांचे म्हणणे मंत्री महोदयांनी खोडलेले नाही. शासनाच्या रेकॉर्ड प्रमाणे तेथे किती शस्त्रक्रिया झाल्या आहेत ?

4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, जून, 2010 पर्यंत बायपासच्या 7 शस्त्रक्रिया, व्हॉल्व्ह चेंजच्या 73 शस्त्रक्रिया व अदर्स 17 शस्त्रक्रिया अशा 97 शस्त्रक्रिया झाल्या आहेत. मागील महिन्यात 4 बायपासच्या शस्त्रक्रिया, 11 व्हॉल्व्ह चेंजच्या आणि अदर्स 4 शस्त्रक्रिया झालेल्या आहेत.

डॉ.दीपक सावंत : माननीय मंत्री महोदयांनी अँजीओग्राफी व अँजीओप्लास्टीच्या शस्त्रक्रिया किती झाल्या ते सांगावे.

प्रा.वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते मान्य केले पाहिजे. परंतु माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार.....

डॉ.दीपक सावंत : आम्हाला अँजीओग्राफी व अँजीओप्लास्टीच्या शस्त्रक्रिया किती झाल्या ते सांगावे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित : जून 2010 पर्यन्त 208 एन्जोग्राफी आणि 39 एन्जोप्लास्टी झालेल्या आहेत आणि इतर 30 शस्त्रक्रिया झालेल्या आहेत.

श्री. चंद्रकांत पाटील : तेथे रोज 6 शस्त्रक्रिया होऊ शकतात. 1000 केसेस प्रलंबित आहेत.

डॉ. विजयकुमार गावित : आपरेशन्स कोणती करावयाची, केस कशी आहे या गोष्टी पाहिल्या जातात. दर महिन्याला सरासरी 25 शस्त्रक्रिया केल्या जातात.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. दिवाकर रावते : आमचा आक्षेप आहे. खाजगी रुग्णालयामध्ये रुग्ण कसा जाईल अशा प्रकारची परिस्थिती त्या ठिकाणी निर्माण केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की दररोज सहा शस्त्रक्रिया होतात. महिन्याला 150 होतात. 150 शस्त्रक्रिया होत नसतील तर निदान 100 तरी कराव्यात. 1000 लोक शस्त्रक्रिया करुन घेण्याच्या प्रतिक्षेत आहेत. तेव्हा शस्त्रक्रियांची संख्या वाढविण्यात येईल काय ?

डॉ. विजयकुमार गावित : जून पर्यन्त 7 बायपास शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. हृदयाच्या छिद्रांच्या 73 आणि अन्य 17 अशा एकूण 97 शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. जानेवारीपासून ज्या वॉल्व्हच्या शस्त्रक्रिया केलेल्या आहेत त्यामध्ये 72 बीपीएल खालील आणि 48 स्कूलमधील रुग्ण होते. कॅटरॅक्टच्या 30 शस्त्रक्रिया केल्या. त्यामध्ये बीपीएल खालील 28 आणि स्कूलमधील 2 रुग्ण होते. तेथे एकच सर्जन असल्यामुळे महिन्यातून 28 मेजर शस्त्रक्रिया केल्या जातात आणि बाकीच्या मायनर सर्जरी केल्या जातात. 2001 पासून तेथे हृदय शस्त्रक्रिया विभाग सुरु झाला त्यावेळी जेवढी पदे होती तेवढीच आज देखील आहेत. त्या ठिकाणी सुपर स्पेशॅलिटी विभाग सुरु करावयाचा आहे. त्यासाठी 105 पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव आहे. त्यास मान्यता देण्याचे काम सुरु आहे.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ.शी.** : सातारा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान असलेल्या जागेच्या भूसंपादनाची सुरु असलेली कार्यवाही

**मु.शी.** : सातारा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान असलेल्या जागेच्या भूसंपादनाची सुरु असलेली कार्यवाही याबाबत ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडते.

श्री. संजय कृष्णाजी पाटील संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालये, महाराष्ट्र राज्य यांनी उपसचिव पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांना पत्र क्रमांक 3169/2010 स्मारके, पाठवले. सातारा येथील सि.स.न.1, पेठ सदर बाजार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवासस्थान असलेल्या जागेच्या भूसंपादनाची कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना सातारा यांचेकडून चालू आहे. त्या वास्तुचे अंदाजित मूल्य 1,04,73,000/- रु. इतके आहे. या पैकी 26,20,000/- रु. निधी 2010-2011 मधील राज्य योजना अंतर्गत उपलब्ध असलेल्या रु. 5.06 कोटी निधीतून मंजूर करावा अशी विनंती संचालकांच्या उपरोक्त पत्रात असणे. सदर खर्च मागणी क्रमांक झेडडी 2, पर्यटन, सांस्कृतिक कार्य विभाग 2205 कला व संस्कृती (00), 103 पुरातत्वशास्त्र, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (01) (02) पुरातत्वशास्त्र संचालनालय राज्य सांकेतांक क्रमांक 22051338/27 लहान बांधकामे या शीर्षाखाली मंजूर करावा ही विनंती संचालकांच्या पत्रात असणे. याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

----

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना सवलती मिळणे

**मु. शी.** : राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना सवलती मिळणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि विशेष शिक्षक तसेच आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षक यांना दरवर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गुणवंत शिक्षकांचा गौरव करण्यात येतो.

गुणवंत शिक्षकांच्या पुरस्कारामध्ये तंत्र माध्यमिक शाळांमधील शिक्षक तसेच उच्च माध्यमिक शिक्षक व आदिवासी क्षेत्रातील आश्रमशाहांमधील शिक्षकांचाही समावेश करण्यात यावा, तसेच नगरपालिका व महानगरपालिका शाळांमधील प्राथमिक व माध्यमिक शिक्षक यांचा समावेश करावा. 1996-97 पासून राज्य पुरस्काराची रक्कम केवळ 7500 रुपये असून यामध्ये वाढ करुन ती 20 हजार रुपये करण्यात यावी, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना राज्य परिवहन मंडळाच्या प्रवासी भाड्यात व रेल्वे भाड्यात सवलत मिळावी, अनुदानित शाळांबरोबरच राज्यातील कायम विनाअनुदानित शाळांमध्ये अत्यंत चांगल्या प्रकारे काम करणाऱ्या गुणवंत शिक्षकांचाही आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी विचार करण्यात यावा. केंद्र सरकारने अशा आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांसाठी सेवानिवृत्तीचे वय दोन वर्षांनी वाढविले आहे. त्याचाही फायदा या राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना देण्यात यावा अशा प्रकारची विनंती मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून राज्य शासनास करीत आहे.

-------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जे.जे.कला महाविद्यालयातील शिक्षकांची पदे रिक्त असणे

**मु. शी.** : जे.जे.कला महाविद्यालयातील शिक्षकांची पदे रिक्त असणे याबाबत श्री.किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

कलेच्या दर्जेदार शिक्षणासाठी प्रसिध्द जे.जे.कला महाविद्यालयात शिक्षण देण्यासाठी पुरेसे शिक्षकच उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर आले असून 51 जागांपैकी 19 जागांवर कायमस्वरुपी शिक्षक कार्यरत असून उर्वरित जागांपैकी 13 जागांवर हंगामी व 4 जागांवर कंत्राटी शिक्षक कार्यरत आहेत. गेल्या 20 वर्षापासून 15 जागा रिक्त असून येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. कला व हस्तकला विभागाच्या प्राध्यापकांना शेतकऱ्यांना दिल्या गेलेल्या सुवर्ण पदकांच्या घोटाळा प्रकरणी सरकारने निलंबित केलेले आहे. या निलंबित प्राध्यापकांना आजही घरपोच 75 टक्के पगार सरकारकडून मिळत आहे. मात्र या वर्गांवर एकही कायमस्वरुपी शिक्षक नाही. अशावेळी कला व हस्तकला विभागातील प्राध्यापकाचे एकमेव पद आजही रिक्त आहे. सरकारने हंगाची शिक्षकांची नेमणूक न केल्यामुळे मागील 15-20 दिवसापासून या विषयाच्या चारही वर्गांवर एकही शिक्षक उपलब्ध नाही. जे.जे.कला महाविद्यालयाच्या प्रभारी अधिष्ठाता प्रा.मनिषा पाटील यांच्या हाताखालील हंगामी शिक्षक जे.जे.कला महाविद्यालयाच्या डीनच्या बंगल्यात राहतात. तेथे एकूणच अनागोंदी कारभार सुरु असून विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान या सर्व बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : झी 24 तास या वृत्तवाहिनीच्या कार्यालयावर राजकीय

**मु. शी.** : झी 24 तास या वृत्तवाहिनीच्या कार्यालयावर राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केलेला हल्ला याबाबत श्री.हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.हेमंत टकले यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

दिनांक 16 जुलै, 2010 रोजी कोल्हापूर येथे महाराष्ट्र कर्नाटक सीमाप्रश्नी झी 24 तास या वृत्तवाहिनीतर्फे थेट प्रक्षेपण सुरु असताना एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी झी टीव्हीच्या कार्यालयावर केलेला हल्ला, आंदोलकांनी झी टीव्हीच्या कार्यालयाची केलेली तोडफोड, झी टीव्हीचे पत्रकार व कॅमेरामन यांना केलेली बेदम मारहाण, याविरुध्द कोल्हापूर येथील शाहुपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुन सुध्दा अद्यापही आंदोलकांना पकडण्यात पोलिसांना आलेले अपयश, त्यामुळे पत्रकारात पसरलेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गृह खात्याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंत्रीमहोदयांकडे आहे. असे असताना या प्रकरणाची आम्हाला काहीच माहिती नाही असे दाखविण्याचा सन्माननीय सदस्यांनी प्रयत्न केला आहे. या संदर्भात जी विशेष उल्लेखाची सूचना मांडली आहे जी अत्यंत चुकीची आहे. या प्रकरणात जे सहभागी झाले होते ते स्वत:हून पोलीस ठाण्यात हजर झालेले आहेत. पळापळ करण्याचा प्रकार झालेला नाही. शिवसैनिक कधीच पळवाटा शोधत नाहीत. अशा प्रकारची विशेष उल्लेखाची सूचना मांडू नये. बेळगाव कारवारच्या प्रश्नासंबंधी मराठी लोकांना गुंड ठरवू नये.

श्री.हेमंत टकले : हा मराठी लोकांपुरता मर्यादित विषय नाही.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : या प्रकरणात सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.राजेश क्षीरसागर व इतर शिवसैनिक सहभागी झालेले होते ते पोलीस ठाण्यात हजर झालेले आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना आपण ही विशेष उल्लेखाची सूचना मागे घेण्यास सांगावे.

नंतर 3ए.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी जो विशेष उल्लेख सभागृहात मांडला तो अपूर्ण माहितीच्या आधारावर माडलेला असल्याने तो रेकॉर्डवर राहू नये अशी आमची विनंती आहे. कारण या प्रकरणातील सहभागी सदस्य स्वत:च पोलीस ठाण्यात हजर झाले म्हणून ही माहिती चुकीची आहे. तसेच सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय म्हणतात तशी परिस्थिती नाही उलट माननीय श्री. छगन भुजबळ यांनीच "झी" टी.व्ही. वर पहिल्यांदा हल्ला केला होता.

डॉ.गुरुनाथ कुलकर्णी : माननीय श्री. छगन भुजबळ यांना त्याची किंमत द्यावी लागली.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवरुन बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रथम एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे ती म्हणजे या सभागृहात सर्वच सन्माननीय सभासदांना आपले मत मांडण्याचा अधिकार आहे व त्यानुसार सन्माननीय सदस्यांनी आपले मत मांडले. त्याची दखल घ्यायची की नाही हा अधिकार शेवटी शासनाचाच आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, आपण म्हणालात ते ठीक आहे परंतु सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थितीदर्शक माहिती सभागृहात मांडलेली नसल्याने असा मुद्दा सभागृहाच्या रेकॉर्डवर सुध्दा राहणे चुकीचे आहे.

**उपसभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्याने मी सभागृहाची बैठक 4.00 वाजेपर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 3.31 ते 4.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( स्भापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहाच्या मध्यंतराच्या अगोदर मी विशेष उल्लेखाद्वारे एक निवेदन केले होते. कुठल्याही परिस्थितीत प्रसार माध्यमांना संरक्षण मिळावे, प्रसार माध्यमांवर हल्ले होऊ नयेत हा विशेष उल्लेख मांडण्याच्या मागचा माझा हेतू होता. परंतु विशेष उल्लेखाच्या वाक्यरचनेमुळे जो काही गैरसमज झाला तसा माझा विशेष उल्लेख मांडण्याच्या मागील हेतू नव्हता. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या बाबतीत वाद निर्माण झालेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सर्व पक्षांची एकजूट आहे. त्यामुळे हा संदर्भ संवेदनशील विषयाशी जुळला गेला असेल तर तेवढा उल्लेख सभागृहाच्या कामकाजातून वगळावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**उप सभापती** : ठीक आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : जळगाव जिल्हयात विद्यार्थ्यांना अज्ञात रोगाची झालेली लागण
**मु. शी.**: जळगाव जिल्हयात विद्यार्थ्यांना अज्ञात रोगाची झालेली लागण याबाबत श्री. दिलीपराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. दिलीपराव सोनवणे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. दिलीपराव सोनवणे ( नाशिक विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, यावल तालुक्यातील (जि.जळगाव) भारत विद्यालय न्हावी, न्यु इंग्लिश स्कूल, भालोद, लोकविद्यालय, पाडळसे, नुतन विद्यालय, अंजाळे, अ.ध. चौधरी विद्यालय, डोंगरकठोरे, या शाळेत दिनांक 15/7/2010 पासून अज्ञात आजाराने सुमारे 274 विद्यार्थ्यांना झ ालेली बाधा, विद्यार्थ्यांना चक्कर येणे, मळमळणे व डोकेदुखी या सारखी लक्षण दिसणे व विद्यार्थी चक्कर येऊन कोसळणे, हा आजार कशामुळे झाला याची अद्यापही उकल न होणे, हा आजार ठराविक वयोगटातील विद्यार्थी/विद्यार्थिनींना हाणे. कालच रावेर तालुक्यातील सरदार जी.जी.हायस्कूल या शाळेतील 22 विद्यार्थी, कमलाबाई कन्या विद्यालय येथील 30 विद्यार्थ्यांना तसेच चोपडा येथील अडावद येथील 37 विद्यार्थी बाधित झाल्याचे व 4-5 विद्यार्थी उप जिल्हा रुग्णालय चोपडा येथे दाखल केल्याचे दूरध्वनीद्वारे संदेश आला आहे. आपण इकडे सभागृहात आहोत. प्रत्येक अर्धा तासाने यासंदर्भात फोन येत आहेत. प्रसार माध्यमातून बातम्या येत आहेत लक्षणे सारखी आहेत मात्र कोणत्या कारणामुळे हे घडत आहे याचा उकल न होणे, वैद्यकीय पथके येऊनही रोगाचे कारण न समजणे, पालक, सामान्य नागरिक चिंतातुर झालेले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये, पालकांत भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. या ठिकाणी संशोधकाची पथके पाठवली गेली आहेत काय ? या ठिकाणचे सामान्य नागरिक व पालक अतिशय चिंतातुर झालेले आहेत. या आजारामागील गूढ काय आहे ? हा आजार घालवण्यासाठी शासनाने केलेली कार्यवाही किंवा केलेली उपाययोजना याबाबत शासनाने सभागृहात निवेदन करावे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3..

**पृ. शी.** :मुंबईमध्ये वाहतुकीचे नियम न पाळणे
**मु. शी.** :मुंबईमध्ये वाहतुकीचे नियम न पाळणे याबाबत
डॉ.नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य डॉ.नीलम गो-हे, यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते

सभापती महोदय,देशातील अपघातग्रस्त शहरांमध्ये मुंबईचा 13 वा क्रमांक लागतो. मुंबई शहरात रोज 5 हजार ट्रक व ट्रेलर्स येत असतात. या ट्रक व ट्रेलर्सचे वजन जास्त असणे, नियम न पाळणे, लेन कटींग व्यवस्थित न करणे, सिग्नलला वाहन न थांबणे, सिग्नलवर वाहने भरधाव निघून जाणे,वेग मर्यादा न पाळणे, मुंबईमध्ये वाहतूक कशी केली जाते याची माहिती वाहनचालकांना नसणे, मुंबई विकास प्राधिकरणाचे मेट्रो आणि मोनोरेलचे प्रकल्प चालू असल्याने ठिकठिकाणी वाहनांची कोंडी होणे व महामार्गावर वेगमर्यादा न पाळणे यामुळे मोठया प्रमाणात मृत्यूंचे प्रमाण वाढलेले आहे. वेस्टर्न हायवे, ठाणे-अहमदाबाद, मुंबई- नाशिक, मुंबे -गोवा, मुंबई पुणे जुना मार्ग व द्रुतगती मार्ग या ठिकाणी सर्वत्र मुंबईच्या उपनगराची हद्द सुरु होते त्यावेळेला बहुतेक ठिकाणी

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

वाहने सिग्नलला न थांबता भरधाव वेगाने निघून जातात. परिणामी अपघातांचे प्रमाण वाढते आहे. म्हणूनच मी मुंबई गोवा-हायवेचे चौपदरीकरण करण्याकडे देखील लक्ष वेधित आहे. या रस्त्यांवर 35 अवघड वळणे आहेत. या रस्त्यावर अतिक्रमणे आहेत. ती हटविणे आवश्यक आहे. तसेच स्पीड ब्रेकर्स्, रिफ्लेक्टर्स नसल्यामुळे व बहुतेक ट्रक्सना मागची वाहने पाहण्यास आरसेच नसतात असे देखील आढळून आले आहे. याबरोबरच कोणतीही इंडीकेशन न देता बसेस, रिक्षा, प्रवासी वाहने यांनी मध्येच वाहने थांबविण्याचे प्रकार घडत असतात. रस्त्यावरील खड्डे व पाणी, बंद पडलेल्या वाहनांना हलविण्यात दिरंगाई होत आहे. तसेच, पादचाऱ्यांना रस्ता ओलांडायला सिग्नल्स नाही. पांढऱ्या पट्ट्यावर गाडी उभी करण्याचे प्रकार देखील वाढत आहे. त्यामुळे या कारणांवर वेगवेगळी उपाययोजना वेळेवर करणे आवश्यक आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभाग व वाहतूक पोलिस यांच्यात समन्वय नाही. तसेच रस्ते विकास महामंडळाकडून देखील दिरंगाई होत आहे. तेव्हा यावर योग्य ती उपाययोजना करून मोठी मोहीम हाती घेण्यात यावी याकडे मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधित आहे.

...............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करणे.**

दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली सर्व पक्षीय शिष्टमंडळ माननीय पंतप्रधानांना भेटून आले. त्यावर फार उलटसुलट चर्चा होत आहे. त्यामुळे यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांच्यावतीने निवेदन होणे आवश्यक आहे. या सदनाच्या माध्यमातून महाराष्ट्राला एक चांगला संदेश जाणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष श्री.माणिकराव ठाकरे व सन्माननीय मुख्यमंत्री हे त्याच वेळी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा माननीय श्रीमती सोनिया गांधी यांना भेटून आले व तेथे त्यांनी महाराष्ट्राची व्यथा मांडली. त्यासंबंधी आदरणीय श्रीमती सोनियाजी गांधी यांच्या महाराष्ट्रासंबंधातील भावना ह्या जनतेला कळणे आवश्यक आहे. त्या जनतेपर्यंत पोचणे आवश्यक आहे. आम्ही त्या शिष्टमंडळात असलो तरी देखील अधिकृतता ही शासनाच्या निवेदनातून होणे अपेक्षित असते. आम्ही बोलणे हे प्रथेमध्ये नाही, प्रतिष्ठेचे नाही. तेव्हा यासंबंधी शासनाने निवेदन करावे अशी मी आपल्या मार्फत विनंती करीत आहे. आपण त्यासंबंधी शासनाला निदेश दिले तर मला आनंद होईल. धन्यवाद.

**उप सभापती** : या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी जर सभागृहात निवेदन केले तर बरे होईल.

............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा

**उप सभापती** : माननीय सदस्यांना हे माहितच असेल की, पुरवणी मागण्यांवरील चर्चेसाठी दोन दिवस म्हणजे बुधवार आणि शुक्रवार दिलेले आहेत. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पुरवणी मागण्या आणि त्या खालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पुरवणी विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्री निहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रिमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या.**

**उप सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

1 मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक ए-3,ए-4,ए-5,ए-6,ए-7, ए-7-ए,एफ-2,एफ-3,एफ-6-ए,क्यू-3,झेड-डी-2,झेड-डी-4

2 महसूल व खार जमीन आणि (अतिरिक्त कार्यभार) पुनर्वसन व मदत कार्य व भूकंप पुनर्वसन मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक सी-1,सी-6,

3 गृह मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक बी-1,बी-3,बी-6,बी-9

4 वने मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक सी-7,सी-10

5 सामाजिक न्याय,विमुक्त भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण व व्यवसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक एन-3, एन-4

6 जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) आणि ऊर्जा मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक आय-3,आय-5,के-6,के-11



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

7 परिवहन व बंदरे आणि अतिरिक्त कार्यभार विधि व न्याय मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक जे-1

8 ग्रामविकास मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक एल-2,एल-3, एल-च,

9 सहकार, पणन व संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक व्ही-2,व्ही-3,व्ही-5

10 कृषी,जलसंधारण,रोजगार हमी योजना आणि अतिरिक्त कार्यभार शालेय शिक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक डी-3,ई-2,ई-3,एल-7, ओ-3

11 पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक वाय-2,वाय-6,

12 अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक एम-2,एम-3

13 उद्योग, रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक के-3,के-7,के-10

आता सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी चर्चेला सुरूवात करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नगरविकास विभागाच्या पान क्रमांक 50 वरील बाब क्रमांक 65 वर बोलणार आहे. विदर्भातील खास करून चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील नगरपरिषदांसंबंधी बोलणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर, मूल, राजुरा, ब्रह्मपुरी, वरोरा, भांदळ गडचिरोली गडचिरोली आणि वडसा या नगर परिषदांमध्ये शासनद्वारा रोख अनुदान व विशिष अनुदान द्यावे अशी मी मागणी करतो. खास करून चंद्रपूर शहरात आज दळणवळणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. वाहतूक जास्त असल्यामुळे नगर परिषद त्या रस्त्याची देखभाल करू शकत नाही. नवीन बांधकाम करू शकत नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी....

तेव्हा शासनाने खास करुन चंद्रपूर व बल्लारपूर नगरपरिषदेला अधिक अनुदान द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, चंद्रपूर आणि बल्लारपूर येथे मोठे रस्ते आहेत. या रस्त्यांवरुन 50-50 टनांच्या ट्रकची वाहतूक होत असते. चंद्रपूर येथे बाय-पास रस्ता आहे. परंतु बल्लारपूर येथे बायपास रस्ता नाही. बल्लारपूर येथे शाळा, महाविद्यालय आणि बाजारहाट असल्यामुळे त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. वर्षाला साधारणत: 150 ते 200 व्यक्तींचे अपघाती मृत्यू होतात. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, बल्लारपूर येथे एक बायपास रस्ता मंजूर करावा. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील नगरपरिषदांना रस्त्यासाठी जास्तीत जास्त अनुदान द्यावे अशी विनंती आहे.

बाब क्रमांक 30,31 व 32, पृष्ठ क्रमांक 23 व 24 - वन विभाग - याठिक्‍णी वन मंत्री उपस्थित आहेत. विदर्भामध्ये 55 ते 58 टक्के वनक्षेत्र आहे. विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यात वनक्षेत्र जास्त आहे. वनक्षेत्रासाठी केंद्र सरकारकडून निधी प्राप्त होतो. परंतु हा निधी रत्नागिरी आणि पुणे जिल्ह्यासाठी खर्च होतो. तेव्हा विदर्भातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यला जास्त निधी देण्यात यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी वन विभागात भरती करण्यात आली. या भरतीमध्ये विदर्भातील उमेदवारांचे प्रमाण फार नगण्य होते. याबाबत विचारणा केली असता सांगण्यात आले की, राज्य एकच असल्यामुळे मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर येथील उमेदवारांना देखील परीक्षेस बसण्याची परवानगी आहे. मुंबई, पुणे, नाशिक जिल्ह्यातील उमेदवारांच्या मानाने विदर्भातील उमेदवार मागे पडतात. आता जी भरती झाली त्याचे प्रमाण पाहता 100 विद्यार्थ्यांमागे विदर्भातील उमेदवारांचे प्रमाण फक्त 5 आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, विदर्भातील उमेवारांना भरती प्रक्रियेमध्ये प्राधान्य द्यावे.

सभापती महोदय, विदर्भातील जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद आहे. तसेच काही भागात मोठ्या प्रमाणावर आदिवासी राहतात. त्यांची म्हणावी तशी प्रगती झालेली नाही. तेव्हा आदिवासींचे जीवनमान उंचाविण्यासाठी, त्यांना प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी योजना आखल्या पाहिजेत अशी विनंती करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------- यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय,2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, प्रथम मला सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 3, पान नंबर 4 संबंधी बोलावयाचे आहे. युनिक ओळखपत्र (युआयडी) योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता 31 कोटी 74 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. नागरिकांना युनिक ओळखपत्र वाटपाची योजना अत्यंत स्वागतार्ह आहे. निवडणूक ओळखपत्राचे वाटप करीत असतांना जसा घोटाळा झाला होता तसा घोटाळा युनिक ओळखपत्राचे वाटप करीत असतांना होऊ नये या दृष्टीने दक्षता घेण्याची आवश्यकता आहे.निवडणूक ओळखपत्रामध्ये व्यक्तीच्या नावामध्ये, वयामध्ये, पत्त्यामध्ये चुका झाल्या होत्या. एका व्यक्तीचे नाव छापले असतांना तेथे फोटो दुस-याच व्यक्तीचा छापला गेला होता इतकेच नव्हे तर महिलांच्या जागेवर पुरुषांचा उल्लेख करण्यात आला होता.अशा प्रकारे निवडणूक ओळखपत्रामध्ये असंख्य चुका झाल्यामुळे नवीन सुधारित ओळखंपत्रे अजूनही देण्यात आलेली नसल्यामुळे त्या योजनेचा कायमचा बोजवारा उडलेला आहे.तेव्हा अशा चुका युनिक ओळखपत्रे देतांना होऊ नयेत यासाठी योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 10, पान नंबर 7 संबंधी मला बोलावयाचे आहे, नाशिक जिल्हयातील ओझर येथील विमानतळाचा विस्तार करण्याकरिता 14 कोटी 32 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे.या चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, रत्नागिरी येथे विमानतळ आहे आणि तेथे विमान सेवा देखील अनेक वर्षे सुरु होती परंतु त्यानंतर ही विमान सेवा बंद करण्यात आली होती.पर्यटनाच्या दृष्टीने रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्हयामध्ये विमानतळाची सोय असणे अत्यंत आवश्यक आहे. त्या विमानतळावरील धावपट्टीचा विकास करण्यासाठी खर्च करण्यात आला तर मुंबई- रत्नागिरी -कोल्हापूर,मुंबई -रत्नागिरी - गोवा, मुंबई- रत्नागिरी- मेंगलोर वा बंगलोर अशा प्रकारची विमान सेवा सुरु करता आली तर रत्नागिरीला पर्यटक येतील व त्या भागाचा उद्योगाच्या आणि पर्यटनाच्या दृष्टीने विकास होऊ शकेल. कोकणाचा विकास करावयाचा असल्यामुळे विमानतळासाठी खर्च करण्याची इच्छा शासनाने दाखवली तर निश्चितपणे हे काम होऊ शकेल. आपल्या राज्यामध्ये संपूर्ण जगातून पर्यटक आला पाहिजे अशीच आपली भूमिका आहे. तेव्हा राज्य शासनाने याकडे लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ....

सभापती महोदय , यानंतर गृह विभागाची बाब क्रमांक 16,पान नंबर 25 संबंधी मला बोलावयाचे आहे. पोलीस प्रशिक्षण शाळेसाठी निवासी इमारतीच्या बांधकामासाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे.सभापती महोदय,ठाणे जिल्हयातील पोलिसांच्या निवासस्थ्यांना सबंधीचा मुद्दा आपण देखील अनेकदा मांडलेला आहे. ही निवासस्थाने म्हणजे नरकवास आहे . पोलिसांच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीच्या व पुर्नबांधणीच्या संदर्भात आम्ही या पूर्वी अनेकदा आवाज उठविलेला आहे. पोलिसांची निवासस्थाने जर चांगली नसतील तर आपण पोलिसांकडून वेळोवेळी जी अपेक्षा करतो ती अपेक्षा त्यांच्याकडून पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामुळे निवासस्थानाच्या दुरुस्तीसाठी आणि नवीन निवासस्थाने बांधण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत.आता नव्याने 15 हजार पोलिसांची भरती केली जाणार आहे या अगोदर ज्या पोलिसांची भरती झाली आहे त्यांच्यासाठी त्याचप्रमाणे नव्याने भरल्या जाणा-या पोलिसांसाठी निवासस्थानाची सोय केली पाहिजे. सध्या जे पोलीस आहेत त्यांच्या निवासाची सोय झालेली नसल्यामुळे एकत्रितपणे त्यांना भाडयाची जागा घेऊन रहावे लागते. त्याचबरोबर ज्या पोलिसांना निवासस्थाने मिळालेली आहेत त्यांची अवस्था चांगली नाही. नरकवासासारखी तेथील अवस्था आहे. तेव्हा पोलिसांच्या निवासस्थानाचा प्रश्न अगक्रमाने सोडवावा व त्यासाठी शासानाने पुरेशी तरतूद करावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर महसूल विभागाची बाब क्रमांक 31, पान नंबर 24 संबंधी मला बोलावयाचे आहे.राज्यातील आपत्ती व्यवस्थापनाच्या कामाकरता 36 कोटी 81 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. शासकीय अधिकारी आणि कर्मचा-यांना आपत्ती निवारणाच्या कामासंबंधी प्रशिक्षण देण्याचा शासनाचा हेतू चांगला आहे. त्याकरता ही तरतूद करण्यात आली आहे. परंतु ज्यावेळी आपत्ती येते त्यावेळी एन.जी.ओ.च्या माध्यमातून आणि नागरी संरक्षण दलाच्या माध्यमातून देखील मदत केली जाते. अतिवृष्टी वा अन्य नैसर्गिक संकटाचे निवारण करण्यासाठी नागरी सांरक्षण दलाचे कार्यकर्ते अनेक वेळा मदत करीत असतात. त्यांना त्यासबंधीचे प्रशिक्षण दिलेले आहे. परंतु त्यांना यासाठी लागणारे साहित्य दिले जात नाही. काही वेळा त्यांच्याकडे स्ट्रेचरसुध्दा नसते ही बाब मी यापूर्वी देखील नमूद केली होती. रोटरी क्लब वा लायन्स क्लब या सारख्या एन.जी.ओ.च्या माध्यमातून नागरी संरक्षण दलाच्या कार्यकर्त्यांना चार स्ट्रेचर्स आम्ही

3..

श्री.संजय केळकर ...

दिली होती. परंतु शासनाकडून हे साहित्य दिले गेले नाही. तेव्हा नागरी संरक्षक दलाच्या कार्यकर्त्यांना आवश्यक साहित्याची जी गरज आहे ती शासनाकडून भागविण्यात आली तर आपत्ती निवारणामध्ये नागरी संरक्षण दलाच्या कार्यकर्त्यांचा चांगला उपयोग होऊ शकतो .असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

नंतर श्री.सरफरे

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, बाब क्रमांक 33 व पृष्ठ क्रमांक 25 मध्ये वनेतर वापरासाठी प्रस्तावित केलेल्या वन जमिनीऐवजी अन्य जमिनीवर वनरोपण करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ठाणे जिल्हयात अनेक ठिकाणी धरणांची व लघुपाटबंधारे, मोठया पाटबंधारेंची कामे प्रलंबित असल्याची यादी माझ्याजवळ आहे. यामध्ये जवळ जवळ 16 मोठे, मध्यम व लघू पाटबंधारे प्रकल्प गेल्या आठ ते दहा वर्षापासून वन खात्याची जमीन न मिळाल्यामुळे व परवानगी न मिळाल्यामुळे केंद्र सरकारकडे अडकून पडलेले आहेत. वर्तमानपत्रामधून जनतेला सांगण्यात येते की, आम्ही मुंबईला किंजाळ धरणामधून, शाही धरणामधून पाणी देणार आहोत. परंतु मुंबईला पाणी देणारी पाईप लाईन ठाणे जिल्हयामधून जात असतांना ठाणे जिल्हयातील लोकांना त्या धरणाचे पाणी मिळत नाही. म्हणून या धरणांच्या बांधकामाकरिता वन खात्याची परवानगी मिळण्याची आवश्यकता आहे. ती परवानगी वेळेवर मिळाली नाही तर या धरणांना प्रशासकीय मंजूरी देऊन व निधीची तरतूद केली तरी चार ते पाच पटींनी अधिक निधीची तरतूद करावी लागते. ती तरतूद आपण जोपर्यंत करीत नाही तोपर्यंत धरणाची कामे सुरु होत नाहीत. त्यामुळे वन खात्याच्या परवानगीकरिता एक स्वतंत्र कक्ष आपण उघडून वन खात्याची तातडीने परवानगी मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 36 व पृष्ठ क्रमांक 26 मध्ये वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या हानीसाठी नुकसान भरपाई देण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, या सभागृहामध्ये सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे विशेषत: हत्तींच्या हल्ल्यामुळे शेत जमिनीचे व शेती उत्पन्नाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले यासंबंधी अनेक वेळा चर्चा झाली आहे. अशाप्रकारे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी अत्यंत कमी तरतूद केली जाते. त्यामुळे जनतेच्या हितासाठी अधिक आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये हत्तींच्या अतिक्रमणामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान व त्यांना देण्यात आलेली भरपाई यामध्ये फार मोठया प्रमाणात तफावत आहे. तेव्हा यामध्ये समन्वयाचा तोडगा काढून बाधित झालेल्या शेतकऱ्यांना योग्य ती भरपाई दिली तर त्यांना निश्चितपणे न्याय मिळेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 82, आणि पृष्ठ क्रमांक 67 वर मुंबईतील शासकीय ऐतिहासिक वारसाप्राप्त इमारती पूर्ववत करण्याकरिता आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री.संजय केळकर....

त्याचबरोबर मुंबईच्या शेजारील ठाणे, रायगड या एमएमआरडीएच्या क्षेत्रामध्ये अनेक शासकीय इमारती वारसाप्राप्त असून सुध्दा त्यांची दुरुस्ती व देखभाल होत नाही, ती करण्याची गरज आहे. याबाबत सांगावयाचे झाले तर हुतात्मा आनंद कान्हेरे, विनायक देशपांडे यांना इंग्रजांनी फाशी दिली या घटनेला नुकतीच 100 वर्षे झाली. देशाच्या स्वातंत्र्य लढयासाठी ज्यांनी प्राणार्पण केले अशा स्वातंत्र्यवीरांचे आजच्या तरुण पिढीला दर्शन घेता यावे यासाठी या स्थळांना भेटी देण्याकरिता शासनाने वर्षभरातील काही दिवस मुक्त ठेवले तर तरुण विद्यार्थ्यांना हा स्वातंत्र्य लढयातील इतिहास निश्चितपणे प्रेरणादायी ठरेल. तेव्हा आज त्या स्थळांना भेटी देण्यासाठी आपल्याला मुक्तपणे जाता येत नाही म्हणून शासनाने ठराविक दिवस मुक्रर केले तर त्याचा तरुणांना निश्चितच फायदा होईल अशी मी सूचना करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 157, पृष्ठ क्रमांक 147 मध्ये सहाय्यक नियंत्रक, वैध वजनमापशास्त्र यांनी भाडेतत्वावर भाडयाने घेतलेल्या वाहनाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीवर झालेला खर्च याकरिता तरतूद करण्यात आली आहे. शासनाने इलेक्ट्रॉनिक वजन काटयांची फेरपडताळणी व मूल्यांकन करण्याबाबत निर्देश दिले आहेत. या वजन काटयांची दुरुस्ती करण्यापूर्वी व दुरुस्तीनंतर सील तोडतांना विभागीय निरीक्षक यांची परवानगी घेणे बंधनकारक केले आहे. या अटीची पूर्तता करणे व्यापाऱ्यांना अडचणीचे ठरत आहे. डिसेंबर 2009 पूर्वी उत्पादित झालेले वजन काटे सील बंद करण्याची व्यवस्था करण्यात आलेली नव्हती.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

ग्रामीण भागात विभागीय निरीक्षकाचे वर्षातून एकदाच शिबिर होत असल्याने वजन काटे दुरुस्त करणाऱ्या निरीक्षकांकडे वारंवार हेलपाटे मारावे लागतात त्यामुळे या पावसाळी दमट हवेमध्ये सिलबंद होण्याचा व इतर वायर गंजण्याचा तसेच वजन काटे बंद पडण्याचा धोका वारंवार उत्पन्न होत असतो. याबाबत ठाणे जिल्हयातील वजनमाप दुरुस्तकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनेक वेळा अंदोलन केलेले आहे. परंतु हा प्रश्न अनिर्णित आहे. हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा अशा प्रकारची विनंती मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 176 पान क्रमांक 244. डोंगराळ क्षेत्र विकास कार्यक्रम याबाबत मी बोलू इच्छितो. डोंगरी विकासाचा निधी कसा खर्च करायचा याचा अधिकार पालक मंत्र्यांना दिलेला असतो. पालक मंत्री विधानसभा सदस्यांच्या शिफारशी विचारात घेतात परंतु विधानपरिषद सदस्यांनी केलेल्या शिफारशींचा विचार केला जात नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, विधानपरिषद सदस्यांनी सुचविलेल्या डोंगरी विकासाच्या कार्यक्रमासाठी निधी देऊन त्या ठिकाणचा विकास करावा अशा प्रकारचे निर्देश शासनाने द्यावेत. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, बाब क्रमांक 1 पान क्रमांक 4 वर मी बोलू इच्छितो. सभापती महोदय, स्पर्धा परीक्षा व चाळणी परीक्षा घेणे, उमेदवारांच्या मुलाखती घेणे याकरिता आणि परीक्षाकांना मानधन देण्याकरिता अतिरिक्त तरतूद करण्याकरिता ही मागणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, अनेक स्पर्धा परीक्षा होतात. आपण असे म्हणतो की, महाराष्ट्रामध्ये आयएएस आणि आयपीस अधिकारी फार कमी आहेत. या स्पर्घा परीक्षेतील उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी आणि मानधनासाठी पैशाची तरतूद करण्यात येत आहे ही चांगली गोष्ट आहे. पण या स्पर्धा परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी कोणत्याही प्रकारची सोय महाराष्ट्र शासनातर्फे केली जात नाही. शासनाकडे रोजगार व स्वंयरोज सारखे खाते आहे. सामान्य प्रशासन खाते आहे. म्हणून या निमित्ताने माझी अशी विनंती आहे की, अशा प्रकारचे मार्गदर्शनपर वर्ग राज्य शासनामार्फत चालू करुन त्यासाठी प्रोव्हिजन करण्यात यावी. जेणेकरुन आपली मुले आयएएस आणि आयपीएसमध्ये वरच्या रँकने उत्तीर्ण होतील आणि त्यांना आयएएस आणि आयपीएसच्या सेवेमध्ये घेता येईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 3 पान क्रमांक 4. च्या संदर्भात मी बोलू इच्छितो. युनिक ओळखपत्राची व्याख्या सामान्य जनतेला समजलेली नाही. ती समजून देण्याची गरज आहे. निवडणूक ओळखपत्र आणि युनिक ओळखपत्र यामध्ये गैरसमज आहेत. हे गैरसमज दूर करणे गरजेचे आहे. यासाठी लोक जागरण करणे गरजेचे आहे. त्याबाबतीत राज्य शासन कमी पडत आहे असे माझे मत आहे. सभापती महोदय, हे युनिक ओळखपत्र देण्याचे काम मुंबईमध्ये कधी सुरु होणार आहे आणि कधी संपणार आहे या विषयाचे ज्ञान सामान्य जनतेला नाही. जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत याबातीत सूचना दिल्या गेल्या नाहीत. मात्र याबाबतीत प्रोव्हिजन करण्यात आलेली आहे. तेव्हा या विषयी माननीय मंत्रिमहोदयांकडून स्पष्टीकरणात्मक उत्तर अपेक्षित आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 15 बाब क्रमांक 23 मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाच्या संदर्भात मी बोलू इच्छितो. आज कोर्टामध्ये मोटार वाहन अपघाताचे अनेक दावे प्रलंबित आहेत. शेकडो केसेस प्रलंबित आहेत. त्या केसेस लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी माननीय न्यायमूर्तींची व्यवस्था नाही. माननीय न्यायमूर्तींची काही पदे रिक्त आहेत ती भरण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

आपण महाराष्ट्रभर एकंदर आढावा घेतला तर अशी जी शेकडो प्रकरणे प्रलंबित आहेत त्यासाठी शासन काय करणार ते सांगावे.

सभापती महोदय, यानंतर मला गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 15 वरील बाब क्रमांक 22 च्या संदर्भात बोलावयाचे आहे. यामध्ये होमगार्डसाठी अतिरिक्त तरतूद केलेली आहे. परवाच एका दूरचित्रवाहिनीवर होमगार्डच्या मुलाखतीची माहिती दिली गेली. होमगार्डसाठी पूर्वी सातवी पास ही अर्हता होती. आता अचानक दोन वर्षानंतर ती अर्हता दहावी पास अशी केली. सामान्य माणसाला माहीत नसल्यामुळे अनेक लोक त्या ठिकाणी रांगेमध्ये उभे होते. खरे म्हणजे होमगार्डचे काम हे स्वयंसेवी काम आहे. त्यांना आपण पगार देत नाही. जो भत्ता देतो तो सुध्दा वेळेवर देत नाही. तो भत्ता फार तुटपुंजा असतो आणि आपण मात्र होमगार्डना वापरुन घेतो. आज खरोखरच नागरी संरक्षणाची गरज असेल तर ती आपण होमगार्डच्या माध्यमातून सोडविली पाहिजे असे माझे मत आहे. आपण ज्या मुलाखती घेतल्या, शारीरिक फिटनेसच्या चाचण्या घेतल्या त्यासंदर्भात त्यांना आपण कोणत्या बाबतीत फीट होऊ शकाल आणि त्यासाठी काय काय पॅरामीटर्स आहेत हे सांगितले नव्हते. त्यामुळे फक्त हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच लोक होमगार्डच्या परीक्षेमध्ये तसेच शारीरिक चाचणीमध्ये किंवा शैक्षणिक अर्हतेमध्ये पात्र ठरले. त्यामुळे होमगार्डसाठी शासनाने पुन्हा एकदा चाचणी परीक्षा किंवा चाचणी ठेवावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला महसूल विभागाच्या पृष्ठ क्रमांक 23 वरील बाब क्रमांक 31 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये आपत्ती निवारण कार्यांतर्गत तरतूद केलेली आहे. ही तरतूद आपत्ती व्यवस्थापनासाठी आहे. आपले महसूल खाते महसूल गोळा करण्यासाठी आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, हा महसूल आज राज्य शासनासाठी किती महत्वाचा आहे परंतु आपण किती महसूल बुडवित आहात. लोकांना सूट दिल्यामुळे महसूल गोळा केला जात नाही. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांचे निवेदन आवश्यक आहे. राज्य शासनाने मान्य केले आहे की, 160.4 कोटी रुपयांचा निधी जो इंटरटेनमेंट ड्युटीच्या माध्यमातून जमा केला जाणार होता तो बुडविला गेला आहे. 160.4 कोटी रुपये ही रक्कम फार मोठी आहे. याबाबतीत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

डॉ. दीपक सावंत .....

ऑडिटर जनरल यांनी सुध्दा रिमार्क पास केलेला आहे. ही सूट कोणाला दिलेली आहे ? ही सूट मल्टीप्लेक्सेसना दिलेली आहे. या मल्टीप्लेक्सेसना सूट देताना त्यांनी किती कोटीचा महसूल बुडविलेला आहे त्याची यादी मी वाचून दाखवितो. जोगेश्वरी येथील 24 कॅरेट मल्टीप्लेक्स 7.28 कोटी, सिनेमॅक्स कांदीवली 3.5 कोटी, सिनेमॅक्स वर्सोवा 11.25 कोटी, फेम ॲडलॅब अंधेरी 24.94 कोटी, फेम ॲडलॅब कांदीवली 18.90 कोटी, फेम ॲडलॅब मालाड 23.20 कोटी, फन रिपब्लीक अंधेरी 11.64 कोटी, आयमॅक्स ॲडलॅब वडाळा 24 कोटी, ह्युमा ॲडलॅब कांजूरमार्ग 6.27 कोटी, मुव्हीटाईम्स गोरेगाव 6.74 कोटी, पीव्हीआर मुलूंड 5.91 कोटी, पीव्हीआर जुहू 5.90 कोटी, आर ॲडलॅब मुलूंड 10.32 कोटी, सिने प्राईम मिरारोड 4.27 कोटी, मेघराज वाशी 5.53 कोटी, पीव्हीआर औरंगाबाद 1.25 कोटी, पीव्हीआर लातूर 1.3 कोटी आणि जी सेव्हन 4.60 कोटी म्हणजे 160 कोटी रुपयांची इंटरटेनमेंट डयुटीमध्ये सूट दिलेली आहे. ही सूट देताना काही नियम ठेवले होते. आपण काय करावयास हवे होते हे त्यांना सांगितले होते. त्या ठिकाण्ी आर्ट गॅलरी तयार करावी, मनोरंजन केंद्राची निर्मिती करावी असे सांगितले होते. त्याच्या बदल्यात काही सूट दिली होती. आपण विधान परिषदेमध्ये प्रश्नोत्तरामध्ये हे मान्य केले आहे की, 2008-09 मध्ये अशा प्रकारची सूट दिली. ती आजपर्यंत आपण या दहा-बारा मल्टीप्लेक्सेसकडून वसूल केलेली नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

मल्टिप्लेक्स थिएटर्सच्या मालकांनी सर्व नियम बाजूला ठेवले आहेत. वर्षातून एक महिना मराठी सिनेमा प्रदर्शित केला पाहिजे तो नियम देखील पाळत नाहीत. असे असताना शासनाने 160.4 कोटी इतका करमणूक कर माफ करण्याचे कारण काय ? यामध्ये खूप घोटाळे व भ्रष्टाचार झालेला आहे. आज शासनाकडे पैसा नाही असे सांगितले जाते. हाच पैसा गरीब लोकांसाठी वापरता आला नसता का ? या मुद्याचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी पान क्रमांक 46 वरील बाब क्रमांक 63 वर बोलणार आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे. आदिवासी भागातील मुले आश्रमशाळांमध्ये शिकून चांगल्या गुणांनी पास होतात. शालेय शिक्षण विभागामार्फत अशा हुशार मुलांसाठी सीबीएसई व आयसीएसईची एक शाळा चालविली जाते, काही ठिकाणी अशा शाळा चालविल्या जातात. त्यामध्ये पालघर-बोईसर येथे अशी एक शाळा आहे. त्या शाळेतील एक महिन्यापूर्वी मुलांनी उपोषण केले होते. त्या शाळेत दहावीच्या मुलांसाठी विषयनिहाय शिक्षक नाहीत. ही सर्व मुले हुशार आहेत. हुशार मुलांना एकत्र करुन सीबीएसई व आयसीएसईच्या शाळेत आणले जाते. दहावीच्या मुलांसाठी इंग्रजी विषयाचे शिक्षक नाहीत. त्याठिकाणी प्रयोगशाळा नाही. तेथे फक्त 3 मायक्रोस्कोप आहेत. मुलांची संख्या जवळजवळ 700 आहे. या 3 मायस्क्रोस्कोपपैकी 2 मायक्रोस्कोपमध्ये ऑईल इमल्शन लेन्सच नाही, अशा परिस्थितीत ते स्लाईडस् कशा बघणार आणि दहावीच्या परीक्षेला कसे बसणार ? ज्या स्लाईडस् आहेत त्यामध्ये फक्त बॉटनी व झुऑलॉजीच्या स्लाईडस् आहेत त्या आपण ओळखणारही नाहीत. त्याही केवळ 25 स्लाईडस् आहेत. केमिकल्स लॅबमध्ये किटस् नाही. फनेल नाही, केमिकल्स नाहीत, या बेसिक वस्तू नाहीत. केवळ टेस्ट टयूब आहेत. दहावीच्या फिजिक्सच्या डिपार्टमेंट गेलात तर तेथे एकही गॅल्व्हॉनोमीटर नाही. तेथे कोणतीही सोय नाही. ही सर्व मुले हुशार आहेत, त्यांना अभ्यास करावयाचा आहे. या आदिवासी मुलांना शिक्षण पाहिजे. परंतु शिक्षण खात्यातील अधिका-यांनी या मुलांच्या उपोषणाकडे लक्ष दिले नाही. सर्व शिक्षा अभियानामधून 2 वहया दिल्या आहेत. आयसीएसई व सीबीएसईच्या शाळेचा ड्रेस कोड वेगळा आहे, परंतु त्यांना आश्रमशाळेचे कपडे

2....

NTK/ ST/ KGS/

डॉ.दीपक सावंत....

घालण्यासाठी दिले जातात. त्यांच्या ड्रेस कोडचे पैसे येतात. ते कोठे जातात ते कळत नाही. ड्रेस कोडमध्ये टायचा अंर्तभाव आहे. तुम्ही आश्रमशाळेचे कपडे का घालता असे विचारल्यावर मागील 2 वर्षांपासून आम्हाला आश्रमशाळेचे कपडे घालण्यास सांगितले आहे असे मुलांनी सांगितले आहे. सभापती महोदय, आश्रमशाळेच्या मुलांना वेळेवर कपडे दिले जात नाहीत. पण आता आयसीएसई व सीबीएसईचा वेगळा भाग केला आहे त्या मुलांना सुध्दा कपडे दिले जात नाहीत. जेवणाचा खालचा दर्जा आहे, आंघोळीच्या पाण्याबाबत अनेक वेळा चर्चा झालेली आहे. एवढे सगळे झाल्यामुळे ती मुले उपोषणाला बसली होती. परंतु तुम्ही उपोषणाला का बसलात हे विचारण्यासाठी शिक्षण खात्यातील एकही अधिकारी गेले नाहीत. म्हणून शासनाने या विषयाकडे लक्ष घालून त्या मुलांना न्याय मिळवून द्यावा. मोखाडा हा आदिवासी तालुका आहे. या तालुक्याचा दहावीचा 79 टक्के निकाल लागला. या आदिवासी मुलांना अकरावीत अद्याप प्रवेश मिळालेला नाही. तेथे वाढीव तुकडया आहेत, पण रयत शिक्षण संस्थेने या मुलांना प्रवेश नाकारला आहे. त्यांनी तालुक्याच्या बाहेरच्या मुलांना प्रवेश दिला आहे. परंतु या गरीब, आदिवासी मुलांचा 79 टक्के निकाल लागून सुध्दा त्यांना अकरावीत प्रवेश दिला जात नाही.

यानंतर मी पान क्र.43 वरील बाब क्र.64 वर बोलणार आहे. विकलांग मुलांसाठी ही मागणी केलेली आहे. या राज्यात अनेक मतिमंद मुले आहेत. अशा मुलांसाठी शासनाने विशेष शाळा बांधल्या पाहिजेत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत....

परंतु दुर्दैवाने राज्य शासनाची अशी एकही शाळा नाही की ज्यामध्ये पालक आपल्या मुलांना शिकण्यासाठी पाठवू शकतील. पती-पत्नी कामाला जात असतात. अशा पालकांची अवस्था फार मोठी विचित्र होते. असे पालक आपल्या डिस्लेक्सीया मतिमंद मुलाला कसे काय सांभाळू शकतील ? अशा मुलांसाठी राज्य शासनाने एकही शाळा सुरु केलेली नाही. काही एनजीओनी अशा मुलांसाठी शाळा सुरु केलेल्या आहेत. तेथे श्रीमंतांची मुले शिक्षण घेतात. परंतु गरिबांच्या मुलांनी शिक्षणासाठी कोठे जायचे ? तेव्हा अशा डिस्लेक्सीया ॲथेस्टिक मुलांसाठी राज्यातील प्रमुख ठिकाणी म्हणजे मुंबई, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, नागपूर येथे दोन दोन तरी शाळा सुरु कराव्यात अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

उद्योग विभागाच्या पान क्रमांक 52 वरील बाब क्रमांक 72मध्ये विशेष घटक स्वर्णजयंती शहरी रोजगार योजनेसाठी तरतूद केलेली आहे. या संदर्भात मला तोच प्रश्न विचारावयाचा आहे की जो दोन दिवसापूर्वी झालेल्या चर्चेच्या वेळी या सदनामध्ये विचारला गेला होता. माननीय मंत्री महोदयांनी राज्यामध्ये काही लाख बेरोजगार आहेत असे सांगितले. मागील तीन महिन्यामध्ये राज्य शासनाने बेरोजगार मेळावे भरवून किती बेरोजगारांना नोक-या उपलब्ध करुन दिल्या हे सांगावे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, 2010-2011च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी जास्त वेळ घेणार नाही. परंतु काही बाबींकडे मी सभागृहाचे जरुर लक्ष वेधू इच्छितो. सामान्य प्रशासन विभागाने सह्याद्री आणि नंदगिरी या अतिथीगृहावर सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी 4 कोटी 28 लक्ष 5 हजार रु. इतकी तरतूद केलेली आहे. वातानुकूलित यंत्रणा आणि अन्य सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी हा खर्च करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने मला सभागृहाच्या एक गोष्ट लक्षात आणून द्यावयाची आहे. या गोष्टीबाबत मध्यंतरी बरीच ओरड देखील झालेली होती. अशी परिस्थिती आपल्या राज्यामध्ये का निर्माण होते, हे काही मला कळत नाही. मंत्रिमंडळाने शपथ घेतली की मंत्र्यांना मंत्रालयातील कॅबिनेटचे तसेच निवासस्थानांचे वाटप केले जाते. हे वाटप केल्यानंतर जेव्हा मंत्री महोदय आपल्या केबिनमध्ये किंवा निवासस्थानामध्ये प्रवेश करतात त्यावेळी सजावटीसाठी पुन्हा खर्च केला जातो. जेव्हा आधीचे मंत्री त्या ठिकाणी असतात तेव्हा देखील अशा प्रकारचा खर्च केलेला असतो. नवीन मंत्री आल्यानंतर पुन्हा आपापल्या सोईनुसार सजावटीवर खर्च केला जातो. यासाठी कराडो रुपये खर्च केले जातात. ही बाब केवळ मंत्र्यांपुरतीच मर्यादित रहात नाही.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.........

त्याठिकाणी मंत्री किंवा राज्यमंत्री असतील त्यांच्या सुविधेसाठी केलेल्या खर्चावर प्रत्येकाचे लक्ष असते. समाजामध्ये या खर्चाबाबत टीका होत असते. ज्या मतदारांनी आपल्याला निवडून दिले, सत्तेवर बसविले त्या मतदारांचे या बाबीकडे बारकाईने लक्ष असते. या सुविधा पुरवित असताना कोणत्याही बाबीची पुनरावृत्ती होणार नाही किंवा अनावश्यक खर्च होणार नाही याची शासनाने दखल घेतली पाहिजे. विशेषत: सामान्य प्रशासन विभागामार्फत या सोयीसुविधा पुरविण्यात येतात, त्या विभागाने या बाबीकडे जागरुकतेने लक्ष दिले पाहिजे हे मला शासनाच्या आणि सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-8 अन्वये शासनाने महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाची निर्मिती करण्यासाठी तरतूद केलेली आहे, याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. महात्मा फुले यांच्या जीवनावरील चित्रपटाची निर्मिती यापूर्वीच होणे आवश्यक होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक या राष्ट्रपुरुषांच्या जीवनावर चित्रपटांची निर्मिती करुन त्याद्वारे आजच्या तरुण पिढीला या राष्ट्रपुरुषांचे जीवन कळले पाहिजे. आम्ही राजकारणी मंडळी प्रत्येक वेळेला राष्ट्रपुरुषांची नावे घेतो. परंतु तरुण पिढीला ही थोर मंडळी कोण होती? रमाबाई आंबेडकर कोण होत्या? याची माहिती नाही. आजच्या वातावरणामध्ये शिक्षण घेणाऱ्या तरुण पिढीपर्यंत ऐतिहासिक क्षण, ऋणानुबंध पोहोचविण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम शासनाने राबविण्याचा निर्णय घेतला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक-17 अन्वये शासनाने पोलिसांच्या गणवेश खरेदीसाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही तरतूद अत्यंत अपुरी आहे. राज्यामध्ये जवळजवळ 1.30 लाख इतकी पोलिसांची संख्या आहे. ग्रामीण भागातील पोलीस कर्मचाऱ्यांना गणवेश, बूट पुरविले जातात. त्यांनी चांगल्याप्रकारे गणवेश परिधान करुन कर्तव्यावर हजर रहावे अशी अपेक्षा केली जाते. परंतु त्यांना पुरविण्यात येणारे गणवेश चांगल्या दर्जाचे असावेत अशी मी विनंती करतो. पोलिसांना जे बूट पुरविण्यात येतात ते वापरल्यानंतर दोन तीन महिन्यात त्या बुटाचे तळवे झिजून जातात. त्यामुळे पोलिसांना गणवेश आणि बूट चांगल्या दर्जाचे पुरविण्यात यावेत अशी मी शासनाला विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी..........

सभापती महोदय, बाब क्रमांक-21 अन्वये नक्षलवादविरोधी कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाने 10.84 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विशेषत: विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया व भंडारा जिल्हयाच्या भागांमध्ये नक्षलवादी चळवळ मोठया प्रमाणात वाढीला लागली आहे. नक्षलवाद्यांना कुठून शक्ती मिळते हा चर्चेचा विषय आहे. त्यांची यंत्रणा मोठया प्रमाणात फैलावत आहे. मध्यंतरी विधानसभेत नक्षलवादाच्या प्रश्नासंबंधी चर्चा झाली. त्या भागात पोलीस कर्मचारी गेल्यानंतर त्यांच्यावर प्राणघातक हल्ले होतात. पोलीस दलातील कर्मचारी किंवा अधिकारी वर्गाला शिक्षा द्यायची झाली तर त्यांची गडचिरोली जिल्हयात त्यांची बदली केली जाते असे आपण वारंवार ऐकत आलो आहोत. परंतु या राज्याचे माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री पद स्वीकारल्यानंतर त्या जिल्हयाचे वेगळे चित्र आपल्यासमोर उभे राहिले आहे. त्या जिल्हयातील आदिवासी भागामध्ये जमिनीचे पट्टे आहेत......

नंतर 3 एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ......

देशातील इतर राज्यांमध्ये ज्या ज्या ठिकाणी आदिवासी भाग आहे तेथे सर्व ठिकाणी आदिवासींना त्यांचा हक्क व अधिकारानुसार शासकीय जमिनीचे पट्टे मालकी हक्काने देण्याचे काम झालेले आहे पण पुरोगामी म्हणविणाऱ्या आपल्या राज्यात मात्र आदिवासींना जमिनीचे पट्टे देण्याचे काम अद्याप होऊ शकले नव्हते. सुदैवाने मंत्री महोदय श्री. आर.आर.पाटील हे त्या भागात गेले तेव्हा त्यांनी आदिवासींना असे मालकी हक्काने जमिनीचे पट्टे देण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात हाती घेतला. त्याचबरोबर या भागातील पोलीस यंत्रणा अधिक सक्षम करण्याचाही कार्यक्रम मंत्री महोदयांनी घेतला आहे. नक्षलवाद्यांना गोळीचे उत्तर गोळीने देऊ असे आपण म्हणतो, ते जरुर दिले पाहिजे परंतु ही परिस्थिती का निर्माण झाली यामागील पार्श्वभूमी तपासली पाहिजे. कारण आदिवासी भागात जर विकासच होत नसेल तर अशी परिस्थिती निर्माण होणार नाही तर काय होणार. या भागात आपण पाहिले तर दिसून येईल की, वीजपुरवठा खंडित झाला तर 10-10 वर्षे सुध्दा ती जोडणी करण्यासाठी लोक येत नाहीत. अशा परिस्थितीत हा आदिवासी माणूस राहतो म्हणून त्यांच्यासाठी विकासाची दालने खुली करुन दिली पाहिजे आणि ही भूमिका शासनाने घेतली. नक्षलग्रस्त भागात आज जी नाराजी आहे, जो अशिक्षितपणा आहे किंवा त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत म्हणून नक्षलवादाकडे हे लोक वळतात अशी शक्यता नाकारता येत नाही म्हणून या भागात जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, शिक्षणाच्या सोई निर्माण करणे व इतर बाबतीत विकास घडवून आणण्याची भूमिका या शासनाने घेतली आहे म्हणूनच आज गडचिरोलीतील चित्र बदलताना दिसत आहे. असे असले तरी या भागाकडे जास्तीत जास्त लक्ष देऊन अधिकाधिक निधी त्यांच्यासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

महोदय, वन विभाग, बाब क्र. 36, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांच्या संदर्भात या सभागृहात मी कित्येक वेळा प्रश्न उपस्थित केले आहेत. आमच्याकडे या वन्य हत्तींचा उपद्रव मोठ्या प्रमाणात होत आहे. ज्याप्रमाणे सर्कसमध्ये एका बाजूच्या हत्तीने मारलेला बॉल दुसऱ्या बाजूला जातो आणि पुन्हा तिकडून मारल्यानंतर तो बॉल इकडे येतो अशाच प्रकारे आमच्या भागातून हत्तींना पळवून लावले की ते गोव्यामध्ये जातात आणि गोव्यातून हाकलल्यानंतर कर्नाटक राज्यात जातात, थोड्या दिवसांनी पुन्हा कर्नाटकातून हाकलून लावल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्यात येतात. अशा प्रकारे त्यांचा

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ......

खेळ सुरु असतो व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. या रानटी हत्तींचा बंदोबस्त करण्याची भूमिका शासनाने घ्यावी, अशी मागणी सदनात सातत्याने होत असते पण आजपर्यंतही आपण त्यांचा बंदोबस्त करु शकलो नाही. शेवटी तो एक प्राणी आहे परंतु त्याच्या उपद्रवामुळे जे नुकसान होते त्याची भरपाई दुर्दैवाने होत नाही ही आमच्या भागातील शेतकऱ्यांची खंत आहे. तसेच या भागातील दुसरी अडचण म्हणजे माकडांची निर्माण झालेली आहे. ही माकडांची संख्या एवढी आहे की, ते घरावर नेहमी बसलेले असतात आणि घरावरील कवेलू फोडतात, बंगला असेल तर त्या बंगल्याच्या गॅलरीत ओळीने बसलेले असतात.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी....

वानर, लाल तोंडाचे माकड माडावर चढतात व नारळ व शहाळी खातात. या माकडांना खालून कोणी हुसकवण्यास गेले तर ही माकडे वरुन नारळ किंवा शहाळे फेकून मारतात असे चित्र रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये पहावयास मिळते. माकडांनी या ठिकाणी खूप मोठया प्रमाणात उपद्रव मांडलेला आहे. त्यामुळे यातून शासनाने मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. तसेच आम्ही आमची शेती कशा पध्दतीने वाचवावयाची व येथील जनता सुरक्षीत कशी राहील यासाठी शासनाने मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 132, पृष्ठ क्रमांक 127 वर माझे विचार मांडणार आहे. सायंकालीन न्यायालयासाठी 15,00,000 रुपयांची तरतूद केलेली आहे. यामध्ये शासनाने 20 सायंकालीन न्यायालये स्थापन करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. आपली न्यायव्यवस्था ब्रिटिशांनी तयार केलेली आहे. ही न्यायव्यवस्था सुरु होऊन 60 वर्षे उलटून गेलेली आहेत ब्रिटिशांनी घालून दिलेल्या न्यायव्यवस्थेत भारत स्वतंत्र झाल्यापासून बदल झालेला नाही. आपल्याकडील कोर्टांना मे 15 ते जून पर्यंत सुट्टी दिली जाते.हायकोर्टाला जवळ जवळ एक ते सव्वा महिना सुट्टी असते. हायकोर्टाला उन्हाळयाची सुट्टी, नाताळची सुट्टी दिली जात असते. आज आपल्याकडील सर्व कोर्टामध्ये हजारो खटले प्रलंबित आहेत. हायकोर्ट, जिल्हा कोर्ट, तालुका कोर्टामध्ये, क्रिमिनल कोर्टात, सिव्हील कोर्ट हजारो केसेस पेंडींग आहेत. त्यामुळे प्रलंबित खटले लवकरात लवकर निकाली कसे निघतील यासंदर्भात निर्णय होण्याची आवश्यकता आहे. मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश यांच्या बरोबर चर्चा करुन लवकरात लवकर खटल्यांचा निकाल कसा लागेल हे पाहिले पाहिजे. प्रलंबित खटले लवकर निकाली निघण्यासाठी शासनाने लक्ष दिले तर जनतेला लवकर न्याय मिळू शकेल. घराच्या संदर्भात एकाने खटला दाखल केला तर त्या केसचा निर्णय तो मनुष्य मरुन जातो तरी सुध्दा त्या लागत नाही. हा निकाल दुस-या पिढीमध्ये लागत असतो. ज्यावेळेस हा निकाल लागतो त्यावेळेस ते घर किंवा इमारत जीर्ण झालेली असते. त्यामुळे कोर्टाचा निकाला लवकरात लवकर लावण्यासाठी राज्यशासनाने ठोस अशी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. कोर्टाला सुट्टया देत असतांना त्यांना अधिक सोयी कशा उपलब्ध करुन दिल्या जातील याकडेही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी....

शासनाने लक्ष दिले पाहिजे. कोर्टाचे कामकाज दिवसभर किंवा रात्री तसेच सकाळी चालवले तर पेंडींग केसचा निपटारा लवकरात लवकर निघू शकेल एवढे मला या निमित्ताने सूचवावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 232, पृष्ठ क्रमांक 363 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजनेकरिता तरतूद करणे (101,74,000/- दत्तमत ) भारत सरकारने कृषी कर्ज माफी व कर्ज फेड सवलत योजना, 2008 मध्ये घोषित केली होती. राज्य शासनाने या योजनेतून वगळण्यात आलेल्या ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग कोल्हापूर, भंडारा व गोंदिया या सात जिल्हयांच्या शेतक-यांना या योजनेचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने ज्यांना केंद्र शासनाच्या योजनेत समाविष्ट करण्यात आलेले नाही आणि जे कर्जाची परतफेड नियमितपणे करत होते अशा राज्यातील शेतक-यांकरता महाराष्ट्र शासन कृषी कर्ज माफी व कर्ज फेड सवलत योजना 2009 देखील घोषित केलेली आहे. या दोन्ही योजनांचा कालावधी दिनांक 30 जून, 2010 पर्यंत वाढविण्यात आला असून या प्रयोजनाकरिता चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली नाही म्हणून आवश्यकतेनुसार अर्थसंकल्पात रुपये 101 कोटी 74 लाखाची तरतूद करण्याचे ठरविले आहे. कित्येक जिल्हयातील शेतक-यांनी या योजनेचा फायदा घेतला . यामध्ये शेतक-यांनी निरनिराळया संस्थाकडून, जिल्हा बँकांकडून कर्ज घेतले होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरूनाथ कुलकर्णी .....

काही लोकांनी प्रामाणिकपणे शासनाची सर्व कर्जे देऊन टाकली. त्यामुळे या कर्जफेडीचा फायदा त्यांना मिळाला नाही. या कर्जफेडीचा फायदा अन्य शेतकऱ्यांबरोबर कोकणातील 4 जिल्ह्यातील आणि कोल्हापूर, भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांना देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. कर्जफेड करीत असताना शासनाला आवश्यकता वाटली म्हणून रूपये 101.74 लाखाची तरतूद केली आहे, याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. इतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांप्रमाणे याही शेतकऱ्यांना सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. मी जास्त वेळ घेत नाही. आपण मला वेळ दिल्याबद्दल धन्यवाद.

...............

**उप सभापती** : मी क्रमाक्रमाने सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी संधी देणार आहे. माझ्याकडे अनेक सन्माननीय सदस्यांची नावे आली आहेत. माझ्याकडे अधूनमधून नावे येतच आहेत. माननीय सदस्यांनी आपल्या पक्ष प्रतोदामार्फत माझ्याकडे नावे द्यावीत. जो तो येतो आणि नावे देतो हे बरोबर नाही.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पान क्रमांक 380, बाब क्रमांक 266 अशासकीय अनुदानित कला संस्थांना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. यात अशासकीय अनुदानित कला संस्थांच्या थकित इमारतीचे भाडे आणि वेतनेतर अनुदानाची तरतूद करण्यात यावी अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर मी पान क्रमांक 45 वरील बाब क्रमांक 62 अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये 93 जादा तुकड्या उघडल्यामुळे वेतनावरील खर्च भागविण्याकरिता करण्यात आलेली तरतूद यावर बोलणार आहे. यात प्लॅनच्या ज्या शाळा आहेत त्यांच्यासाठी वेतन अनुदान देण्याची तरतूद देखील करण्यात यावी अशी मी विनंती करीत आहे. त्याचप्रमाणे वेतनेतरशाळा चालविण्यासाठी अनुदान आवश्यक आहे. त्याची देखील तरतूद करणे आवश्यक आहे.

पान क्रमांक 44, बाब क्रमांक 59 मध्ये शालेय पोषण आहार कार्यक्रमांतर्गत मध्यान्ह भोजन योजनेचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. मोफत तांदूळ आणि आचारी नि मदतनीसासाठी मानधन देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. आज, शाळांमध्ये धान्य ठेवण्यासाठी स्वतंत्र खोली नसते. त्यामुळे सदर खोलीच्या बांधकामासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात यावी अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर मी जलसंपदाच्या पान क्रमांक 122 वरील बाब क्रमांक 124 वर बोलणार आहे. लहान पाटबंधाऱ्यांचा विस्तार व सुधारणा याकरिता तरतूद करण्यात आली आहे. लहान पाटबंधाऱ्यांचा विस्तार करण्यासाठी व सुधारणा कामे करण्याकरिता नियतव्यय उपलब्ध करून देण्यासंबंधी तरतूद यात करण्यात आली आहे. जुने कालवे व लहान पाटचाऱ्याचे पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहचू शकत नाही. त्यामुळे ते दुरूस्त होणे आवश्यक आहे. अणेर डावा कालवा, ता.चोपडा, जिल्हा जळगाव या ठिकाणच्या लहान पाटचाऱ्याच्या दुरूस्तीसाठी तरतूद करणे आवश्यक आहे. ती आपण करावी अशी मी या निमित्ताने विनंती करीत आहे.

**(सभापतीस्थानी तालिकासभापती श्री.चंद्रकांत पाटील)**

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे....

बाब क्रमांक -129,पृष्ठ क्रमांक 127, - विधी व न्याय विभाग - मुंबई उच्च न्यायालयातील वकील कक्ष वातानुकुलित करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. आज ग्रामीण भागातील न्यायालयांना स्वत:च्या इमारती नाहीत. भडगाव, ता.चोपडा, जि.जळगाव येथील नियोजित न्यायालया इमारतीच्या बांधकामासाठी तरतूद करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक -144, पृष्ठ क्रमांक 136 - उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग- स्वतंत्र गावठाण फीडर योजना व पायाभूत सुविधा याकरिता तरतूद करण्यात आली आहे. माझ्या जळगाव जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये स्वतंत्र गावठाण फीडर योजना निधी अभावी अपूर्ण राहिल्या आहेत. तेव्हा जळगाव जिल्ह्यातील गावठाण फीडर योजना पूर्ण करण्यासाठी निधी देण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 151, पृष्ठ 142, ग्राम विकास व जलसंधारण विभाग- लहान पाटबंधारे योजनांखालील बांधकामाच्या दुरुस्ती व परिरक्षणाच्या प्रलंबित देयकांच्या प्रदानासाठी तरतूद करण्यात आली आहे. जळगाव जिल्ह्यातील गांधली ता.अमळनेर, येथील पाझर तलावाची दुरुस्ती करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 161, पृष्ठ क्रमांक 152-सामाजिक न्याय, विशेष सहाय्य योजना - विशेष मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांकरिता मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्त्यांसाठी अतिरिक्त तरतूद करणे. मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांना मागील थकबाकी मिळालेली नाही तेव्हा त्याबाबत निधीची तरतूद करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

महसूल, पुनर्वसन व मदत - जळगाव जिल्ह्यातील यावल, चोपडा, रावेर, अमळनेर इत्यादी तालुक्यात झालेल्या चक्रीवादळामुळे व गारपीटीमुळे हजारो शेतकऱ्यांचे कराडो रुपयांचे नुकसान झाल्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. त्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून मी विविध आयुधांच्या माध्यमातून तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, नियम 93 अन्वये सूचना इत्यादी माध्यमातून मागणी करुनही अद्याप शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही. खरे म्हणजे शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे. तेव्हा नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2010-2011च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 1, पृष्ठ क्रमांक 4-सामान्य प्रशासन विभाग- केंद्राप्रमाणे राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे, निमसरकारी तसेच सर्व शासकीय महामंडळातील कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय 60 वर्षे करावे अशी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची मागणी आहे, त्यांची ही मागणी मान्य करावी अशी मी मागणी करीत आहे.

बाब क्रमांक 26, पृष्ठ क्रमांक 16-गृह विभाग- राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अपंगांना चहाचे स्टॉल टाकण्याची परवागनी देण्यात यावी. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये कमीत कमी 25-30 पोलीस अधिकारी/कर्मचारी असतात आणि पोलिसांना चहा व नाश्ता टपरीवर घेण्याची सवय असते. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये एक छोटेसे स्टॉल टाकण्याची परवानगी दिल्यास पोलिसांना चहा व नाश्ता मिळेल आणि अपंगाना देखील रोजगार मिळेल.

बाब क्रमांक 109, पृष्ठ क्रमांक 114-जल संपदा विभाग-धामापूर लहान पाटबंधारे तलाव विस्तार व सुधारणा करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. धामापूर माझे गाव आहे. मी आमदार झाल्यापासून प्रत्येक अधिवेशनात धामापूर तलावाच्या दुरुस्तीचा मुद्दा उपस्थित करीत होतो. धामापूर तलाव अतिशय सुंदर आहे. आज पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने धामापूर गावाचा उल्लेख आला याबाबत वित्तमंत्री आणि जलसंपदा मंत्री यांचे मी मनापासून शतश: आभार मानतो. या धामापूर तलावाला एक इतिहास आहे. हा शिवकालीन तलाव आहे. पर्यटनाच्यादृष्टीने हा परिसर अत्यंत रमणीय आहे, सुंदर आहे, वर्णन अपुरे पडेल इतका सुंदर आहे. या तलावाच्या दुरुस्तीसाठी 5 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हा आकस्मिक निधी मिळविण्यासाठी मला खूप त्रास सहन करावा लागला. मंत्रालयात एकेका कक्ष अधिकाऱ्याकडे मी 20-25 वेळा फेऱ्या मारल्या आहेत. अवर सचिवांकडे तितक्याच फेऱ्या मारल्या आहेत. प्रशासनामध्ये झारीतील शुक्राचार्य आहेत याचा मला प्रत्यक्ष अनुभव आला. प्रशासनातील अधिकाऱ्यांची मानसिकता नकारात्मक स्वरुपाची असते.

यानंतर श्री.गायकवाड..

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण ....

या राज्याच्या नियोजन विभागाचे जे प्रधान सचिव आहेत त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे. प्रधान सचिव, सचिव राज्याचे धोरण ठरवित असतांना शासनाला व लोकप्रतिनिधींना काही देण्याच्या संदर्भात त्यांची प्रवृत्ती असावी लागते. या कामासाठी पैसे मिळवत असतांना मला खूप त्रास झाला होता असे मी परवाच्या दिवशी बोललो होतो. इतका त्रास सहन करुन मी हे पैसे मिळवले होते. त्यामुळे त्यांनासुध्दा आश्चर्याचा धक्का बसला असेल असे मला वाटते. हे अधिकारी फोनसुध्दा घेत नाहीत असे मी परवा सांगितले होते.मुख्य सचिव माझे मित्र असून त्यांच्याकडूनही 20-25 फोन केले होते परंतु ते फोनसुध्दा घेण्यास तयार नाहीत.त्याचप्रमाणे् परवाच्या दिवशी विशेष उल्लेखाची सूचना मांडत असतांना मी असे म्हणालो होतो की, सभ्यता,शिष्टाचार आणि आदर लक्षात ठेवून प्रधान सचिवांनी लोकप्रतिनिधींचे फोन उचलावेत व नकारात्मक विचार कधीही मनात आणू नयेत. विविध कामासाठी जे पैसे देण्यात येतात ते पैसे राज्याचे असतात सचिवांचे नसतात. परंतु मला पैसे मिळवतांना बराच त्रास झाला होता . लोकप्रतिनिधींना पैसे मिळवतांना सचिवांनी वा प्रधान सचिवांनी त्रास देता कामा नये असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.हे पैसे मी त्रास सहन करुन मिळवले व ते काम पूर्ण केल्यामुळे अनेक गावातील शेतीला पाणी मिळणार आहे. त्यामुळे आजूबाजूची गावे हिरवीगार दिसतील. जम्मु काश्मीरचे पर्यटन मंत्री काही दिवसापूर्वी माझ्या बरोबर सिंधुदुर्ग जिल्हयात आले होते. ते माझ्याबरोबर सतत तीन दिवस असल्यामुळे मी त्यांना माझ्या गावातील तलाव व तलावातील बोटी दाखविल्या होत्या. त्यावेळी ते असे म्हणाले की," यहॉ की हरियाली देखकर मुझे ऐसा लग रहा है कि मैं जम्मू काश्मिर में हूँ" सिधुदुर्ग जिल्हयातील निसर्ग सौंदर्य किती सुंदर आहे हे यावरुन आपल्या लक्षात येईल. या भागाचा पर्यटन विकास करण्यासाठी कोणताही सचिव खिशातून पैसे देत नाहीत. परंतु मला पैसे मिळवतांना त्रास झाला तरी देखील मी हे पैसे मिळवले आहेत आणि अजूनही इतर कामासाठी लागणारे पैसे मी मिळवणार आहे. अधिका-यांनी आपली मानसिकता सकारात्मक ठेवावी आणि शासनाला मदत करावी असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला गृह निर्माण विभागाची बाब क्रमांक 212 पान नंबर 339 सबंधी बोलावयाचे आहे.मुंबईत विंशेष कोटयातून पत्रकार, लोकप्रतिनिधी,खेळाडू, कलाकार, विडी कामगार,औद्योगिक कामगार इत्यादींना विशेष कोटयातून घरे दिली जातात त्याच धर्तीवर

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण ....

मुंबईमध्ये जेवणाचे डबे कार्यालयात पोहोचविणा-या डबेवाल्यांना देखील घरे देण्यात यावीत अशी माझी शासनाकडे मागणी आहे. इंग्लडच्या राजकुमाराने वेगळया प्रकारे या डबेवाल्यांचे कौतुक केले होते. संपूर्ण् आयुष्यभर डबेवाले जेवणाच्या डब्यांचे ओझे खांद्यावरुन वाहून नेत असल्यामुळे या डबेवाल्यासाठी म्हाडाच्या अंतर्गत स्वतंत्र वसाहत करण्यात यावी तसेच त्यांचा विमा उतरविण्यात यावा अशी मी या पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो. जयहिंद. जय महाराष्ट्र.

-----------------

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ( विधान सभेने निवडलेल्या ) सभापती महोदय, सन 2010-2011च्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, गृह विभागाची बाब क्रमांक 15, पान नंबर 13 संबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे. राजभवन आणि वर्षा बंगला येथील सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी 4 कोटी 9 लाख 47 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आलेली आहे. तेथील सुरक्षा बळकट करण्यासाठी हा निधी देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा आणि गोदिंया या सपूर्ण भाग नक्षलग्रस्त म्हणून प्रसिध्द आहे. त्या ठिकाणी पोलीस कर्मचारी आणि अधिकारी यांच्यासाठी तात्पुरत्या स्वरुपाची निवासस्थाने व पोलीस स्टेशन्स बांधली आहेत. त्यांची देखील सुरक्षा तितकीच महत्वाची आहे. सभापती महोदय, राजभवन आणि वर्षा बंगल्याची सुरक्षा करण्याबद्दल माझे दुमत नाही परंतु ज्या पोलिसांचा आणि पोलीस अधिका-यांचा नक्षलवाद्यांशी रोज सबंध येतो त्यांच्या सुरक्षेचीसुध्दा काळजी घेतली पाहिजे. काही वेळा नक्षलवादी पोलीस स्टेशनवर हल्ला करतात , त्यांची शस्त्रे पळवून नेतात व त्यांना ठार मारतात. अत्यंत धोक्याच्या ठिकाणी पोलीस कर्मचारी व अधिकारी राहत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या घराचे, पोलीस स्टेशनचे बळकटीकरण करण्यासाठी पुरेसा निधी द्यावा अशी मी शासनाला विनंती करते.

सभापती महोदय,यानंतर मला बाब क्रमांक 18 पान नंबर 14 संबंधी बोलावयाचे आहे. गडचिरोली मधील केन्द्रीय राखीव पोलीस दलाकरिता मूळ पायाभूत सुविधासाठी 5 कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आली असून या निधीतून केन्द्रीय राखीव दलाच्या तुकडीसाठी प्रसाधनगृह, निवासी इमारतीच्या सभोवताली संरक्षण भित बांधणे ,भांडारकक्ष आणि भोजनालय इत्यादी सुविधा पुरविण्यात येणार आहेत . अनेकदा असे दिसून आले आहे की ,केन्द्रीय राखीव दलाचे जवान आठवडी बाजारामध्ये काही वस्तू खरेदी करण्यासाठी जातात आणि तेथे नक्षलवादी त्यांना टारगेट करतात.

नंतर श्री.सरफरे s

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

ज्याप्रमाणे पोलीस दलातील सैनिकांना टारगेट केले जाते त्याप्रमाणे या लोकांना सुध्दा टारगेट केले जाते.त्यामुळे या लोकांना दैनंदिन लागणारे अन्नधान्य, साधनसामग्री त्यांच्या निवासाच्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. दुसरे असे की, याठिकाणी आपण केंद्रीय पोलीस दलासाठी निवास व्यवस्था करीत आहोत त्याप्रमाणे तात्पुरते कँप घेऊन जाणाऱ्या पोलिसांची निवास व्यवस्था केलेली नसते. त्यांना कुठेतरी उघडयावर कँपमध्ये रहावे लागते,पोलीस स्टेशनच्या आतमध्ये रहावे लागते. त्याठिकाणाहून ते सर्व व्यवस्था पहातात. तेव्हा या लोकांची निवास व्यवस्था तात्पुरत्या स्वरुपामध्ये किंवा कायम स्वरुपी करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नक्षलवादी विभागामध्ये काम करणाऱ्या पोलिसांना आधुनिक उपकरणे् व हत्यारे उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. दुदैवाची गोष्ट अशी की, गेल्या चार-पाच वर्षापासून मोठया प्रमाणावर नक्षलवाद्यांकडून पोलिसांची हत्या होत आहे. आज त्यांच्याकडे एके 47, एक 57 सारखी आधुनिक शस्त्रे नाहीत, हातबॉम्ब नसल्यामुळे आपले पोलीस शस्त्रसज्ज नाहीत. गेल्या तीन वर्षापासून मोठया प्रमाणात आधुनिक शस्त्रे व उपकरणे दिली जातील असे सांगितले जाते.परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, गेल्या तीन वर्षापासून कुणीही तुमचे टेंडर उचलत नाही. त्यामध्ये आपण जी किंमत लावलेली असते त्या किंमतीला कोणताही हत्यारे पुरविणारा व्यापारी किंवा कारखानदार उतरत नाही. आतापर्यंत टेंडर कॉस्ट 5 कोटी होती ती आता 10 कोटींवर गेली आहे. मी याठिकाणी प्रामाणिकपणे सांगते की, एका अधिकाऱ्याने मला 51 कोटींची व्यवस्था केल्याशिवाय आपल्याला आधुनिक हत्यारे व उपकरणे मिळू शकत नाहीत असे सांगितले.एकीकडें आपण अतिरेक्यांबरोबर लढणाऱ्या पोलिसांना आधुनिक हत्यारे व उपकरणे पुरविता, त्याप्रमाणे नक्षलवाद्यांबरोबर लढणाऱ्या पोलिसांना देखील आपण आधुनिक हत्यारे व उपकरणे पुरविली पाहिजेत. व त्याकरिता 10 कोटींऐवजी 51 कोटींची तरतूद करावी अशी विनंती करते. तुम्हाला जर पोलिसांना द्यायचेच असेल तर ते नीट द्या. नाहीतर तुम्ही 10 कोटींचे टेंडर काढले तर ते कुणीही घेणार नाही. आपल्याला वाटते की, शासनाने बजेटमध्ये या लोकांना भरपूर दिले परंतु प्रत्यक्षात त्या लोकांच्या हातामध्ये काहीही मिळाले नाही.

सभापती महोदय, मी यानिमित्ताने एकच उदाहरण याठिकाणी सांगणार आहे. लाहेरी येथे 17 पोलिसांना नक्षलवाद्यांनी मारले. त्या सिंरोंचा, भामरागडच्या भागामध्ये असलेल्या घटनास्थळी मी पहावयास गेले असता व पाहिले असता अक्षरश: आपल्या पोलिसांना त्याठिकाणी आपण मरायला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्रीमती शोभा फडणवीस....

पाठवितो की काय असा मला प्रश्न पडतो त्याठिकाणी अक्षरश: हातबॉम्बचा सडा पडलेला होता. त्यामुळे 17 पैकी एकही पोलीस त्यामध्ये वाचू शकला नाही. आज जर आमचे पोलीस आधुनिक शस्त्रसज्ज असते तर ते नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामध्ये वाचले असते, नक्षलवाद्यांनी त्यांचा खातमा केला नसता. त्यामुळे तुम्ही पोलिसांना नक्षलवाद्यांविरुध्द लढण्याकरिता पाठविता की, त्यांचा खातमा करण्यासाठी पाठविता? त्यांच्याजवळ आधुनिक शस्त्र कां नसावे? नक्षलवादी विभागामध्ये काम करणाऱ्या पोलिसांकरिता तुम्ही विशेष भत्ता दिला असला तरी अशाप्रकारची चवन्नी छाप व्यवस्था असल्यानंतर मोठया प्रमाणावर पोलिसांचे मनोबल खचेल. त्यांच्यामध्ये नक्षलवाद्यांविरुध्द लढण्याचे सामर्थ्य राहणार नाही.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे पोलीस भरतीच्या प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली आहे. ही स्थगिती कां देण्यात आली? याचे कारण मला समजले नाही. आज त्या विभागामध्ये मोठया प्रमाणावर पोलिसांची भरती करण्यात आली. परंतु स्थगिती दिल्यानंतर नक्षलवाद्यांनी त्या पोलीस भरतीमध्ये सहभागी झालेल्या मुलांना मारण्याचे ठरविले आहे. नक्षलवादी आपल्याला केव्हाही मारतील म्हणून त्यांना बाहेर कुठेही जाता येत नाही, आपल्या उद्योग व्यवसायासाठी कुठेही जाता येत नाही. त्यामुळे ते आर्थिकदृष्टया अतिशय कमजोर झाले असल्यामुळे आपण या भरतीची चौकशी करुन या तरुणांना पोलीस सेवेमध्ये दाखल करुन घ्यावे, जेणेकरुन त्यांचा जीव तरी वाचू शकेल. नाही तर एक-दोन महिन्यानंतर त्यांना आपले प्राण द्यावे लागतील. आज या तरुण मुलांना आपल्या गावामध्ये सुध्दा जाता येत नाही, कुठेही लपून रहाता येत नाही. म्हणून आपण दिलेल्या स्थगितीबाबत ताबडतोब चौकशी करुन स्थगिती आदेश मागे घेण्यात यावा अशी विनंती करते.

सभापती महोदय, प्रशासनामध्ये कार्यालयीन खर्चाकरिता ज्याप्रमाणे तरतूद केली जाते त्याप्रमाणे पोलिसांच्या सुरक्षिततेची सुध्दा आपल्यावर बांधिलकी असते. आपल्या पोलिसांना नक्षलवाद्यांबरोबर युध्दाची लढाई लढावी लागते. ज्याप्रमाणे अतिरेक्यांबरोबर लढण्यासाठी ट्रेनिंग दिले जाते त्याप्रमाणे नक्षलवाद्यांबरोबर लढण्यासाठी त्यांना ट्रेनिंग देण्याची गरज आहे. आपण किती प्रशिक्षण केंद्रे बांधली याला महत्व नाही.

(यानंतर श्रीमती थोरात)

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

परंतु या प्रशिक्षण केंद्रामध्ये पोलिसांना खऱ्या अर्थाने कसे प्रशिक्षण मिळते हे महत्वाचे आहे. सुरक्षितता कशी बाळगावी आणि कशा रीतीने या नक्षवाद्यांचा खातमा करावा यासंबंधीचे प्रशिक्षण देण्यासाठी मिलिटरीच्या अधिकाऱ्यांची गरज आहे. मिलिटरीच्या अधिकाऱ्याकडून प्रशिक्षण मिळेल अशी व्यवस्था शासनाने करावी अशा प्रकारची माझी विनंती आहे.

सभापती महोदय. बाब क्रमांक 35. पान क्रमांक 25 वर मी बोलू इच्छिजते. वन स्थानकांच्या बांधकामासाठी तरतूद करणे. बेकायदेशीर वृक्षतोडीस, वन उत्पादनाच्या बेकायदेशीर वाहतुकीस आणि वन्य प्राण्यांची बेकायदेशीर शिकार करण्यास व चोरुन शिकार करण्यास तसेच पशुजन्य पदार्थाच्या बेकायदेशीर वाहतुकीस प्रतिबंध करण्याकरिता 16 वनस्थानकांची बांधणी करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचे खरोखर नवल वाटते. वनांची अवैध वृक्षतोड कोण करतात? वनांचे रक्षण करण्यासाठी अधिकारी त्या ठिकाणी असतात तरी त्या ठिकाणी वृक्षतोड कशी होते? याबाबतीत मी स्वत: हायकोर्टात पीआयएल दाखल केली होती. त्या बाबतीत हायकोर्टाने निर्देश दिले. पण त्यानंतर तो अधिकारी पुन्हा बढतीने त्या ठिकाणी अधिकारी म्हणून गेला. अशा पध्दतीने चोराच्या हातात जंगलाच्या किल्ल्या देण्यात येतात आणि वृक्षतोड थांबली पाहिजे यासाठी मोठया प्रमाणात तरतूद करण्यात येते हे चुकीचे आहे.

सभपती महोदय, विदर्भात ताडोबासारखा वन्य प्राणी प्रकल्प आहे. या ठिकाणी 53 वाघ आहेत. या जंगलामध्ये उन्हाळयामध्ये पाणी मिळाले नाही म्हणून वानरे मेली या गोष्टीला मोठया प्रमाणात प्रसिध्दी मिळाली पण एका झोनमध्ये 15 बायसनसारखे महत्वाचे प्राणी मेले. पाणी न मिळाल्यामुळे ते मेलेले आहेत. मी स्वत: तेथे जाऊन पाहिलेले आहे. वनामध्ये आणखी जास्त आतमध्ये आम्ही जाऊ शकलो नाही. आतमध्ये आणखी किती बायसन मेले असतील माहीत नाही. जंगलामध्ये असलेल्या पाण्याच्या सोई डिफेक्टिव्ह आहेत त्यामुळे वाघाला पिण्यासाठी पाणी मिळत नाही. तसेच अन्य जनावरांनाही पिण्यासाठी पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे ही जनावरे पाणी पिण्यासाठी गावात येतात आणि गावातील माणसांना खातात. त्यानंतर दोन वर्षा नंतर पुरक मागणीद्वारे पैशाची मागणी केली जाते. माणसांना हे वाघ खात आहेत आणि वाघांना वाचवा असे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सांगण्यात येते. वाघांना वाचवा म्हणजे काय माणसांना मारा? यासंदर्भात काय नियम आहेत?. वन्य प्राण्यांसाठी जंगलामध्ये पाण्यासाठी डबकी बांधलेली आहेत. ती कोणत्या इंजिनियरने आणि कोणत्या ठेकेदाराने बांधलेले आहेत हे मला माहीत नाही. पण या डबक्यंच्या एका बाजूकडून उतार आहे आणि दुसऱ्या बाजूकडून एकदम उंच भाग आहे. एखादा प्राणी पाणी पिण्यासाठी खाली उतरला तर त्याला पुन्हा वर चढता येत नाही त्यामुळे तो त्या पाण्यामध्ये पडून मरतो अशी स्थिती आहे. काही ठिकाणी पाणीच नाही. नुसतीच डबकी आहेत. या वर्षी दुर्दैवाने या जंगलामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला. माणसांना पाणीपुरवठा करण्यात आला तर मी समजू शकते परंतु ताडोबा सारख्या मोठया जंगलामध्ये ज्याचा परिसर 650 कि.मी. आहे अशा ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला.. हे टँकरवाले किती बेइमानी करतात हे आपल्याला माहीत आहे. एक टँकर टाकतात आणि दोन टँकर गायब करतात. त्यामुळे हे वाघ पाणी पिण्यासाठी गावामध्ये येतात. शासनाला खऱ्या अर्थाने इमानदारीने काम करायचे असेल तर या जंगलामध्ये प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली पाहिजे.

सभापती महोदय, ताडोबा हे वन्यप्राणी प्रकल्प म्हणून प्रसिध्द आहे. या ठिकाणी मोठया प्रमाणात पर्यटक येतात. त्या ठिकाणी गेली तीन वर्षे रेंजर अधिकारीच नव्हता. रेंजर शिवाय आणि पाण्याच्या व्यवस्थेशिवाय हे जंगल असेल तर येथील वृक्षतोड कोण वाचविणार? वाघांचे प्राण कोण वाचविणार? सभापती महोदय, येथे रेंजरच नाही. एक रेंजर आहे तो आस्थापना शाखेत ऑफिसमध्ये बसतो आणि तोच ताडोबाचे हे सगळे जंगल बघतो. सभापती महोदय, जर शासनाला या वन्य प्राणी प्रकल्पाकडे लक्ष देता येत नसेल तर वन्य प्राणी प्रकल्प हे नाव बदलण्यात यावे आणि ते जनतेच्या हातामध्ये देण्यात यावे. आदिवासी जंगल सांभाळायला तयार आहेत. सरकार हे जंगल ताब्यात घेऊन लोकांवर मोठया प्रमाणात अन्याय करीत आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, पोलीस हा चोर पकडण्याकरिता असतो पण सिरोंचा तालुक्यातील बाम्हणी या गावच्या पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी तेथील जंगलातील बारा लाख रुपये किंमतीच्या लाकडाचे फर्नीचर करुन घेऊन जात असताना सापडला. पोलीस अधिकारी चोऱ्या करताना सापडत असतील आणि वन विभाग त्यांना पकडत असेल तर कोणावर विश्वास ठेवावयाचा? आणि कोणा बद्दल बोलायचे हा प्रश्नच आहे. सभापती महोदय, एखादा आदिवासी जंगलातील बारीक-सारीक लाकडे घेऊन जाताना सापडला तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येते आणि त्याला दंड लावण्यात येतो. पण अशा प्रकारची मोठ-मोठी धेंडे सापडत असतील तर त्यांच्या विरुध्द काय कारवाई करण्यात येते? सभापती महोदय, खऱ्या अर्थाने जंगल वाचववायाचे असेल तर हायकोर्टाने दिलेल्या निर्देशानुसार आणि इमानदारीने अशा चोर असलेल्या अधिकाऱ्यांना कुठल्याही वनाच्या संरक्षणासाठी ठेवण्यात येऊ नये. शासनाचे ते लाडकेच असतील तर त्यांना मंत्रालयात कुठल्याही पदावर घेण्यात यावे, असे मला याठिकाणी खेदाने म्हणावे लागते.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

सभापती महोदय, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे झालेल्या हानीसाठी नुकसानभरपाई देण्याच्या संदर्भात बाब क्रमांक 36 अंतर्गत तरतूद केलेली आहे. वन्य प्राणी हल्ले करतात. आताच सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, हत्ती गावामध्ये घुसतात आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणावर हानी होते. आमच्याकडे कोण कधी वाघाच्या तोंडात जाईल याचा भरवसा नसतो. वाघ सरळ गावामध्ये घुसतात आणि घरातील माणसे उचलून नेतात. जशी नक्षलवाद्यांची हिंमत वाढलेली आहे तशी वाघांची सुध्दा हिंमत वाढलेली आहे. त्या कुटुंबाचे झालेले नुकसान ताबडतोब मिळाले तर त्या कुटुंबाला आधार मिळतो. आपण पुरवणी मागण्यांमध्ये पैसे मंजूर करतो पण आपण सुरुवातीला मुख्य अर्थसंकल्पामध्ये पैसे मंजूर करुन ते वन विभागाच्या वनसंरक्षकांकडे का देत नाही ? मुख्य बजेट सादर झाल्यानंतर याकरिता पुन्हा मागणी करावी लागते. त्यांना दोन दोन वर्षे पैसे मिळत नाहीत. त्या कुटुंबाचे काय हाल होत असतील याचा विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे मूळ अंर्थसंकल्पामध्ये याची तरतूद व्हावी अशी मी या निमित्ताने विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मला शालेय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 44 वरील बाब क्रमांक 58 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरिता पायाभूत सुविधा निर्माण करण्यावरील खर्च भागविण्यासाठी तरतूद केलेली आहे. आपण हे जरी करीत असलो तरी ज्यावेळी शाळा चालवितो त्यावेळी वेतनेतर अनुदानाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण होतो. चार पाच वर्षे मोठ्या प्रमाणावर वेतनेतर अनुदान दिले जात नाही. शाळा चांगल्या चालविणे, चांगला मेन्टेनन्स ठेवणे यासाठी त्या ठिकाणी वेतनेतर अनुदान देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मला शालेय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 44 वरील बाब क्रमांक 59 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये शालेय पोषण आहार कार्यक्रमांतर्गत मध्यान्ह भोजन योजनेचा खर्च भागविण्यासाठी 761 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. पूर्वी खऱ्या अर्थाने शालेय पोषण आहाराचे कंत्राट महिला बचत गटांना दिलेले आहेत. महिलांना मोठ्या प्रमाणावर पुढे आणण्यासाठी त्यांना आर्थिकदृष्ट्या सबळ करणे हा केंद्र शासनाकडून आलेला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

कार्यक्रम आहे. महिला बचत गटांकडे खिचडी शिजविण्याचे काम दिले जात होते. परंतु सरकारला त्यांना दोन दोन वर्षे पैसे देता आले नाही. आधीच दारिद्र्यरेषेखालील महिलांचा बचत गट आणि त्यांना दोन दोन वर्षे पैसे मिळाले नाहीत अशा वेळी त्यांनी कर्ज घेऊन शालेय पोषण आहाराचा प्रश्न निभावला. पण त्यांना पैसे मिळाले नाहीत. अशा प्रकारे महिला बचत गट शालेय पोषण आहार पुरविण्याचे काम करीत असताना कोठल्या तरी एखाद्या शाळेमध्ये खिचडीत अळ्या निघाल्या म्हणून त्यांचे कंत्राट रद्द केले आणि आता ते काम ठेकेदारांना देऊन त्या महिलांना फक्त भांडी घासा, खिचडी शिजवा, इंधन आणा यासाठी 50 पैसे देणार आहेत. महिला सबलीकरणाच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सबळ करण्याचे सोडून त्यांना भिकाऱ्याच्या रांगेत आणून सोडले आहे. 50 पैशासाठी कोणती महिला काम करणार ? इंधन आणणे एवढे सोपे आहे काय ? आज गावामध्ये सिलेंडर घ्यावयाचा असेल तर 450 रुपये लागतात. जंगलामध्ये लाकडे मिळत नाहीत. अशा वेळेला त्यांच्या हातून शालेय पोषण आहाराचे काम काढून ठेकेदारांना द्यावयाचे आणि त्या महिलांनी फक्त भांडी घासावयाची असे जर ठरविले असेल तर ते चुकीचे धोरण आहे. म्हणून ते कंत्राट रद्द करुन ते काम महिला बचत गटांकडे सोपवावे अशी मी मागणी करते. ते कंत्राट महिला बचत गटाला द्यावे. त्यासाठी दर वर्षाला नव्हे तर दर महिन्याला जो खर्च लागत असेल ते पैसे त्यांना द्यावेत. ठेकेदारांना आणि मोठ्या व्यापाऱ्यांना पोसण्याचे सोडून गरिबांना मोठ्या प्रमाणावर मदत करावी अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मला नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 52 वरील बाब क्रमांक 72 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये विशेष घटक योजनेच्या संदर्भात तरतूद केलेली आहे. विशेष घटक योनजेच्या माध्यमातून आपण मुलांना मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण देतो. प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांना खऱ्या अर्थाने स्वत:च्या पायावर उभे करावे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वासाने जगण्याची हिंमत निर्माण करावी हा यामध्ये उद्देश आहे. विशेष घटना योजना काढण्याच्या मागचा उद्देश असा आहे की, आपण बेरोजगारांना रोजगार देऊ शकतो. त्यांनी स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी छोटा उद्योग निर्माण करावा यासाठी प्रशिक्षण देतो. परंतु बँकेच्या माध्यमातून त्यांना कर्ज मिळणे तसेच

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

त्यांनी तयार केलेल्या मालाला भाव मिळणे याकडे शासन लक्ष देत नाही. त्यामुळे प्रशिक्षण घेतलेली मुले स्वत:च्या पायावर उभी राहू शकत नाहीत. सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेच्या माध्यमातून त्यांना उद्योग उभा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करावा, मदत करावी असा उद्देश आहे पण बँक आज कोणालाही कर्ज देण्यास तयार नाही. शासन आदेश काढते पण बँका त्या आदेशाचे पालन करीत नाही असे दुर्दैवाने या ठिकाणी म्हणावे लागते. तो विषय मी या ठिकाणी मांडणार नाही. याचे कारण असे की, या ठिकाणी तो विषय नाही. परंतु बँकांच्या बाबतीत सुध्दा महाराष्ट्राच्या पातळीवर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असते. ती समिती दर वर्षाला किंवा तीन महिन्याला किंवा दोन महिन्याला आढावा घेत असते. परंतु त्यांच्या कधी हे लक्षात येत नाही की, बँका ज्या ठेवी किंवा डिपॉझीट्स जमा करतात त्याच्या 40 टक्के कर्ज दिले पाहिजे आणि त्यातील 40 टक्के कर्ज शेतकरी आणि गरीब लोकांना दिले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

याचा आढावा का घेतला जात नाही. अजून कधीही 40 अक्के कर्ज मिळालेले नाही. बँका कमी दराने कर्ज देण्यास तयार नाहीत. बँका असे म्हणतात की, सरकारने आदेश काढले असले तरी ते आदेश आमच्याकडे आलेले नाहीत. शासनाने जी.आर.काढला नसल्यामुळे त्याचा लोकांना फायदा होत नाही.

सभापती महोदय, पाटबंधारे विभागातील गोसीखूर्द प्रकल्पाविषयी मी बोलणार आहे. केंद्र सरकारने हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून जाहीर केले आहे आणि त्यासाठी केंद्राकडून पैसाही पाठविला जातो. परंतु हा पैसा आल्यानंतर पाटबंधारे विभागाला तातडीने पाठविला पाहिजे. परंतु त्यांना तो पैसा वेळेवर दिला जात नाही. 1-2 महिने हा पैसा रोखून का ठेवला जातो ते समजत नाही. या प्रकल्पासाठी आलेला पैसा वेळच्या वेळी पाटबंधारे विभागाला पाठविला पाहिजे. मागील 3 महिन्यापूर्वी शासनाने ही चूक केलेली आहे, परंतु पुढील काळात अशी चूक होता कामा नये.

सभापती महोदय, कन्हान नदीचे पाणी गोसीखूर्द प्रकल्पात सोडले जाते आणि नाग नदीचे पाणी कन्हान नदीत मिसळते. हे पाणी प्रदूषणयुक्त असल्यामुळे ते पिण्यासाठी अयोग्य आहे. नाग नदीचे प्रदूषित पाणी शुध्द करुन द्यावे अशी मागणी केली होती. परंतु या कामासाठी महानगरपालिका खर्च करु शकत नाही असे आम्हाला सांगण्यात आले आहे. म्हणून शासनाने पाण्याच्या शुध्दीकरणासाठी पैसे उपलब्ध करुन द्यावेत अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, बाभळी बंधा-याच्या प्रश्नावर मोठे राजकारण सुरु आहे. परंतु आंध्र प्रदेशच्या सीमेवर प्राणहिता नदीवर कुंबळी धरण बांधले जाणार आहे. या धरणामुळे 160 अब्ज घनमीटर पाणी उपलब्ध होणार आहे आणि 16 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. या धरणामुळे आपल्या राज्याला एका पैशाचाही फायदा होणार नाही. परंतु या धरणामुळे महाराष्ट्रातील अडीच हजार हेक्टर भूभाग बाधित होणार आहे. महाराष्ट्रातील धरणांची कामे वन खात्याकडून अडविली जातात. परंतु आंध्र प्रदेश राज्याला वन खात्याची परवानगी कशी मिळते ? आपल्या कडील धरणांच्या कामासाठी वन विभागाची परवानगी मिळण्यासाठी 5-10 वर्षे वाट पहावी लागते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्रीमती शोभा फडणवीस....

पण त्यांना लगेच कशी परवानगी मिळते ? या निमित्ताने विदर्भावर अन्याय केला जातो असे म्हटले तर वावगे होऊ नये. प्राणहिता नदीवर गडचिरोली जिल्हयात धरण बांधून ते पाणी आपल्याकडेच घेतले पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर पृष्ठ क्र.147 वरील बाब क्र.155 वर बोलणार आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अंतर्गत असलेल्या 24 अन्न साठवण गोदामांची दुरुस्ती केली जाणार आहे. जिल्हयाच्या व तालुक्याच्या ठिकाणी ही गोदामे आहेत. परंतु या गोदामांतील फरशा खराब झ ााल्या आहेत, गळती होत आहे. मूल व सावली या तालुक्यांमध्ये मोठी गोदामे बांधावीत अशी विनंती करते.

त्याचप्रमाणे बाब क्र.156 अंतर्गत अन्नधान्य व्यवहारातील तुटीच्या प्रतिपूर्तीसाठी मागणी केलेली आहे. या तुटींचा फटका रेशन दुकानदारांना बसतो. गोदामामध्ये आलेला माल 2-3 किलो कमी असतो. दुकानदार तो माल घेऊन जातात तेव्हा त्यांना तो माल लोकांना मोजून द्यावा असे सांगितले जाते. शासनाच्या गोदामातून त्या दुकानदारांना केव्हाही माल मोजून मिळत नाही. परंतु तहसीलदार कार्यालयाचे अधिकारी साळसदपणे 100 किलो माल आल्याची नोंद करतात. त्यामुळे दुकानदारांचे हाल होत आहेत. त्यांनी 5 किलो धान्य ॲड्जेस्ट ठरविले तरी ते अडचणीत येतात. माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी घोषणा केली आहे की, फिरत्या पथकाच्या माध्यमातून रेशन दुकानदारांची तपासणी केली जाईल. तपासणीत ते दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. परंतु त्यांना गोदामातून धान्य कमी दिले जाते त्याबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. गोदामातून धान्य मोजून दिले तर हे दुकानदार चो-या करणार नाही अशी व्यवस्था करावी.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KTG/ 17:35

श्रीमती शोभा फडणवीस...

बाब क्रमांक 165,166 आणि 167. पृ.क्र. 153. सभापती महोदय, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी आवास योजना अशा प्रकारच्या विविध योजना शासन बाराही महिने राबवित असते. आमदार प्रकरणे मंजूर करतात. परंतु शासनाकडून मंजुरी मिळण्यासाठी वर्ष जाते. मग लोक आमदाराला वेठीला धरतात. तहसील कार्यालयावर मोर्चा नेतात. अशा योजनांचे पैसे शासनाला द्यावयाचे आहेत हे माहीत असताना देखील त्यासाठी पुरवणी मागण्याची वेळ का आणावी लागते ? वार्षिक नियोजनामध्ये यासाठी तरतूद का केली जात नाही ? तेव्हा श्रीमंतांना आणखीन श्रीमंत करण्याचा धंदा शासनाने सोडावा आणि गरिबांना नयाय देण्याचा प्रयत्न करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहामध्ये सन 2010-2011च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु आहे. या मागण्यांवरील पृष्ठ क्रमांक आणि बाब क्रमांक याकडे जाण्यापूर्वी मागण्यांच्या संदर्भात जे काही निष्कर्ष नोंदविले गेले आहेत त्याकडे मी सभागृहाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, जेव्हा पुरवणी मागण्या चर्चेसाठी येतात त्यावेळी त्यातील फक्त 5-6 विभागाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी वेळ मिळतो ही वस्तुस्थिती आहे. अनेक वेळा अनेक विभागानी चांगली कामे केलेली असतात तर काही वेळा अनेक विभागांवर वेगवेगळ्या प्रकारचे ताशेरे ओढलेले दिसतात. या संदर्भातील एक उदाहरण मी आपल्याला देते. बारामतीमध्ये एक नाट्यमंदिर उभारण्यात आले होते. त्या बाबतीत दोन दिवसापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने ते अतिक्रमण असल्यामुळे पाडून टाकावे असा निर्णय दिला. या ठिकाणी आम्ही पुरवणी मागण्यावर जीव तोडून चर्चा करतो, कुणी कितीही कंटाळले तरी त्याची पर्वा न करता पोटतिडिकेने आम्ही बोलतो. परंतु जर अशा प्रकारे बांधकामासाठी तरतूद करीत असताना सर्व प्रकारच्या अटी-शर्तींची पूर्तता केली गेली आहे की नाही हे संबंधित विभागाने पाहाण्याची आवश्यकता आहे. तेथील नाट्य मंदिर चांगले आहे. आपण फक्त ठराविक कलाकृतींचा विचार करता. परंतु बाकीच्या सर्वसामान्य कलाकार जे औषधपाण्यासाठी वणवण भटकत आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. एक म्हण आहे. बारा रेडे धुवीन पण एक शाळीग्राम धुणार नाही. शाळीग्राम हा देव मानला जातो. तर विविध प्रकारच्या मागण्या करीत असताना त्यामध्ये समन्वये नसेल तर कोट्यवधी रुपये खर्च करुन देखील त्या योजनांचा लोकांना फायदा होत नाही. शासनाकडून बारा रेडे धुतल्यासारखे काम होते परंतु एक शाळीग्राम म्हणजे पवित्र असा विकास, माणसाचे हित, सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये मराठीचा सन्मान अशा गोष्टी आपल्याला हरवल्या सारख्या दिसतात.

सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 4 मध्ये असे म्हटलेले आहे की. भाषा संचालनालय स्वतंत्र संकेत स्थळ करणार आहे. ही चांगली गोष्ट आहे. भाषा संचालनालयाने प्रकाशनांचे पुनर्मुद्रण करण्याची तरतूद केलेली आहे. मला या निमित्ताने हे सांगितले पाहिजे की, काही महत्वाच्या गोष्टी शासनाच्या वतीने केल्या जात असताना त्याबाबतची माहिती मात्र सदनाला आणि सदनातील सन्माननीय सदस्यांना दिली जात नाही. ईस्टर्न युरोप मधील स्लोव्होकिया येथे

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे...

महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक मदतीने काही अभ्यासक गेले आणि तेथे जागतिकस्तरावर मराठी भाषा परिषद झाली. महाराष्ट्रामध्ये काय काय घडतेय याची चर्चा त्या ठिकाणी झाली. परंतु याबाबतची माहिती विधानसभा आणि विधानपरिषदेतील सदस्यांना द्यावी असे शासनाला वाटले नाही. सांस्कृतिक धोरणाचा मसुदा सरकारने बाहेर जाहीर केला. परंतु राज्याचे सांस्कृतिक धोरण काय आहे याची अधिकृत प्रत सन्माननीय सदस्ययांना देण्यात आलेली नाही. आमदारांचा राज्याच्या सांस्कृतिक धोरणाशी काही संबंध नसावा असे सरकारला वाटत असावे, अशा प्रकारचे हे एकच राज्याचे सांस्कृतिक धोरण आहे.

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

म्हणून मला असे वाटते की, सांस्कृतिक धोरणाबरोबरच भाषेचे प्रमाणिकरण करणे आणि ही माहिती सर्वदूर पोहोचली पाहिजे यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत त्यामध्ये मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार या बाबीचा समावेश आहे. सांस्कृतिक कार्य आणि पर्यटन विभागाशी ही बाब जोडणे आवश्यक आहे असे मला वाटते. माझ्या माहितीप्रमाणे सन्माननीय राज्यमंत्री महोदयांकडे या दोन्ही विभागांचा कार्यभार आहे. त्यामुळे आमची अशी अपेक्षा आहे की, या विभागांच्या समन्वयाने या बाबीचा विचार केला जाईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक-279 नुसार शासनाने पुरातत्व विभागाच्या अखत्यारितील विविध वास्तूंसाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही तरतूद कोणत्या किल्ल्यांसाठी, कोणत्या देवालयांसाठी किंवा कोणत्या वास्तूसाठी वापरली जाणार आहे? याची यादी आम्हाला मिळाली पाहिजे. या संदर्भात माननीय सदस्यांकडून अनेक प्रकारच्या सूचना येऊ शकतात. अमुक अमुक ठिकाणच्या देवस्थानासाठी काय केले पाहिजे हे सुचविता येऊ शकते. पुणे जिल्हयातील कुकडेश्वर, रायगडावरील शिवाजी महाराजांच्या जन्मस्थानाच्या ठिकाणी दुरुस्ती झाली पाहिजे. ही 50 कोटीची तरतूद चांगल्याप्रकारे कशी वापरली जाईल यादृष्टीने दूर्गप्रेमी आणि पुरातत्व विभागाचा चांगला अभ्यास आहे अशा मंडळींना विश्वासात घेऊन या निधीचा उपयोग केला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 273 नुसार शासनाने सुवर्ण महोत्सवी वर्षात प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तरतूद केली आहे. प्रचार आणि प्रसार कुठे केला जाणार आहे? महाराष्ट्रातील ग्रामीण भागात प्रचार आणि प्रसार चांगल्याप्रकारे होऊ शकतो. उद्या आषाढी एकादशी आहे. लाखो वारकरी वारीकडे निघाले आहेत. मुंबई शहरातील मराठी लोक वगळता वारीची माहिती किती लोकांना असावी हे फार मोठे प्रश्नचिन्ह आहे. रेडिओ मिर्ची या एफएम वाहिनीवर मराठी गाणी ऐकविली पाहिजेत असा माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा आग्रह आहे. सांस्कृतिक विभागामार्फत संयुक्त महाराष्ट्राची माहिती दिली जाते. परंतु संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या निमित्ताने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर विठ्ठल उमप यांनी अतिशय सुंदर गीते रचली आहेत. ती पुरस्कृत करुन सक्तीने विविध एफएम वाहिन्यांवर प्रसारित केली पाहिजेत. मुंबईसारख्या शहरामध्ये प्रत्येक माणूस आपल्या वाहनामध्ये एफएम रेडिओ ऐकत

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

असतो. अशा वेळी या शाहीर मंडळींनी रचलेली मराठी भाषेतील जूनी गीते नवीन पध्दतीने ऐकविण्यात आली तर निश्चितपणे ती लोकप्रिय होतील आणि केलेली तरतूद यशस्वी होऊ शकेल याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 278 अन्वये शासनाने सातारा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधण्यासाठी तरतूद केली ही अतिशय चांगली गोष्ट आहे. अनेक वर्षापासून सातारा येथील स्मारकाचा प्रश्न उपेक्षित राहिला होता. त्यासाठी तरतूद केली ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून चित्रपट महोत्सवासाठी काही निधी देऊ केला आहे. चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन समारंभ होतात. त्यावेळी केंद्रीय मंत्री आलेले असतात. अशा कार्यक्रमाच्या वेळी मराठी भाषेतून कोणतीही उद्‌घोषणा केली जात नाही. क्वचित प्रसंगी एखादा मराठी चित्रपट दाखविण्यात येतो. चित्रपट महोत्सवामध्ये मराठीतील चित्रपटांसाठी एखादा विभाग किंवा एक संपूर्ण दिवस राखून ठेवला जाईल यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, सांस्कृतिक विभागामार्फत वेगवेगळी कामे होत असताना कलावंतांच्या मानधनाच्या संदर्भात ज्या अटी आहेत त्यात बदल केला पाहिजे. त्या संदर्भात बैठक आयोजित केली आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देते.

सभापती महोदय, बाब क्रमांक-65 अन्वये नगरविकास विभागाने पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेला वाहतुकीसाठी सहाय्यक अनुदान देण्याकरिता तरतूद केली आहे. मेट्रो रेल्वेच्या संदर्भात पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरामध्ये प्रचंड वादंग सुरु आहे. सन्माननीय गृहराज्यमंत्री पुणे जिल्हयाचे नेतृत्व करीत असले तरी त्यांना मेट्रो रेल्वेच्या प्रस्तावाबाबत किती माहिती आहे याबद्दल आम्हाला शंका वाटते. स्थानिक आमदार, खासदार यांना कोणतीही माहिती न देता नगरविकास विभागाचा कारभार सुरु आहे. मेट्रो रेल्वेच्या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 66 नुसार श्रमसाफल्य योजनेंतर्गत सफाई कामगारांच्या घरांची व्यवस्था करण्यासाठी तरतूद केली आहे. महाराष्ट्रातील अनेक छोट्या गावांमध्ये अजूनही टोपली संडासाची व्यवस्था दिसून येते. महाराष्ट्रातून टोपली संडास हद्दपार झाले की नाही

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 17:40

डॉ.नीलम गोऱ्हे.........

याबद्दल चर्चा झालेली नाही. परंतु दुर्दैवाने आजही छोट्या गावांमध्ये अशा तऱ्हेची मैला सफाईची पध्दत अस्तित्वात आहे. ती पध्दत नष्ट होत नाही तोपर्यंत सफाई कामगारांना न्याय मिळेल की नाही याबद्दल साशंकता वाटते.

नंतर 3डब्ल्यू.1...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .......

महोदय, बाब क्र. 67, नगरविकास विभाग - 13 व्या वित्त आयोगानुसार महानगरपालिका आणि नगरपरिषदांना 190 कोटी आपण देणार आहात ही चांगली गोष्ट आहे पण महापालिका आणि नगरपालिका हा खर्च करीत असताना वित्त आयोगाचा पैसा आला म्हणून खिरापत वाटण्याचा कार्यक्रम असल्यासारखा हा पैसा खर्च होतो म्हणून या खर्चावर संनियंत्रण होणे आवश्यक आहे.

अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्र. 155, पृ.क्र. 147 च्या अनुषंगाने मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, गोदामांच्या दुरुस्तीसाठी ही तरतूद शासनाने केलेली आहे. पण मध्यंतरी एनडीटीव्हीने देशव्यापी मोहीम हाती घेतली होती आणि त्यातून हे धान्य गोदामांमध्ये कशा पध्दतीने सडत असते हे समोर आले होते. आपण आजही बीपीटी रस्त्यावरुन आले तर दाणा बंदरमध्ये दिसून येईल की हे धान्य पावसात भिजत असते तसेच तेथे उंदीर आणि प्राण्यांचा सुळसुळाट असतो. तसेच ही गोदामे कोणाच्या मालकीची आहेत यासंबंधीचे बोर्ड सुध्दा तेथे नसतात, असे बोर्ड लावण्याची गरज आहे. मंत्री महोदयांना माझी विनंती राहील की, प्रत्येक गोदामाच्या संदर्भात आपण स्वत: लक्ष घालून ही दुरुस्ती करुन घ्यावी. सोलापूरमध्ये सुध्दा अशाच प्रकारे धान्य वाया गेले होते याची माहिती आपल्यासमोर आलेली आहे. आज याच संदर्भात जो जी.आर. काढलेला आहे त्याचा मी उल्लेख केला होता. अन्न व नागरी पुरवठा विभागाने जिल्हा पातळीवर ज्या दक्षता समित्या निर्माण केल्या आहेत त्यासंबंधीचा हा जी.आर. असून त्याची प्रत मी माननीय सभापतींच्या मार्फत आपल्याकडे पाठविणार आहे. या अनुषंगाने मला मंत्री महोदयांना निदर्शनास आणून द्यावयाचे आहे त्यावरुन भ्रष्टाचार का वाढतो हे आपल्या लक्षात येईल. तसेच लोकांचा सहभाग या रेशनिंग व्यवस्थेत का होत नाही असेही दिसून येईल.

पुणे जिल्ह्याचेच उदाहरण पाहिले तर अध्यक्ष म्हणून माननीय पालकमंत्री श्री. अजितदादा पवार हे आहेत, त्यानंतर जिल्हाधिकारी श्री. चंद्रकांत दळवी हे उपाध्यक्षांचे पद भरलेले आहे. तसेच जी.आर.मध्ये म्हटल्याप्रमाणे जिल्हाधिकारी नामनिर्देशित करतील असे जिल्ह्यातील दोन विधानसभा सदस्य असून त्यात श्री. अशोक टेकवडे आणि श्री. बाळासाहेब शिवरकर यांचा समावेश आहे. पण जिल्हाधिकारी हेच उपाध्यक्ष दाखविल्यानंतर ते नामनिर्देशित करतील अशी एक व्यक्ती विधानपरिषद सदस्य असेल ती म्हणजे श्री. लक्ष्मणराव जगताप, हे ठीक आहे. पण विरोधी पक्षाचा

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ........

देखील एक विधानपरिषद सदस्य या समितीवर असावा अशी मी सूचना करते. परंतु जिल्हा परिषद पातळीवर विचार केला तर पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्या श्रीमती वैशाली आमणे, आणखी आश्चर्य म्हणजे श्रीमती शारदा शिंदे आणि जयश्री पोकळे अशा दोन सदस्या देखील या समितीत आहेत. प्रत्यक्षात त्यात एक महिला असावी असेही जी.आर.मध्ये म्हटले आहे. प्रत्यक्षात विरोधी पक्षाचे एक सदस्य श्री. शरद ढमाले हे सन्माननीय सदस्य होते पण ते आता सभागृहाचे सदस्य नसल्याने त्यांचे पद रिक्त आहे. तसेच जी.आर. मध्ये म्हटल्यानुसार या समितीवर एक महिला सदस्या असावी पण ते पदही रिक्त आहे. दुकानदारांच्या संघटनेचा प्रतिनिधी सदस्य पाहिजे पण ते पदही रिक्तच आहे, ग्राहक चळवळीशी संबंधित पद सुध्दा रिक्त आहे. अण्णा हजारे सुचवतील ती एक व्यक्ती असेही म्हटले असून ती जागा मात्र भरलेली आहे. त्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनाही या समितीमध्ये समाविष्ट केलेले आहे. म्हणजे जेथे जेथे इतर लोकांचा संबंध येत असेल तेथे नेमणुका करण्याच्या बाबतीत मात्र "हम करे सो कायदा" अशीच परिस्थिती असेल तर या दक्षता समित्यांचा हेतू काय आहे, हे स्पष्ट होत नाही. आमचे असेही म्हणणे नाही की, आमचेच सदस्य त्यात प्रत्येक ठिकाणी घ्यावेत. पण विरोधी पक्षाचा एक सदस्य असला पाहिजे. जिल्हा परिषदेत कोणी महिला सदस्य असली ती सुध्दा आपण घेऊ शकता, अशा छोट्या छोट्या पण महत्वाच्या गोष्टी आहेत त्याचा विचार होणे आवश्यक आहे.

महोदय, गृह विभागाच्या बाब क्र. 21 बाबत बोलताना मला असे सुचवावयाचे आहे की, नक्षलवादी चळवळींच्या अनुषंगाने मी सातत्याने शासनाचे लक्ष वेधलेले आहे. त्या अनुषंगाने मला असे सुचवावयाचे आहे की, शासनाने या नक्षलग्रस्त भागातून हुतात्मा झालेल्या जवान आणि पोलिसांच्या कुटुंबियांना मदत देणे अपेक्षित असते. पण त्यांच्या विधवा सांगतात की सन 2009 पूर्वी जरी त्यांचे पती या नक्षलग्रस्त भागातील कारवायांमध्ये दगावले असले तरी त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती तसेच वेगवेगळ्या योजनांमध्ये अशा कुटुंबांचा समावेश करण्यात आलेला नाही. या निमित्ताने माझी सूचना आहे की, शासनाने याबाबतीत अधिक तरतूद करण्याची गरज आहे. त्याचबरोबर मुंबईतील पोलिसांच्या अंगावर रेनकोट मी पाहिले पण पंढरपूर येथील वारीत जे पोलीस डयुटीसाठी आहेत त्यांच्या अंगावर मात्र मला रेनकोट दिसत नाहीत, ते रेनकोट न घालताच फिरतात.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

पोलिसांच्या संदर्भात मा.गृहमंत्र्यांनी आम्हा आमदारांना असे सांगितले होते की, आम्ही पुणे पोलिसांना आधुनिक शस्त्रास्त्रे देणार आहोत. परंतु पुणे पोलीस आयुक्तालयाने यासंदर्भात अनेक प्रस्ताव शासनाकडे दिलेले असतांनाही अद्यापपर्यंत पुणे पोलीस आयुक्तालयाला कोणतेही शस्त्र व केणतीही साधनसामुग्री मिळालेले नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 31 व 32, महसूल व वनविभागावर मी विचार व्यक्त करणार आहे. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व आपत्ती निवारण कर्मचा-यांना प्रशिक्षण.

सभापती महोदय, शिवडीमध्ये आताच वायुगळती झालेली आहे. अशा वेळेला आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण काय करते हा पीएचडीचा विषय होऊ शकेल. हे व्यवस्थापन ना त्यावेळी अस्तित्वात असते, ना त्याच्या अगोदर काय तयारी केलेली आहे याबाबत त्यांना कोणी विचारीत, आपत्ती आल्यावर, आपत्ती झाल्यानंतर अशा प्रकारची आपत्ती पुन्हा येऊ नये यासाठी काही सुध्दा प्रयत्न केले जात नाही. खरी जबाबदारी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची आहे.

सभापती महोदय, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, बाब क्रमांक 136 ते 142 यावर मी विचार व्यक्त करणार आहे. आमची अपेक्षा अशी होती घर कामगारांच्या संदर्भात सर्व व्यवस्था झ ाालेली असेल. कोल्हापूर, मुंबई व पुणे या ठिकाणी हजारो महिला येत असतात. त्यांच्या औषधोपचाराच्या संदर्भात अपेक्षा आहेत. कामगार कल्याण मंडळाने यासंदर्भात आम्हाला मदत करावी असे त्यांचे म्हणणे आहे परंतु आजपर्यंत घर कामगारांच्या संदर्भात कुठलीही व्यवस्था झ ाालेली नाही.

सभापती महोदय, विधी व न्याय विभाग, बाब क्रमांक 134 वर मी विचार व्यक्त करणार आहे. यामध्ये चिल्ड्रेन्स एडस् सोसायटीसाठी आपण व्यवस्था केलेली आहे विधी सल्लागार,समुपदेशनासाठी व्यवस्था आहे परंतु यासाठी अतिशय तुटपुंज्या स्वरुपात व्यवस्था करण्यात आलेली आहे. लिगल एडस् सर्व्हीसेस ॲथॉरीटीच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी जास्त माहिती घेतली तर आपल्याला दिसून येईल की, काही वर्षापूर्वी विधी सेवा प्राधिकरण किंवा कायदा सहाय्यक समिती अस्तित्वात होती. या समितीचा हेतू हा गरिबांना मोफत न्याय मिळावा असा होता. त्यामुळे ठिकठिकाणी लोक न्यायालये करणे, लोकांना कायद्याची माहिती मोफत

डॉ. नीलम गो-हे....

मिळण्यासाठी प्रशिक्षण देणे या कार्यक्रमास 1990 च्या सुमारास म्हणजे श्री. भगवती हे सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश होते तेव्हा त्यांनी अतिशय चांगली चालना दिली होती. आज हा कार्यक्रम कोठे गेलेला आहे हे शोधण्याची वेळ आलेली आहे. यामध्ये आपण अध्यक्ष म्हणून न्यायाधीशांची नियुक्ती केलेली आहे. परंतु न्यायाधीशांना लोकांमध्ये मिसळण्याच्या संदर्भात खूप मर्यादा येतात. तसेच न्यायाधीशांना पुरेसा वेळ देखील मिळत नाही. न्यायाधीश जरी अध्यक्ष असले तरी त्यासाठी निधीची तरतूद करुन प्रत्येक जिल्हयात किमान 10 तरी लोकन्यायालये केली पाहिजेत. कायद्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी महिला मोठया प्रमाणात इच्छुक आहेत. प्रत्येक ठिकाणी बचतगट झालेले आहेत, महिला मंडळ तयार आहेत परंतु त्यांना मार्गदर्शन करणारे कोणीही नाही. प्रत्येक तालुक्यामध्ये तरी कायद्याची किमान दोन प्रशिक्षण शिबिरे तरी झाली पाहिजेत असे टार्गेट त्यांना दिले व त्यांचा उपयोग करुन घेतला तर माझे मत असे आहे की, यामुळे पोलिसांचे जवळ जवळ निम्मे काम सोपे होईल. जेणेकरुन जनता पोलिसांकडून अपेक्षा न करता स्वत: कायद्याचा उपयोग करुन घेऊ शकेल. आपण विधी समुपदेशनाची व्यवस्था केली आहे त्याच बरोबर विधी सल्लागार आणि लिगल सर्व्हीसेस ॲथॉरिटी यांना अजून मजबूत केले पाहिजे याकडे मी आपले लक्ष वेधते व एवढे बोलून मी माझे विचार येथेच थांबवते.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 66 व बाब क्रमांक 79, सार्वजनिक बांधकाम या विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. महाराष्ट्र राज्य विकास मंडळाने हाती घेतलेल्या प्रकल्पासाठी रुपये 100 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदीनुसार मी फक्त दोन रस्त्यांचा उल्लेख करणार आहे. गोवा ते पनवेल पर्यंतचा रस्ता महामंडळाच्या मार्फत केला जाईल तसेच या ठिकाणी काही स्क्वेअर मीटरचे बांधकाम झालेले आहे अशी चर्चा ऐकावयास मिळालेली आहे. परंतु अजूनपर्यंत हा रस्ता दुपदरी झालेला नाही. या रस्त्याची गरज काय आहे हे सुध्दा मी सांगणार आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या जिल्हयातून हा पनवेल ते गोवा रस्ता जातो. सिंधुदुर्ग जिल्हा आणि गोवा राज्य हे दोन्हीही पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित केलेला आहे. आपण जेव्हां एखादा जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करतो तेव्हा त्या जिल्हयामध्ये इन्फ्रास्ट्रक्चर्स उभे करणे गरजेचे असते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.......

नॅशनल हायवे क्रमांक 17 हा एकपदरी आहे. सदर महामार्ग दुपदरी करणे आवश्यक आहे. तेव्हा आपण रूपये 100 कोटीतून 50 कोटी रूपयांची तरतूद नॅशनल हायवे क्रमांक 17 दुपदरी करण्यासाठी करावी अशी मी विनंती करीत आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला आहे. या जिल्ह्यातील छोटी-छोटी गावे मुख्य रस्त्याला जोडण्याचा प्रयत्न शासनाने केला पाहिजे. मी गेली दहा वर्षे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील वायंगणी ते तळाशील रस्ता व्हावा म्हणून पाठपुरावा करीत आहे. सदर रस्ता हा समुद्र सपाटीच्या मध्य भागावरून जातो. या रस्त्याच्या मध्येच वन विभागाचा काही भाग येतो. त्यामुळे वन विभाग तेथून रस्ता करण्यासाठी गेली 10 वर्षे परवानगी देत नाही. त्यामुळे सदर रस्त्याचे काम शासन कधी करणार आहे ? असा प्रश्न मी या निमित्ताने विचारीत आहे. सदर रस्ता ताबडतोबीने करण्यासाठी केंद्र शासनाकडून परवानगी आणून काम पूर्ण करावे अशी मी आपल्याला विनंती करते आणि माझे भाषण पूर्ण करते.

....................

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अॅड्.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी उभी आहे.

मी पान क्रमांक 22, बाब क्रमांक 28 वर बोलणार आहे. बीड जिल्ह्यातील शिरूर तालुका होऊन 11 वर्षे झाली आहेत. तेथे अद्यापि दुय्यम निबंधकाचे कार्यालय नाही. तसेच बीड जिल्ह्यातील उप जिल्हाधिकाऱ्यांच्या पदांसह अन्य पदे देखील रिक्त आहेत. ती भरण्यासंबंधी शासनाने ताबडतोब कारवाई करण्याची गरज आहे. तसेच पाटोदा तहसीलदार श्री.जाधव यांच्याकडे आष्टी आणि शिरूर या तालुक्यांचा चार्ज आहे. त्यामुळे त्यांना तीन तालुक्याकडे लक्ष द्यावे लागते. तेव्हा यासंबंधी देखील शासनाने निर्णय घेणे गरजेचे आहे. नुकतीच बीड जिल्ह्यामध्ये तलाठी पदासाठी परीक्षा घेण्यात आली. खुल्या संवर्गातील उमेदवारांना परीक्षेसाठी ऑर्डर देण्यात आली. मात्र, ओबीसींच्यासंबंधी काही तक्रारी आल्यामुळे त्यांना परीक्षेला बसण्यासाठी ऑर्डर देण्यात आली नाही. माझे असे म्हणणे आहे की, आपण संपूर्ण परीक्षा पद्धतीला स्थगिती द्यायला पाहिजे होते. एका संवर्गासाठी अनुमती देणे आणि दुसऱ्या संवर्गासाठी अनुमती न देणे हे बरोबर वाटत नाही. तेव्हा याकडे देखील शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर मी पान क्रमांक 12, बाब क्रमांक 12 संबंधी बोलणार आहे. बीड तालुक्यातील निजामकालीन अस्तित्त्वात असलेल्या पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत 76 गावे आहेत. त्यासाठी फक्त 17 पोलीसच आहेत. ही संवेदनशील गावे आहेत. त्यामुळे पोलीस बळ वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, प्रत्येक तालुक्यासाठी गृह विभागाच्या माध्यमातून लिगल अॅडव्हायझर्स निवडण्यात आले होते. सरकारी लिगल अॅडव्हायझर्सना कंत्राटी पद्धतीवर नियुक्त करण्यात आले आहे. त्यांची तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. काही लिगल अॅडव्हायझर्स् कोर्टात गेले होते. त्यांना कायम करण्याचा निर्णय कोर्टाने दिला व त्यांना क्लास-1 म्हणून घ्यावे असा देखील निर्णय दिला. पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. या लिगल अॅडव्हायर्झसची जनरल प्रॅक्टीस संपली आहे. तेव्हा शासनाने अपीलात न जाता कोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी करावी व त्यांना वर्ग-1 च्या पदावर नियुक्ती द्यावी अशी मी विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.उषा दराडे.......

सभापती महोदय, यानंतर मी सामाजिक न्याय विभागाच्या पान क्रमांक 152 वरील, बाब क्रमांक 159 वर बोलणार आहे. बीड जिल्ह्यात ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा सुरू करणे आवश्यक आहे. दरवर्षी ऊस तोड कामगार बीड जिल्ह्यातून स्थलांतर करीत असतात. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न नेहमी असतो. आज बीड जिल्ह्यामध्ये फक्त दोनच निवासी शाळा आहेत. या शाळांचा श्रेणीवाढ प्रस्ताव अनेक दिवसांपासून सामाजिक न्याय विभागाकडे प्रलंबित आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव ताबडतोबीने मंजूर करण्यात यावा अशी मी विनंती करीत आहे. तसेच, दोन निवासी शाळांचे शालेय पोषण आहाराचे रूपये 31.00 लाख थकले आहेत. सामाजिक न्याय विभागाकडे सदर प्रस्ताव प्रलंबित आहे. तो ही प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने एस.सी., एस.टी.च्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासंबंधीचा जी.आर.काढला आहे. मात्र व्हीजेएनटी व ओबीसीच्या मुलांना याचा फायदा होणार नाही. त्यामुळे व्हीजेएनटी व ओबीसीच्या मुलांसाठी देखील शिष्यवृत्तीची सोय उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने जी.आर.काढावा यावी अशी मी या निमित्ताने विनंती करीत आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ ST/ KTG/ SBT/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.. 18:00

ॲड.उषा दराडे..

बाब क्रमांक 106,पृष्ठ क्रमांक 113- जलसंपदा विभाग - बीड जिल्ह्याला मांजरा खोऱ्याचे पाणी मिळत नाही. तेव्हा हे पाणी देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा. तसेच गोदावरी खोऱ्यातील पाणी वाण आणि मांजरा खोऱ्यात टाकण्याचा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावा. दौंडवाडी क्रमांक 3, मांडवा, लेंडेवाडी, सारडगाव, बुटेनाथ कासारे हे साठवण तलाव ताबडतोब पूर्ण करण्यात यावेत. तसेच वंजारवाडी आणि बाभवगावची उंची वाढविण्याचा प्रस्ताव करावा. सिंदफणाची ऊंची वाढविण्यासाठी साडेसात कोटी रुपयांची निधी मिळूनही काम रखडले आहे ते ताबडतोब पूर्ण करण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 129, पृष्ठ क्रमांक 127, विधी व न्याय विभाग - माजलगावमध्ये ॲडीशनल गव्हर्मेंट प्लीडरच्या तीन जागा भरण्यासाठी मागील दोन वर्षापासून प्रयत्न सुरु आहे. विधी व न्याय विभागाने प्रस्ताव देखील मागविलेला आहे. परंतु जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे मागील वर्षापासून हा प्रस्ताव प्रलंबित आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी हा प्रस्ताव न पाठविल्यामुळे या जागा रिक्त आहेत. अंबेजोगाई येथे ॲडीशनल गव्हर्मेंट प्लीडरची एक जागा रिक्त आहे. ही जागा लवकरात लवकर भरण्यात यावी. परळी कोर्टाला इरिगेशन विभागाने जागा दिली, परंतु जागेचे रिपेअरींग झाले नसल्यामुळे परळीचे न्यायालय तेथे भरविता येत नाही. 55 लाख रुपये विधी व न्याय विभागाने खर्च करावेत की इरिगेशन विभागाने खर्च करावेत असा वाद असा निर्माण झाला आहे. तेव्हा विधी विभागाला विनंती आहे की, त्यांनी एक संयुक्त बैठक बोलावून निर्णय घ्यावा आणि ताबडतोब जागा रिपेअर करुन परळीचे न्यायालय सुरु करता येईल यादृष्टीने प्रयत्न करावा.

बाब क्रमांक 41, पृष्ठ क्रमांक 33 - रासायनिक खतांची सबसिडी पूर्ववत सुरु करण्यासाठी आणि ठिबक सिंचनाला 100 टक्के सबसिडी द्यावी यासाठी महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा. तसेच सेंद्रीय शेतीबाबत ताडबतोब धोरण जाहीर करावे. शेती विषय शाळेतील अभ्यासक्रमात अनिवार्य करावा. कापसाचे आयात-निर्यातीचे धोरण बदलावे आणि कोणत्याही परिस्थितीत कापसाला आणि ऊसाला मागील वर्षी मिळालेला भाव या वर्षीही देण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

बाब क्रमांक 58, पृष्ठ क्रमांक 44- शालेय शिक्षण - बीड जिल्ह्यातील केज तालुक्यामध्ये 8 शाळांना खेळाचे मैदान नाही, 8 शाळांना स्वच्छतागृहे नाहीत, 219 शाळांमध्ये सेवक नाहीत, फर्निचर नाही,पिण्याच्या पाण्याची सोय नाही.

शिरुर तालुक्यात सर्वशिक्षा अभियानामार्फत शालेय स्वच्छतागृहासाठी 50 लाख रुपये खर्च केले. परंतु काम इतक्या निकृष्ट दर्जाचे झाले की त्याठिकाणी आता एकही स्वच्छतागृह सुरु नाही.

अंबेजोगाई तालुक्यातील 7 शाळेत स्वच्छतागृहांचे बांधकाम झालेले नाही. 33 शाळेत पिण्याचे पाणी नाही, 13 शाळांचा पडझड झाली आहे.

केज, गेवराई, धारुर, परळी या तालुक्यात दिनांक 12 जून रोजी झालेल्या वादळी वाऱ्यात शाळेचे शेड उडून गेले. शाळेची मोठी पडझड झाली असे असताना गट शिक्षण अधिकाऱ्यांना शाळा दुरुस्तीचे प्रस्ताव अद्याप पाठविलेले नाहीत.

माजलगाव तालुक्यामध्ये 207 शाळांपैकी 123 शाळांमध्ये शौचालये नाहीत. 17 शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत. या संदर्भात शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. वरील सर्व बाबींकडे शासनाने तातडीने लक्ष घालून कारवाई करावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 136, पृष्ठ क्रमांक 133-उद्योग - सभापती महोदय, थोड्या वेळापूर्वी याठिकाणी सन्माननीय राज्यमंत्री उपस्थित होते. परंतु आता ते उपस्थित नाहीत. त्यांनी या संदर्भात एक बैठक देखील घेतली होती. दहिफळ वडमाऊली देवीच्या समोरच्या डोंगरावर 350 एकर गायरान जमीन उपलब्ध आहे. त्याठिकाणी कुसळ देखील उगवू शकत नाही. आता लिबांच्या वाडीच्या साठवण तलावाचे पाणी उपलब्ध आहे. तेव्हा त्याठिकाणी सौरऊर्जेचा प्रकल्प ताबडतोब उभा करण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

शिरुर आणि वडवणी हे दोन पुनर्निर्मित तालुके आहेत. वडवणी तालुक्याला अप्पर कुंडलिका धरणाचे तर शिरुर तालुक्याला सिंदफणाचे पाणी मिळत आहे. या दोन्ही ठिकाणी एम.आय.डी.सी.चे प्रकल्प घेण्याच्या दृष्टीने उद्योग विभागाने प्रयत्न करावा अशी मागणी करते आणि या मागण्यांना पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करते.

------ यानंतर श्री.गायकवाड..

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, 2010-2011 च्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, नगर विकास विभागाच्या बाब क्रमांक 65 ते 73 च्या संदर्भात बोलत असतांना मी नगर विकास विभागाच्या माननीय मंत्री महोदयांना एकच विनंती करणार आहे की, शालेय शिक्षण विभागाने दिनांक 12 जून 2010 रोजी एक शासन निर्णय काढला असून राज्यातील सर्व अनुदानित शाळातील शिक्षकांना व कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाची वेतन संरचना लागू केली आहे. नगरविकास विभागाने महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांना व कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भात जी.आर. काढला आहे परंतु महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळा,नगरपरिषदांच्या माध्यमिक शाळा आणि नगरपालिकांच्या माध्यमिक शाळा मधील शिक्षकांना व कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधी अजूनही जी.आर.काढलेला नाही. हा जी.आर. नगर विकास विभागाने काढावा की शालेय शिक्षण विभागाने काढावा यामध्ये वाद निर्माण झाला असल्यामुळे एक वर्ष होऊनही या बाबतीत आदेश काढण्यात आला नाही म्हणून गोरगरिबांची मुले ज्या शाळेत शिक्षण घेत आहेत आणि ज्या शाळेतील शिक्षक अधिक मेहनत घेऊन काम करीत आहेत त्या नगरपालिका ,नगरपरिषदांच्या शाळेतील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे म्हणून नगरविकास विभागाने शालेय शिक्षण विभागाशी चर्चा करुन या शिक्षकांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून तातडीने जी.आर. काढावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय,सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यासबंधी मला असे सांगावयाचे आहे की अंध अपंग विद्यार्थ्यांसाठी ज्या अनुदानित शाळा सुरु करण्यात आल्या आहेत त्या शाळेत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी तसेच त्या शाळेत काम करणा-या कर्मचा-यांसाठी शासनाकडून अनुदान दिले जाते.विद्यार्थ्यांनासुध्दा शैक्षणिक सुविधासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते,.या संस्थांना शासनाकडून वेतनेतर अनुदान दिले जाते इतकेच नव्हे तर शिक्षकांचे पगारसुध्दा शासनाकडून दिले जाते. अंध आणि अपंग शाळेतील एका वर्गामध्ये किती विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा यासाठी शासनाने विद्यार्थी संख्या ठरवून दिली आहे. त्यानुसार प्रत्येक वर्गातील इन्टेक कॅपेसिटी 40 निश्चित करण्यात आली आहे. अंध,अपंग वा कर्णबधिर मुलांना काही शाळा चालक शाळेत प्रवेश देऊ इच्छितात परंतु 40 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिला तर शासनाकडून अनुदान दिले जाणार

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ......

नाही असे शासनाचे धोरण असल्यामुळे व इन्टेक कॅपेसिटीची मर्यादा 40 पर्यतची असल्यामुळे अधिक विद्यार्थ्यांना समावून घेऊ शकत नाही. या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची संस्थां चालकांची मानसिकता आहे.त्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी तसेच शिक्षकांसाठी जो काही खर्च लागेल तो खर्च स्वत: सहन करण्याची तयारी संस्था चालकांची आहे. फक्त जादा प्रवेशाला शासनाने मान्यता देण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना विनंती केली होती आणि त्यांनीसुध्दा ही बाब तत्वत: मान्य केली होती की शासनावर जर आर्थिक बोजा पडणार नसेल तर ही मागणी मान्य करता येईल. या संदर्भात पुण्याच्या आयुक्त कार्यालयाकडे वर्षानुवर्षे प्रस्ताव प्रलंबित आहेत. या आयुक्ताने शासनाकडे फक्त शिफारसच करावयाची आहे. परंतु आयुक्त कार्यालयाकडून शिफारशीसह प्रस्ताव शासनाकडे पाठविले जात नाहीत. वाढीव विद्यार्थ्यांना मान्यता देण्यासंबंधी ज्या शाळांचे प्रस्ताव आलेले आहेत ते माननीय मंत्रिमहोदयांनी आयुक्तांकडून तातडीने मागवून घ्यावेत व त्याला मान्यता द्यावी. शासनावर आर्थिक बोजा पडणार नसल्यामुळे ही मागणी माननीय मंत्रीमहोदयांना तत्वत: मान्य केली होती.तेव्हा हे प्रस्ताव लवकरात लवकर मान्य करावेत अशी मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पूरक मागण्यांच्या निमित्ताने एक बाब मी मुद्दाम आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो .सभापती महोदय, एकात्मिक अपंग विकास योजनेतील शिक्षकांनी आपल्या मागण्यांसाठी केलेल्या धरणे आंदोलनाच्या वेळी आपण स्वत: आझाद मैदानावर आला होता. केन्द्र सरकारने एकात्मिक अपंग विकास योजना सुरु केली होती परंतु नतर ती योजना केन्द्र सरकारने बंद केली असून या योजनेची सर्व जबाबदारी राज्य शासनावर आणि सर्वशिक्षा अभियानावर टाकली आहे.या योजनेच्या अनुषंगाने सर्व जबाबदारी राज्य सरकारवर असल्यामुळे आणि केन्द्र सरकार कोणताही निधी देत नसल्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी तसेच या शाळांमध्ये करणा-या शिक्षकांसाठी आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारे वर्षानुवर्षे काम करणा-या शिक्षकांची संख्या 595 आहे. हे सर्व शिक्षक .12 तारखेपासून आझाद मैदानावर उपोषणाला बसले असून त्यापैकी एका शिक्षकांची प्रकृती बिघडली आहे तर एका शिक्षकाला हार्ट अटॅक आला होता परंतु त्यांच्या मागण्यांकडे शासन लक्ष देत नाही. गेल्या दीड वर्षापासून या शिक्षकांना पगारसुध्दा मिळालेला नाही..............

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

अन्य ठिकाणी खर्च करीत असतांना अंध अपंगांच्या शाळांमध्ये काम करणाऱ्या परमनंट, क्वॉलिफाईड शिक्षकांना पगार देण्यासंदर्भात आपण आर्थिक तरतूद करावी. आणि जर आपल्याला शक्य नसेल तर या शिक्षकांना अनुदानित शाळेमध्ये सामावून घेण्यासंदर्भात, त्यांचे समायोजन करण्यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या शिष्टमंडळाची माननीय शिक्षण मंत्र्यांबरोबर भेट झाली, त्यावेळी माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे,श्री. विक्रम काळे हे देखील होते. त्या संदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, तो निर्णय तातडीने घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शिक्षण सेवकांच्या मानधन वाढीबाबत अनेक वेळा चर्चा करण्यात आली. परंतु त्यासाठी आपण कोणतीही तरतूद केली नाही. त्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत मंत्रिमहोदयांनी जाहीर केले. त्यांना 3 हजार रुपयाऐवजी 7 हजार रुपये, माध्यमिकला 4 हजार रुपयाऐवजी साडे आठ हजार रुपये, उच्च माध्यमिकला 5 हजार ऐवजी साडे अकरा हजार रुपये मानधन वाढविणार आहेत. या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने शासनावर ताशेरे मारतांना Equal pay for equal work आपल्याला नाकारता येणार नाही असे म्हटले आहे. परंतु शासन त्यांना पूर्ण स्केल देत नाही. मानधनवाढीचा निर्णय जाहीर केला आहे, परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही, आणि त्यासाठी आर्थिक तरतूद देखील करीत नाही. शिक्षण सेवकांच्या मानधनवाढीचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. त्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, शिक्षकांना पगारासाठी शासनाकडून वेतन अनुदान मिळते.ग्रामीण भागातील व शहरी भागातील शाळांना वेतनेतर अनुदान न मिळाल्यामुळे त्या अडचणीत आल्या आहेत. विशेषत: ग्रामीण भागात व शहरी भागामध्ये मराठी माध्यमाच्या शाळा आहेत. आदिवासी भागामध्ये असलेल्या शाळांना स्वत:चे सोर्स ऑफ इन्कम नाही. अशा शाळांना वेतनेतर अनुदान दिले नाही तर त्यांची फार मोठया प्रमाणात दुर्दशा होण्यास सुरुवात झाली आहे. या शाळा वेतनेतर अनुदानाअभावी बंद पडत चालल्या आहेत, त्यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही, त्यांना फी देण्यास पालक वर्ग तयार नाही. अशा परिस्थितीत या शाळांचे वेतनेतर अनुदान गेल्या सात वर्षापासून बंद आहे. ते देण्याकरिता शासनाने घोषणा केली

DGS/ KGS/ ST/

श्री. रामनाथ मोते....

आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी 5 टक्के वेतनेतर अनुदान देण्याबाबत निर्देश दिले. परंतु त्या संदर्भात पुरवणी मागण्यांमध्ये उल्लेख करण्यात आला नाही. म्हणून या शाळांना वेतनेतर अनुदान देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारच्या अनुदानाच्या सहाय्याने या राज्यातील शिक्षकांना दर्जेदार प्रशिक्षण मिळाले पाहिजे. चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण घेऊन शिक्षकांनी आपल्या शाळेमध्ये जास्तीचे काम करावे या उद्देशाने केंद्र सरकारच्या मदतीने या राज्यामध्ये जिल्हा प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली. या जिल्हा प्रशिक्षण केंद्राच्या अत्यंत अद्ययावत इमारतीमध्ये शिक्षकांची प्रशिक्षणाची सोय करण्यात आली. त्यासाठी केंद्र सरकारने सुरुवातीला 1 कोटींपेक्षा अधिक निधी दिला. "डाएट" सारख्या संस्थेने 12 जिल्हयांमध्ये जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे काम सुरु केले. परंतु केंद्र सरकारकडून गेल्या तीन वर्षात थोडया प्रमाणात निधी मिळाल्यानंतर पुढील निधी न मिळाल्यामुळे ते काम बंद झ ाले आहे. ठाणे जिल्हयातील जव्हारसारख्या आदिवासी दुर्गम भागामध्ये स्थानिक आमदारांच्या प्रयत्नाने केंद्र देण्यात आले. त्याचप्रमाणे् अंबरनाथमध्ये रहाटोळी गावामध्ये प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले. त्यासाठी 29 लाख रुपये मिळाले. परंतु पुढील निधी न मिळाल्यामुळे इमारतीचे बांधकाम अर्धवट अवस्थेत आहे. त्यामुळे बांधकाम खाते पुढील काम करण्यास तयार नाही. तेव्हा शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या "डाएट" सारख्या संस्थांना त्यांचे कामकाज करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने आता पुढाकार घेऊन या संस्थेचे बाधकाम पूर्ण करण्यासाठी व त्यांना सुविधा मिळवून देण्यासाठी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. राज्य सरकारच्या प्रचलित धोरणानुसार साधारणपणे चार वर्षेपर्यंत कोणत्याही शाळेला किंवा वाढीव तुकडीला अनुदान मिळत नाही. आणि पाच वर्षानंतर 20 टक्के, 40 टक्के, 60 टक्के, 80टक् व 100 टक्के असे टप्प्या-टप्प्याने अनुदान मिळते. त्याचप्रमाणे आदिवासी भागातील शाळांना व तुकडयांना सुध्दा 5 वर्षानंतर त्यांचे मूल्यांकन प्राप्त झाल्यानंतर 100 टक्के अनुदान मिळते.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

शासन त्यांची यादी जाहीर करते. पण आज शासनाने अनेक तुकडयांना आणि शाळांना अनुदानास पात्र ठरवूनही पुरवणी मागण्यांमध्ये त्यांच्यासाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतूद केलेली नाही म्हणून या संदर्भात शासनाने गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या वतीने आयसीटी इन्फॉर्मेशन ॲन्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी ही योजना सुरु करण्यात आली. या योजनेंतर्गत सर्व जिल्हयांमधील काही शाळांना काही निधी देऊन त्यांचा संगणक कक्ष अद्ययावत करण्याचा निर्णय घेण्यात आला. पण गेल्या दोन-तीन वर्षामध्ये या शाळांना कोणत्याही प्रकारचा निधी मिळालेला नाही. अनेक शाळांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत. मध्यंतरी असे समजले की, या निर्णयाला स्थगिती देण्यात आलेली आहे. त्यानंतर असे समजले की, त्यावरील स्थगिती उठविण्यात आलेली आहे. या आयसीटी योजनेंतर्गत ज्या शाळांची निवड केलेली आहे आणि त्यांचा संगणक विभाग अद्ययावत करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्यासाठी लागणारा निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदिवासी भागातील शाळांना शासनाने वेतन अनुदान मंजूर केलेले आहे.त्यानुसार शिक्षकांचे वेतन सुरु झाले. दोन महिन्यांचे वतन दिले त्यानंतर एका वर्षापासून या शिक्षकांना वेतन मिळालेले नाही. आजही हे शिक्षक उपाशीपोटी काम करीत आहेत. ज्याला आपण टिकली लावली असे म्हणतो. त्याप्रमाणे आदिवासी भागातील शाळा शंभर टक्के अनुदानित आहत. पण त्या शाळांमधील शिक्षकांना केवळ दोन महिने वेतन दिले त्यानंतर पुढच्या वेतनासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. अनेक शाळांचे आणि अनेक शाळांमधील वाढीव तुकडयांचे हे प्रश्न आहेत. यासंदर्भात कोणतीही तरतूद या शासनाने केलेली नाही, ती करण्यात यावी, अशा प्रकारची विनंती मी या ठिकाणी करतो.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा सांगून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. पायभूतपेक्षा वाढीव पदांचा प्रश्न गेल्या चार वर्षापासून प्रलंबित आहे. 759 पदे आहेत. या पदासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. संख्याशास्त्र आणि गणित या विषयाचा कार्यभार वाढल्यामुळे वाढीव पदांना शासनाने मान्यता देण्याचे धोरण ठरविलेले आहे. 2007-2008 ची 991 पदे आहेत. 2008-2009 ची 346 पदे आहेत. यावर पाच कोटी पेक्षा जास्त निधी खर्च होण्याची





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

शक्यता नाही. हा पाच ते साडेपाच कोटी रुपये निधी या वाढीव पदांना मान्यता देऊन त्या शिक्षकांना वेतन देण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची पुरवणी मागणी या पुरवणी मागण्यांमध्ये नाही. याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

----

...3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिशन बाजोरिया (अकोला,वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महसूल विभागाची बाब क्रमांक 28 पान क्रमांक 22 वर मी बोलू इच्छितो.सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य दुय्यम निबंधक कार्यालयाद्वारे दरवर्षी 10 हजार कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. राज्यात सर्वदूर या कार्यालयांची दुरवस्था झाली आहे. अकोला येथील कार्यालय इमारत संगणीकृत तसेच रेकॉर्ड रुम करण्यासाठी तेथे अद्ययावत व मूलभूत सोई उपलब्ध करण्याकरिता तसेच महाराष्ट्रातील इतर इमारतींकरिताही भरीव तरतूद करण्यात यावी अशी मी विनंती करतो. दरवर्षी 10 हजार कोटी रुपयाचा महसूल एकमात्र या कार्यालयातून वसूल होतो परंतु या कार्यालयाची अवस्था अशी आहे की, खरेदी विक्री करणारे आणि इतर लोक बाहेर उभे असतात.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य बाब क्रमांक 28 वर बोलत आहेत. बाब क्रमांक 28 ही भूमि संपादनासाठी जे अधिकारी व कर्मचारी काम करतात त्यांच्या वेतनाच्या संदर्भातील आहे, असे असताना सन्माननीय सदस्य सब रजिस्ट्रार ऑफिसबद्दल बोलत आहेत. भूसंपादन आणि सब रजिस्ट्रेशन ऑफिसचा काय संबंध आहे ?

श्री. गोपीकिसन बाजोरिया : माननीय मंत्रिमहोदयांचा हरकतीचा मुद्दा बरोबर आहे पण भूमि संपादनाचाच तो एक भाग आहे. भूसंपादन केल्यानंतर रजिस्ट्रेशनसाठी सब रजिस्ट्रेशन ऑफिसमध्ये जावे लागते.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया ....

सभापती महोदय, यानंतर मला ऊर्जा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 136 वरील बाब क्रमांक 144 बाबत बोलावयाचे आहे. मूर्तिजापूर येथील उद्योगधंदे अत्यंत डबघाईस आले असून त्यांना 10 तास लोडशेडींगचा सामना करावा लागत असल्यामुळे त्यांना पर्यायी सोय म्हणून इंडस्ट्रीयल फिडर देण्यात यावा आणि त्याकरिता 50 लाख रुपये देण्यात यावेत अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मला शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 44 वरील बाब क्रमांक 58 बाबत बोलावयाचे आहे. या पुरवणी मागण्यांमध्ये क्रीडा विभागातर्फे कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही. क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट अशा खेळाडूंना त्यांचे कलाकौशल्य तसेच त्यांच्यातील खिलाडूवृत्ती कायम राहावी याकरिता त्यांना स्पर्धेकरिता देण्यात येणारा 40 रुपये भत्ता या महागाईच्या काळात अत्यल्प असून त्यांना देण्यात येणाऱ्या या अल्पशा दैनिक भत्त्यामध्ये वाढ करुन क्रीडापटूंचा भत्ता 40 रुपयांवरुन 200 रुपये करावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मला पाणीपुरवठा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 385 वरील बाब क्रमांक 269 बाबत बोलावयाचे आहे. पाणीपुरवठा विभागातर्फे ब्रिटीशकालीन तलाव दुरुस्तीसाठी, अकोला जिल्ह्यातील भीषण पाणी टंचाई दूर करण्यासाठी अनकवाडी, कापसी या तलावातील गाळ उपसा दुरुस्ती तसेच नवीन पाईप लाईनकरिता भरीव तरतूद करण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

श्री. रणजित कांबळे : गाळ उपसणे आणि पाणीपुरवठ्याचा काय संबंध आहे ?

श्री. गोपीकिसन बाजोरिया : गाळ उपसल्यानंतर पाईप लाईन टाकली नसेल तर काय उपयोग होणार ? माननीय मंत्रिमहोदयांनी कृपया मला डिस्टर्ब करु नये.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ज्या तलावाचा उल्लेख करीत आहेत ती बाब नगरविकास विभागाची आहे. नगरविकास विभागावरील मागण्यांच्या वेळी त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी बोलावे. कापशी तलाव कोणाच्या ताब्यात आहे ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया : तो तलाव महापालिकेच्या ताब्यात आहे.

श्री. रणजित कांबळे : मग आपण नगरविकास विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये त्याबाबत बोलावे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, काही माननीय मंत्रिमहोदय हसत आहेत. आपण त्यांना समज द्यावी.

**तालिका सभापती** ( श्री. चंद्रकांत पाटील ) : सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी आपले भाषण पुढे चालू करावे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, सभागृहामध्ये काय चालले आहे ? आपण माननीय मंत्रिमहोदयांना समज द्यावी आणि मला संरक्षण द्यावे. सभापती महोदय, यानंतर मला गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 13 वरील बाब क्रमांक 15 बाबत बोलावयाचे आहे. अकोला येथील दक्षतानगर पोलीस वसाहत दुरुस्तीकरिता तरतूद करण्यात आलेली नाही. अकोला येथील पोलीस वसाहत अतिशय जीर्ण झालेली आहे. त्या पोलीस वसाहतीमध्ये राहणारे पोलीस कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना धोका निर्माण झालेला आहे. तरी दक्षतानगर पोलीस वसाहतीकरिता भरीव तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करुन माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 5 वरील बाब क्रमांक 4 बाबत बोलणार आहे. महाराष्ट्रामध्ये मोडी लिपीत बरीच डॉक्युमेंट्स आहेत. प्रत्येक तालुक्याला किंवा प्रत्येक जिल्ह्यामध्ये मोडी लिपीमध्ये जे पेपर्स आहेत ते वाचण्यासाठी माणसे उपलब्ध होत नाहीत. माझी या माध्यमातून शासनाला अशी विनंती आहे की, मोडी लिपीतील सर्व दस्तऐवज मराठीमध्ये करुन द्यावीत. आम्ही कणकवलीमध्ये हा प्रयोग केला. आमच्या फंडातून त्यासाठी पैसे दिले. राज्यात असणारे मोडी लिपीतील सर्व दस्तऐवज मराठीत करण्यासाठी शासनाने तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 7 वरील बाब क्रमांक 10 बाबत बोलावयाचे आहे. विमानतळाच्या विस्ताराच्या संदर्भात ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळाच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी मागच्या वेळी असे उत्तर दिले होते की, हे विमानतळ दोन वर्षात पूर्ण होईल. त्यासंदर्भात सद्य:स्थिती काय आहे याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

यानंतर मी पृष्ठ क्र.7 वरील बाब क्र.11 वर बोलतो. या निवडणूक कर्मचा-यांनी 16-16 वर्षे काम केलेले आहे त्यांना कायम केले जात नाही. ते 16 वर्षे तात्पुरत्या स्वरुपात काम करीत असल्यामुळे त्या कर्मचा-यांबाबत शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

यानंतर मी पृष्ठ क्र.23 वरील बाब क्र.30 वर बोलणार आहे. नैसर्गिक आपत्तीसाठी ही तरतूद केलेली आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये पूर्ण घर पडले तर 4,800 व अंशत: पडले तर 2,400 रुपये नुकसान भरपाई दिली जाते. मुळात नैसर्गिक आपत्तीत घर पडले तर शेतक-यांचे खूप नुकसान होते. म्हणून हा निकष बदलावा. त्यांना जास्तीत जास्त मदत कशी देता येईल याबाबत शासनाने सुधारणा करावी अशी मी विनंती करतो.

यानंतर पृष्ठ क्र.33, बाब क्र.25 वर मी बोलतो. वन विभागाच्या अंतर्गत ही मागणी केलेली आहे. वन संज्ञेखाली कोकणातील बरीच जमीन गेलेली आहे. विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हयातील 68 हजार हेक्टर जमीन वन संज्ञेखाली गेली आहे. त्यामुळे पाटबंधा-याचे प्रकल्प अडकले आहेत. रस्ते व सार्वजनिक सुविधांची कामे होत नाहीत. याबाबत शासनाने फेर विचार केला आहे. त्याप्रमाणे शासनाने सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. यासाठी माननीय वन मंत्र्यांनी जास्त लक्ष द्यावे. हे प्रतिज्ञापत्र दाखल करुन दीड वर्षे झाले आहे, आज त्याची काय परिस्थिती आहे ते सांगितले पाहिजे. शासनाने वन खात्याच्या अडचणीचा प्रश्न निकालात काढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी जंगली हत्ती, माकडे आणि रानडुक्कर व गवे या वन्यप्राण्यांचा विषय मांडला आहे. हे वन्यप्राणी शेतीचे, घरांचे व बागायतीचे नुकसान करीत आहेत. शासनाने हत्तीने केलेल्या नुकसानीची भरपाई दिलेली आहे. त्याप्रमाणे इतर वन्यप्राण्यांनी केलेल्या नुकसानीची भरपाई द्यावी अशी विनंती करतो.

यानंतर पृष्ठ क्र.364 वरील बाब क्र.233 वर मी बोलतो. सहकार व पणन विभागाची ही मागणी आहे. शासनाने सिंधुदुर्ग जिल्हयात 1994 साली आंब्यासाठी महामँगो प्रकल्प व केळीसाठी महाबनाना प्रकल्प सुरु केला होता. या प्रकल्पात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्यामुळे सहकार कायद्याच्या कलम 83 अन्वये चौकशी झाली होती. परंतु संबंधितांविरुध्द अद्याप कोणतीही कारवाई

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.राजन तेली....

झालेली नाही. हा विषय मी उपस्थित केल्यावर दोन महिन्यात कारवाई केली जाईल असे माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिले होते, त्याची पूर्तता करण्यात यावी.

राज्यामध्ये सर्व जिल्हयात सहकारी बँका आहेत. या बँकांमार्फत साखर कारखान्यांना कर्ज दिले जाते, त्या कर्जासाठी शासन हमी घेते. त्यामुळे ब-याच जिल्हा बँका अडचणीत आल्या आहेत. त्यामुळे त्या बँका एनपीएमध्ये जातात. अशा वेळी एखादे सन्माननीय सदस्य त्या बँकेबाबत प्रश्न विचारतात आणि बँकेवर ताशेरे ओढतात. म्हणून शासनाने जेवढया रकमेची हमी घेतलेली आहे ती कशी देता येईल यासाठी शासनाने विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर पृष्ठ क्रमांक 134 वरील उद्योग खात्याच्या मागणीवर बोलत आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात ब-याच खाणी आहेत. काही खाणी 25 वर्षासाठी लिजने दिल्या आहेत. परंतु त्या जागेवर अद्यापपर्यंत काहीच केलेले नाही. त्यांनी त्या खाणी भाडेपट्टयाने दिल्या आहेत. अशाप्रकारे त्या लोकांनी शासनाचा महसूल बुडविला आहे. म्हणून जे लोक तेथे काही काम करीत नसतील तर त्यांचे लिज रद्द करावे आणि नवीन लिज निर्माण करावे.

यानंतर मी पृष्ठ क्र.34, बाब क्र.43 वर बोलतो. कापसासाठी विकास कार्यक्रम राबविण्यासाठी ही मागणी केलेली आहे. विदर्भ, मराठवाडा व खानदेशामध्ये हा कार्यक्रम राबविला जाणार आहे. कोकणामध्ये मोठया प्रमाणावर फळफळावळ आहे. आंबा, काजू, फणस या फळांचे उत्पादन जास्त होते. त्याच्यावर कृषी विभागाने संशोधन केले पाहिजे. फक्त 20 टक्के फळांवर प्रक्रिया केली तरी शेतक-यांना 1 हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. कापूस व ऊसावर प्रक्रिया करावी आमचे काही म्हणणे नाही.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KGS/ ST/ 18:30

श्री. राजन तेली पुढे सुरु...

त्याचप्रमाणे कोकणातील फळांवर आधारित फळप्रक्रिया प्रकल्प उभारण्याचा विचार आपण करणार आहात की नाही ? माननीय कृषी मंत्री सभागृहामध्ये हजर आहेत. त्यांनी कोकणाच्या संदर्भातील राज्य शासनाचे धोरण जाहीर करायला पाहिजे. कोकणातील आंबा, काजू, कोकम, इत्यादी विविध प्रकारच्या फळपिकांबाबत सभागृहामध्ये चर्चा झाली. कोकणातील 6 लाख टन काजूची बोंडे वाया जातात. त्याच्यावर प्रक्रिया करुन त्यापासून उत्पन्न मिळू शकते. याबाबतीत शासनाने धोरण जाहीर केले पाहिजे. कोकणातील अर्थ व्यवस्था ही फळावर अवलंबून आहे याचा शासनाने विचार केला पाहिजे.

बाब क्रमांक 58. पृष्ठ क्रमांक 44. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकणाच्या सर्वांगीण विकासाच्या संदर्भात नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. कोकणासाठी एसएससी आणि एचएससी बोर्ड स्थापन करण्याच्या घोषणा माननीय मंत्री महोदयांनी 2009मध्ये केल्या. त्यांनी हेही सांगितले की, 2009मध्ये एसएससी आणि एचएससी बोर्डाच्या परीक्षा होतील. अशा प्रकारच्या घोषणा एक नाही तर दोन दोन मंत्र्यांनी केल्या. असे असताना त्याबातीत कोणतीही कार्यवाही शासनाने केलेली नाही. मग या सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केव्हा करणार हे माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे.

सभापती महोदय, शिक्षण सेवकांच्या बाबतीत मला सांगायचे आहे की, या शिक्षण सेवकाचे मानधन अवघे तीन हजार रुपये आहे. सिंधुदुर्ग मधील शिक्षण सेवक नंदूरबारमध्ये आणि नंदूरबारमधील शिक्षण सेवक सिंधुदुर्ग, रत्नागिरीमध्ये पाठविले जातात. खरे तर या शिक्षण सेवकांची नेमणूक स्थानिक पातळीवर केली पाहिजे. आदिवासी भागातील शिक्षण सेवक कोकणामध्ये आणि कोकणातील शिक्षणसेवक आदिवासी भागामध्ये नेमला तर बोलीभाषेमुळे अध्ययन आणि अध्यापनावर त्याचा परिणाम होतो हेही दुर्लक्षित करुन चालणार नाही. तेव्हा पूर्वी प्रमाणे जसे जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली निवड मंडळ होते तसे निवड मंडळ असावे जेणेकरुन स्थानिक लोकांना नोक-या मिळतील आणि त्यांच्यावर अन्याय देखील होणार नाही. आपण शिक्षण सेवकाला तीन हजार रुपये मानधन देऊन शिक्षणाचा दर्जा सुधारला पाहिजे असे म्हणतो. त्यासाठी जिल्हास्तरावर निवड मंडळ करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी विभागातील शिक्षणसेवक

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

सिंधुदुर्ग किंवा रत्नागिरीमध्ये आणि रत्नागिरी, सिंधुदुर्ग मधील शिक्षण सेवक नंदूरबार, गडचिरोली अशा आदिवासी भागामध्ये पाठविला जातो. विभागनिहाय बोली भाषेतील फरकामुळे शिकण्या आणि शिकविण्याच्या पध्दतीमध्ये फरक पडतो आणि त्यामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारण्याऐवजी घसरतो. तेव्हा पूर्वी प्रमाणेच जिल्हास्तरावर निवड मंडळे करुन उमेदवारांची निवड करावी अशी मी मागणी करीत आहे.

बाब क्रमांक 110, पृष्ठ क्रमांक 114. जलसंपदा विभाग. जलसंपदाच्या बाबतीत कोकणावर सातत्याने अन्याय होत आहे. संपूर्ण राज्याचा विचार करता मराठवाडा आणि विदर्भामध्ये 16 टक्के सिंचन झालेले आहे आणि कोकणामध्ये फक्त 5 ते 5.5 टक्के सिंचन झालेले आहे. तिलारी, काळंबा या प्रकल्पांची कामे 25 वर्षापासून सुरु आहेत. प्रकल्पग्रस्तांना नोक-या नाहीत. त्यांना जमिनी विकता येत नाहीत. कोकणाला जाहीर केलेल्या पॅकेजचे पैसे देखील पुरेसे दिलेले नाहीत. ठेकेदारांची बिले द्यावयाची आहेत. अशी एकंदर परिस्थिती आहे. तेव्हा कोकणातील सिंचनाच्या बाबतीत सरकार नेमके काय करणार आहे ? सिंचनासाठी किती तरतूद केलेली आहे ? हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

बाब क्रमांक 134, पृष्ठ क्रमांक 128. विधी व न्याय विभाग. सभापती महोदय, दोडामार्ग येथे न्यायालयासाठी 4 कोटीची तरतूद केल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. कुडाळ आणि वैभववाडी येथील न्यायालयाच्या इमारतीसाठी देखील शासनाने निधी द्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय 12 ऑक्टोबर 2009मध्ये ढगफुटी झाली आणि कोकणातील बरीचशी घरे जमीनदोस्त झाली. शासनाने घरांसाठी 2400 रु. आणि 4800 रु. या प्रमाणे मदत जाहीर केली. या मदतीमध्ये घराची कोणत्याही प्रकारची दुरुस्ती होत नाही. सिध्दीविनायक ट्रस्टच्या माध्यमातून या लोकांना मदत देता येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले होते. यासंदर्भात 2 कोटी 75 लाख रुपयाचा प्रस्ताव आलेला आहे. हा प्रस्ताव विधी व न्याय विभागामध्ये धूळ खात पडलेला आहे.

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.........

त्याबाबतीत निर्णय झाला तर सर्वसामान्य गोरगरीब शेतकऱ्यांना न्याय मिळेल अशा प्रकारची या माध्यमातून विनंती करतो.

सभापती महोदय, सन्माननीय वन राज्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. कोकणातील माकडांचा, हत्तींचा, रानडुक्करांचा मोठया प्रमाणात उपद्रव होत आहे. कोकणातील अनेक प्रकल्प वनसंज्ञेमुळे रखडले आहेत. सा.बां.विभागाने रस्त्याचे काम सुरु केले तर वन विभागाकडून हरकत घेतली जाते. सन्माननीय राज्यमंत्र्यांनी याबाबतची जबाबदारी स्वीकारुन केंद्र सरकारच्या वन खात्याकडे ही बाब उपस्थित करावी. गेली दोन वर्षे वनसंज्ञेची बाब या सभागृहात आम्ही सातत्याने मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत. डीएफओ आणि आरएफओ यांनी जागेवर बसून अहवाल तयार केला. त्यांना वाचविण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी 10-12 वर्षे वाया घालविली आहेत. या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून या प्रश्नाचा जरुर विचार करावा आणि कोकणातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशा प्रकारची विनंती करतो आणि मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आपल्याला मनापासून धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

-------------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्याठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-18, पृष्ठ क्रमांक-15 वर गृह विभागाने केंद्रीय राखीव पोलीस दलाला मूळ पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी पूरक मागणी सादर केली आहे. महाराष्ट्रातील काही जिल्हयांमध्ये नक्षलवाद अतिशय मोठया प्रमाणात वाढला आहे. माझी राज्य शासनाला विनंती आहे की, प्रत्येक जिल्हयात गस्त घालण्यासाठी एका हेलिकॉप्टरची व्यवस्था केली तर नक्षलवादी चळवळीवर नियंत्रण करणे सोपे होईल. नक्षलवादी रात्रीच्या वेळी फिरणारे निशाचर आहेत. त्यांच्यावर नियंत्रण आणायचे असेल तर नक्षलग्रस्त जिल्हयांमध्ये रात्रीच्या वेळी हेलिकॉप्टरच्या माध्यमातून गस्त घालण्याची आवश्यकता आहे, यादृष्टीने शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक-22, पृष्ठ क्रमांक-15 वर 15 कोटी रुपयांची पुरवणी मागणी प्रस्तावित केली आहे. मागील दोन तीन अधिवेशनात मी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. महाराष्ट्रातील होमगार्डची स्थिती भयावह झालेली आहे. होमगार्ड वाकले आहेत, वाळले आहेत. हवेचा झोत आला तरी हलतात. त्यांना फक्त काठीचा आधार मिळतो. अशा स्थितीत होमगार्ड आपले जीवन जगत आहेत. त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे. सन्माननीय गृहराज्यमंत्री हे धिप्पाड आहेत. त्यांनी होमगार्डना आधार द्यावा. कर्नाटक राज्याने होमगार्डना कायमस्वरुपी शासन सेवेत सामावून घेतले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने होमगार्डना कायमस्वरुपी सेवेत सामावून घ्यावे अशी माझी विनंती आहे. हुरडा खात असताना त्यांना आदेश प्राप्त होतात. अमुक अमुक ठिकाणी दंगल होण्याची शक्यता असल्यामुळे परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी हातात काठी घेऊन निघा असे होमगार्डना सांगितले जाते. त्यांच्या शर्टाला गुंडी नसते, त्यांची विजार फाटलेली असते. अशा स्थितीत होमगार्ड काम करीत आहेत. हे चित्र महाराष्ट्राच्या गृहखात्याला शोभनीय नाही हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 19, पृष्ठ क्रमांक 14 वर सांगली जिल्हयामध्ये पोलीस प्रशिक्षण शाळा उभारण्यासाठी पूरक मागणी सादर केली आहे. या प्रशिक्षण शाळेतील प्रशिक्षणार्थी मुले संस्कारक्षम होतील अशी अपेक्षा आहे. पोलीस खात्यातील जे सन्माननीय आयपीएस अधिकारी आहेत त्यांनी काय सांगितले? सांगलीच्या एस.पी.चे काय उद्‌गार आहेत? राज्य शासन याची





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ ST/ 18:35

प्रा.सुरेश नवले.........

गांभीर्याने नोंद घेणार आहे की नाही? पुण्याचे पोलीस आयुक्त माननीय गृहराज्यमंत्र्याबद्दल काय उद्गार काढतात? आपण शांतपणे ऐकून घेता. मायावतीचा आवाज ऐकल्यानंतर अधिकारी चळचळ कापतात. इतका त्यांचा दरारा निर्माण झालेला आहे. तशा प्रकारचा दरारा आपण महाराष्ट्रात निर्माण करणार आहात की नाही? अधिकाऱ्यांचे हे जे उद्गार आहेत त्याबाबत गृहविभाग गांभीर्याने लक्ष घालणार आहे की नाही? ही लोकशाही आहे.

नंतर 4एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .......

नोकरशहांचे नाही आणि नोकरशहावरती वचक हे आयपीएस अधिकारी विसरत आहेत. म्हणून माझ ी विनंती आहे की, राज्य शासनाचे एक मॉरल इम्प्रेशन, नैतिक दरारा या अधिकाऱ्यांवर असायला हवा पण तोच आपण गमावून बसलो की काय अशी शंका येते. विधानपरिषदेच्या या सभागृहात ज्यावेळी आपण चर्चा करतो, सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात की अशा अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार तेव्हा माननीय गृह मंत्री सांगतात की, संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासा मागितलेला आहे. पण असा खुलासा किती दिवस ? एक-दोन-तीन दिवस झाले तरी येत नाही. वास्तविक 24 तासाच्या आत खुलासा येऊ शकतो पण त्यांच्यावर वचक पाहिजे. म्हणून नैतिक बळ वाढविण्याचा शासनाने प्रयत्न करावा आणि थोडा तरी मायावतींचा आदर्श याबाबतीत घेतला तर काही बिघडणार नाही, दुसऱ्या बाबतीत घ्या असे मी म्हणणार नाही, तो आदर्श घेऊ नये.

बाब क्र. 4, पृ.क्र.5, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, शासनाने स्वतंत्र मराठी विभाग तयार केला त्याबद्दल मी शिक्षण खात्याचे अभिनंदन करतो, धन्यवाद देतो. एके काळी या महाराष्ट्रामध्ये ज्ञानेश्वरांनी अपेक्षा व्यक्त केली होती की, "माझी मराठाचिये बोलु कौतुके, परि अमृतातेही पैजा जिंके, ऐसी अक्षरे रसिके मिळविन". आता ऐसी अक्षरे रसिके मिळविण्याचा प्रयत्न शासनाने करावा अशी माझी विनंती आहे. एकदा पाणिनी ऋषी तपश्चर्या करण्यासाठी बसले होते. तेव्हा महादेवाने तांडव नृत्य करुन डमरु वाजविला. महादेव फक्त दोन प्रसंगात डमरु वाजवित होते. एक म्हणजे चिडल्यानंतर आणि दुसरे म्हणजे खूष झाल्यानंतर. पण पाणिनी हे तंत्रशूध्द अभ्यास करणारे ऋषी होते त्यांच्या तपश्चर्येवर खूष होऊन महादेवाने डमरु वाजविला आणि त्यातून 14 सुत्रे बाहेर पडली. ती 14 सूत्रे म्हणजे अ इ उ ण् ऋ लृ क् ए ओ ड. ऐ औ च् ह य व र ट ल ण् य म ड. ण न म झ भ ळ् त्र् घ ढ घ ष् ज ब ग ड द श ख फ छ ठ थ च ट ते व् क प य् शे ष स र् ह ल ही 14 सुत्रे संस्कृत आणि मराठी भाषा मिळून जी देवनागरी बाहेर पडते त्या भाषेतून आली. अशा प्रकारे मराठीच्या विकासासाठी, देवनागरीच्या विकासासाठी मंत्री महोदयांनी स्वतंत्र विभाग तयार केला त्याबद्दल मंत्री महोदयांचे विशेषत: आमच्या शिक्षण विभाग सांभाळणाऱ्या झाशीच्या राणी प्रा. फौजिया खान यांचेही मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ ST/ KGS/ 18:40

प्रा. सुरेश नवले .......

बाब क्र. 10, पृ.क्र. 7 मध्ये ओझर विमानतळाचा विस्तार करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. या निमित्ताने माझी विनंती आहे की, आमचा बीड जिल्हा हा मध्यवर्ती भाग आहे, मराठवाड्याचा मध्यबिंदू आहे. त्यात उस्मानाबादला विमानतळ आहे, माननीय विलासराव देशमुख यांच्या लातूरला विमानतळ आहे, औरंगाबादला विमानतळ आहे पण बीडमध्ये मात्र अद्यापही विमानतळ नाही. बीड जिल्ह्यातील लोकांनी ढगामधून जायचे हे मात्र आम्हाला न पटण्यासारखे आहे. म्हणून राज्यशासनाला माझी विनंती आहे की, आमचे माननीय महसूल राज्य मंत्री श्री. प्रकाश सोळंके हे बीड जिल्ह्याचेच आहेत त्यांनी तरी बीडला विमानतळ करण्याचा प्रयत्न करावा. कारण जटायूचे पंख सीतेला पळवून नेणाऱ्या रावणाला विरोध करीत असताना बीडमध्येच पडले असा इतिहास आहे. म्हणून माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांना माझी सूचना आहे की, बीड मधील विमानात दोन तीन वर्षानंतर का होईना आपल्याला बसता यावे म्हणून तरी राज्यशासनाने प्रयत्न करावा, अशी आग्रहाची विनंती मी शासनाला करणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ ST/ 18:45

प्रा. सुरेश नवले .....

सभापती महोदय, बाब क्रमांक 32, पृष्ठ क्रमांक 24, महसूल विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. महाराष्ट्राचे माननीय महसूल मंत्री श्री. राणे साहेब तसेच मा. महसूल राज्यमंत्री श्री. सोळंके यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. बीड जिल्हयात आणि इतरत्र वर्ग 3 व वर्ग 4 च्या कर्मचा-यांच्या जागा भरण्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शीपणा शासनाने दाखविलेला आहे. याबाबत माननीय महसूल मंत्री श्री. राणेसाहेब तसेच मा. महसूल राज्यमंत्री श्री. सोळंके यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. अशाच प्रकारची पारदर्शक भरती महाराष्ट्रात व्हावी, अशी मी अपेक्षा करतो. काही ठिकाणी उप जिल्हाधिका-यांच्या जागा रिक्त आहेत, त्या त्वरीत भरण्याचा निर्णय घ्यावा, अशी आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 33, पृष्ठ क्रमांक 25, वर विचार व्यक्त करणार आहे. बीड जिल्हयात अनेक ठिकाणी डोंगर नजरेस पडतात. या ठिकाणी साधारणत: एक ते दीड टक्के सुध्दा वृक्षारोपण झालेले नाही. बीड जिल्हयाच्या लोकसंख्येच्या किमान 10 पट प्रत्येक वर्षी वृक्षारोपण झाले पाहिजे, अशी शासनास विनंती आहे. ज्या संस्था वृक्षारोपण करतील त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे. ब-याच वेळा अधिकारी हे फोटोसाठी वृक्षारोपण करतात व तिस-या दिवशी लावलेले रोप जळून जाते व तो फोटोही रद्दीत जाऊन पडते. त्यामुळे वृक्षारोपण करण्यासाठी शासनाने सेवाभावी संस्थांना प्रोत्साहन द्यावे, अशी आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 109, पृष्ठ क्रमांक 114, धामापूर लहान पाटबंधारे तलावासाठी 5 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मी दोन-तीन अधिवेशनामध्ये बीड जिल्हयातील टुकुर प्रकल्पाच्या संदर्भात विचार मांडले होते व त्यासंदर्भात जलसंपदा मंत्री श्री. विजय वडेट्टीवार यांनी आश्वासन दिले होते की, पुढील अधिवेशनाच्या अगोदर टुकुर प्रकल्प सुरु करण्यात येईल. या प्रकल्पास तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी मिळालेली असतांना सुध्दा या प्रकल्पाच्या कामास सुरुवात झालेली नाही. म्हणजे साखरपुडा झाला, टिळाही झाला, आता लग्न कधी होईल आणि माळ गळयात कधी पडेल या अपेक्षेने वधू आणि वर बोहल्यावर उभे राहिलेले. अशी अवस्था या प्रकल्पाच्या बाबतीत होऊ नये म्हणून तेथील जनतेचे अपेक्षा सार्थ करावी, अशी माझी आग्रहाची विनंती आहे. या ठिकाणच्या 12-13 गावच्या बेकार फौजेला काम मिळेल त्यामुळे हा टुकुर प्रकल्प होणे आवश्यक आहे. तशा प्रकारचे लेखी पत्र मी आजच माननीय श्री. अजित पवार साहेबांना दिलेले आहे. त्यामुळे टुकुर प्रकल्पाची गांभीर्याने दखल घ्यावी . 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

सभापती महोदय, बाब क्रमांक 43, पृष्ठ क्रमांक 34, वर माझे विचार व्यक्त करणार आहे. कापूस विकासाकरिता मुळ तरतूद 4 कोटी रुपयांची आहे. महाराष्ट्रात मोठया प्रमाणात शेततळी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. पूर्वी 5 लाख पर्यंतची मेण कापडाची शेततळी केली जात होती परंतु आता मेण कापडाचे तळे यामधून वगळण्यात आलेले आहे. महाराष्ट्राला टँकर मुक्त करावयाचे असेल तर माझी राज्य शासनाला विनंती आहे की, मेण कापडाचे शेततळे मोठया प्रमाणात केले पाहिजे. या मेन कापडाच्या शेततळयात मोठया प्रमाणात पाणी राहत असते. महाराष्ट्राला वाचविण्यासाठी मेन कापडाच्या शेततळयाची मोहिम ही चळवळ झाली पाहिजे. ही चळवळ राज्य शासनाने मोठया प्रमाणात वाढवावी, असा आग्रह मी करणार आहे. शेततळयाची चळवळ मोठया प्रमाणात राबवली तर महाराष्ट्रातील एकाही गावात टँकर लावण्याची आवश्यकता पडणार नाही व प्रत्येक गावामध्ये पाणी दिसेल, प्रत्येक गावात शेततळे दिसेल आणि तळयातील पाणी घेता येईल. असे म्हटले जाते की,

"पाय पडता पाण्यात, पाणी शहारल होतं, लई शरमल होतं, भारी वरमल होतं"

आता पाण्यामध्ये पाय टाकण्यासाठी आमच्याकडे पाणी नाही, शेत तळे नाही, वरमले पाहिजे,लाजले पाहिजे त्यामुळे माननीय भास्करराव कोणाला लाज नाही हा मोठा प्रश्न आहे. पाण्यामध्ये पाय पडावे यासाठी तरी प्रयत्न करावा. ग्रामीण भागातील शेतकरी शेततळयासाठी आतुर आहे, शेततळे व्हावेत अशी त्याची अपेक्षा आहे. आमचा बीड जिल्हा हा अवर्षणप्रवण क्षेत्र आहे. मंत्री महोदयांच्या तालुक्यात पाटाचे पाणी आहे, बीड तालुक्यात पाटाचे पाणी नाही. सगळा डोंगर पट्टा आहे. आमच्या भागातील लोक ऊस तोडण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रात जात असतात. पाचटामध्ये त्यांची मुले पडलेली असतात, मुलांकडे लक्ष देण्यास आईला वेळ नसतो. काम मिळाले नाही म्हणून घराकडे परत फिरणारा मराठी माणूस, अंगावरील जीर्ण झालेल्या वस्त्रांची दुपटी करुन ती तरी मुलांच्या अंगाखाली अंथरता येतील का याची विवंचना वाहतो. या विवंचनेत आपण सहभागी व्हावे व त्याला आधार द्यावा, एवढी विनंती करतो व येथेच थांबतो.

-----

यानंतर श्री. भारवि...

अधुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे. मी पान क्रमांक 141 वरील ग्रामविकास विभागाच्या बाब क्रमांक 148 वर बोलणार आहे.

ग्रामविकास या कार्यक्रमातून जिल्हा परिषदा, पंचायत समित्या या स्थानिक स्वराज्य संस्थांना 13 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून गावाच्या विकासासाठी अनुदान दिले जाते. सध्या ग्रामविकास कार्यक्रम योजनेतून जे अनुदान दिले जाते ते कमी असून ते वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. एका गावाच्या विकासासाठी ग्रामपंचायतीला 50 टक्के, पंचायत समितीला 25 टक्के आणि जिल्हा परिषदेला 25 टक्के अनुदान 13 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून दिले जाते. गावापर्यंत निधी आणला जातो. परंतु, एका गावाला फक्त 50 हजार रूपयेच मिळतात. त्यामुळे हा निधी अपुरा पडतो. तो वाढविणे आवश्यक आहे, अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मी पान क्रमांक 50 वरील नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 65 वर बोलणार आहे. श्री क्षेत्र परळी वैजनाथ हे 12 ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. वीज निर्मिती करणारे महाराष्ट्रातील अनेक शहरांपैकी एक आहे. वैशिष्टयपूर्ण योजनेतून परळी नगरपरिषदेच्या इमारतीसाठी सन 2008-2009 मध्ये रूपये 2 कोटी 50 लाख मंजूर झाले होते. त्यापैकी रूपये 1 कोटी 20 लाख खर्च झाले असून उर्वरित रक्कम अद्यापि मिळालेली नाही. त्यासाठी तरतूद व्हावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. परळी वैजनाथ हे वीज निर्माण करणारे शहर आहे. 12 ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग असणारे शहर आहे. त्याच बरोबर परळी-वैजनाथ येथे आता इंडस्ट्रीयल हब होत आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.राम पंडागळे )**

श्री.धनंजय मुंडे.....

आता परळी येथे सिमेंट कारखाना उभा राहिला आहे. तेथे तीन हजार मेट्रीक टन सिमेंट तयार होते. परळी येथे रेल्वे स्टेशन आहे त्याठिकाणी खतांच्या रॅक्स आहेत. तसेच परळी येथील रस्त्यावरुन मोठ्या प्रमाणावर कोळसा आणि सिमेंटची वाहतूक होत असल्यामुळे तेथील रस्ते खराब झाले आहेत. तेव्हा रस्ते दुरुस्तीसाठी नगरपरिषदांना भरीव निधी देण्यात यावा अशी मागणी आहे.

मराठवाड्यामध्ये अतिशय जुने असे नटराज नाट्यगृह आहे. या नाट्यगृहाची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. तेव्हा या नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मी सदनात प्रथम नव्याने आलो आहे. मी माझे विचार थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 58, पृष्ठ क्रमांक -44 - शालेय शिक्षण व क्रीडा विभाग - प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरिता पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी 131 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे.

बाब क्रमांक 59- शालेय पोषण कार्यक्रमांतर्गत मध्यान्ह भोजन योजनेचा खर्च भागविण्यासाठी 761 कोटी 65 लाख 29 हजार रुपयांची पूरक मागणी केलेली आहे.

बाब क्रमांक 63, पृष्ठ क्रमांक 46 - राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तरतूद करणे यासाठी 215 कोटी 68 लाख रुपयांची पूरक मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये शालेय शिक्षण विषयावर अनेकवेळा चर्चा झालेली आहे. शालेय शिक्षण विभागाकरिता करण्यात आलेल्या पूरक मागण्यांचा विचार करता राज्य आणखी दुसऱ्या राज्याचे शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबवू शकेल हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. महाराष्ट्रात शिक्षणावर कोट्यावधी रुपये खर्च होत आहेत. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत केंद्र सरकारकडून निधी मिळत आहे. या निधीचा वापर खरोखर शिक्षणासाठी होतो काय हा महत्वाचा प्रश्न आहे. मी मागील पाच वर्षाची आकडेवारी सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो. सन 2004-05 मध्ये 382 कोटी रुपये, सन 2005-06 मध्ये 604 कोटी रुपये, सन 2006-07 मध्ये 783 कोटी रुपये, सन 2007-08 मध्ये 827 कोटी रुपये आणि सन 2008-09 मध्ये 600 कोटी रुपये असे एकूण 3196 कोटी रुपये केंद्र सरकारकडून मिळाले. आता पूरक मागण्याच्या माध्यमातून मागणी करण्यात आली आहे. आपण शिक्षणावर इतक्या मोठ्या प्रमाणावर खर्च करुनही शिक्ष्‍ण क्षेत्रात इतके मागे का आहोत ? इतक्या मोठ्या प्रमाणावर खर्च करुनही राज्यातील 43 हजार 187 शाळांमध्ये मुलींसाठी वेगळे प्रसाधनगृह नाही. 14 हजार 835 शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. 3 हजार 380 शाळांमध्ये फळा नाही. 33 हजार 402 शाळांतील भितींना कुंपण नाही अशी अवस्था आहे. आपण इतक्या मोठ्या प्रमाणावर तरतूद करतो मग ते पैसे जातात कुठे ? प्राथमिक शिक्षणाकडे दुर्लक्ष झालेले आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ ST/ SBT/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 19.00

श्री.किरण पावसकर...

आता मी जी काही प्रकरणे सांगितली आहेत या सगळया प्रकरणांमध्ये शासनाने खरोखरच कोठे कारवाई केली आहे काय ? सर्व शिक्षा अभियानातील पैसा बिअर बार आणि डान्सबारमध्ये उडविल्याची घटना कोल्हापूरमध्ये घडलेली आहे. निविदा न मागविता बोगस बिलाव्दारे हजारो रुपये उकळले गेले आहेत, अनेक संस्थांना वेतन मिळत नाही, पाठयपुस्तक मंडळाच्या कारभारामध्ये गोंधळ सुरु आहे, पुस्तके आणि नकाश्यामधील चुकामुळे लाखो रुपयांची पुस्तके व नकाशे पडून राहिले आहेत. महाराष्ट्र राज्य साक्षरतेच्या बाबतीत नागालॅडपेक्षाही मागे राहिले आहे.पूरक मागण्यांच्याव्दारे कोटयावधी रुपये मंजूर केले जातात परतु हे पैसे कोठे जातात हे पाहण्याची आवश्यकता आहे. पूरक मागण्यांवरील निमित्ताने मोठ मोठी आकडेवारी देऊन त्यातील कोटयावधी रुपयांच्या रक्कमेला मान्यता देण्यासाठी जर आपण या ठिकाणी भाषणे करणार असू तर यातील पैसे नेमके कोठे जातात हे देखील शोधून काढण्याची गरज आहे. शिक्षणाच्या नावाखाली केन्द्र सरकारकडून तसेच राज्य सरकारकडून जे पैसे मिळतात त्यातील 10 टक्के सुध्दा पैसे ख-या अर्थाने शिक्षण ंसंस्थामध्ये शिक्षणासाठी वापरले जात नाहीत असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने मी या ठिकाणी काही उदाहरणे देऊ इच्छितो.शाळेच्या खोल्या बांधण्यामध्ये काही ठिकाणी भ्रष्टाचार झाला आहे. सभागृहामध्ये तसेच वृत्तपत्राच्या मार्फत या घटना शासनाच्या निदर्शनास देखील आणून देण्यात आल्या होत्या. उस्मानाबाद मध्ये मोह येथे शाळा खोल्याच्या दुरुस्तीच्या कामामध्ये भ्रष्टाचार केल्याचा प्रकार उधडकीस आला आहे. मुंबईमध्ये महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या उदासिनतेमुळे दहा वर्षात 505 पैकी 120 खोल्यांचे काम पूर्ण झाले आहे .नागपूरमध्ये निकृष्ट दर्जाच्या वर्ग खोल्या बांधण्यात आल्याच्या तक्रारी करण्यात आल्यामुळे हे प्रकरण संपूर्ण विदर्भात गाजले होते. अकोला, जळगाव,धुळे,नाशिक येथे तीच परिस्थिती आहे. अनेक ठिकाणी शाळांच्या खोल्याचे बांधकाम करण्याध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. विद्यार्थ्यांना जो आहार दिला जातो त्यामध्ये देखील भ्रष्टाचार केला जातो. काही ठिकाणाच्या भ्रष्टाचाराला शिक्षक कारणीभूत आहेत असे ठरवल्यामुळे त्या शिक्षकाला आत्महत्या करावी लागली. नाशिक जिल्हयात शेवाळे नावाच्या शिक्षकाला अशा प्रकरणामध्ये आत्महत्या करावी लागली.अशा प्रकारे शिक्षण विभागाच्या पूरक



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

मागण्यांच्या निमित्ताने कोटयावधी रुपये दिले जातात परंतु त्याचा शिक्षणासाठी उपयोग होत नाही. अशा प्रकारच्या मागण्या वारंवार मान्य करुन घेऊन विद्यार्थ्यापर्यंत हे पैसे पोहोचले जात नाहीत आजसुध्दा सर्व विद्यार्थी माननीय मुख्यमंत्राकडे, माननीय शिक्षण मंत्र्यांकडे वा सरकारकडे अपेक्षेने पहात नाहीत तर हे विद्यार्थी आणि त्यांचे पालक कोर्टाकडे डोळे लावून बसलेले आहेत. कोणत्या विद्यार्थ्याने कोणत्या शाळेत जावयाचे हे कोर्टच ठरविणार आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्याचे प्रवेश केव्हा सुरु करावयाचे हे सुध्दा कोर्ट ठरविणार आहे. शिक्षण क्षेत्रात जर भ्रष्टाचार चालू राहणार असेल तर या पूरक मागण्या मान्य करण्यामध्ये काहीही अर्थ राहणार नाही.त्यासाठी राज्य सरकारला कठोर असे धोरण तयार करावे लागेल .असे मला सांगावयाचे आहे दुर्देवाने शिक्षणासाठी पाच वर्षाकरिता आजही धोरण ठरविण्यात आलेले नाही तर अकरा महिन्याचे धोरण ठरविण्यात आलेले आहे. अकरा महिन्याच्या धोरणामुळे चांगल्या प्रकारचे विद्यार्थी घडू शकत नाहीत .शिक्षणासाठी राज्य सरकार कोटयावधी रुपये खर्च करुन सुध्दा भ्रष्ट अधिका-यांना पकडू शकत नाही वा त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई करु शकत नाही. विद्यार्थ्यांना शिकविण्याची शिक्षकांची जर भावना असेल तर त्याचे मनोबल वाढविणे आवश्यक आहे परंतु आपण ते वाढवू शकत नाही अशा प्रकारे शिक्षणाचा बटयाबोळ झालेला आहे म्हणूनच मधल्या काळात "शिक्षणाच्या आयचा घो " या नावाचा एक सिनेमा निघाला होता. या सिनेमाला असे नाव का देण्यात आले होते या विषयाच्या खोलात जाण्यात काही अर्थ नाही परतु आजची शिक्षणाची परिस्थिती तशी आहे त्यामुळे या सिनेमाला असे नाव देण्यात आलेले आहे. खरोखरच आपण प्रत्येक बाबीसंबंधी कोर्टाकडे दाद मागावयाची काय या बाबतीत प्रत्येकजण विचार करील ,प्रत्येक बाब जर कोर्टच ठरविणार असेल तर मग शिक्षण मंत्री कोण असावेत हे सुध्दा आपण कोर्टाला ठरवू देऊ. शिक्षणाचे धोरण कसे असावे हे जर कोर्ट ठरविणार असेल तर शिक्षण मंत्री कोण असावेत याचासुध्दा निर्णय कोर्टाकडूनच घ्यावा. खाजगी शाळेची फी किती असावी या संदर्भात सभागृहात मागच्या वेळी बरीच चर्चा झाली होती. खाजगी शाळेच्या फी संदर्भात सरकारचे कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही. त्या संस्थेला जेवढी फी विद्यार्थ्यांच्या पालकाकडून घ्यावयाची असेल तेवढी फी त्यांनी त्यांच्याकडून घ्यावी. त्यांना जेवढे लुटावयाचे असेल तेवढे संस्था चालकांनी लुटावे.परंतु सरकार

3.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ ST/ SBT/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 19.00

श्री.किरण पावसकर...

मात्र त्यामध्ये अजिबात हस्तक्षेप करीत नाही व त्यावर नियंत्रण ठेवत नाही. सरकारच्या हातामध्ये शिक्षणाच्या संदर्भातील काहीही शिल्लक राहिलेली नाही म्हणून पूरवणी मागण्यांमध्ये दाखविण्यात आलेले कोटयावधी रुपये मंजूर झाल्यानंतर भ्रष्टाचाराचे कुरण निर्माण होणार आहे याबद्दल कोणाच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही.असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 134 व बाब क्रमांक 141 मध्ये सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत लघू, मध्यम व मोठया औद्योगिक व बृहत प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी 100 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. राज्यामध्ये नवीन औद्योगिक प्रकल्प निर्माण होण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री परदेशात जाऊन आल्यानंतर राज्यामध्ये 700 कोटींची गुंतवणूक व 33 हजार नवीन रोजगार निर्मिती होणार असल्याची त्यांनी घोषणा केली होती. ज्याप्रमाणे एखादा सेल्समन परदेशामध्ये काही नवीन उद्योग आणण्यासाठी जातो त्याप्रमाणे हे मुख्यमंत्री जातात. त्यांनी केलेल्या घोषणप्रमाणे खरोखर या राज्यामध्ये 700 कोटींची गुंतवणूक झाली व 33 हजार नवीन रोजगार निर्मिती झाली याची माहिती आपण सभागृहाच्या पटलावर ठेवणार काय? निवडणुका जवळ आल्यानंतर लोकांची मते मिळविण्यासाठी आपण अशापध्दतीची आश्वासने देत असाल व तीच पध्दत या सभागृहामध्ये अंमलात आणीत असाल तर ती दुर्दैवाची गोष्ट आहे. तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख हे परदेशी दौऱ्यावरुन आल्यानंतर त्यांनी केलेल्या घोषणेप्रमाणे आपण किती बेकारांना नोकऱ्या दिल्या व त्यापैकी किती नोकऱ्या टिकल्या? त्याचप्रमाणे विद्यमान माननीय मुख्यमंत्री सुध्दा परदेशात जाऊन आले. त्यांनी नवीन रोजगार निर्मितीसाठी किती गुंतवणूक करण्यात येणार आहे हे अजून सांगितले नाही. या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने ते काहीतरी सांगतील अशी अपेक्षा होती.

सभापती महोदय, नवीन उद्योग धंद्याच्या वाढीसंदर्भात चर्चा करीत असतांना आमच्या कोकणातील एक मंत्रिमहोदय या सदनामध्ये म्हणाले की, आपल्याला उत्कर्ष साधावयाचा असेल, महाराष्ट्रामध्ये प्रगती करावयाची असेल तर प्रकल्पांच्या आड येऊ नका. ते कोणते प्रकल्प आणू पहात आहेत? कोकणामध्ये खाण आणि औष्णिक ऊर्जा प्रकल्पांना तेथील संपूर्ण जिल्हयांचा आणि गावांचा विरोध असतांना हे प्रकल्प जाणीवपूर्वक कोकणामध्ये सुरु केले जात आहेत. कोकणामध्ये पर्यटनाचा विकास करीत असतांना तेथील फळबागा टिकल्या पाहिजेत, त्या फळबागांचे नुकसान करणारे प्रकल्प उभारण्यासाठी आपण हे 100 कोटी रुपये खर्च करणार आहात काय? आपण तेथील शेतकऱ्यांचे नुकसान करुन काय साधणार आहात? सभापती महोदय, या सभागृहामध्ये सांगण्यात आले की, तेथील प्रकल्पग्रस्त लोकांना क आणि ड वर्गातील रोजगार उपलब्ध करुन देणार. म्हणजेच त्यांना शिपाई आणि मदतनीस अशाप्रकारच्या नोकऱ्या दिल्या जाणार आहेत. ज्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी घेण्यात आल्या आहेत, त्यांच्याकरिता त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. किरण पावसकर...

रोजगार प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्यात आले नाही. अशाप्रकारे काही टक्केवारी घेऊन हे खाण आणि औष्णिक ऊर्जा प्रकल्प कोकणातील लोकांच्या माथी मारण्याचे काम झाले आहे ते आपण थांबविले पाहिजे.

सभापती महोदय, डोंबिवली येथे एमआयडीसी स्थापन करण्यासाठी तेथील भूमिपुत्रांच्या जमिनी कवडी मोलाने घेण्यात आल्या. जमिनी घेऊन त्यावर एमआयडीसी उभारल्यानंतर आज ती बंद पडलेली आहे. अशाप्रकारे औद्योगिकीकरणाच्या नावाखाली सुरु करण्यात आलेल्या कितीतरी कंपन्या बंद आहेत. त्या बंद पडलेल्या कंपन्यांच्या जागेवर मॉल आणि थिएटर निर्माण व्हावयास लागले आहेत. एमआयडीसी स्थापन करण्यासाठी आमची जमीन घेतल्यानंतर जर ती चालणार नसेल तर आमची जमीन आम्हाला परत केली पाहिजे असे भूमिपुत्र शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. परंतु ही जमीन शेतकऱ्यांना परत न करता त्याठिकाणी मोठ मोठे मॉल उभे केले जात आहेत. सुरुवातीला 15 रुपये गुंठा या भावाने घेण्यात आलेली जमीन आज 900 रुपये गुंठा या भावाने सरकार त्यांना विकत आहे. अशाप्रकारे या गरीब शेतकऱ्याला मिळालेले चार पैसे सुध्दा त्याच्या खिश्यामधून काढून घेतले जात आहेत. आज ठाणे, कल्याण, डोंबिवली, तारापूर, अंबरनाथ या औद्योगिक पट्टयामधील बंद कंपन्यांच्या जागेवर रिअल इस्टेट, टॉवर उभे केले जात आहेत. . अशा परिस्थितीत आपण मुंबईमध्ये नवीन उद्योग निर्माण करण्यासाठी 100 कोटींची मदत करणार आहात. आज मुंबईमधील केंद्रीय वस्त्रोद्योग किंवा राज्य वस्त्रोद्योग महामंडळाच्या 11 गिरण्यांना आगी लागल्यानंतर आणि त्यामधील सर्व लोकांचा रोजगार निघून गेल्यानंतर त्या जागेवर टॉवर उभे करुन पैसे कमाविण्याचा उद्योग सुरु आहे. अशाप्रकारे गिरण्या बंद पडल्यानंतर तेथील भाग विकसित करण्यासाठी ती जागा मॉलसाठी वापरावयाची आणि त्यामधून पैसे कसे कमाविता येतील हे पाहिले जात आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. राज्यामध्ये 700 कोटींचे उद्योग येतील असे सांगितल्यानंतर आजपर्यंत जेवढया कंपन्या बंद पडल्या आहेत त्यामधून कुणालाही नवीन रोजगार मिळाला नाही. कंपन्या बंद पडल्यामुळे बेरोजगार झालेल्यांची संख्या जास्त झाली आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर....

ठाणे येथील रेमंड कंपनी बंद झाली त्यामुळे 18 हजार कामगार देशोधडीला लागले आहेत. अंबरनाथ येथील धरमसिंह मोरारजी रासायनिक कारखान्याने टाळेबंदी लागू केली. त्याठिकाणी पंधरा कामगार मरण पावलेले आहेत. कल्याणमध्ये एमआयडीसी,एनआरसी आणि अमरडाय या तीन कंपन्या बंद झाल्यामुळे पंधरा हजार कामगार देशोधडीला लागलेले आहेत. अशा या नवीन उद्योगांची यादी सदनासमोर वाचायला लागलो तर वेळ पुरणार नाही. महाराष्ट्रात 33 हजार नवीन नोकऱ्या तर सोडाच पण ज्या 60 हजार लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत, त्या जमिनी विकून मालकांच्या फायद्यासाठी गेल्या आहेत.

सभापती महोदय, पान क्रमांक 13 बाब क्रमांक 15. गृह खात्यावर मी बोलू इच्छितो. गृह खात्यासाठी 4 कोटी 9 लाख 97 हजार रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. गृह खात्याची दुसरी मागणी बाब क्रमांक 85, पान क्रमांक 68 वर मुंबईतील पोलिसांच्या इमारत दुरुस्ती करिता तीन कोटी रुपयाची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच बाब क्रमांक 86, पान क्रमांक 69 वर मुंबईतील पोलिसांच्या निवासी इमारतीच्या दुरुस्ती करिता 25 कोटी रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे.चार वर्षापूर्वी भिंवडीमध्ये पोलीस स्टेशन बंधण्यावरुन दंगल झाली होती. त्या दंगलीमध्ये दोन पोलीस कॉन्स्टेबलची निघृण हत्या झाली होती. या गोष्टीला चार वर्षे झालेली आहेत. पोलीस विभागासाठी एवढया कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आणि पुरवणी मागंण्यामध्ये मागणी करण्यापेक्षा भिवंडीमध्ये साधी पोलीस चौकी बांधण्याचे धैर्य शासनामध्ये असू नये ! काहीही झाले तरी भिवंडीत एक पोलीस चौकी बांधली जाणार आहे अशा प्रकारची चार वर्षापूर्वी एक घोषणा करण्यात आली होती.यासंदर्भात नक्की काय अडचण आहे? कशामुळे ही पोलीस चौकी बांधली जात नाही.? येथील पोलिसांना ती बांधणे जमत नाही म्हणून बाहेरच्या राज्यातील पोलिसांची कुमक मागविली जाणार आहे काय? कारण भिवंडी दंगलीच्या वेळी पंधरा एस.टी.बसेस तोडण्यात आल्या पोलिसांवर हल्ला झाला. दोन पोलिसांची निघृण हत्या झाली. 35 पोलीस जखमी झाले. एवढे होऊनही भिवंडीमध्ये जी पोलीस चौकी हवी होती ती शासन करु शकलेले नाही. कायदा व सुव्यवस्था पोलीस विभागापासूनच लांब राहिली अशा प्रकारची आज परिस्थिती आहे. तेव्हा ही पोलीस चौकी किती दिवसात बांधली जाणार आहे हे सदनाला सांगावे. पोलिसांच्या मनोधैर्याबद्दल

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/

श्री. किरण पावसकर...

बोलावयाचे असेल तर खंडणी विरोधी पथकातील पोलिसांची नावे मी याठिकाणी सांगतो. डी.सी.पी. श्री. प्रदीप सावंत., पी.आय. श्री.दया नाईक, प्रदीप शर्मा, आंग्रे. ज्या पध्दतीच्या हत्यांना आता पुन्हा सुरुवात झाली आहे त्यामध्ये नेहरुनगरमधील तीन बालिकांवरील बलात्कार आणि हत्या आहे, पुण्यामध्ये काल झालेला गोळीबार आहे. या विषयी बोलत असताना मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की,काही जांबाज अधिकारी होते त्यांना वेगवेळया केसेसमध्ये आतमध्ये टाकलेले आहे. दया नाईक यांना पुन्हा त्यांच्या पदावर घेण्यात यावे असे सुप्रिम कोर्टाने आठ महिन्यापूर्वी सांगितलेले आहे. शासन अशा अधिकाऱ्यांना लांब ठेवीत आहे. ज्यांचे नेटवर्किंग आहे आणि जे कायदा व सुव्यवस्थेसाठी मदतीचे होऊ शकतील असे सर्व अधिकारी बाहेर आहेत. सभापती महोदय, आयबीएन लोकमतच्या मुलाखतीमध्ये काही अधिकाऱ्यांनी परवा असे सांगितले की, आता आमच्यामागे सरकार नावाची यंत्रणा नसल्यामुळे अधिकारी काम करणार नाहीत. सभापती महोदय, पोलिसांना इक्वीपमेंट देण्यापेक्षा, जास्त पोलीस फोर्स देण्यापेक्षा त्यांचे मनोधैर्य वाढविण्याची गरज आहे. ते मनोधैर्य वाढविण्यासाठी शासनाला त्यांच्या पाठीशी उभे रहावे लागेल. ते करीत असताना काही पोलीस अधिकाऱ्यांच्या विरुध्द तक्रारी आहेत. त्या तक्रारी वारंवार सदनासमोर मांडल्या आहेत पण त्यांच्यावर कारवाई होऊ शकत नाही. असे कोणते पोलीस अधिकारी आहेत की जे आपल्या विभागाला किंवा मंत्र्यांना सांभाळीत आहेत. त्यांच्यावर शासन का कारवाई करु शकत नाही? सभापती महोदय, परवाच्या दिवशी घडलेली केस आहे. कल्याणमध्ये एका व्यक्तीला नोकरी मिळवून देतो असे सांगून लाखो रुपयाचा गंडा घातलेला आहे. त्या संबंधीची तक्रार केल्या नंतर तेथील पी.एस.आय.ने संबंधिताकडे 50 लाख रुपयांची मागणी केली. त्यातील 50 हजार रुपये घेत असतांना त्याला पकडण्यात आले. एक पी.एस.आय. अशा पध्दतीने वागत असेल तर जे भ्रष्टाचारी आहेत त्यांच्यावर कारवाई कशी करणार? चांगल्या अधिकाऱ्यांचे मनोधैर्य जरुर वाढवा.

सभापती महोदय, सन 2008-2009 ला एअरपोर्टवर घडलेल्या काही घटना मी या सदनासमोर मांडल्या होत्या. श्री. अनिल अंबानीच्या हेलिकॉप्टरमध्ये दगड आणि माती टाकण्यात आली होती.

यानंतर श्री. बरवड...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ......

त्याचाही आजपर्यंत सुगावा लागू शकलेला नाही. एअरपोर्टमधील 100 किलो चांदी दिवसाढवळ्या चोरी करण्यात आली त्याचाही आजपर्यंत सुगावा लागलेला नाही. तेथील एसीपीची आम्ही सभागृहामध्ये तक्रार केली आणि तिकडचे जे सर्व कारनामे सांगितले पण त्याबाबत आजपर्यंत माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांना सुध्दा त्यांच्यावर काही तरी कारवाई करण्याचे धैर्य इ ाालेले नाही. एअरपोर्टमध्ये काळा बाजार जोरदार चालतो. त्या ठिकाणी पैशाने पूर्ण भरलेली गाडी व्यवस्थित येते. कारण डॉलर इंडियन करंसीमध्ये ताबडतोब कॅश करता यावे यासाठी डोमॅस्टीक एअरपोर्टला गाडी उभी राहते. स्वत: एसीपी स्क्वाडचा माणूस येतो आणि दरदिवशी त्यांच्याकडून पैसे घेऊन निघून जातो. पण आपली पोलीस यंत्रणा मात्र त्यांच्यावर कारवाई करु शकत नाही. त्यांचा दरदिवशीचा हप्ता किती आहे हे कळत नाही. त्यातील मंत्र्यांपर्यंत किती हप्ता येतो ? हे एकदा सदनासमोर येऊ द्या. ही माहिती जर आपल्याला मिळाली तर आपल्याला सांगता येईल की खरोखर आपल्याकडून त्यांच्यावर कारवाई होणार आहे काय ? ती कारवाई करण्याची हिंमत मंत्र्यांमध्ये आहे काय ? काही मंत्रिमहोदय माहिती द्या असे म्हणत आहेत. सर्व माहिती दिलेली आहे. मी तारखांसह माहिती देऊ शकतो. 25 मे, 2009 ला 100 किलो सोने दिवसाढवळ्या घेऊन गेले. आम्हीच सगळी माहिती द्यावयाची असेल तर मग मंत्री काय करणार ? ते काय फक्त हप्ते घेणार ? मी आरोप यासाठी करीत आहे की, सदनात एकदा, दोनदा, तीनदा सांगितले तरी शासन त्याबाबत कोणतीही कारवाई करीत नाही. एखाद्या गुन्हेगारावर बलात्काराचे सात आठ गुन्हे असतात. मारामारीचे गुन्हे असतात. खून केल्याचे तीन गुन्हे झाल्यानंतर त्या गुन्हेगाराला शूट केल्यावर त्याची सजा कोणी तरी एखादा अधिकारी भोगतो. पण ज्याने तीन खून केलेले आहेत तो सुटून जातो. असे असेल तर मी मुद्दाम सांगेन की, गृह विभागाला नुसत्या पैशाची गरज नाही तर त्या विभागामध्ये कार्यरत जे अधिकारी आहेत त्यांच्या पाठीवर सरकारने थाप मारण्याची तेवढीच गरज आहे. तरच या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था चांगल्या प्रकारे सांभाळू शकतील. एवढे सांगून मी माझे दोन शब्द संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 4 वरील बाब क्रमांक 3 बाबत बोलणार आहे. यामध्ये युनिक ओळखपत्राच्या संदर्भात पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. खरे म्हणजे ओळखपत्र तयार करण्यासाठी अनेक प्रयोग या राज्यामध्ये झाले परंतु या निमित्ताने माझी सरकारला विनंती असणार आहे की, नागरिकांना आपण ओळखपत्र देताना असे युनिक ओळखपत्र या ठिकाणी तयार केले गेले पाहिजे की, जे निवडणुकीसाठीही चालेल तसेच एखादा ज्येष्ठ नागरिक असेल आणि तो रेल्वेने किंवा बसने प्रवास करीत असेल तर त्यासाठी सुध्दा ते ओळखपत्र चालेल. त्या नागरिकाने मतदान केले आहे किंवा नाही याचीही नोंद त्या ओळखपत्राच्या माध्यमातून घेता येईल असे युनिक ओळखपत्र तयार केले पाहिजे. कारण जेव्हा आता आपण विज्ञान आणि तंत्रज्ञान युगाची भाषा या ठिकाणी करतो, कॉम्प्युटरची भाषा या ठिकाणी करतो तेव्हा या नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन एक युनिक ओळखपत्र या निमित्ताने तयार केले गेले पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय यानंतर मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 5 वरील बाब क्रमांक 6 बाबत बोलणार आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामातील रझाकारांच्या अत्याचाराने पीडित झालेल्या लोकांना अर्थसहाय्य करण्यासाठी या ठिकाणी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. उशिरा का होईना पण हैद्राबाद मुक्ती संग्रामात ज्यांनी बलिदान दिले अशा लोकांना अर्थसहाय्य करण्याचे काम शासन करीत आहे. परंतु आजही आमच्या मराठवाड्यामध्ये रझाकाराच्या अत्याचाराने पीडित झालेले लोक अजूनही या अनुदानापासून वंचित राहिलेले आहेत. त्यांच्या कुटुंबियांना कोणत्याही प्रकारची मदत झालेली नाही. त्यामुळे पुन्हा एकदा किमान लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील रझाकाराच्या अत्याचाराने पीडित झालेल्या लोकांचे सर्वेक्षण केले पाहिजे. जे लोक पीडित झालेले आहेत त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याची भूमिका शासनाने घ्यावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, यानंतर मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 6 वरील बाब क्रमांक 7 बाबत बोलणार आहे. नवीन वाहने खरेदी करण्यासाठी या ठिकाणी पुरवणी मागणी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. विक्रम काळे .....

करण्यात आलेली आहे. सातत्याने ही प्रक्रिया चालू असते याबद्दल आमचे काही मत नाही. पण अनेक ठिकाणी जेव्हा शासकीय कार्यालयांमध्ये जातो तेव्हा त्या ठिकाणी जुनी वाहने कुजत पडलेली असतात. या निमित्ताने शासनाने असा नियम केला पाहिजे की, जोपर्यंत जुने वाहन निकाली निघत नाही, जोपर्यंत त्याची हर्रास होत नाही किंवा लिलाव होत नाही, जोपर्यंत त्याचा निकाल लागत नाही तोपर्यंत नवीन वाहन खरेदी करण्यास परवानगी देऊ नये. अशा प्रकारचा जर आपण नियम केला तर निश्चितपणे शासनाकडे महसूल मिळेल आणि तो शासनाच्या तिजोरीत जमा होईल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

यानंतर बाब क्र.8, पान क्र.6 वर मी बोलतो. विद्ये विना मती गेली, मती विना गती गेली... हे शब्द कानावर नेहमी पडतात आणि महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव समोर येते. म्हणून त्यांच्या जीवनावर आधारित चित्रपट काढण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यासाठी ही मागणी केलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. उशिरा का होईना महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये शासनाने एक चांगला निर्णय घेतला आहे. या चित्रपटासाठी शासनाने आणखी निधी दिला पाहिजे आणि तातडीने हा चित्रपट पूर्ण झाला पाहिजे अशी मी मागणी करतो.

यानंतर मी बाब क्र.20, पृष्ठ क्र.14 वर बोलतो. पोलिसांसाठी नवीन वाहन खरेदी करण्यासाठी ही मागणी केलेली आहे. मी तर असे म्हणेन की, पोलिसांना अत्याधुनिक वाहने दिली पाहिजेत. पोलिसांसाठी डिझेलचे वाहन खरेदी करु नये. आज नवीन तंत्रज्ञानाचा वापर केलेली वाहने उपलब्ध आहेत. पोलिसांसाठी डिझेल ऐवजी पेट्रोलची वाहने उपलब्ध करुन द्यावीत. एखाद्या चोराच्या मागे पळावयाचे असेल तर अनेकदा पोलिसांचे वाहन सुरु होत नाही. हे टाळावयाचे असेल तर पोलिसांना अत्याधुनिक वाहने दिली पाहिजेत.

यानंतर मी बाब क्र.25, पान क्र.16 वर बोलतो. पोलीस प्रशिक्षणासाठी नवीन इमारती बांधणे यासाठी ही मागणी केलेली आहे. अत्यंत चांगल्या पध्दतीने व दर्जेदार पोलीस प्रशिक्षण शाळेची इमारत लातूरमध्ये झाली आहे. लातूर पॅटर्न म्हणून ओळखली जाईल अशी इमारत तेथे उभी केली आहे. तोच पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रात राबवावा आणि त्या मॉडेलनुसार इमारती बांधल्या तर हे एक वेगळे काम होईल आणि त्यासाठी प्रयत्न करावा अशी विनंती करतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

श्री.विक्रम काळे...

यानंतर मी बाब क्र.58 व 59, पान क्र.44, बाब क्र.65, पान क्र.45 या सर्व मागण्या शिक्षण खात्यासंबंधीच्या आहेत. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारला पाहिजे. शालेय पोषण आहार योजनेसाठी ही तरतूद केलेली आहे. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारला पाहिजे यासाठी सातत्याने आम्ही प्रश्न मांडत असतो. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाने नवीन शाळा मंजूर करणे बंद केले पाहिजे. आता कोणत्याही वाडयात व तांडयात शाळा नाही अशी परिस्थिती नाही. ज्या खेडयात जिल्हा परिषदेची शाळा असेल तेथे नवीन शाळा सुरु करण्याची परवानगी दिली जाणार नाही असा ठोस निर्णय शासन घेणार नाही तोपर्यंत यामध्ये सुधारणा होणार नाही. शालेय पोषण आहार योजनेमध्ये काही घडले नाही, विद्यार्थ्यांना विषबाधा झाली नाही असा एकही दिवस जात नाही. या योजनेची बातमी रोज कोणत्या ना कोणत्या वर्तमानपत्रात छापून येते. ही शालेय पोषण आहार योजना कशासाठी सुरु केली ? गरीब मुलांनी शाळेत रोज उपस्थित रहावे, दिवसभर अध्ययन करावे यासाठी ही योजना सुरु केली. पूर्वी या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना 3 किलो तांदूळ दिला जात होता. मुलांनी शाळेत रोज उपस्थित रहावे असा या योजनेमागील उद्देश होता. परंतु मुले शाळेत आली नाही तरी त्यांच्या पालकांना गुरुजींना तांदूळ द्यावा लागत होता. तांदूळ दिला नाही तर तुझ्या बापाचे काय जाते असे म्हटले जात होते. त्यामुळे मुले रोज शाळेत उपस्थित रहावीत हा जो मूळ उद्देश होता तो बाजूला फेकला गेला. त्यानंतर शासनाने या योजनेंतर्गत खिचडी देण्यास सुरुवात केली. म्हणजे शिक्षण खात्याने शिक्षकांना आचारी बनविले. एकेका शाळेत 500-600 मुले असतील तर समजू शकतो. परंतु 5 हजार विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन द्यावयाचे म्हणजे लग्नाच्या पंगतीसाठी जेवण तयार करण्यासारखी परिस्थिती आहे. शिक्षकांनी शिकविण्याचे काम करावयाचे की जेवण तयार करावयाचे हा प्रश्न निर्माण झाला आहे. आज मुंबई व पुणे यासारख्या शहरामध्ये श्रीमंत पालकांची मुले शिकतात, ही मुले शाळेतील खिचडी खात नाहीत. म्हणून या योजनेबाबत पुनर्विचार झाला पाहिजे.

यानंतर श्री.शिगम.....

MSS/ SBT/ KTG/ 19:25

(श्री. विक्रम काळे...

नक्षलाईट भाग असेल, आदिवासी भाग असेल, डोंगरी भाग असेल या ठिकाणी शासनाने जरुर खिचडी द्यावी. परंतु जो प्रगत भाग आहे तेथे शाळातून खिचडी न देता त्या ऐवजी गरीब विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके आणि गणवेश देण्याची योजना शासनाने सुरु करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. सभापती महोदय, शैक्षणिक संस्थाना मदत करण्यासाठी काही तरतूद केलेली आहे. आज शाळेच्या तुकडयांना अनुदान नाही. शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ करण्यासंबंधीची चर्चा या सभागृहामध्ये कित्येक वेळा करण्यात आली. परंतु शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ झाली नाही. वेतनेतर अनुदानाचा प्रस्ताव घेऊन मंत्रिमंडळापुढे आम्ही जात आहोत अशा प्रकारची उत्तरे आम्हाला दिली जातात. पण कार्यवाही काहीच होत नाही. तेव्हा वेतनेतर अनुदान देखील दिले पाहिजे. वाढीव पदाना मान्यता द्यावी, त्यांना अनुदान द्यावे अशी मागणी मी करीत आहे. आज राज्य शासन शिक्षण विभागावर एकही पैसा खर्च करायला तयार नाही. शिक्षणाच्या हक्काचा कायदा करीत असताना शिक्षण आणि शिक्षकांच्या संदर्भातील आर्थिक मागणी मंजूर करावी अशी मी विनंती करतो.

बाब क्रमांक 274 आणि 276, पान क्रमांक 39. अखिल भारतीय मराठी नाटय संमलेनासाठी तरतूद केलेली आहे.ही तरतूद केल्याबद्दल आमचे दुमत नाही. मराठवाड्यामध्ये दरवर्षी मराठी साहित्य संमेलन भरते. अलीकडे 11 आणि 12 फेब्रुवारीला मराठवाड्यात मराठी साहित्य संमेलन पार पडले. त्या साहित्य संमेलनासाठी आर्थिक मदत दिली जात नाही. तेव्हा त्या संमेलनासाठी देखील भरीव आर्थिक मदत शासनाने करावी अशी मी मागणी करीत आहे. सभापती महोदय, मला आणखी काही मुद्दे मांडावयाचे होते. परंतु वेळेच्या अभावी मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011च्या पुरवणी मागण्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 47, पान क्रमांक 35. पीक विमा योजनेअंतर्गत नुकसानभरपाईसाठी रु.79,14,44,000 इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. सन 2009 मध्ये रु.384,87,26,213 एवढी तरतूद दाखविण्यात आलेली होती. गोंदिया जिल्हयासाठी रु. 1,25,10,000 इतकी रक्कम पीक विमा योजनेसाठी ठेवलेली आहे. 35,835 शेतक-यांनी कृषी विमा उतरविलेला आहे. गोंदिया हा दुष्काळग्रस्त जिल्हा आहे. 25 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी जाहीर झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये शेतक-यांना दिलासा देण्यासाठी 15 जून पूर्वी कृषी विम्याची रक्कम मिळावयास पाहिजे होती. शेतक-यांच्या हिताच्या दृष्टीने पीक विमा योजना शेतक-यांसाठी लागू करण्याची आवश्यकता होती. शेतक-यांना आर्थिक सहाय्य मिळण्याची आवश्यकता होती. पण शासनाने या बाबतीत कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. संपूर्ण राज्यातील शेतकरी या पीक विमा योजनेच्या बाबतीत संभ्रमात आहेत. दुष्काळग्रस्त जिल्ह्यांना प्राधान्य देऊन त्या जिल्ह्यातील शेंतक-यांना पीक विम्याचे पैसे द्यावेत अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 269, पृष्ठ क्रमांक 385. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग. सभापती महोदय, या सभागृहामध्ये लक्षवेधी आणि तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून आमगावच्या स्वतंत्र पाणी पुरवठा योजनेचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. ही योजना 5 वर्षापासून बंद आहे. ही 294.39 लाखाची योजना असली

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.........

तरी प्रत्यक्ष 2.03 कोटी रुपये या योजनेवर खर्च झालेला आहे. जीवन प्राधिकरणाने तीन वेळा ग्रामपंचायतीबरोबर बैठका घेऊन योजना हस्तांतरित करण्याचा प्रयत्न केला. परंतु ग्रामपंचायतीने योजना हस्तांतरित करुन घेतली नाही. जिल्हा परिषदेने देखील याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. फिल्टरचे पाणी उपलब्ध असूनही 1993 पासून आजतागायत ही योजना हस्तांतरित न झाल्यामुळे आमगाव शहरातील लोकांना अस्वच्छ पाणी पुरविले जात आहे. माझी पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने जलसंपदा मंत्र्यांना विनंती आहे, ही योजना अत्यंत चांगली असून फिल्टर प्लॅट असल्यामुळे स्वच्छ पाणी मिळू शकते, त्यामुळे ही योजना शासनाने चालवावी किंवा अन्य उपाययोजना करुन ही योजना कशी चालविता येईल यादृष्टीने विचार करावा. 248 गावांची जी नळयोजना आहे ती या योजनेला जोडली तर कदाचित या योजनेचे भवितव्य चांगले होऊन नागरिकांना पिण्याचे शुध्द पाणी मिळू शकेल आणि त्यांच्या आरोग्याचे रक्षण होऊ शकेल.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 122, बाब क्रमांक 124 अन्वये जलसंपदा विभागाने पुरवणी मागणी सादर केली आहे. मी माननीय जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांना दिनांक 19.4.2010 रोजी पत्र लिहिले आहे. इटियाडोह प्रकल्पाच्या दुरुस्तीची कामे तातडीने करण्याची गरज आहे. या कामाला मंजुरी दिल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. एकूण 24 कोटी रुपये खर्चाची कामे होती, परंतु शासनाने 8 कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी दिली आहे. हिवाळा संपला, उन्हाळा संपला आणि आता पावसाळा सुरु आहे. परंतु अद्याप कामे झालेली नाहीत. निविदा प्रक्रिया पूर्ण केली गेली. मुख्य कार्यकारी अभियंता यांनी निगोसिएशन केले. कमी दराची निविदा मंजूर झाली. परंतु जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या आडमुठेपणामुळे अद्याप पुढे प्रगती झालेली नाही. वास्तविक पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे. या राष्ट्रीय संपत्तीचे संरक्षण करणे हे आपल्या सर्वांचे प्रथम कर्तव्य आहे. कॅनॉल फुटतात आणि पाणी वाहून जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना आठ-दहा दिवस पाणीपुरवठा होऊ शकत नाही. ही महत्वाची दुरुस्तीची कामे शासनाच्या अधिकाऱ्यांमुळे वा राजकीय पुढाऱ्यांच्या अडथळयामुळे अडून आहेत या संदर्भात शासनाने खुलासा केला पाहिजे. या संदर्भात चौकशी करण्याची गरज आहे. या चौकशीमधून जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. आठ कामांसाठी 27 ठेकेदारांनी निविदा सादर केल्यानंतर त्या रद्द केल्या गेल्या असे कळते. या संदर्भात चौकशी करण्याची गरज आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 19:30

श्री.केशवराव मानकर........

सभापती महोदय, मी नक्षलग्रस्त भागामध्ये राहतो. गृह विभागाने बाब क्र.21 अन्वये नक्षलवादविरोधी कार्यक्रम राबविण्यासाठी रु.10.84 कोटीची तरतूद केली आहे ही आनंदाची बाब आहे. याबरोबरच ग्रामशिक्षण आणि लोकशिक्षण देण्याची गरज आहे. नागरिक स्वतःच स्वतःचे रक्षण करतील अशा प्रकारची उपाययोजना केली पाहिजे अशी माझी आग्रहाची सूचना आहे. शासन या संदर्भात गांभीर्याने विचार करेल असा मला विश्वास वाटतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------

नंतर 4एस.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ SBT/ पूर्वी श्री. भोगले...... 19:35

श्री. रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : महोदय, आघाडी सरकारच्या वतीने सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांचे स्वागत करीत असताना सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र. 8, पृ.क्र. 6 च्या अनुषंगाने मी बोलणार आहे. या पुरवणी मागणीच्या अनुषंगाने तरतूद करुन शासनाने महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना पुरोगामी राज्याने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनावर आधारित चित्रपट निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. त्याचबरोबर अशीही सूचना करणार आहे की, याच राज्यात जन्म घेतलेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत आपल्या सामाजिक, शैक्षणिक तसेच राजकीय कार्याचा ठसा उमटविला आहे परंतु नेहमीच त्या दुर्लक्षित राहिल्या अशा अहिल्यादेवींच्या जीवनावर सुध्दा चित्रपट निर्माण करावा अशी माझी विनंती आहे.

महसूल विभाग, बाब क्र. 31, पृ.क्र. 23, नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर शासनाच्या वतीने मदत जाहीर करण्यात येते. या ठिकाणी सांगण्यात आले की, 100 टक्के केंद्रशासनाने हे अनुदान दिलेले असते. मला या निमित्ताने अशी विनंती करावयाची आहे की, नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर ज्याप्रमाणात सधन भागात आपत्ती आली की मदत दिली जाते त्याच प्रमाणात कायम दुष्काळी भाग असलेल्या प्रदेशात सुध्दा मदत दिली जाते. जो भाग इरिगेटेड असतो त्या भागाची तुलना कायम दुष्काळी असलेल्या भागाशी करुन चालणार नाही. कारण कायम दुष्काळी भागातील लोक अनेक प्रकारे हालअपेष्टांना सामोरे जात असतात, नैसर्गिक आपत्तीला तोंड देत जगत असतात म्हणून अशा भागात इतर भागापेक्षा जास्त मदत दिली पाहिजे. मला माहीत आहे की, द्राक्षाच्या बागा, डाळिंब वगैरे पिकांचेही नैसर्गिक आपत्तीने मोठ्या प्रमाणावर नुकसान होते त्यासाठी देखील भरीव स्वरुपाची तरतूद करणे आवश्यक आहे.

बाब क्र.33, वन विभागाच्या वतीने वनाच्या विकासासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. पण बऱ्याच वेळा एका ठिकाणी आपण जंगल पाहतो आणि दोन तीन वर्षात ते पुन्हा बघायला मिळत नाही अशा ठिकाणी वनाचा ऱ्हास हाताना दिसतो. राज्यभर शेळी-मेंढी चारणारा मेंढपाळ, आपल्या मेंढ्या जेव्हा वनात चारण्यासाठी जातात तेव्हा मेंढपाळांच्या मेंढ्या जप्त करणे, त्याला दंड करणे अशा प्रकारच्या हाल अपेष्टा या मेंढपाळांना सहन कराव्या लागतात. या निमित्ताने माझी विनंती आहे की, शेळ्या-मेंढ्या वनात चरण्यासाठी वनाचा उपयोग चराऊ कुरणे म्हणून करण्याची परवानगी देण्यात यावी किंवा अशा शेळ्या मेंढयांना कुरणे उपलब्ध करुन द्यावीत.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .......

सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र. 159, पृ.क्र. 152 शिक्षण व प्रशिक्षण फीचे प्रदान करण्यासाठी विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी ही तरतूद केली आहे. माननीय मंत्री महोदयांना मी याबद्दल धन्यवाद देऊ इच्छितो. मागील अधिवेशनात यासंबंधीची तरतूद पहिल्यांदा शासनाने केली होती. ती एक कोटीची तरतूद अत्यंत कमी होती. कारण राज्यातील ही संख्या पाहिली तर त्या प्रमाणात तरतूद कमी वाटते म्हणून त्यात वाढ करण्याची गरज आहे. या राज्यात एससी व एसटी असतील त्यांच्यासाठी जी तरतूद करण्यात येते ती देशात सर्वात जास्त करण्यात येते. त्याचप्रमाणे विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी सुध्दा भरीव तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर बाब क्र. 168, पृ.क्र.154, अपंग वित्त व विकास महामंडळासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. या पुरोगामी महाराष्ट्रात मागील अर्थसंकल्पात 1100 कोटीची कर्जमाफी विविध महामंडळांसाठी केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या महाराष्ट्रात, शाहू महाराजानंतर राज्यातील जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न कोणी केला असेल तर तो आघाडी सरकाने केला आहे. पण त्यासंसबंधीचे आदेश व्यवस्थितपणे गेलेले दिसत नाहीत. काही महामंडळांनी तसा फायदा सुध्दा दिलेला आहे. माहिती घेतल्यानंतर सांगण्यात आले की राज्यशासनाने आमच्याकडे अजून पैसे दिलेले नाहीत म्हणून लाभार्थ्यांच्या 7/12 च्या उताऱ्यावरील बोजा काही महामंडळांनी कमी केलेला नाही. मी अभिमानाने सांगू इच्छितो की, मी ज्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी विकास महामंडळाचा अध्यक्ष आहे त्या महामंडळाच्या माध्यमातून, शासनाने निर्णय घेतल्यानंतर लाभार्थ्यांना आम्ही कळवून टाकले की शासनाने तुमचे कर्ज माफ केले आणि त्यानुसार सर्वांच्या 7/12 च्या उताऱ्यावरील बोजा आम्ही कमी केलेला आहे आणि तसा तो शासनानेही कमी केला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

परंतु बाकीच्या महामंडळाचे अध्यक्ष किंवा एमडी असे म्हणतात की, राज्य सरकारने आम्हाला पैसे दिलेले नाहीत. सरकारकडून कर्ज माफ झालेले आहे. फक्त शासनाला असे कळवावयाचे आहे की, कर्ज माफ केल्यामुळे आम्ही लाभार्थींच्या सात-बारावरील बोजा कमी केलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात शासनाने चांगल्या प्रकारचे निर्देश देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या पुरोगामी राज्यामध्ये सर्व जाती धर्माचे लोक राहत आहेत. जी सामाजिक महामंडळे आहेत मग मागासवर्गीय महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ, रोहिदास चर्मोद्योग महामंडळ, वसंतराव नाईक भटके विमुक्त महामंडळ, मौलाना आझाद महामंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महामंडळ असो, या महामंडळाला आपण निधी का दिला नाही ? शासनाने यासंदर्भात बजेटमध्ये तरतूद केली नाही, पुरवणी मागण्यांमध्ये सुध्दा एक रुपयांची देखील तरतूद केलेली नाही. या समाज घटकांना आपण वा-यावर सोडणार आहात काय ? राज्य शासन विविध योजना राबवित असते, सर्व लोकांसाठी योजना राबवित असते. पण जे छोटे छोटे समाज घटक आहेत त्यांना या महामंडळाचा मोठया प्रमाणात उपयोग होत असतो. या छोटया समाज घटकांना एक प्रकारचा आधार मिळत असतो. म्हणून शासनाला विनंती करावयाची आहे की, सर्व महामंडळांना किंवा पशुसंवर्धन खात्याशी संबंधित पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळाला भरीव तरतूद करावी व गोरगरीब समाजाला आधार द्यावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 112, पृष्ठ क्रमांक 115 - जलसंपदा विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. ज्यावेळेला अर्थसंकल्प सादर झाला, तेव्हा अनुशेष भरुन काढण्याचा विषय सभागृहात निघाला होता, त्यावेळी विधानसभा आणि विधानपरिषदेत मागणी झाली होती व दोन वेळा सभागृहाचे कामकाज तहकुब झाले होते. त्यावेळेला सन्माननीय अर्थमंत्र्यांनी, जलसंपदा मंत्र्यांनी जाहीर केले होते की, या राज्यात जे कायमस्वरुपी दुष्काळी तालुके आहेत, मग ते तालुके विदर्भातील, मराठवाडयातील, पश्चिम महाराष्ट्र किंवा कोकणातील तालुके असतील या कायम दुष्काळी तालुक्यांचा अनुशेष भरुन काढण्यात येईल. अनुशेष भरुन काढण्यासाठी 2 हजार कोटी रुपयांची भरीव तरतूद केली पाहिजे, अशी आम्ही सर्व आमदारांनी मागणी केली होती. भरीव तरतूद करण्यात येईल, अशा प्रकारचे आश्वासन शासनातर्फे देण्यात आले होते परंतु यासंदर्भात

2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

एक रुपयांची सुध्दा तरतूद झाली नाही. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, कायम दुष्काळी भागासाठी भरीव तरतूद करण्याचे जे आश्वासन दिले होते ते आश्वासन पूर्ण करावे व कायम दुष्काळी तालुक्यांसाठी महामंडळ त्वरीत स्थापन करावे, अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 282, पृष्ठ क्रमांक 393, पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. श्रीक्षेत्र हरिहरेश्वर-मार्लेश्वर, जिल्हा रायगड येथे मुलभूत सुविधेसाठी तरतूद केलेली आहे. तीर्थस्थळासाठी, पर्यटनासाठी शासन तरतूद करीत आहे त्यामुळे मला शासनाचे अभिनंदन करावयचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी परळी वैजनाथचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. परळी वैजनाथचे मंदिर हे बारा ज्योतीर्लिंगापैकी आहे. हे मंदिर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी बांधले आहे. जगातील हिंदूचे पवित्रस्थान काशिविश्वेश्वराचे मंदिर असून हे मंदिर सुध्दा पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनीच बांधलेले आहे. सोरटी सोमनाथ, घृष्णेश्वर,जेजुरीचा खंडोबा, विहिरी, नद्यावरील घाट अशी किती तरी ठिकाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी बांधलेल्या आहेत. अहिल्यादेवी होळकरांचे जन्मगाव अहमदनगर जिल्हयातील चौंडी येथे आहे. आपण इतर ठिकाणी निधी देत आहात त्याचप्रमाणे अहिल्यादेवी होळकरांच्या स्मारकासाठी भरीव निधी दिला पाहिजे. या ठिकाणी आपण शिल्पसृष्टी जाहीर केली परंतु त्यासाठी तुटपुंजा निधी दिलेला आहे. शिल्पसृष्टीसाठी शासनाने जाहीर केलेला निधी द्यावा अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द येथेच संपवतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो. धन्यवाद

-----

..3



SGJ/ KTG/ SBT/ 19:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 4, बाब क्रमांक 1, सामान्य प्रशासन विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. महाराष्ट्र शासनाने मे महिन्यात विविध खात्यातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहिराती दिल्या होत्या व ही पदे भरण्यासाठी एकाच वेळी परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या पदांच्या मुलाखतीसाठी जिल्हा निवड समितीला मुलाखती घेण्याचे आदेश दिले होते पण अचानक 5 जून, 2010 रोजी उपसचिव श्री. म्हेत्रे यांच्या सहीने स्थगितीचे आदेश काढले गेले व सहाव्या वेतन आयोगामुळे राज्याच्या तिजोरीवर ताण पडत असल्याने जमेच्या तुलनेत खर्चामध्ये मोठी वाढ होत असल्याने निवड प्रक्रियेला स्थगिती दिली होती. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे जिल्हयातील पशुसंवर्धन पर्यवेक्षक पदाला स्थगिती दिलेली आहे ती उठवून त्या उमेदवारांना न्याय द्यावा, अशी मी विनंती करतो.

आनंतर श्री भारवि..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.परशुराम उपरकर....

सभापती महोदय, यानंतर मी गृह विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. पोलीस अधीक्षकांच्या तक्रारी नुसार श्री.पाटणकर यांची बदली झाली. त्यांच्या जागेवर श्री.शेलार यांची नेमणूक झाली. सेवानिवृत्तीसाठी एक वर्ष असल्यामुळे गेले दीड महिने अधीक्षकाचे पद रिक्त आहे. तेथे कर्तव्यदक्ष अधिकारी देऊन ते पद भरण्याची कार्यवाही करावी अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर मी पान क्रमांक 14 वरील बाब क्रमांक 19 वर बोलणार आहे. 26/11 च्या हल्ल्यानंतर सागरी हद्दीचे रक्षण करण्यासाठी कोकणपट्टीच्या समुद्रकिनारी गस्ती घालण्यासाठी 12 नौका देण्यात आल्या. खोल समुद्रात काम करणाऱ्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी मिळत नसल्यामुळे जवळ जवळ 70 पदे रिक्त असल्याचे पत्र गृह मंत्र्यांनी मला पाठविले आहे. किनारपट्टीचे संरक्षक म्हणून मच्छिमारांना निवडले तर त्यांना देखील रोजगार मिळेल. खोल समुद्रातील त्यांचा अनुभव लक्षात घेऊन मच्छिमारांना गस्ती नौकेवर काम देण्याचे काम शासनाने करावे अशी मी या निमित्ताने सूचना करतो.

सभापती महोदय, पान क्रमांक 25, बाब क्रमांक 33 वर मी बोलणार आहे. महसूल विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. वन संज्ञे संबंधातील विषय गेली अनेक वर्षे या सभागृहात विविध आयुधाच्या माध्यमातून मांडण्यात आला आहे. शासनाच्या वतीने मुख्य सचिवांनी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. गेली अडीच वर्षे निकाल न लागल्यामुळे बाजारपेठा, बागायती, गोठे यांची दुरूस्ती करता येत नाही. यासंबंधी शासनाने समिती देखील गठित केली आहे. 42 हजार हेक्टर जमिनीवरून 1800 हेक्टर जमीन मान्य केली आहे. ती जमीन लवकरात लवकर वन संज्ञेतून वगळावी. यामुळे लोकांची अडचण होत आहे. ती आपण तातडीने दूर करावी अशी मी विनंती करीत आहे.

दोडामार्ग तालुक्यातील शिरंगे येथे जंगल तोड झाली आहे. तसेच येथील काही जमिनी केरळी लोकांनी घेतलेल्या आहेत. सुमारे 26 एकर जमिनी शासनाने ताब्यात का घेऊ नये अशा प्रकारच्या नोटीस त्यांना दिल्या होत्या. यासाठी एक महिन्याची मुदत दिली होती. पण एक महिन्यामध्ये त्या जमीन मालकांनी जिल्हाधिकाऱ्याकडे अपील न केल्यामुळे त्या जमिनी शासन जमा करण्यासंबंधीचा तातडीने आदेश द्यावा अशा प्रकारची विनंती मी येथे करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर......

सभापती महोदय, पान क्रमांक 14, बाब क्रमांक 109 वर मी बोलणार आहे. मी येथे कोकण पॅकेजचा देखील उल्लेख करणार आहे. कोकण पॅकेज अंतर्गत कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी सन 2009-2010 या वर्षासाठी रूपये 729 कोटीची आणि सन 2010-2011 या वर्षासाठी रूपये 447 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. यासंबंधातील जी.आर.दिनांक 25 ऑगस्ट 2009 रोजी निघाला. तथापि, सदर कामासाठी अद्यापि निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. कोकणासाठी 3 वर्षे पॅकेज देण्यात येईल अशा प्रकारची घोषणा केली. त्यापैकी 2 वर्षे पूर्ण झाली आहेत. तथापि, अद्यापि पैसे शासनाने दिलेले नाहीत. ते तातडीने द्यावेत अशी मी विनंती करतो. कोकणातील अनेक प्रकल्प अपूर्ण आहेत. ते लवकरात लवकर पूर्ण करावेत अशी मी विनंती करतो.

यानंतर मी पान क्रमांक 391, बाब क्रमांक 274 च्या अनुषंगाने बोलणार आहे. पर्यटन आणि सांस्कृतिक विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरस येथे रंगकर्मी मच्छिंद्र कांबळी यांच्या नावाने कला अकादमी सुरू करण्यासाठी सन 2009-2010 मध्ये एक कोटी रूपयांची आणि सन 2010-2011 मध्ये रूपये 1.25 कोटीची तरतूद पॅकेजमध्ये करण्यात आली. पण आजमितीपर्यंत मच्छिंद्र कांबळी कला अकादमीसाठी एकही पैसा शासनाने वितरित केलेला नाही.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.....

तशीच बाब छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराबाबत झालेली आहे. सन 2009-10 मध्ये 50 लाख रुपये आणि सन 2010-11 मध्ये 50 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात अजूनपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराची डागडुजी करण्यासाठी निधी मिळालेला नाही. तेव्हा हा निधी लवकरात लवकर देण्यात यावा अशी विनंती आहे.

बाब क्रमांक 281, पृष्ठ क्रमांक 392- पर्यटन - कोकण पॅकेजमध्ये पर्यटन कृती आराखडा तयार करणे, कोकण विभागाला सोयी सवलती पुरविणे यासाठी सन 2009-10 मध्ये 60 कोटी रुपये आणि सन 20010-2011 मध्ये 130 कोटी रुपये असे एकूण 190 कोटी रुपये जाहीर झाले. परंतु हा निधी अद्याप वितरित झालेला नाही. तेव्हा हा निधी वितरित करावा अशी मागणी आहे. तसेच कोकणातील धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे, ॲप्रोच रोड,पर्यटन सुविधा इत्यादीसाठी सन 2009-10 मध्ये 40 कोटी रुपये तर सन 20010-11 मध्ये 20 कोटी रुपये असे एकूण 60 कोटी रुपये पॅकेज अंतर्गत जाहीर करण्यात आले होते. परंतु हा निधी देखील अजून मिळालेला नाही. पीपीसीसाठी गेल्या आर्थिक वर्षात 25 लाख रुपये आणि या वर्षी 25 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली परंतु,अद्यापपर्यंत कामास सुरुवात झालेली नाही.

कोकण पॅकेज अंतर्गत केरळच्या धर्तीवर कोकणातील पर्यटनस्थळ विकसित करुन सी.आर.झ ेड.मधून विशेष सवलती प्राप्त करण्याकरिता सन 2009-10 मध्ये 3 कोटी 60 लाख तर सन 20010-11 मध्ये 3 कोटी 40 लाख असे एकूण 7 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात बजेटमध्ये वा पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात आली नाही. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून कोकण पॅकेज जाहीर करण्यात आले. कोकणासाठी जे पॅकेज जाहीर करण्यात आले त्याची तरतूद अर्थसंकल्पात वा पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आलेली नाही ती करण्यात यावी अशी मागणी करुन माझे भाषण पूर्ण करतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 41,पृष्ठ क्रमांक 33 - बीज चाचणी, रासायनिक खत नियंत्रण व कीटकनाशक चाचणी प्रयोगशाळा यावरील खर्च भागविण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. आता जैविक खताचे फॅड निघाले आहे. बहुतेक कंपन्या जैविक खते काढत आहेत. दिल्लीतील एका गोदावरी गोल्ड कंपनीने चमडे आणि प्लास्टीकपासून जैविक खताची निर्मिती केलेली आहे. अशाप्रकारच्या खतापासून जमिनीची प्रत खराब होण्याची शक्यता आहे. तेव्हा यावर कुठेतरी नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कृषी विभागाचे मध्यवर्ती कार्यालय पुणे येथे आहे. या कार्यालयातूनच कृषी विभागाचा संपूर्ण कारभार चालतो. आपण सर्वजण शेतकऱ्यांच्या समस्या येथे मांडतो. परंतु व्यापाऱ्यांच्या समस्यांबद्दल कोणी बोलत नाही. व्यापारी लोक या मध्यवर्ती कार्यालयाला "दगडी चाळ" असे संबोधतात. हे कृषी कार्यालय दगडांनी बांधलेले आहे. व्यापारी वर्ग त्या कार्यालयाचा "दगडी चाळ" असा उल्लेख करतात याचा अर्थ तेथील अधिकारी कसे वागतात हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

सभापती महोदय, व्यापाऱ्यांना लायसन्सच्या नुतनीकरणाचा त्रास आहे. व्यापाऱ्यांचा बियाण्यांचा आणि खतांचा व्यापार फक्त 15 दिवसांचा असतो. 15 दिवसांसाठी तो कोणाशीही पंगा घेणार नाही. कारण त्याने पंगा घेतला तर त्याचा वर्षाचा धंदा बुडणार.तेव्हा व्यापाऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

आता खतांचा मोठा तुटवडा जाणवत आहे. आम्ही गावाकडे गेलो की शेतकरी आम्हाला 10-12 खताची पोती मिळवून द्या असे सांगतात. तेव्हा शेतकऱ्यांना खतांचा तुटवडा पडणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

सभापती महोदय, आता कंपन्या मोठ्या डिलरला खत पुरवितात.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ ST/ SBT/ KGS/ प्रथम शिगम 19.55

श्री.पाशा पटेल .......

सर्वात महत्वाची गोष्ट अशी आहे की, खताचे जे मोठे डिलर्स असतात त्यांना मोठया प्रमाणावर खते दिले जात असल्यामुळे तेच खताचा साठा करीत असतात . लहान डिलर्सना खते मिळत नसल्यामुळे ते खताचा साठा करु शकत नाही. या व्यवहारामध्ये मोठया प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असते ते प्रकार थांबावेत या दृष्टीने शासनाने दक्षता घ्यावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बियाण्यांच्या संदर्भात मी या ठिकाणी एक दोन उदाहरणे सांगणार आहे. पुण्याच्या कार्यालयामध्ये म्हणजेच दगडी चाळीमध्ये जे अधिकारी कर्मचारी आहेत ते कशा पध्दतीने वागत आहेत हे मी आपल्याला सांगतो. ईगल सीड नावाची इंदोरची एक कंपनी असून सोयाबीनचे उत्तम प्रकारचे बियाणे ती कंपनी तयार करीत असते. त्या बियाण्यांची विक्री करण्यासाठी परवानगी मिळविण्याकरिता त्या कंपनीला या अधिका-यांकडून त्रास व्हावयास लागला . त्या कंपनीच्या अधिका-यांनी असा विचार केला की, अजून आपल्याला परवानगी मिळालेली नाही आणि ही परवानगी मिळेपर्यत सिझन संपून जाईल म्हणून 1500 ट्रक्स बियाणे महाराष्ट्रात विक्रीसाठी आणून ठेवले होते. हे बियाणे विकण्यासाठी त्यांना परवानगी मिळालेली नव्हती आणि सिझन संपून जाईल म्हणून त्या कंपनीने बियाणे राज्यात आणून ठेवले होते. जे अधिकारी बियाण्यांच्या विक्रीसाठी परवानगी देणार होते ते अधिकारी वेळेवर परवानगी देत नव्हते. या कंपनीच्या बियाण्यांच्या बॅग्जवर बोगस बियाणे असा शिक्का मारण्यात आला. त्याच्या उलट यशोदा नावाची एक कंपनी महाराष्ट्र राज्यातील आहे.त्या कंपनीकडे लायसन्स नव्हते तरीसुध्दा त्या कंपनीला सर्व बियाणे विकण्यासाठी परवानगी देण्यात आली होती.व्यापारी असे म्हणू लागले आहेत की यापुढे आमच्याकडून दगडी चाळीतील अधिका-यांकडून होणारा त्रास सहन होणार नाही.तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी या बाबीकडे अधिक लक्ष द्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय,यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. शेतक-यांना सल्फरची आवश्यकता नाही. परंतु अमुक इतके खत घेतले तर अमुक इतके सल्फर घेतलेच पाहिजे अशी शेतक-यांवर सक्ती केली जाते. याकडे देखील माननीय मंत्रीमहोदयांनी लक्ष द्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री.पाशा पटेल .......

सभापती महोदय, यानंतर मला महसूल आणि वन विभागाची बाब क्रमांक 39 पान नंबर 27 सबंधी बोलावयाचे आहे.महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यास अल्प मुदतीचे कर्ज देण्यासाठी 5 कोटी 37 लाख 63 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे.राज्यातील शेती महामंडळ तोटयात चालले आहे. त्या ठिकाणी काम करणा-या मजुराला किती मजुरी दिली जाते हे जाणून घेण्यामध्ये मला जास्त उत्सुकता आहे.सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे आणि मी मघाशी एका विषयावर बोलत असताना त्यांनी मला असे सांगितले की ,शेतामध्ये काम करणा-या एका जोडप्याची वर्षाची मजुरी आता सव्वा लाख रुपये झालेली आहे. म्हणजे पुरुषाला 75 हजार रुपये आणि त्याच्या पत्नीला 50 हजार रुपये वर्षाला मजुरी मिळते.अशा प्रकारे एका जोडप्याला एक वर्षाला सव्वा लाख रुपये शेतकरी मजुरी द्यावयास लागला आहे. माझ्या गावात 250 रुपये देऊनही मजूर मिळत नाही. शासन मात्र त्या ठिकाणी काम करणा-या मजुराला 84 रुपये मजुरी देत आहे. रोजगार हमी योजनेतील मजुरांची आणि शेतामध्ये काम करणा-या मजुरांची मजुरी गेल्या वर्षापर्यत एक सारखीच होती. यावर्षी रोजगार हमी योजनेवर काम करणा-या मजुराला 125 रुपये मजुरी दिली गेली आहे .शेती महामंडळात काम करणा-या मजुरांची मजुरी मात्र वाढविण्यात आली नाही.म्हणून मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की बाकीच्या क्षेत्रात अत्यंत जागरुकपणे पाहिले जाते त्याप्रमाणे याही बाबीकडे जागरुकतेने पहावे या ठिकाणी बसलेल्या अनेक मंत्र्यांकडे 100 एकर, 150 एकर जमीन असून सर्व मंत्री महोदय शेतीशी सबंधित आहेत परंतु शेती जगविण्यासाठी लहान लहान बाबीकडे ते लक्ष देत नाही ही अत्यंत दुर्देवाची गोष्ट आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री विक्रम काळे यांनी असे सांगितले की, सरकार अमुक बाबीकडे लक्ष देत नाही, तमुक बाबीकडे लक्ष देत नाही. आपल्या पक्षाचे सरकार असून ते या बाबीकडे लक्ष देत नाही असे मला त्यांना सांगावयाचे आहे.शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण सर्वजण मोठे शेतकरी असून आपणाला शेतीची चांगली जाण आहे.तेव्हा शासनाने शेती महामंडळामध्ये काम करणा-या मजुराच्या मजुरीच्या संदर्भात अत्यंत गांभीर्याने विचार करावा अन्यथा आपल्यासमोर मोठे संकट उभे राहणार आहे.मी ज्या दोन बाबी या ठिकाणी मांडल्या आहेत त्याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नगर विकास विभागाच्या बाब क्रमांक 65 ते 73 पान नंबर 50 ते 52 वर 405 कोटी 82 लाख रुपयांच्या पूरक मागण्या असून या सर्व मागण्या मान्यतेसाठी सभागृहासमोर सादर करण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 66 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी 10 कोटी रुपयांची पूरक मागणी करण्यात आली आहे. झोपडपट्टीमुक्त शहरे करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला असून त्या ठिकाणी 269 स्क्वेअर फुटाची घरे संबंधित झोपडीधारकांना मोफत देण्याचा देखील शासनाने निर्णय घेतला आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

परंतु त्याचबरोबर सरकारने महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये 25 वर्षे सफाई कामगार म्हणून काम करणारे जे कर्मचारी आहेत, किंवा सेवेतून निवृत्त झालेले कर्मचारी आहेत, किंवा काम करीत असतांना दुर्दैवाने मृत झालेले कर्मचारी आहेत अशा कर्मचाऱ्यांना शासनाने 269 चौरस फूटाची सदनिका मोफत देण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने "191 महानगरपालिकांना सहाय्य" या गौण शीर्षाखाली 10 कोटींची तरतूद केली आहे. तसेच, "192 नगरपरिषदांना सहाय्य" या गौण शीर्षाखाली 10 कोटींची तरतूद या वर्षापासून ठेवली आहे. या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, आपल्याकडे तेरावा वित्त आयोग येणार आहे. या तेराव्या वित्त आयोगामधून आपल्याला सर्वसाधारण मुलभूत सुविधांसाठी 2077 कोटी 73 लाख रुपये पाच वर्षासाठी मिळणार आहेत. त्याचबरोबर चांगल्या प्रकारचा परफॉर्मन्स दाखवू शकलात तर परफॉर्मन्स निधी म्हणून 1099 कोटी 99 लाख अशाप्रकारे 3177 कोटी 72 लाखाचे केंद्रीय अनुदान पाच वर्षासाठी आपल्याला मिळणार आहे. याकरिता सन 2010-11 वर्षासाठी 295 कोटी 91 लाख इतकी बजेटमध्ये तरतूद करावी लागत आहे. त्याचप्रमाण् महानगरपालिकेसाठी 100 कोटी रुपये, नगरपालिकेसाठी 190 कोटी 91 लाख रुपये आणि नगर पंचायतसाठी 5 कोटींची तरतूद 5 नगरपंचायतीसाठी 105 कोटी अशाप्रकारे 295 कोटी 91 लाखाची मागणी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

सभापती महोदय, दुसरे असे की, केंद्रीय पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत 1 कोटी रुपये राज्याचा शेअर देण्याकरिता तरतूद केली आहे, व त्याकरिता पूरक मागणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जागतिक पर्यावरण सुविधा अंतर्गत कायम स्वरुपी नागरी परिवहन प्रकल्प म्हणजे एसयुटीपी प्रकल्प पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिकांमध्ये सुरु आहे. त्यासाठी वेगवेगळया वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन हा प्रकल्प पूर्ण करण्याचे काम महानगरपालिका आणि शासन करीत असून केंद्र सरकारकडून देखील आपल्याला आर्थिक वाटा मिळत आहे. त्याकरिता 8 कोटी 90 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्ज अनुदान देण्याकरिता 80 कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार आहे. अशाप्रकारे 88 कोटी 90 लाख रुपयांची तरतूद या पुरवणी मागण्यांमध्ये केली आहे. या मागण्या मंजूर करण्यासाठी सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/ KTG/ KGS/

श्री. भास्कर जाधव...

सभापती महोदय, राष्ट्रीय नागरी माहिती पध्दती प्रकल्पांतर्गत जे कामकाज केले जाते त्याच्या माहितीचा एकंदर गोषवारा आपणासमोर ठेवला आहे. अशाप्रकारे नगरविकास विभागाची 405 कोटी 82 लाखाची मागणी सभागृहाच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आली आहे तिचे थोडक्यात विश्लेषण केले आहे.सभापती महोदय, नगर विकास विभागाच्या चर्चेच्या निमित्ताने अनेक माननीय सदस्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी रस्ते अनुदानाची मागणी केली. रस्ते अनुदान हे लोकसंख्येच्या प्रमाणात किंवा वेगवेगळया प्रश्नाच्या माध्यमातून देण्यात येते. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी वन विभागाच्या संदर्भात मांडलेल्या विषयावर मी नंतर बोलतो. अशाप्रकारे ज्या ज्या माननीय सदस्यांनी याठिकाणी सूचना केल्या आहेत, मुद्दे मांडले आहेत त्यांची निश्चितपणे नोंद घेण्यात आली आहे.

सभापती महोदय, वन विभागांतर्गत एकूण 16 कोटी 1 लाखाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये सरदार सरोवर प्रकल्पासाठी जमीन संपादित केल्यानंतर त्या वन जमिनीवर पर्यायी वनीकरणासाठी 7 कोटी 98 लाखाची मागणी केली आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

अजंठा आणि वेरुळ प्रकल्पातंर्गत करावयाच्या वनीकरणासाठी 21 लाख 89 हजार रुपयाची मागणी केलेली आहे. तसेच वन क्षेत्राच्या रक्षणाकरिता 25 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. योजनेत्तर सहाय्यक वन संरक्षक पदी थेट नियुक्त झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षण देण्यासाठी 1 कोटी 45 लाख 92 हजार रुपयाची मागणी करण्यात आलेली आहे. सांगली जिल्हयात पलूस तालुक्यात कुंडल येथे नवीन प्रशिक्षण केंद्राची स्थापना शासन करु इच्छिते त्यासाठी 1 कोटी 50 लाख रुपयाची मागणी केलेली आहे. बाब क्रमांक 33 ते 38 साठी एकूण 16 कोटी 1 लाख रुपयाची मागणी सभागृहाच्या मंजुरीकरिता ठेवण्यात आलेली आहे. ही मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. केळकर यांनी अनेक प्रकारचे छोटे-मोठे प्रकल्प केंद्र सरकारकडे मंजुरी करिता आहेत असे सांगितले. त्याचा पाठपुरावा सुरु असून आजतागायत साधारणपणे 534 प्रकल्प पेंन्डिग आहेत.

सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी हत्तींनी केलेल्या नुकसानीची नुकसान भरपाई वेळेवर मिळत नाही असे सांगितले. यासाठी मार्च महिन्यामध्ये अर्थसंकल्पात 5 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु एकंदरीत आढावा घेता वर्षभरामध्ये किंवा पुढच्या काळात पैसे कमी पडतील म्हणून ही पाच कोटी रुपयांची पुरवणी मागण्यांमध्ये मागणी केलेली असून ती सभागृहाने मंजूर करावी, अशी विनंती करतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयाच्या धर्तीवर संपूर्ण राज्यामध्ये हत्तींनी केलेल्या नुकसान भरपाईच्या संदर्भात राज्य शासनाने 2/7 च्या जी.आर.मध्ये नुकतीच माहिती सादर केलेली आहे. त्यामध्ये वनगाई, रान डुकरे,रानगवे आणि माकडांनी केलेल्या नुकसान भरपाईचा समावेश केलेला आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : माझ्या माहिती प्रमाणे माकडांनी केलेल्या नुकसान भरपाईचा उल्लेख त्या जी.आर.मध्ये आलेला आहे पण फळझाडे किंवा अन्य नुकसान आहे त्याचा त्यामध्ये उल्लेख आलेला नाही. त्यासंदर्भात खुलासा करण्यात यावा.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी हे अत्यंत ज्येष्ठ सदस्य असून अत्यंत जागरुक आहेत. माननीय वन मंत्री श्री. बबनराव पाचपुते यांच्या काळात माजी सन्माननीय सदस्य कै. मधुकर सरपोतदर तसेच आपण सगळयांनी मिळून एक बैठक घेतली होती त्यानंतर पुढच्या काळात राज्यमंत्री म्हणून मी त्याचा पाठपुरावा केला. परंतु जो जी.आर. निघाला त्यामध्ये माकडांनी केलेल्या नुकसानीच्या भरपाईची तरतूद ठेवण्यात आली नाही. खरे म्हणजे माकडे फळबागायतीचेच नुकसान करीत असतात. म्हणून मी याठिकाणी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, लवकरच माकडांनी फळबागायतीचे नुकसान केल्याचा अंतर्भाव करण्यात येईल आणि तो करावा लागेल. कारण माकडे शेतीचे नुकसान करीत नाहीत तर फळबागांचेच नुकसान जास्त करतात. म्हणून शेतीचे आणि फळबागेचे नुकसान ग्राहय धरण्यात येईल. सभापती महोदय, याचा विचार निश्चितपणे केला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. सोनवणे यांनी सिरोंचा पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकाऱ्याने बारा लाख रुपयाची चोरी केली असे सांगितले. त्यासंदर्भातील माहिती घेण्यात येईल. ताडोबा जंगलाचे रेंजर नाहीत असेही त्यांनी सांगितले. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामध्ये जखमी झालेल्या लोकांसाठी मदत करण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी हत्तींनी केलेल्या नुकसानीच्या संदर्भात सांगितले. मी त्यासंदर्भातील खुलासा या ठिकाणी केलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, सर्वश्री राजन तेली, परशुराम उपरकर या सर्वांनी वनसंज्ञेचा प्रश्न उपस्थित केला. 73 हजार हेक्टर जमीन वनसंज्ञ ेखाली घेण्यात आली होती. नंतर त्याचा रिव्हयू घेण्यात आला. त्यापैकी 42 हजार आणि काही हेक्टर जमीन वगळण्यात आलेली आहे. सन 2008 साली या संदर्भात शासनाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात ॲफिडेव्हिट दाखल केलेले आहे. हा विषय थोडासा प्रलंबित आहे पण निश्चितपणे त्याचा लवकर पाठपुरावा केला जाईल. आणि त्यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल.

...3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी सांगितले की, लहान झाडांमध्ये शेळया-मेंढयांना चरण्यासाठी परवानगी देण्यात यावी. (अडथळा) मोठी उंच झाडे असतात परंतु ती बकऱ्या, मेंढयांच्या तोंडात येत नाहीत. त्या ठिकाणी बकऱ्या-मेंढयांना चरण्यास परवानगी द्यावी असे आपण म्हणालात. मोठया झाडाखाली छोटी झाडे उगवत असतात.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

यातील ज्या तांत्रिक बाबी आहेत त्या निश्चितपणे समजावून घेऊन त्या विषयामध्ये निश्चितपणे मार्ग काढू. या ठिकाणी काही फळझाडाबाबत विचारणा करण्यात येत आहे. मी सांगू इच्छितो की, जी.आर.मध्ये सगळ्याच फळझाडांचा उल्लेख केलेला आहे. या विभागाच्या 16 कोटी 1 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 127 व 128 वरील बाब क्रमांक 129 ते 135 या पुरवणी मागण्या मिळून एकूण 113 कोटी 95 लाख 66 हजार रुपयांच्या मागण्या आहेत. त्यामध्ये मुंबई उच्च न्यायालयाचा वकील कक्ष वातानुकुलीत करणे, सर्व न्यायिक अधिकाऱ्यांना "न्यायनिर्णय" हे मराठी विधी अहवाल मासिक पुरविण्यासाठी तरतूद करणे, उच्च न्यायालयात प्रकरण (केस) व्यवस्थापन माहिती यंत्रणा बसविण्यासाठी तरतूद करणे, सायंकालीन न्यायालयासाठी खर्चाची तरतूद करणे, तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार न्यायदानात अधिक सुधारणा करण्यासाठी तरतूद करणे, बाल सहाय्य संस्था, मुंबई यांच्या कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात ठेवी जमा करावयाच्या बाबतचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करणे, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणासाठी संगणक, प्रिंटर, झेरॉक्स पुरविण्यासाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद अशk या सगळया एकत्रितपणे 113 कोटी 95 लाख 66 हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या मान्यतेकरिता सभागृहासमोर ठेवलेल्या आहेत. त्या मागण्यांवर विचार मांडत असताना सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथजी कुलकर्णी यांनी सायंकाळची जी न्यायालये आहेत त्यामध्ये थोडी गती वाढवावी आणि ती अधिक सक्षम करावीत असा मुद्दा मांडला. त्याबाबत निश्चितपणे विचार करता येईल. सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनावणे यांनी चोपडा न्यायालयाच्या बाबतीत सांगितले. परंतु हायकोर्टाकडून चोपडा न्यायालयाच्या संदर्भात जो प्रस्ताव शासनाकडे यावयास पाहिजे तो अद्यापपर्यंत आलेला नाही. ज्यावेळला प्रस्ताव येईल त्यावेळी याबाबत सुध्दा विचार करता येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी अत्यंत महत्वाचे मुद्दे या ठिकाणी सुचविलेले आहेत. त्यांनी सांगितले की, विधी सल्लागार, विधी समुपदेशन तसेच लिगल सर्व्हिसचे मजबुतीकरण करणे, जिल्ह्यामध्ये दहा लोक न्यायालये आणि तालुक्यामध्ये दोन कायदा

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

शिबिरे घेणे अशा प्रकारचे तीन अत्यंत महत्वाचे मुद्दे या ठिकाणी मांडले. आपल्याला माहीत आहे की, सर्व जिल्ह्यामध्ये दहापेक्षा जास्त लोकन्यायालये आयोजित करण्यात येतात. म्हणजे आपले न्यायाधीश वरचेवर त्या ठिकाणी येतात. आज आपण महात्मा गांधी तंटामुक्त समितीबाबत सुध्दा विचार केलेला आहे. सन्माननीय सदस्य ॲड. उषा दराडे यांनी जो मुद्दा मांडला त्याची शासनाने दखल घेतलेली आहे.

सभापती महोदय, ढगफुटीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य राजन तेली यांनी मुदा उपस्थित केला. ही गोष्ट खरी आहे की, तो प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. त्यावर सुध्दा शासन सकारात्मक दृष्टीने विचार करण्याच्या मन:स्थितीमध्ये आहे. या तीनही विभागाच्या मागण्या मी एकत्रितपणे मंजुरीसाठी ठेवतो. या मागण्या सभागृहाने मान्य कराव्या अशी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन, सांस्कृतिक कार्य, शालेय शिक्षण राज्यमंत्री) सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या बाब क्रमांक 1 ते 11 तसेच सांस्कृतिक कार्य विभागाच्या मागण्या बाब क्रमांक 271 ते 280 त्याचबरोबर शालेय शिक्षण विभागाच्या मागण्या बाब क्रमांक 58 ते 64 या सर्व मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी माझी विनंती आहे. या मागण्यांवरील चर्चेत अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आणि अनेक महत्वपूर्ण सूचना या ठिकाणी करण्यात आलेल्या आहेत त्या सर्व सूचनांचा गांभीर्याने विचार करण्यात येईल तरी सुध्दा दोन तीन गोष्टींच्या बाबतीत या ठिकाणी स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर, डॉ. दीपक सावंत आणि श्री. विक्रम काळे यांनी युनिक आयडेंटीटी कार्डबाबत जो मुद्दा उपस्थित केला त्याचे स्पष्टीकरण करणे गरजचे आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

आपण असे सांगितले की, इलेक्शन कार्ड व युआयडी कार्डामध्ये काय फरक आहे ? त्याबद्दल लोकांमध्ये जागरुकता नाही, हे खरे आहे. पहिल्या टप्प्यामध्ये बीपीएलच्या लोकांसाठी ही योजना सुरु करणार आहोत. यासाठी 300 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. बीपीएल खालील लोकांना 100 रुपये देऊन त्यांना बोलावून नोंद करण्यात येणार आहे. याचे महत्व असे आहे की, यामध्ये युनिक आयडेंटिटी नंबर प्रत्येक सिटिझनचा राहणार आहे आणि त्या सिटिझनच्या फण्डामेंटल माहितीची नोंद होईल, बायोमेट्रिक नोंद होईल आणि तो नंबर सोशल सिक्युरिटीसारखा कोणत्याही विभागामध्ये उपयोगी होईल. हा युआयडी नंबर कोणत्याही विभागामध्ये नोंदला तर त्या व्यक्तीचा फोटो समोर येईल. अन्न व नागरी पुरवठा विभाग असो, गृह विभाग असो, कोणताही विभाग असो. त्याच्या बाहेरील माहिती पाहिजे असेल तर फण्डामेंटल युआयडीमध्ये ती राहील. त्यामुळे हे कार्ड कम्प्लीटली डिफरण्ट आहे. हे कार्ड इलेक्शनसाठी सुध्दा उपयोगी पडू शकेल.

यानंतर मी सामान्य प्रशासन विभागाच्या एका महत्वाच्या बाबीकडे सभागृहाचे लक्ष वेधते. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी मंत्र्यांच्या रेंसिडेंसवर व कॅबिन्सवर जास्त खर्च होतो असा मुद्दा मांडला होता. मंत्र्यांच्या कॅबिन्सची जर दुरुस्ती आवश्यक असेल तर ती करावीच लागेल. कारण मंत्र्यांना व्यवस्थित बसून काम करणे आवश्यक असते. त्यांच्याकडे संपूर्ण राज्यभरातून माणसे येतात. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने दि.24.3.2010 रोजी काढलेल्या परिपत्रकात असे नमूद केले आहे की, कक्षाची निकड लक्षात घेऊन नुतनीकरणाची मागणी करावी आणि सदर मागणी सा.प्र.वि.कडे नोंदविताना नुतनीकरण करणे आवश्यक आहे असे सा.बां.वि.च्या मुख्य अभियंत्यांकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अनेक माननीय सदस्यांनी वेगवेगळया विभागातील अधिकारी व कर्मचा-यांबद्दलचा मुद्दा मांडला आहे. या कर्मचा-यांचे व अधिका-यांचे काम प्रभावीपणे व्हावे यासाठी एक महत्वाचा निर्णय विभाग घेत आहे. आजपर्यंत शासनाचे तसे धोरण नव्हते. वर्ग-1 ते

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

वर्ग-3 च्या अधिकारी व कर्मचा-यांचे इनसर्व्हिस ट्रेनिंग, मोटिवेशन सेन्सिटिव्ह होणे गरजेचे आहे. आयएएस अधिका-यांचे एन्ट्री पॉईन्टला ट्रेनिंग होते. तसेच त्यांचे इनसर्व्हिस सुध्दा टप्प्याटप्प्यावर ट्रेनिंग होते. त्या पध्दतीने सर्व स्तरावरील अधिका-यांचे ट्रेनिंग व्हावे आणि त्यांच्या इन्सेंटिव्हसाठी त्यांच्या परफॉर्मन्सचे ॲसेसमेंट व्हावे यासाठी सा.प्र.वि.निर्णय घेत आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागातील 1-2 महत्वाच्या मुद्यांसंबंधी स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विभागाकडून केला जाणारा खर्च कोठे जातो असा मुद्दा उपस्थित केला होता. (अडथळा) सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे शासन गांभीर्याने घेणार आहे, कोणताही मुद्दा कॅज्युअली घेणार नाही.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ ST/ 20:20

प्रा. फौजिया खान...

2010-2011 या वर्षासाठी योजनांतर्गत 1288 कोटी आणि योजनेतर 22816 कोटी असे एकूण 24104 कोटी रुपये शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून आपण खर्च करीत आहोत. यामधील योजनेत्तर खर्च 26.80 टक्के आहे. यामधून आपण पगारावर खर्च करतो. आपल्याला 3.1 टक्के योजनेंतर्गत खर्च करण्याची मुभा आहे. सन्माननीय सदस्यांनी शाळातून प्रसाधनगृहे आणि अन्य मूलभूत सुविधा नसल्याचे सांगितले. आरएमएसएचच्या माध्यमातून ही कमतरता आपण दूर करु शकू. प्रत्येक शिक्षणाधिका-याला सर्क्युलर काढून या सुविधाकडे लक्ष देण्याच्या बाबतीत सांगितलेले आहे. तसेच डीपीडीसी तसेच आमदारांच्या विकास निधीतून ही कामे करण्यासंबंधीही सर्क्युलर काढलेले आहे. सन्माननीय सदस्य आदरणीय डॉ. दीपक सावंत यांनी डिस्लेक्सी आणि अथेस्टिक मुलांसाठी शाळा सुरु करण्याचा मुद्दा मांडला. हा अतिशय गांभीर्याने विचार करण्यासारखा मुद्दा आहे. याबाबतीत शासन जरुर विचार करील. पोईसर आणि पालघर येथील शाळेतील विद्यार्थ्यांना युनिफॉर्म देण्यात येत नाही. याबाबतीत चौकशी करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : तेथील मुले उपोषणाला बसली होती आणि मी स्वत: त्या मुलांना भेटलो होतो.

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा गांभीर्याने घेतलेला आहे. या प्रकरणी चौकशी करण्यात येईल. आदिवासी विभागातील शाळांना अनुदान देण्याचा मुद्दा येथे मांडण्यात आला. कुपोषणाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली होती. त्यावेळी असा मुद्दा उपस्थित झाला होता की, आदिवासी भागातील शाळेत 50 टक्के आदिवासी मुले असली तरच त्या शाळांना अनुदान देण्यात येते. परंतु केन्द्र शासनाच्या निकषाप्रमाणे शाळेत जरी 40 टक्के आदिवासी विद्यार्थी असले तरी त्या शाळांना अनुदान द्यावे अशा प्रकारचे आदेश काढण्यास सांगण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत मी सांगू इच्छिते की, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये एअरस्ट्रीपचे काम प्रगतीपथावर आहे.अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेऊन जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या सर्व मुद्याची नोंद गांभीर्याने घेतलेली आहे. तेव्हा शालेय शिक्षण विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010-2010च्या सामाजिक न्याय विभागाच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे,. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी भाग घेऊन ज्या ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्यांचा आम्ही जरुर विचार करणार आहोत.

सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी सांगितल्या प्रमाणे पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर शेळी-मेंढी विकास महामंडळास निधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भातील निर्णय निर्गमित करण्याची भूमिका आपण घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मतिमंद,डिस्लेक्सीया, मुलांच्या शिक्षणाच्या संबंधातील मुद्दा उपस्थित केला. त्यांच्यासाठी स्पेशल स्कूल सुरु करण्याचे धोरण आपण घेणार आहोत.

.....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर........

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी अपंगांना स्टॉल देण्याबाबतची सूचना केली आहे. या संदर्भात तरतूद वाढवित आहोत. त्यामध्ये या सर्व गोष्टींचा विचार करुन अपंगांच्या कल्याणाबाबत वेगवेगळे नवीन उपक्रम आणि योजना आणण्याचे काम करणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सफाई कामगारांच्या संदर्भात प्रश्न मांडला आहे. सफाई कामगारांसाठी आयोग निर्माण करण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यात या सर्व गोष्टींचा शासन निश्चितपणे विचार करणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अधिकाधिक अपंग विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत सूचना केली असून याबाबतचे आदेश अपंग आयुक्तांना देण्याचे काम केले जाईल. सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी 12 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार योग्य तो निधी मिळाला पाहिजे असा मुद्दा मांडला आहे. मला सांगण्यात आनंद वाटतो, 13 व्या वित्त आयोगाने अशी भूमिका घेतली आहे की, किमान 70 टक्के निधीच्या दृष्टीने बजेटरी प्रोव्हीजन करण्याचे काम केले पाहिजे. त्यादृष्टीने राज्य शासन निश्चितपणे काम करण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी वडखड आणि दहिफळे एमआयडीसीचा विषय मांडला आहे. सोलर बेस इंडस्ट्रीचा विषय देखील मांडला आहे. उस्मानाबाद येथे सोलर बेस इंडस्ट्री करण्याचे काम करीत आहोत. वडखळ व दहिफळे येथील एमआयडीसीबाबत बेसिक सर्व्हे केला असून कॉस्ट नॉर्म्स निश्चित झाल्यानंतर कार्यवाही करण्याचा प्रयत्न करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली आणि सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी कोकणामध्ये ॲग्रो बेस इंडस्ट्री करता येईल का असा प्रश्न मांडला आहे. काजू प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी 7.5 टक्के वॅटच्या रुपाने जो टॅक्स द्यावा लागतो तो रिफंड करण्याची योजना मंत्रिमंडळाने मान्य केली आहे. या माध्यमातून जवळजवळ 75 कोटी रुपयांपेक्षा अधिक फायदा कोकणातील शेतकऱ्यांना होणार आहे. ॲग्रो बेस इंडस्ट्रीचे धोरण राज्य शासनाने जाहीर करण्याचे काम केले. त्या संदर्भात हरकती आणि सूचना ऑनलाईन व वेब साईटच्या

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर........

माध्यमातून मागविण्याचे काम केले आहे. माझी विनंती आहे की, कोकणातील आमदारांनी ॲग्रो बेस इंडस्ट्रीबाबत आपल्या मौल्यवान सूचना नोंदविण्याचे काम केले तर या संदर्भातील अंतिम धोरण जाहीर करण्याच्या दृष्टीकोनातून निश्चितपणे फायदा होईल अशी अपेक्षा करतो आणि गृहनिर्माण विभागाची मागणी क्रमांक-212, सामाजिक न्याय विभागाच्या मागण्या क्रमांक 159 ते 168, उद्योग विभागाच्या मागण्या क्रमांक 136 ते 144 व ग्रामविकास विभागाच्या मागण्या क्रमांक 145 ते 154 या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी आपल्यामार्फत विनंती करतो.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये शिक्षण घेणाऱ्या व्हीजेएनटी आणि ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासन विचार करणार आहे काय?

श्री.सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांच्या सूचनेची नोंद घेण्यात आली आहे.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असताना अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक- 155 ते 158 बाबत ज्या सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले, महत्वाच्या सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांद्वारे ज्या काही महत्वाच्या योजना राबविण्यात येणार आहेत त्या अंतर्गत वाढत्या महागाईला तोंड देण्यासाठी जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरात देता याव्यात यासाठी महाराष्ट्र शासनाने अतिशय अभिनव अशी योजना महाराष्ट्र राज्यात राबविली आहे. या योजनेच्या माध्यमातून गहू, तांदूळ, पामतेल, साखर व तूरडाळ या पाच जीवनावश्यक वस्तू सवलतीच्या दरात देण्यासाठी दरमहा 116 कोटी रुपये खर्च करुन स्थिर भाव योजना महाराष्ट्रात राबवित आहोत. महाराष्ट्र राज्य हे देशातील एकमेव राज्य आहे, ज्या राज्यात अशा पध्दतीची योजना राबवून दरमहा 116 कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत.

सभापती महोदय, गोडावून दुरुस्तीसाठी किंवा अन्नधान्याची वाहतूक करण्यासाठी वाहन भाडे व इतर बाबींसाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.

नंतर 5 डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख ..........

त्यामध्ये जवळजवळ 203,54,39,000 रुपयाच्या मागण्या आमच्या विभागाने केलेल्या आहेत. त्यावर बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त कले. खास करुन नवीन इलेक्ट्रॉनिक बॅलन्स सिस्टम वापरण्याविषयीची विनंती आपण सर्वांना करीत आहोत. जेणेकरुन कोणत्याही प्रकारचे टेंपरिंग त्यात होऊ नये म्हणून अशा प्रकारचे सील करण्याची योजना राज्यामध्ये आपण राबवित आहोत. त्याचबरोबर काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मोठ्या प्रमाणात योजना राज्यात जानेवारी, 2011 पासून आपण राबविणार आहोत. त्याचबरोबर काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, राज्यात मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचा काळा बाजार होतो. या काळ्या बाजाराला कशा पध्दतीने आळा घालता येईल यासाठी पाच कलमी योजना पुढील एक वर्षात राबविण्याचे शासनाचे धोरण आहे. कारण राज्यात जवळजवळ 55 हजार स्वस्त धान्य दुकाने असून त्या सर्व दुकानांवर मॅन्युअली नियंत्रण ठेवणे कठीण आहे म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण कसे करता येईल याचा आपण विचार करीत आहोत. त्या माध्यमातून संपूर्ण वाहतूक यंत्रणेसाठी आपण ग्लोबल पॉलिसींग सिस्टम बसवून त्याद्वारे आपल्याला यावर नियंत्रण ठेवता येईल. त्यानुसार प्रत्येक गावाला आजच्या तारखेला किती धान्य पोहचणार आहे याची माहिती एसएमएसद्वारे देण्यात येईल. सर्व वाहतूक यंत्रणेच्या गाड्यांना एकाच प्रकारचा रंग देण्याची योजनाही यातूनच आपण राबवित आहोत. तसेच द्वारपोच योजनाही आपण संपूर्ण राज्यासाठी सुरु करीत असून त्या माध्यमातून तीन महिन्याचे धान्य गावाला एकाच वेळी देण्यात येईल आणि लाभार्थ्यांपर्यंत ते कसे पोहचेल यासाठीच हा पाच कलमी कार्यक्रम राबवित आहोत. त्यासाठी संपूर्ण यंत्रणा बायो-मेट्रिक पध्दतीने कप्युटराईज्ड करण्याचा प्रकल्प आपण हाती घेतला आहे. अशा प्रकारे काळ्या बाजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध योजना शासन राबविणार आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दक्षता समितीच्या बाबतीत पुण्याचे उदाहरण देऊन सांगितले. मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, दक्षता समितीबाबत अशी तरतूद आहे की, या समितीमध्ये आमदार ज्या पक्षाचा असेल त्याच्या विरोधी पक्षाचा एक सदस्य असेल. समजा एखाद्या वेळेस शिवसेनेचा आमदार असला तर आम्ही विरोधी पक्षाचे सदस्य म्हणून या दक्षता समितीमध्ये राहू. तसेच विधानपरिषदेचा सदस्य सुध्दा समितीमध्ये असावा अशी सूचना सन्माननीय

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख .......

सदस्या डॉ. नीलमताई यांनी केली. त्यानुसार प्रत्येक तालुक्यातील दक्षता समितीमध्ये विधानपरिषदेच्या एक सन्माननीय सदस्याचे नाव समाविष्ट करण्याबाबत नोंद घेतलेली आहे. एवढे सांगून अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाब क्र. 155 ते 158 या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (पाणीपुरवठा राज्य मंत्री) : महोदय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्र. 269 व 270 या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात, अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (महसूल, पुनर्वसन व मदतकार्य राज्य मंत्री) : महोदय, महसूल, पुनर्वसन व मदत कार्य विभागाच्या बाब क्र. 28 ते 32 तसेच बाब क्र. 39 अशा एकंदरित 119.29 कोटीच्या पूरक मागण्या सभागृहात सादर करण्यात आलेल्या आहेत. या मागण्यांवर चर्चा करीत असताना सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला. त्यात सन्माननीय सदस्य संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, ॲड. उषा दराडे, सर्वश्री राजन तेली, रमेश शेंडगे, प्रा. सुरेश नवले आणि श्री. पाशा पटेल या सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले असून त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. त्याचबरोबर त्यांनी अनेक मौलिक सूचनाही या विभागाच्या संदर्भात केल्या आहेत. या सर्व सूचनांची नोंद घेऊन भविष्यात त्यासंदर्भात शासनाच्या वतीने निश्चितच योग्य असा निर्णय घेण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ......

सन्माननीय सदस्य श्री. दीपक सांवत यांनी मुंबई किंवा महाराष्ट्रातील मल्टीप्लेक्स चित्रपटगृह किंवा बहुविध चित्रपटगृहांना 160.40 कोटी इतक्या रक्कमेच्या सवलती चुकीच्या पध्दतीने दिल्या आहेत असा आक्षेप उपस्थित केलेला आहे. मला या निमित्ताने सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र शासनाने दिनांक 29.9.2001 च्या शासन निर्णयानुसार विविध निकष पार पाडल्यानंतर बहुविध चित्रपट गृहे कार्यान्वित झाल्यानंतर त्यांना पहिले तीन वर्ष 100 टक्के सवलत व त्यानंतरच्या दोन वर्षात 75 टक्के सवलत करमणूक शुल्क माफीच्या रुपाने अनुज्ञेय केलेली आहे. या उपरोक्त आदेशानुसार तपासणी केली असता, शासन पात्र प्रमाणपत्र देत असतांना विहित निकष पालनाची खात्री करुनच ही प्रमाणपत्रे देण्यात आलेली आहेत. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात जी बाब उपस्थित केलेली आहे त्यामुळे परत एकदा जिल्हाधिक-यांनी किंवा करमणूक शुल्क विभागातील कर्मचा-यांनी सवलती देतांना संपूर्ण निकषाची खात्री केलेली आहे किंवा नाही ही बाब तपासली जाईल. अटींची पूर्तता चित्रपटगृहांनी केली नसेल तर यासंदर्भात शासन निश्चितपणे वेगळा निर्णय घेईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी जळगाव जिल्हयात दिनांक 2 जोनवारी, 2010 रोजी जे चक्रीवादळ झाले त्या चक्री वादळात सापडलेल्या जनतेला लवकरात लवकर मदत उपलब्ध करुन द्यावी अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे. सदरचा प्रस्ताव कृषी आयुक्तालयाकडे प्राप्त झालेला असल्यामुळे शासन येत्या महिन्याभरात जळगाव जिल्हयात चक्रीवादळामुळे पिकांचे, घरांचे जे नुकसान झालेले आहे त्यांना लवकरात लवकर मदत देण्याचा प्रयत्न करेल असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

या ठिकाणी सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी शिरुर तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयातील रिक्त जागेच्या संदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत. त्याच बरोबर बीड जिल्हयात तलाठी व सेवक पदांच्या भरतीला शासनातर्फे स्थगिती देण्यात आली होती ती स्थगिती

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ......

उठवण्यात यावी अशी मागणी केलेली आहे. परंतु मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या पदांच्या संदर्भातील स्थगिती शासनाने मागील महिन्यातच उठवलेली आहे. या पदांच्या संदर्भात ज्यांची निवड झालेली आहे अशा उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र तसेच इतर प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर शासनाच्या सेवेत सामावून घेतले जाईल असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी नैसर्गिक आपत्तीमध्ये अंशत: किंवा पूर्णत: घरांचे नुकसान होते त्याबाबत जी मदत शासनातर्फे दिली जाते त्या मदतीचे निकष शासनाने बदलावे अशी विनंती केलेली आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये घरांचे जे नुकसान होते त्यांना मदत देण्याचे निकष बदलण्याच्या संदर्भात शासनाने पुनर्विचार सुरु केलेला असून यासंदर्भात लवकरात लवकर निकष बदलण्याचे काम शासनाच्या वतीने केले जाईल अशी मला सन्माननीय सदस्यांना हमी द्यावयाची आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी कायम दुष्काळी भागांना बारमाही सिंचनाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये शासन मदत करीत असते त्यावेळेस शासनाने कायम दुष्काळी भागांना जास्त मदत करावी अशी मागणी केलेली आहे. त्यामुळे या मागणीचा भविष्यकाळात निश्चितपणे विचार करण्यात येईल असे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो. या ठिकाणी उपस्थित असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांनी महसूल, पुनर्वसन व मदतकार्य, भूकंप पुनर्वसन विभागाच्या मागण्यांना पाठिंबा देऊन मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

त्याच प्रमाणे सहकार आणि पणन विभागाच्या बाब क्रमांक 233, 234, 235, 236, 241, 242, 243, 244 व 245 अशा एकंदरीत 418,50,70,000/-एवढया रकमेच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. भारवि...

श्री.प्रकाश सोळंके.....

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य ॲड.गुरूनाथ कुलकर्णी, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी विचार व्यक्त केले आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या कर्जमाफीच्या योजनेतून ज्या लोकांना कर्जमाफीची सवलत मिळाली नाही त्यांना प्रत्येकी 20 हजार रूपयाची सवलत देण्यासाठी रूपये 101 कोटी रूपयाची तरतूद या पुरवणी माध्यमाच्या मागणीतून मान्यतेसाठी आली आहे. त्याबद्दल ॲड.गुरूनाथ कुलकर्णी यांनी शासनाचे अभिनंदन देखील केले आहे त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सन्माननीय सदस्य श्री.राजनजी तेली यांनी महामँगो संस्थेमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे असा मुद्दा उपस्थित केला आहे. वारंवार त्यांनी ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणली आहे. यासंबंधी चौकशी सुरू असून त्या चौकशीचा निष्कर्ष हाती आल्यानंतर यासंबंधातील कारवाई निश्चितपणे केली जाईल. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून साखर कारखान्यांना शासनाच्या हमीवर कर्ज देण्यात आले आहे. सदर रक्कम त्वरित अदा करण्यात यावी अशा प्रकारची मागणी श्री.राजनजी तेली यांनी केली आहे. मला त्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, शासनाने हमी दिलेली आहे. संस्थेकडून कर्ज वसुलीचे सगळे पर्याय संपल्यानंतर मग हमीदाराकडून परतफेड करीत असतो. त्यामुळे सर्व पर्याय संपल्यानंतर मग पैसे देण्याचे काम या शासनाच्या वतीने केले जाईल. परत एकदा आपल्याला धन्यवाद देतो आणि सहकार व पणन विभागाच्या मागण्यांना सर्वांनी पाठिंबा द्यावा अशा प्रकारची विनंती करतो.

............

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या गृह विभागाच्या बाब क्रमांक 12 ते 22 आणि 24 ते 27 अशा एकूण 15 बाबीवर या सदनातील सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी, श्री.सुभाष चव्हाण, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड्.उषा दराडे, प्रा.सुरेश नवले, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.परशुराम उपरकर यांनी अत्यंत मौलिक विचार आणि महत्त्वाच्या सूचना केल्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

येथे विशेष करून पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे त्यात वाढ करावी असे विचार मांडले आहेत. या सूचनेचा शासन नक्की विचार करील, एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. त्याच प्रमाणे ठाणे कारागृहाच्या दुरूस्तीसंबंधी शासनाने विचार करावा, पोलिसांच्या गणवेशासंबंधीचा निधी अपुरा आहे, त्यात वाढ करावी, पोलीस निवासस्थानाची दुरूस्ती करण्यासाठी निधीमध्ये वाढ करण्यात यावी अशा प्रकारच्या सूचना येथे करण्यात आल्या. या सूचनांचा आम्ही नक्की विचार करू एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो. होमगार्ड यांचा निधी वाढविण्यासंबंधीची सूचना असेल, नक्षलग्रस्त भागातील पोलिसांना प्रशिक्षित करण्यासाठी अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याची आवश्यकता असेल, या सूचनांचा जरूर विचार केला जाईल. पुणे शहरातील पोलिसांकडे आज अत्याधुनिक शस्त्रात्रे नाहीत अशी सूचना सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. या सूचनेचा देखील शासनाच्यावतीने विचार केला जाईल. येथे ज्या काही मौलिक सूचना माननीय सदस्यांनी केल्या आहेत, त्याचा शासनाच्या वतीने नक्की विचार केला जाईल एवढेच या निमित्ताने सांगू इच्छितो. बाब क्रमांक 12 ते 22 आणि 24 ते 27 अशा एकूण 15 बाबी आहेत. त्यासाठी एकूण मागणी रूपये 158.65 कोटी असून या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशा प्रकारची विनंती करतो.

.......

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार (जलसंपदा व ऊर्जा राज्यमंत्री ) सभापती महोदय, ऊर्जा विभाग आणि पाटबंधारे विभागाच्या पूरक मागण्यांवर चर्चा करताना सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण, दिलीपराव सोनवणे, राजन तेली, प्रा.सुरेश नवले आणि श्रीमती शोभा फडणवीस यांनी चर्चेमध्ये भाग घेऊन काही उपयुक्त सूचना केल्या.त्यांनी केलेल्या सूचनांवर शासन निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेईल याची मी त्यांना हमी देतो.

जलसंधारण विभाग बाब क्रमांक 106 ते 128 पर्यंतच्या एकूण 1574 कोटी रुपयांच्या पूरक मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

तसेच ऊर्जा विभाग बाब क्रमांक 139,143 आणि 144 च्या 253 कोटी 50 लाख रुपयांच्या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर ( कृषी, पशुसंवधन, रोजगार हमी योजना, परिवहन, विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. उषा दराडे, डॉ.दीपक सावंत, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री केशवराव मानकर, रमेश शेंडगे, दिलीपराव सोनावणे, पाशा पटेल यांनी पूरक मागण्यांमध्ये भाग घेऊन माझ्या विभागावर चर्चा केलेली आहे.

जलसंधारण विभाग बाब क्रमांक 150, 151, 153, 154 मंजूर कराव्या अशी मी विनंती करतो.

रोजगार हमी योजना बाब क्रमांक 169 मंजूर करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

कृषी विभाग बाब क्रमांक 40, 41, 42, 43, 44, 45 46, 47 व 48 मंजूर कराव्या अशी मी विनंती करतो.

परिवहन विभागाची बाब क्रमांक 23 मंजूर करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

भटक्या विमुक्त जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण विभाग- बाब क्रमांक 151, 160, 161, 162 मंजूर कराव्या अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**उपसभापती** : पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपली आहे.

सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव आहे....

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे हा प्रस्ताव परवा चर्चेसाठी येणार आहे...

**उपसभापती** : सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्थ□ि□ होऊ□ गुरुवार, दि□□ 22 जुलै, 2010 रोजी स□ळी 10.30 वाजता पु□ भरेल. सकाळी 10.30 ते दुपारी 12.00 या वेळेत विशेष बैठक घेण्यात येईल. या विशेष बैठकीत आजच्या कामकाजपत्रिकेतील "युवा धोरण" या प्रस्तावावर चर्चा होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन: भरेल.

( सभा□हाची बैठ□ रात्री 8 वाजू□ 48 मि□ि□□□,गुरुवार, दि□□ 22 जुलै, 2010 रोजीच्या स□ळी 10.30 वाजेपर्य□ स्थ□ि□ झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही